(सभापतीस्थानी माननीय सभापती)

<u>नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेबाबत</u>

सभापती : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबतची एक सूचना प्राप्त झालेली आहे. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सर्वश्री रामदास कदम, दिवाकर रावते, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.परशुराम उपरकर यांनी ही सूचना दिलेली आहे. मी माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अनुमती देत आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन असो, पावसाळी अधिवेशन असो वा अर्थसंकल्पीय अधिवेशन असो, प्रत्येक अधिवेशनात कुपोषण आणि बालमृत्यू या प्रश्नासंबंधी सातत्याने चर्चा उपस्थित होत असते. सूचनेमध्ये म्हटल्याप्रमाणे मागील 9 महिन्यांच्या काळात राज्यात 18 हजार बालमृत्यू झालेले आहेत. कारण असे दिले जाते की, विविध आजाराच्या प्रादुर्भावामुळे हे बालमृत्यू झालेले आहेत. बालमृत्यू होण्यास हे आजार कारणीभूत ठरतात की कुपोषण? हा प्रश्न आहे. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाने देखील शासनाच्या कारभारावर ताशेरे ओढले आहेत. राज्यात बालमृत्यू रोखण्यासाठी अनेक योजना राबविल्या जात असताना देखील कुपोषणाचे प्रमाण कमी होत नाही.

सभापती महोदय, काल माननीय महिला व बालविकास मंत्री श्रीमती वर्षा गायकवाड यांनी स्टार टी.व्ही.चॅनेलच्या माध्यमातून या प्रश्नावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. वास्तविक ही जबाबदारी सार्वजनिक आरोग्य विभागाची आहे. नोडल एजन्सीची ही जबाबदारी नाही. विदर्भात विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असताना मेळघाट परिसरात सर्वाधिक बालमृत्यू झालेले आहेत. काल मी तेथील जिल्हा शल्य चिकित्सकांशी चर्चा केली. त्यांनी सांगितलेली आकडेवारी चकीत करणारी आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील बालमृत्यूची आकडेवारी 17500 इतकी असू शकेल असे म्हटले आहे. या प्रश्नावर सभागृहात तातडीने चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. सभागृहापुढे कितीही महत्वाचे कामकाज असले तरी प्रगत महाराष्ट्रात बालमृत्यूच्या घटना या राज्याला काळीमा फासणाऱ्या आहेत. म्हणून प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयावर सभागृहात चर्चा करण्यासाठी अनुमती द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो. यापूर्वी या विषयावर सभागृहात चर्चा झाल्यानंतर एन.आर.एच.एम.च्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु त्यातील एक रुपया देखील या बालकांपर्यंत पोहोचला नाही. मोठया प्रमाणात भ्रष्टाचार करण्यात आला आहे. आपण या कुपोषित भागातील बालकांना न्याय मिळवून देण्यासाठी या विषयावर चर्चा उपस्थित करण्यास अनुमती द्यावी अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, अत्यंत महत्वाचा विषय या ठिकाणी मांडण्यात आला आहे. कुपोषणाच्या माध्यमातून मोठया प्रमाणात या राज्यात बालमृत्यू होत आहेत. मेळघाटमधील कुपोषणाचा प्रश्न अद्याप मिटलेला नाही. नाशिक, जव्हार, मोखाडा या भागातील आदिवासी पाड्यांना भेटी देऊन मी स्वत: परिस्थितीचा अनुभव घेतला आहे. आजही नाशिक जिल्हयात मोठया प्रमाणात आदिवासी बालकांचे कुपोषण सुरु आहे. हे प्रकार थांबले पाहिजेत. एका बाजूला कुपोषण संपुष्टात आणण्यासाठी नवनवीन योजना राबविण्यात येत आहेत. महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य आणि आदिवासी विकास विभाग एकत्रितपणे उपाययोजना करण्यासाठी पुढे सरसावले आहेत. उच्च न्यायालयाने देखील महाराष्ट्र शासनाला नोटीस पाठवून विभागाच्या सचिवांना कुपोषण केव्हा थांबविणार आहात असा प्रश्न विचारला आहे. सभापती महोदय, हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगतीशील राज्यात कुपोषणाच्या माध्यमातून बालमृत्यू होणे योग्य नाही. बालकांना जगण्याचा अधिकारच नाही. गर्भवती आदिवासी मातांचे मृत्यू होत आहेत. कुपोषणामुळे बालमृत्यू होण्याचे प्रकार थांबले पाहिजेत. सदनामध्ये या विषयावर चर्चा घडवून आणली पाहिजे. म्हणून सभागृहाचे आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन या विषयावर प्राधान्याने चर्चा करण्यास अनुमती द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती : सभागृहासमोर उपस्थित झालेला विषय अत्यंत महत्वाचा आणि कुपोषित बालकांचा आहे. या विषयावर प्राधान्याने चर्चा करण्याची माननीय सदस्यांची मागणी रास्त आहे. मी सभागृह सुरु होण्यापूर्वी सभागृहाच्या नेत्यांबरोबर या संदर्भात चर्चा केली. त्यांचेही या दृष्टीने अनुकूल असेच मत आहे. फक्त आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये या बाबतचा कोणताही विषय अंतर्भूत नाही. तांत्रिकदृष्टया कारण पुढे न करता पुढील तीन-चार दिवसाच्या काळात या विषयावरील चर्चेसाठी किमान एक तासाचा अवधी देण्याचा मी जरुर प्रयत्न करेन. त्या दृष्टीने या विषयाला न्याय मिळेल अशी व्यवस्था करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, चर्चेच्या वेळी माननीय महिला व बालविकास मंत्री, माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री आणि माननीय आदिवासी विकास मंत्री यांनी सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे.

सभापती : माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जी सूचना केली ती सूचना शासनाला जरुर कळविण्यात येईल, संबंधित तीनही विभागांचे मंत्री चर्चेच्या वेळी सभागृहात उपस्थित राहतील. मी आज देण्यात आलेली नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासंबंधीची सूचना तांत्रिकदृष्ट्या अस्वीकृत करीत आहे. आता प्रश्नोत्तराचा तास सुरु होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तहसील कार्यालयात अधिकारी/कर्मचारी यांची पदे रिक्त असल्याबाबत

(१) * २२१७१ श्री.हेमंत टकले , श्री.विक्रम काळे , श्री.सतीश चव्हाण , ॲड. उषाताई दराडे , श्री.रमेश शेंडगे , श्री.अरुण गुजराथी , श्री.अनिल भोसले , श्री.किरण पावसकर : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तहसील कार्यालयात एक वर्षापासून अधिकारी/कर्मचारी यांची सुमारे ३० पदे रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०११ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (१), (२), (३) व (४) तहसील कार्यालयात वैजापूर येथे कर्मचाऱ्यांची ३० पदे रिक्त नसून एकूण २१ पदे रिक्त आहेत. पैकी तलाठी, लिपिक-टंकलेखक व शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी दि. ०१.१०.२०११ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून त्यानुसार भरतीबाबतची कार्यवाही चालू आहे.

मंडळ अधिकारी व अव्वल कारकून ही पदे पदोन्नतीने भरावयाची असून ती भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, एखाद्या तहसीलमध्ये एवढ्या प्रमाणात पदे रिक्त राहणे योग्य नाही. पंचायतीमध्ये तलाठी म्हणजे शासन व्यवस्थेमधील शेवटच्या स्तरावरचा अधिकारी असतो. तलाठ्यांची पदे रिक्त असल्यामुळे ग्रामपंचायत पातळीवरील कामे प्रलंबित राहतात. अशा परिस्थितीत या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून ही रिक्त पदे लवकरात लवकर भरण्यात येऊन तेथील प्रशासनाचा कारभार सुरळीत होण्यासाठी किती दिवसात कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, वैजापूर तहसीलमध्ये एकूण २१ पदे रिक्त आहेत. त्यातील १३ पदे तलाठी, मंडल अधिकारी ५, अव्वल कारकून २ आणि नायब तहसीलदाराचे १ पद रिक्त आहे. तलाठ्याची १३ पदे भरण्यासाठी २४ डिसेंबरला परीक्षा होणार असून परीक्षेचा निकाल लागल्यानंतर आठवड्याभरात ही पदे निवड करण्याची प्रक्रिया पूर्ण होईल. मंडल अधिकारी संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत निवड सूची तयार करण्यात आली आहे. निवड सूचीतील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर पदोन्नतीने एक महिन्याच्या काळात ही पदे भरली जातील.

..५..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न औरंगाबाद जिल्हयाशी संबंधित असला तरी राज्यातील प्रत्येक महसुली विभागात अनेक पदे रिक्त आहेत. तलाठी, अव्वल कारकून, नायब तहसीलदार संवर्गातील पदे मोठया प्रमाणात रिक्त आहेत. नागपूर शहरात विधिमंडळाचे अधिवेशन सुरु आहे. नागपूर विभागातील नायब तहसीलदार आणि त्या खालील दर्जाचे कर्मचारी उपोषणाला बसलेले आहेत. जवळजवळ २०० पदे रिक्त आहेत.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 22171..... श्री. पांडुरंग फुंडकर.....

आणि या लोकांना पदोन्नती दिली जात नसल्याने इतर कर्मचाऱ्यांवर त्यांच्या कामाचा ताण पडतो म्हणून या विभागातील पात्र लोकांना पदोन्नती देऊन नागपूर विभागातील नायब तहसीलदार संवर्गातील रिक्त जागा भरण्याच्या संदर्भात गेल्या दोन वर्षांपासून कार्यवाही सुरु आहे. मग त्यात या प्रकरणाची फाईल आयुक्त कार्यालयातून मंत्र्यांच्या कार्यालयापर्यंत फिरत आहे, निर्णय मात्र कोणताच होत नाही. माझी विनंती आहे की, नागपूर विभागातील रिक्त पदे भरण्याबाबतचा निर्णय हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासन घेणार आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, हा प्रश्न जरी एका तालुक्यापुरता विचारलेला असला तरी संपूर्ण राज्यातच अशी परिस्थिती आहे, हे नाकारता येणार नाही. या निमित्ताने मी असे सांगू इच्छितो की, राज्यात महसूल विभागातील रिक्त पदे भरत असताना प्रामुख्याने "क" आणि "ड" संवर्गातील पदे भरण्यासाठी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार तलाठ्याची 1067 रिक्त पदे भरली जाणार आहेत. त्याचबरोबर इतर संवर्गातील मिळून अनुक्रमे 4787, 1373 अशी मिळून 6160 पदे भरण्याची सुध्दा परवानगी मिळाली आहे. ही 6160 पदे येत्या तीन महिन्यात आढावा घेऊन भरली जातील. विदर्भाच्या बाबतीत प्रामुख्याने पदोन्नतीबाबतचा प्रश्न जो निर्माण झालेला आहे तो विशेष करुन सेवा ज्येष्ठता आणि बिंदू नामावली यासंदर्भात आहे. यामध्ये 144 पदांचा प्रश्न असून त्यातील त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न सुरु आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : मंत्री महोदयांनी पदोन्नतीबाबतच्या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे सांगितले पण गेल्या वर्षभरापासून हे काम सुरु असून अजून किती दिवस हे चालणार आहे, तसेच हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर नागपूर विभागातील महसूल अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचा प्रश्न लवकर निकाली काढणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, यात सर्वात महत्वाचा प्रश्न बिंदू नामावली आणि सेवा ज्येष्ठतेबाबत निर्माण झालेला असून बिंदू नामावलीबाबत अत्यंत बारकाईने तपासणी होत असल्याने लवकर मान्यता मिळत नाही. तरी देखील या त्रुटी लवकरच दूर करुन तातडीने ही पदोन्नतीची पदे भरली जातील. तसेच आवश्यक असेल तेथे ॲडहॉक बेसिसवर ही पदे भरण्यात येतील. कारण या प्रोसिजरला बराच कालावधी लागत असल्याने काही कर्मचाऱ्यांची पदोन्नतीची संधी सुध्दा

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निघून जाते व पदोन्नती थांबते व परिणामी जागा सुध्दा रिक्तच राहतात. यासाठी संपूर्ण राज्यातील या पदांची बिंदू नामावली व सेवा ज्येष्ठता याबाबत पूर्णत: संगणकीकरण करण्याचे ठरविले असून त्यासाठी एक साफ्टवेअर सुध्दा डेव्हलप करण्यात आले आहे. मॅन्युअली संपूर्ण राज्यातून ही माहिती गोळा करण्यात बराच वेळ जातो म्हणून या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून ही सेवाज्येष्ठता अद्ययावत करण्यात येईल. तसेच ही अद्ययावत स्वरुपाची माहिती वेबसाईटला सुध्दा टाकली जाईल. त्याचबरोबर नागपूर विभागातील रिक्त पदे तातडीने भरली जातील.

श्री. अरुण गुजराथी : महोदय, मी विचारतो तो प्रश्न थोडा वेगळा असला तरी महत्वाचा असल्याने आपल्या परवानगीने विचारु इच्छितो की, कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने तलाठ्यांना लॅपटॉप व संगणकाचे प्रशिक्षण देण्याची कार्यवाही शासनाच्या माध्यमातून करण्यात येईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, सुवर्ण जयंती महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने आपण "सुवर्ण जयंती राजस्व अभियान" हा कार्यक्रम या वर्षी सुरु केला असून या प्रकल्पात सर्व तलाठ्यांना लॅपटॉप देऊन सर्व लॅपटॉप ऑनलाईन जोडली जातील असा निर्णय घेतला आहे. तसेच यासाठी एक सॉफ्टवेअर सुध्दा तयार झाले असून ही कार्यवाही सुरु आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, वैजापूर तहसील अंतर्गत एकूण किती पदे मंजूर आहेत ? तसेच यासंदर्भात मी सभागृहात अर्धा-तास चर्चा उपस्थित केली असता शासनाच्या वतीने उत्तर देण्यात आले होते की, महसूल विभागात संपूर्ण संगणकीकरण करुन पदांच्या पॅटर्नमध्ये सुध्दा बदल करण्यात येईल. अशा प्रकारे संगणकीकरण केल्यानंतर पदे कमी होणार आहेत की नाही, त्यादृष्टीने शासन धोरण ठरविणार काय ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, वैजापूरमध्ये एकूण 106 मंजूर पदे असून त्यापैकी 85 पदे कार्यरत आहेत व 21 पदे रिक्त आहेत.

श्री. भाई जगताप : महोदय, लोकशाही अधिक लोकाभिमूख व्हावी म्हणून आपण पंचायती राज्य व्यवस्थेचा स्वीकार केला त्याचाच हा एक महत्वाचा घटक आहे. गेल्या दोन वर्षांपासून सभागृहात वारंवार रिक्त पदांचा प्रश्न वेगवेगळ्या माध्यमातून सन्माननीय सदस्य उपस्थित करीत

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, राज्यभरात अशा एकूण किती जागा रिक्त आहेत आणि प्रत्यक्षात भरती कधी केली जाणार आहे, तसेच पदोन्नतीचा निर्णय किती दिवसात घेतला जाणार आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, प्रामुख्याने "क" आणि "ड" या दोन संवर्गातील भरती करण्यासाठी आपल्याला मान्यता मिळाली असून मुद्रांक व भूमी अभिलेख यांचा सुध्दा यामध्ये समावेश आहे. या संपूर्ण विभागातील 6160 रिक्त पदांचा आढावा येत्या तीन महिन्यात घेण्यात येईल. संपूर्ण राज्यातील पदांचा विचार करता अप्पर जिल्हाधिकारी 85, उप जिल्हाधिकारी 528, तहसीलदार 651, नायब तहसीलदार 1087 आणि तलाठी 12658 इतकी पदे असून त्यांना वेळेत पदोन्नती मिळावी यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

प्रा. सुरेश नवले : महोदय, महसूल विभागातील रिक्त पदे भरण्यासाठी ज्या परीक्षा घेतल्या जातात त्या लेखी स्वरुपाच्या असतात. यामध्ये जो प्रश्न संच उमेदवारांना दिला जातो ती प्रश्नपत्रिका राज्य शासन काढते, सामाजिक संस्था काढते की एखाद्या राजकीय पक्षाला ही जबाबदारी दिलेली आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, तलाठी अथवा लिपीक या पदासाठीच्या ज्या परीक्षा घेतल्या जातात त्या परीक्षेचे प्रश्नसंच जिल्हाधिकाऱ्यांमार्फत काढले जातात.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विदर्भ विकास कार्यक्रमांतर्गतचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(2) *21572 श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.जगदीश गुप्ता : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सन 2009-2010 व सन 2011-2012 या वर्षाकरिता विदर्भ विकास कार्यक्रमांतर्गत गडचिरोली जिल्हयातील नक्षलग्रस्त भागासाठी आदिवासी उपयोजनेंतर्गत विविध योजना राब विण्या -बाबत दिनांक 16 ऑगस्ट, 2010 रोजी शासनाने शासन निर्णय निर्गमित केला होता, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, विदर्भातील 11 जिल्ह्यांकरीता आदिवासी उपाययोजनेंतर्गत सन 2009-2010 मध्ये रु.44 कोटी, सन 2010-2011 मध्ये रु140 कोटी व सन 2011-2012 मध्ये रु 155 कोटी अशी एकूण रु.399 कोटी रुपयांची विदर्भ विकास कार्यक्रमांतर्गत तरतूद केली होती, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने दिनांक 16 ऑगस्ट, 2010 रोजीच्या शासन निर्णयानुसार गत 3 वर्षात विदर्भ विकास कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध करुन दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(5) असल्यास, सदर निधी लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने काणेती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे?

श्री.बबनराव पाचपुते : (1) होय.

(2) हे अंशत: खरे आहे. आदिवासी विकास विभागाच्या दिनांक 16 ऑगस्ट, 2010 च्या शासन निर्णयान्वये विदर्भ विकास कार्यक्रम सन 2009-2012 या तीन वर्षासाठी रु.339 कोटीची तरतूद मंजूर करण्यात आलेली होती. तथापि दिनांक 20 ऑक्टोबर, 2010 च्या शासन शुद्धीपत्रकाद्वारे सन 2009-10 या आर्थिक वर्षात रु. 35 कोटी, सन 2010-2011 या आर्थिक वर्षात रु. 121 कोटी व सन 2011-2012 या आर्थिक वर्षासाठी रु.136 कोटी अशी एकूण रु. 292 कोटीची तरतूद सदरहू कार्यक्रमासाठी मंजूर करण्यात आलेली आहे.

(3) नाही. विदर्भ विकास कार्यक्रमांतर्गत आदिवासी उपयोजनेंतर्गत घेण्यात आलेल्या

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 21572.....

योजनांसाठी सन 2010-2011 या आर्थिक वर्षाकरिता डिसेंबर, 2010 च्या अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेली रु. 8.00 कोटी एवढी तरतूद दि. 7 जानेवारी, 2011 च्या शासन निर्णयान्वये तसेच सन 2011-12 या आर्थिक वर्षाकरिता जुलै, 2011 च्या अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेली रु. 22.00 कोटी एवढी तरतूद दि. 20 सप्टेंबर, 2011 च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेली आहे.

(4) व (5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शासनाने विदर्भ विकास कार्यक्रमाची घोषणा मोठ्या थाटामाटात केली होती. त्यानंतर 16 ऑगस्ट, 2010 च्या शासन निर्णयान्वये 339 कोटी रुपये आदिवासी विकास विभागासाठी मंजूर करण्यात आले होते. त्यानंतर शुध्दी पत्रक काढण्यात आले आणि या 339 कोटीऐवजी ही रक्कम 292 कोटी एवढी कमी करण्यात आली. या 292 कोटीमधून सुध्दा गेल्या तीन वर्षात फक्त 30 कोटीची रक्कम शासनाकडून वितरित केली, हे उत्तरात सुध्दा मान्य केले आहे. माझा प्रश्न असा आहे की, अशी कोणती परिस्थिती निर्माण झाली होती की, शासनाला 339 कोटीची तरतूद असताना शुध्दी पत्रक काढून ती रक्कम कमी करण्याची गरज भासली ? अगोदरच विदर्भाचा निधी प्रत्येक वेळी कपात करण्यात येतो आणि दुसऱ्या बाजूला दिलेला निधी कमी करण्यात येतो. याचा अर्थ आदिवासींच्या प्रती शासन किती संवेदनशील आहे हे सिध्द होते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / मुद्रणासाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, गेल्या तीन वर्षात 292 कोटी रुपयांपैकी केवळ 30 कोटी रुपये वितरित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे उर्वरित 262 कोटी रुपये वितरित न करण्याची कारणे काय आहेत ? आदिवासी विभागाला हा निधी कोणत्या लेखाशीर्षाखाली वितरित करण्यात आला होता ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, गडचिरोली जिल्हयाच्या विकासासाठी स्वतंत्र पॅकेज तयार करण्यात आले. मात्र या पॅकेजच्या संदर्भात कमी प्रस्ताव आल्याचे दिसून आले. 339 कोटी रुपयांच्या प्रस्तावा ऐवजी 292 कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. आदिवासी उपयोजनेच्या अंतर्गत हा निधी खर्च करण्यासाठी प्रत्येक तालुक्यामध्ये एकलव्य इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यात येणार आहे. या करिता राज्य शासनाला केंद्र शासनाकडून 214 कोटी रुपयांचा निधी मिळणार होता.

सभापती महोदय, दुसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, केंद्र शासन एकलव्य इंग्रजी शाळेच्या संदर्भात पैसे देण्यास तयार होते परंतु आपल्याला गडचिरोली जिल्हयाच्या प्रत्येक तालुक्यात एक या प्रमाणे इंग्रजी शाळा सुरु करावयाची होती. ज्यावेळेस पैसे देण्याची वेळ आली तेव्हा केंद्र शासनाने सांगितले की, सात-बारा जोडल्याशिवाय हे पैसे दिले जाणार नाहीत. त्यामुळे जमिनीच्या खरेदीच्या संदर्भात शासनाने 31 ऑगस्ट, 2009 रोजी परिपत्रक काढून जमीन खरेदीचे आदेश देण्यात आले.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला मंत्रीमहोदयांनी अचूक उत्तर द्यावे. प्रस्ताव कमी आले असतील तर जास्त प्रस्ताव मागविण्याच्या संदर्भात आपल्या विभागाकडून काही प्रयत्न झाला होता काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, अधिक प्रस्ताव मिळण्याच्या संदर्भात जरुर ते प्रयत्न केले जातील. जमिनीच्या संदर्भातील अडचणी आम्ही केंद्र शासनाच्या मंत्र्यांसमोर मांडल्या नंतर त्यांनी असे सांगितले की, तुम्ही दोन नक्षलग्रस्त जिल्हयासाठी ज्या शाळा मागत आहात त्या शाळा दोन जिल्हयात सुरु न करता एकाच ठिकाणी सुरु केल्या तर आम्ही प्रत्येक शाळेसाठी 100-100 कोटी रुपये देऊ. एज्युकेशन हब सुरु करण्यासाठी राज्य शासनाने दोन जिल्हयांची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते.....

निवड केली असून शाळेसाठी लागणारी जमीन मिळविण्याचे काम प्रत्यक्षात सुरु झालेले आहे. शाळांसाठी जमीन खरेदी केल्यानंतर केंद्र शासनाकडून इंग्रजी शाळांसाठी म्हणजे के.जी. टू पी.जी शाळांसाठी 100-100 कोटी रुपये उपलब्ध होऊ शकतील. शिक्षणाचा बॅकलॉग नष्ट व्हावा, यासाठी ही योजना आपण सुरु केलेली आहे.

सभापती महोदय, दुस-या ज्या योजना आहेत त्यामध्ये वन क्षेत्राच्या माध्यमातून आदिवासी लोकांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी बांबू लागवड तसेच इतर योजनेसाठी 10 कोटी रुपयांची तरतूद दर वर्षी केलेली आहे. या योजनेच्या संदर्भात आदिवासी लोकांकडून प्रस्ताव येत असून बांबूवर प्रक्रिया करणारे 400 ते 500 प्रोजेक्ट होऊ शकतात. एका एका प्रोजेक्टसाठी 10-10 कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. या संदर्भातील पहिला प्रोजेक्ट साईन सुध्दा करण्यात आला असून एका प्रोजेक्टमध्ये किमान 500 लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. आश्रमशाळे ऐवजी वसतिगृहाची क्षमता वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे परंतु आता जी क्षमता आहे तीच पूर्ण होत नसल्यामुळे खर्च होऊ शकला नाही, अशी वस्तुस्थिती आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, 339 कोटीं पैकी 292 कोटी रुपयांचे प्रस्ताव आलेले आहेत अशी माहिती माननीय मंत्री महोदयांनी दिलेली आहे. प्रस्ताव देण्याचे काम....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे प्रश्न विचारीत आहेत त्यामध्ये मी थोडीशी दुरुस्ती करु इच्छितो की, 292 कोटी रुपयांचे प्रस्ताव आले नव्हते तर 339 कोटी रुपयांची जी तरतूद केली होती ती 292 कोटी रुपयांवर आणली गेली. या योजनेसंदर्भात शासनाने केवळ 30 कोटी रुपयांचेच प्रस्ताव मागवले आहेत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, प्रस्ताव देण्याचे काम संबधित विभागाने करणे आवश्यक होते. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सांवत यांनी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन याच विषयावर चर्चा घ्यावी, यासाठी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता. या योजनेसाठी पैसे असतांना सुध्दा प्रस्ताव येत नसेल तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे काय ?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय,मला असे वाटते की, सन्माननीय सदस्यांना हा प्रश्न समजलेला नाही. सन्माननीय सदस्य या ठिकाणी जो प्रश्न विचारीत आहेत, तशी वस्तुस्थिती नाही. या योजनेच्या संदर्भात एक पॅकेज तयार करण्यात आले होते व त्यामध्ये कोण कोणत्या गोष्टींना प्राधान्य दिले जावे हे ठरवले गेले होते. या प्रस्तावाच्या व्यतिरिक्त नक्षलग्रस्त भागासाठी 45 कोटी रुपयांचा निधी देण्यात आलेला आहे. सन 2011-12 मध्ये 559 कोटी रुपये नागपूर, वर्धा, भंडारा,गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, बुलढाणा,अकोला, वाशिम, अमरावती व यवतमाळ या जिल्हयांसाठी उपलब्ध करुन दिलेला आहे,ही वस्तुस्थिती आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझा प्रश्न पूर्ण न होताच मंत्री महोदयांनी उत्तराला सुरुवात केली. मंत्री महोदयांना जे काही उत्तर द्यावयाचे असेल ते त्यांनी द्यावे. आम्हाला प्रश्न समजला की, समजला नाही हा मुद्दा बाजूला ठेवू. विभागातील अधिका-यांनी आपल्याला काय समजावले, याची मला कल्पना नाही. आम्ही कुपोषण, शिक्षण, उपेक्षित राहिलेल्या आदिवासींबद्दल विचार मांडत आहोत,याची कल्पना आपल्या विभागाला नाही काय ? या योजनेअंतर्गत जो निधी ज्या निकषाखाली देण्यात आला होता, त्या निकषाखाली सदर प्रस्ताव का आले नाहीत ? प्रस्ताव आले नसतील तर संबंधित अधिकाऱ्यावंर आपण कारवाई करणार आहात काय ?

सभापती महोदय, इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करण्यासाठी एकंदर किती कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : इंग्रजी शाळांसाठी 214 कोटी रुपये दिले जातील, असे केंद्र शासनाने सुरुवातीला सांगितले होते. शाळा ज्या तालुक्याच्या ठिकाणी सुरु करावयाच्या आहेत त्या ठिकाणच्या जमिनीचा सात-बाराचा उतारा आदिवासी विभागाच्या नावाने असल्याशिवाय आम्ही पैसे देऊ शकणार नाही, असे केंद्र शासनाने सांगितले. जमिनीच्या संदर्भातील अडचणी दूर करण्यासाठी राज्य शासनाने 31 ऑगस्ट रोजी परिपत्रक काढले व जमीन खरेदीचे अधिकार वाढविण्यात आले. रेडीरेकनरपेक्षा 20 टक्के जास्त किंमत असेल तर त्या जमिनीचे अधिकार पीओला देण्यात आले, रेडीरेकनरच्या 50 टक्क्यापेक्षा जास्त किंमत असेल तर त्या संदर्भातील जमिनीचे अधिकार

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एटीसीकडे दिले व रेडीरेकनरच्या दुप्पट जमिनीची किंमत असेल तर त्या संदर्भातील अधिकार आयुक्तांना दिले तसेच यापेक्षाही जास्त किंमत असेल तर तो प्रस्ताव शासनाकडे पाठवून शासन ती जमीन विकत घेईल अशा प्रकारचे परिपत्रक काढण्यात आले होते. जमिनी खरेदी करण्यामध्ये शासनाला मोठया प्रमाणात यश मिळाले असून शासनाने या योजनेसाठी पुणे, ठाणे येथे देखील जमिनीं खरेदी केलेल्या आहेत. जोपर्यंत जमिनीचे सात-बाराचे उतारे दिले जात नाही, तोपर्यंत केंद्र शासनाकडून पैसे मिळणार नव्हते. त्यामुळे आता शासनाकडून मोठया प्रमाणात जमिनींची खरेदी करण्यास सुरुवात झालेली आहे. या योजनेचे पैसे लॅप्स झाले नसून अटींची पूर्तता केल्यानंतर हे पैसे आपल्याला उपलब्ध होणार आहेत. जमिनी खरेदी करण्यामध्ये विलंब झालेला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, विविध कार्यक्रमांसाठी हा पैसा आलेला आहे. गडचिरोली जिल्हयाचे पालक मंत्री श्री.आर.आर.पाटील यांना मी यादी दिली असून त्या यादीमध्ये गडचिरोली येथील 50 टक्के गावांमध्ये रस्ते, शाळा, अंगणवाडया, पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. रस्ते, शाळा, अंगणवाडया, पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देऊन हे सर्व प्रश्न सोडविण्याऐवजी तेथील इंग्रजी शाळांचा प्रश्न हे शासन सोडवावयास निघाले आहे. गडचिरोली जिल्हयात आजही मोठया प्रमाणात नक्षलवाद वाढत आहे. मात्र शासनाने प्रत्येक ठिकाणी पैसा कमी केलेला आहे. नक्षलग्रस्त भागासाठी आलेले पैसे सुध्दा अद्याप शासनाने दिलेले नाहीत. आदिवासी विभागात रस्ते तयार करण्यात आले परंतु त्याचेही पैसे दिलेले नाहीत, पोषण आहारासाठी आलेला पैसाही आपण पूर्ण देत नाही. आदिवासी विभागासाठी आलेला पैसा अर्धवट दिला जात आहे. माझा प्रश्न आहे की, ज्या ठिकाणी रस्ते, शाळा, अंगणवाडया, पिण्याचे पाणी नाही तेथे या सुविधा कधी उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत ? रस्ते, शाळा, अंगणवाडया, पिण्याच्या पाण्यासाठी निधी दिला जाणार आहे काय ? आदिवासींसाठी 339 कोटी रुपये असून त्यापैकी केवळ 30 कोटी रुपये देणार असाल तर अशा पध्दतीचे बजेट आपण का करता, असा माझा सवाल आहे. आदिवासींची फसवणूक न करता आदिवासींचे पैसे पूर्णपणे दिले जाणार आहेत काय ?

यानंतर श्री. भारवि.....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.21572....

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, होय.

सभापती : मंत्रिमहोदय, आपण उत्तर द्यावे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला मी "होय" असे उत्तर दिलेले आहे. रस्त्याच्या संदर्भात प्रस्ताव आला आहे. या वर्षी चंद्रपूर जिल्ह्यासाठी 104 कोटी रूपये आणि गडचिरोली जिल्ह्यासाठी 161कोटी रूपयांची तरतूद केली आहे. या शिवाय सन्माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे अधिकचा प्रस्ताव आला तर त्याला देखील मंजुरी देण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला असे वाटते की, या प्रश्नासंबंधी काही तरी गल्लत होत आहे. सभागृहाची दिशाभूल केली जात आहे. विदर्भ विकास पॅकेज अंतर्गत ही घोषणा करण्यात आली होती. विदर्भासाठी पॅकेज घोषित केल्यानंतर तीन वर्षामध्ये फक्त 30 कोटी रूपयेच खर्च होतात. प्रस्ताव खालून कमी आले. 339 कोटी रूपयांची घोषणा झाली होती. हा निधी 289 कोटी पर्यंत आणला. नक्षलवादी जिल्ह्यासाठी व मेळघाटसाठी आपण अमुक एका ठिकाणी निधी खर्च करण्यासंबंधीचा प्लॅन तयार केला होता का ? तरतूद केलेली असताना देखील लेखा शीर्ष का निर्माण करण्यात आले नाही ? तेव्हा यासंबंधी आपण सभागृहाला अवगत करणार आहात की नाही ? आम्ही इंग्रजी शाळेचा प्रश्न विचारला नव्हता. केंद्र सरकार किती पैसा देणार आहे, किती इंग्रजी शाळा काढण्यात येणार आहेत, असा प्रश्न आम्ही विचारला नव्हता. मूळ प्रश्न असा आहे की, जेवढा निधी जाहीर करण्यात आला होता, त्यास कट लावण्यात आला. 290 कोटी रूपयांपैकी फक्त 30 कोटी रूपये खर्च झालेले आहेत. उर्वरित निधी खर्च का झालेला नाही, त्यास कोण जबाबदार आहेत, त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय, असा माझा प्रश्न आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या संबंधी सविस्तर उत्तर दिले पाहिजे. आपण विदर्भासाठी 339 कोटी रूपयांचे पॅकेज तयार केलेले आहे. या पॅकेज अंतर्गत आदिवासी उप योजने अंतर्गत प्रत्येक तालुक्यात आदिवासींसाठी एक इंग्रजी माध्यमाची निवासी शाळा करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी पहिल्या वर्षासाठी 24 कोटी रूपये, दुसऱ्या वर्षासाठी 90 कोटी आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते...

तिसऱ्या वर्षासाठी 100 कोटी रूपये असे मिळून 214 कोटी रूपये देण्याचे प्रस्तावित आहे. वन क्षेत्राच्या माध्यमांतून आदिवासी लोकांना स्वयंरोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने बांबू लागवड, अगरबत्ती निर्मिती, मद्य निर्मिती यासाठी सन 2009-2010 मध्ये 10 कोटी, सन 2010-11 मध्ये 10 कोटी आणि सन 2011-12 साठी 10 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. वन्य प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी सोलार कुंपण बांधण्यासाठी सन 2010-11 साठी 5 कोटी आणि सन 2011-12साठी 10 अशी मिळून 15 कोटी रूपयांची तरतूद करावी अशी प्रकारची सूचना आली आहे होती. पुढील दोन वर्षात विदर्भातील वसतीगृहातील विद्यार्थ्यांची संख्या 5 हजार ने वाढवायची आहे. त्यासाठी 30 कोटी रूपयांची व्यवस्था केली आहे. म्हणजे सन 2010-11 व 2011-12 साठी अनुक्रमे 15-15 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली होती. तसेच गडचिरोली व अमरावती जिल्ह्यामध्ये भरती पूर्व वन संरक्षक प्रशिक्षणासाठी सन 2009-2010 साठी 10 कोटी रूपये, सन 2010-2011 साठी 20 कोटी रूपये आणि सन 2011-2012 साठी 20 कोटी रूपये अशी मिळून 50 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. सर्व रक्कम मिळून एकूण 339 कोटी रूपये होतात. त्यानंतर प्रत्यक्षात आढावा घेतला गेला.

आदिवासी उप योजने अंतर्गत एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्यासाठी सन 2009-10, सन 2010-11 आणि सन 2011-12 यासाठी 214 कोटी रूपयांची तरतूद केली आहे ती बरोबर आहे. यात अडचण केंद्र सरकारची आल्यामुळे निधी राहिलेला आहे. ज्यावेळी आपण तरतूद देणार त्यावेळी ते देखील देणार आहेत असा शब्द दिलेला आहे. वन क्षेत्राच्या माध्यमांतून आदिवासी लोकांना स्वयंरोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने बांबू लागवड, अगरबत्ती निर्मिती, मद्य निर्मितीसाठी 30 कोटी रूपयांचा प्रस्ताव होता. प्रत्यक्षात वन विभागाकडून जेवढे प्रस्ताव आले त्याप्रमाणे त्यांना निधी दिलेला आहे. वन्य प्राण्यांकडून पिकांचे संरक्षण करण्यासाठी सोलार कुंपण बांधण्यासाठी 15 कोटी रूपयांचा प्रस्ताव होता. प्रत्यक्षात दीड कोटी रूपयांचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. अन्य ठिकाणचे प्रस्ताव

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आल्यानंतर देखील त्यास निधी उपलब्ध करून देण्यासंबंधीचा विचार करण्यात येईल. गडचिरोली, अमरावती येथे भरती पूर्व वन सरंक्षक प्रशिक्षण यासाठी 3 कोटी आपण दिले होते. तसेच, पुढील दोन वर्षात आपण आश्रमशातील क्षमता वाढविण्याचा प्रयत्न करणार आहोत. आपल्याकडील जी वसतिगृहे आहेत त्यातील क्षमता अद्याप पर्यंत पूर्ण भरलेली नाही. ती क्षमता भरल्या नंतर जेथे जेथे गरज लागेल तेथे तेथे मुलांसाठी वसतिगृहे सुरू करू शकतो. यामध्ये आपल्याला कुठलीही अडचण नाही.

सभापती : मी सन्माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य यांची एकच मागणी आहे की, 339 कोटी रूपयांची तरतूद केली असताना आपण विदर्भ विकास पॅकेज अंतर्गत फक्त 292 कोटी रूपये देण्याचे प्रस्तावित केले आहे. यापैकी प्रत्यक्षात फक्त 30 कोटी रूपये उपलब्ध झाले. म्हणजे उर्वरित निधी उपलब्ध झालेला नाही. या प्रश्नासंबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी चांगले उत्तर दिलेले आहे. आपणही चांगला पाठपुरावा केलेला आहे. त्यामुळे मी पुढच्या प्रश्नाकडे वळतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी एकच प्रश्न विचारतो. मघाशी सन्माननीय मंत्रिमहोदयांनी अमरावती जिल्ह्याच्या निधीचा उल्लेख केला. अमरावती विभागात जनरेटर खरेदीमध्ये अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी जवळ जवळ 68 लाख रूपयांची अनियमितता केली आहे. या संबंधातील चौकशी देखील झाली आहे व जबाबदारी निश्चित करण्यात आली. एवढे सगळे झाल्यानंतर आपण श्री.अण्णा हजारे यांच्या लोकपाल विधेयकाची वाट बघत आहात काय ? आपण या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे ती सभागृहाला सांगावी.

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सदर प्रश्न हा वेगळा आहे. तरी देखील मी उत्तर देत आहे. या प्रकरणासंबंधी चौकशी नेमली होती. तिचा अहवाल प्राप्त झाला आहे.चौकशी अहवालामध्ये सुचविल्याप्रमाणे या अधिवेशनाच्या आत कारवाई करण्यात येईल. येथे निधीला कट लावला आहे असा देखील उल्लेख करण्यात आला होता. आम्ही निधीला कट लावलेला नाही. आम्ही 192 + 45 कोटी रूपये वाढवून दिलेले आहेत. त्यामुळे येथे कट लावण्याचा प्रश्नच येत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या अधिवेशनाच्या काळात कारवाई करू असे सांगितले आहे. येत्या गुरूवारी अधिवेशन संपणार आहे. त्यामुळे शासन केव्हा कारवाई करणार आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हा प्रश्न मूळ तारांकित प्रश्नाशी निगडित नाही. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला म्हणून मी उत्तर दिले आहे. या प्रकरणाचा अहवाल शासनाकडे परवा प्राप्त झाला आहे. अधिवेशन अजून 2-3 दिवस चालणार आहे. त्या आधी कारवाई करून माहिती देण्यात येईल.

.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कडेगाव तालुक्यातील (जि.सांगली) ठेकेदारांकडून येरळा नदीच्या पात्रातील अमर्यादित वाळू उपसा होत असल्याबाबत

(३) * २१५२२ श्री.भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील , डॉ.रणजित पाटील , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.रामनाथ मोते : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडेगाव तालुक्यातील (जि.सांगली) ठेकेदारांनी येरळा नदीच्या पात्रातील अमर्यादित वाळू उपसा केल्याने येरळा नदीच्या पात्राचे अस्तित्व धोक्यात येत असून पाणीटंचाईचे चटके तालुक्यातील नदीकाठच्या लोकांना बसत असल्याचे शिवाय पर्यावरण संतुलनाचे नियम धाब्यावर बसवत असल्याचे माहे सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारे शासनाची व पर्यावरणाची लूट करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (१) (२) व (३) भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा सांगली यांनी सन २०११-१२ या वर्षासाठी येरळा नदी पात्रातील वाळूगट भूजल शास्त्रीय दृष्ट्या अद्याप प्रमाणित केलेले नाहीत.

कडेगांव तालुक्यात एप्रिल २०११ पासून वाळू/रेतीचे अवैध उत्खनन करणाऱ्या विरुध्द कारवाई करुन रक्कम रु. ४,६५,७५०/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच एक प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, वाळू उपसा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्रात चिंतेचा होत चालला आहे. कडेगाव तालुक्यातील येरळा नदीच्या काठावरील वाळूचे मोठ्या प्रमाणावर अनधिकृतपणे उत्खनन होत चालले आहे. त्यातून पर्यावरणाला व नदीच्या पात्राला धोका निर्माण झाला आहे. माझ्या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आले आहे की, सन 2011-12 या वर्षासाठी येरळा नदी पात्रातील वाळूगट अद्यापि प्रमाणित करण्यात आलेले नाहीत. आता डिसेंबर संपत आलेला आहे. त्यामुळे अद्याप पर्यंत वाळू गट प्रमाणित न करण्याचे कारण काय आहे ? वाळूमुळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारी वाढत चालली आहे. वाळू उत्खननाचे ठेके खाजगरित्या काढण्याऐवजी सरकार तो उद्योग आपल्या ताब्यात घेणार आहे काय ? तसेच शासन वाळूसाठी पर्यायी काही विचार करीत आहे काय ?

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या संदर्भात सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका क्रमांक 568/1988 दाखल करण्यात आली तिचा निकाल नोव्हेंबर 1989 मध्ये लागला. त्याप्रमाणे या नदीमधील वाळू उत्खननाला बंदी घालण्यात आली. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने सुचविलेल्या समितीमध्ये उप संचालक, भू जल व खनिकर्म संचालनालय, संबंधित तहसीलदार व जिल्हाधिकारी कार्यालयाचा एक प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात आला. या समितीने शिफारस केल्यानंतर स्थानिक लोकांची घर बांधण्याची गरज लक्षात घेऊन 20 ब्रास पर्यन्त वाळू उत्खनन करण्यास परवानगी देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाकडून निर्देश देण्यात आले. या संदर्भात माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे की, या समितीने दरवर्षी वाळूचा लिलाव करावयाचा किंवा काय याबाबत निर्णय झाला आहे काय? 20 ब्रासपर्यन्त प्रमाणित वाळू काढली जाते त्यामुळे अवैध वाळूचे उत्खनन होत असे अनधिकृत वाळू उत्खनन करणाऱ्या 39 व्यक्तींवर दंडात्मक योग्य ती कारवाई करुन 4 लाख 75 हजार 750 रुपये दंड वसूल केला आहे. त्यामध्ये एका फौजदारी गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. दुसरा प्रश्न यामध्ये वाळू गट निर्माण करण्यासंबंधी विचारण्यात आला आहे. ते गट समितीने निर्माण करावयाचे असून त्याबाबत सूचना देण्यात येतील. तिसरा प्रश्न वाळूला पर्याय निर्माण करण्याबाबत विचारण्यात आला आहे. सभापती महोदय, व्यवसाय करणे हे सरकारचे काम नाही. परंतु दगडापासून रेती तयार करण्याचा एक पर्याय असून त्याकरिता त्यांना अधिक प्रमाणात सवलत देण्याबाबत शासन स्तरावर विचार विनिमय सुरु आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिंधुदुर्ग जिल्ह्यात सुवर्णजयंती योजनेंतर्गत कोकम प्रकल्पास निधी देऊनही काम पूर्ण झाले नसल्याबाबत

(४) * २१६२० श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले , ॲड. उषाताई दराडे , श्री.सतीश चव्हाण , श्री.विक्रम काळे , श्री.अनिल भोसले , श्री.रमेश शेंडगे , श्री.अरुण गुजराथी , श्री.किरण पावसकर : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात सुवर्णजयंती योजनेंतर्गत कोकम प्रकल्पास सन २००४ मध्ये मंजूरी देवून प्रकल्पासाठी २ कोटी ४८ लाख रूपयांची तरतूद करूनही प्रकल्पाचे काम पूर्ण झाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०११ मध्ये उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाचे काम पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर प्रकल्प पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील : (१) होय

(२) १) स्वर्णजयंती योजनेंतर्गत तील कोकम विशेष प्रकल्प (कोकम लागवड व प्रक्रीया) दि. २७/०२/२००४ रोजी मंजूर झाला असला तरी सदर प्रकल्प मंजुरीची प्रत माहे ऑक्टोबर २००७ मध्ये प्राप्त झाली.

२) कोकम लागवडीसाठी आवश्यक असणारा पावसाळी हंगाम माहे ऑक्टोबर पासून संपला असल्याने.

३) कोकम लागवडीसाठी कोकम रोपे संबंधित संस्थेमार्फत उपलब्ध न झाल्याने

४) सदरचा प्रकल्प बचत गटामार्फत करणेचा असल्याने बचत गटातील सदस्यांचे एकत्रित सलग क्षेत्र उपलब्ध नसल्याने.

५) सदरील विशेष प्रकल्प केंद्र शासनामार्फत बंद करण्यात आल्यामुळे

(३),(४) सदरील प्रकल्प पुनरुज्जीवित करण्याबाबत प्रस्ताव केंद्र शासनास सादर करुन या प्रकल्पाचे पुनरुज्जीवन करण्यात आले असून सन २०११ पर्यंत सदर प्रकल्पास मुदतवाढ मान्य करण्यात आली आहे. या प्रकल्पामधून लागवडीची बाब वगळण्यात आली असून कोकम प्रक्रिया युनिट व प्रशिक्षण या बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने अद्यावत प्रकल्प अहवाल व अनुदानाच्या दुसऱ्या हप्त्याची मागणी प्रस्ताव जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग यांच्यामार्फत केंद्र शासनास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

ता.प्र.क्र. २१६२०...

श्री. जयंत पाटील....

सन २०१० मध्ये सादर करण्यात आला असून त्याबाबतचा पाठपुरावा सुरु आहे. दरम्यान या प्रकल्पास मुदतवाढ मिळण्याकरीता केंद्र शासनाकडे विनंती करण्यात आली आहे. अनुदानाचा दुसरा हप्ता व मुदतवाढ इ.करीता केंद्र शासनाकडून उपस्थित करण्यात आलेल्या मुद्दयांबाबतची माहिती सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या प्रकल्पाला २००४ साली मंजुरी मिळाली त्याची प्रत शासनाला २००७ मध्ये मिळाली. म्हणजेच ही प्रत मिळण्यासाठी तीन वर्षाचा कालावधी लागला. याचा अर्थ शासनाचे अधिकारी या प्रश्नाचा पाठपुरावा करण्यामध्ये कुठेतरी कमी पडले. दुसरा प्रश्न असा की, हा प्रकल्प तयार करीत असतांना त्यामध्ये आलेल्या अडचणी या ठिकाणी सांगितल्या गेल्या आहेत. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेले क्षेत्र बचत गटाकडे उपलब्ध नाही, त्यांच्याकडे रोपे उपलब्ध होत नाहीत. हा प्रकल्प तयार करीत असतांना या अडचणींचा अभ्यास केला नव्हता काय, सन २०११ मध्ये या प्रकल्पाचा कालावधी संपत असल्यामुळे त्याला मुदत वाढवून देण्यासाठी आणि हा प्रकल्प वाचविण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहात काय, या प्रकल्पावर आतापर्यन्त किती पैसे खर्च केले आणि त्याचा किती लोकांना लाभ मिळाला आहे?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, सन २००४ मध्ये मंजूर झालेल्या प्रकल्पाच्या मंजुरीची प्रत केंद्र सरकारकडून ऑक्टोबर २००७ मध्ये प्राप्त झाली. पावसाळी हंगाम संपल्यानंतर ती प्रत प्राप्त झाल्यामुळे रोपांची उपलब्धता करता आलेली नाही. विशेषत: बचत गटाच्या सदस्यांकडे एकत्रित सलग क्षेत्र उपलब्ध नसल्यामुळे अशा वेगवेगळया कारणांमुळे पावसाळयाच्या हंगामात या प्रकल्पाची अंमलबजावणी करता आली नाही. रोजगार हमी योजनेमध्ये जशी तरतूद आहे की,कोकमच्या रोपाला दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी खत आणि पाणी देण्याची तशी तरतूद या मूळच्या प्रकल्पामध्ये नव्हती. म्हणून सुधारित प्रस्ताव फेब्रुवारी २००७ मध्ये केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला. यामध्ये साखर आणि मीठ याच्या मिश्रणाशिवाय कोकम रस साठविता येतो काय हे पहाण्याची पध्दत विकसित करावी. तिसरा प्रश्न असा की,....

(अडथळा)

सभापती : माननीय सदस्यांनी शांत रहावे, मंत्री महोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी प्रकल्प करीत असतांना येणाऱ्या अडचणींची जी कारणे देण्यात आली आहेत ती जास्त असल्यामुळे हा प्रकल्प झालेला नाही. या अनेक कारणांपैकी महत्वाचे तांत्रिक कारण असे की, कोकम रस काढल्यानंतर त्याची साठवणूक करण्याची व्यवस्था वेगळया पध्दतीने आपल्याला करता येईल काय? आपण एकदा विद्यापीठाला काम दिल्यानंतर, प्रकल्पाला मंजुरी २००४ मध्ये मिळाल्यानंतर आणि त्याची प्रत सन २००७ मध्ये शासनाला मिळाल्यानंतर कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर या प्रकल्पासाठी सलग क्षेत्र पट मिळावे यासाठी देखील प्रयत्न करण्यात आले. या प्रकल्पाला उशीर लागण्याची वेगवेगळी कारणे दिली आहेत. त्याचप्रमाणे या प्रकल्पाचे प्रोसेसिंग युनिट घेण्याकरिता देवगड तालुक्यातील पोयरे आणि विलवडे अशी दोन गावे निश्चित करण्यात आली आहेत. या दोन गावांपैकी एका गावामध्ये वाद निर्माण झाल्यानंतर ओरस बुद्रुक येथील जागा निश्चित करण्यात आली. अशा प्रकारे या प्रकल्पासाठी जागा उपलब्ध झाल्यानंतर केंद्र सरकारकडे एक्सटेंशनसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, राज्यामध्ये युतीचे सरकार असतांना हा प्रकल्प जाणीवपूर्वक आणण्यात आला. मुळात या प्रकल्पासाठी शासनाकडून निधी मिळत नाही त्यामुळे हा प्रकल्प वेळेवर होत नाही. या प्रकल्पाला पैसे मिळाल्यानंतर अधिकाऱ्यांच्या अक्षम्य दिरंगाईमुळे हा प्रकल्प डीआरडीएच्या अधिकाऱ्यांनी परत पाठविला. या प्रकल्पासाठी बचत गटाच्या सदस्यांकडे एकत्रित सलग क्षेत्र उपलब्ध नाही याची माहिती त्यांना नव्हती काय? नसेल तर या ठिकाणी उल्लेख का करण्यात आला. प्रकल्प आपणच तयार करतो आणि अडचणी मात्र आपणच सांगतो. ऑक्टोबर २००४ मध्ये पावसाळा संपल्यानंतर २००५, २००६, २००७ मध्ये पाऊस पडलाच नाही काय? आपण आपल्या अधिकाऱ्यांना कशासाठी वाचवत आहात. ज्या अधिकाऱ्यांनी दिरंगाई केली आहे त्या अधिकाऱ्यांवर कारवाई केल्याशिवाय हे लोक सुधारणार नाहीत. त्यांच्यावर आपण कारवाई करणार काय?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सर्व गोष्टींचा विचार करुन पहिल्यांदा प्रकल्प प्रस्तावित करणे आवश्यक होते. परंतु अधिकाऱ्यांनी त्यामध्ये त्रुटी ठेवून तो प्रस्ताव प्रपोज केला त्या अधिकाऱ्यावर जबाबदारी फिक्स केली पाहिजे या मताशी मी सहमत आहे याबद्दल शंका नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २१६२०...

श्री. जयंत पाटील.....

प्रस्ताव आल्यानंतर त्यामध्ये नवनवन मुद्दे अंतर्भूत करुन सुधारणा केली पाहिजे. तसे करुन केंद्र सरकारकाडे पुन्हा सुधारीत प्रस्ताव पाठविला. त्याबाबत पाठपुरावा करुन केंद्र सरकारकाडून मंजुरी मिळाल्यानंतर पुन्हा आपल्याला एक्सटेंशनसाठी जावे लागले. एकंदरीत प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासंबंधी आणि पाठविलेल्या प्रस्तावाला मंजूरी मिळाल्यानंतर त्याच्या एक्सटेंशनबाबत तात्काळ काम करण्याबाबत आवश्यक ती कारवाई करण्याबाबत मागील ४-५ वर्षात करावयाचे राहून गेले हे कुणीही नाकारु शकत नाही. ही दिरंगाई होण्यास जे लोक जबाबदार असतील किंवा प्रस्तावित प्रकल्प करण्यासाठी जेलोक जबाबदार असतील त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर निश्चितपणे जबाबदारी फिक्स केली जाईल. अशाप्रकारे प्रकल्पाचा कालावधी लांबणे महाराष्ट्राच्या हिताचे नाही आणि त्या भागातील जनतेच्या हिताचे नाही. त्याबाबत संबंधितांवर नक्की जबाबदारी फिक्स कारवाई केली जाईल.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, एकतर कोकणासाठी निधी मिळत नाही. तसेच तेथे एखादा प्रकल्प देत असताना तेथे खूप गाजावाजा केला जातो.परंतु त्यासाठी पुरेशी तरतूद करण्यात येत नाही. मात्र याबाबतीत तरतूद झाली. ज्या अधिकाऱ्यांनी हा प्रकल्प सादर केला असेल त्यानुसारच तरतूद झाली असणार आणि ही साधी प्रक्रिया आहे.याठिकाणी 6-7 वर्षाची जी कारणमिमांसा देण्यात आलेली आहे,ती दिशाभूल करणारी आहे.याचा अर्थ असा होतो की, तुम्हाला कोकणासाठी निधी द्यावयाचाच नाही. म्हणून माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, 2004 मध्ये ज्या प्रकल्पासाठी 2 कोटी 48 लाख रुपयांची तरतूद झाली आणि चार दिवसानंतर 2011 हे वर्ष देखील संपणार आहे. मग हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 2012 सालापर्यंत मुदत वाढ देणार आहात काय? दुसरा प्रश्न असा आहे की, 2004 मध्ये 2 कोटी 48 लाख रुपयांची तरतूद केली होती, ती पुरेशी नाही असा आपला आतापर्यंतचा अनुभव आहे. मुंबईमध्ये सी-लिंक बांधण्यात आला पण त्याचा खर्च देखील 400 कोटी रुपयांवरुन 1600 कोटी रुपयांवर गेला ही गोष्ट खरी आहे. त्यामुळे कोकणातील प्रकल्पासाठी जो अधिक निधी लागणार आहे, तो देखील शासन उपलब्ध करुन देणार आहे काय ? तसेच हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जी मुदतवाढ देण्यात येईल, त्या कालावधीमध्ये हा प्रकल्प कोकणामध्ये राबविला जाईल याची आपण खात्री देणार आहात काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, या प्रकल्पाचा खर्च 250 कोटीपर्यंत नक्की वाढला असेल याबद्दल काही शंका नाही. म्हणून प्रकल्पाचा वाढलेला खर्च आणि तो पूर्ण करण्याचा जो वाढीव कालावधी आहे, त्यासाठी मंजुरी मिळावी याकरता केंद्र शासनाकडे मागणी केली जाईल आणि हा प्रकल्प ठरवून दिलेल्या कालावधीमध्ये पूर्ण केला जाईल.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, कोकणामध्ये अशा प्रकारचा प्रकल्प येणे ही बाब कोकणाच्या दृष्टीने भाग्याची असताना, त्याठिकाणी श्री.पाटील नावाचा एकच अधिकारी असून, त्यांनीच तो प्रकल्प सादर केला आणि त्यांच्याच काळामध्ये हा प्रश्न राबविण्याचा प्रयत्न झाला. त्या श्री.पाटील या अधिकाऱ्यावर शासन कारवाई करणार आहे काय ? कारण प्रकल्प सादर करणारा आणि त्याची अंमलबजावणी करणारा अधिकारी देखील एकच आहे. तसेच याठिकाणी रोपे मिळत नाहीत असे एक कारण सांगण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्षात सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये हजारो रोपवाटिका आहेत. तसेच तेथे या रोपवाटिका मिळत नसतील तर त्या दुसरीकडून घेण्याची कार्यवाही का झाली नाही ? याचे कारण देखील माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.21620 . . .

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी याबाबतीत जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे सांगितले आहे. तसेच यामध्ये कोणकोणत्या जबाबदाऱ्या होत्या आणि त्याची अंमलबजावणी कोणी करावयाची याबाबत संबंधित सर्व अधिकाऱ्यांकडे विचारणा करण्यात येईल आणि जबाबदारी निश्चित करुन त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय अतिशय पॉझिटीव्ह आहेत. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी सांगितल्याप्रमाणे तेथे श्री.पाटील नावाचा एकच अधिकारी असून त्यांनी बिलवडे व पोयरे ही गावे निश्चित केली. परंतु त्या गावांमध्ये ॲप्रोच रोड नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर जबाबदारी फिक्स करुन नक्की किती दिवसामध्ये करवाई करणार आहात ? याबाबत कालावधी सांगावा.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, याठिकाणी प्रकल्प पूर्ण करणे हा सगळयात महत्वाचा उद्देश आहे. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पहिली कार्यवाही अशी करावयाची आहे की, यासाठी मुदतवाढ घेणे आणि वाढीव खर्चाची मागणी करणे आवश्यक आहे.त्यामुळे ज्या अधिकाऱ्यांच्या काळामध्ये हा विलंब झाला असेल, कारण सन्माननीय सदस्यांनी तेथे एकच अधिकारी असल्याचे सांगत आहेत आणि त्यामुळे काम अधिक सोपे होईल. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांबाबत पुढील तीन महिन्याच्या काळामध्ये रिपोर्ट आल्यावर कारवाई करण्याची कार्यवाही पूर्ण होईल.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, कोकम रस टिकविण्यासाठी कोकण कृषी विद्यापीठ विचार करील. कोकम रस आंबट असल्यामुळे त्याचा जो आगळ असतो तो चार-चार वर्षे टिकतो.त्यामुळे त्याबाबतीत नव्याने काही संशोधन करावयाचे नाही. माननीय मंत्री महोदयांना अधिकाऱ्यांकडून चुकीची माहिती दिली जात आहे. साखर घातल्याने आगळ टिकतो ही चुकीची माहिती आहे.कारण साखर न घालताही रस टिकतो.पण याबाबत संबंधित अधिकारी माननीय मंत्री महोदयांना चुकीची माहिती देत आहेत, त्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, जर अधिकाऱ्यांची चुकीची माहिती दिली असेल तर संबंधितांवर कारवाई होईलच. पण बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठाच्या बरोबर डी.आर.डी.ए.ने ॲग्रीमेंट केलेले असून अशा प्रकारची प्रक्रिया पध्दत विकसित करावी म्हणून एम.ओ.यु.करावे असाही प्रस्ताव करण्यात आलेला आहे. तसेच कृषी विद्यापीठ, दापोली यांनी या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाबत पॉझिटीव्ह रिस्पॉन्स् दिलेला आहे म्हणजेच सन्माननीय सदस्यांचे जे म्हणणे आहे, त्याच्या पलिकडेही शास्त्रीयदृष्ट्या अजून काही शिल्लक आहे असे मला वाटते.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, सभापती महोदय, गेल्या सात वर्षामध्ये जर हा निधी मिळाला असता तर ते कोकणासाठी फार मोठे वरदान ठरले असते. कारण कोकणामध्ये आंबा, काजू बरोबरच कोकमाचे पीक देखील फार महत्वाचे आहे. या दरम्यानच्या सात वर्षामध्ये लागवड होऊन कोकमे मिळाली असती तर महिला बचत गटाच्या माध्यमातून कोकम सरबत किंवा कोकमापासून तेल काढण्याचे प्रोजेक्ट सुरु करता आले असते. आज पेप्सी, कोकाकोलाच्या बरोबरीने कोकम सरबताला मागणी आहे हे लक्षात घेऊन सदरहू प्रोजेक्ट लवकरात लवकर कधी सुरु करण्यात येणार आहेत याची माहिती द्यावी.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, महिला बचत गटांची शेती असेल आणि त्यांच्याकडे कोकमाची झाडे लावण्यासाठी जमीन शिल्लक असेल तर तेथे झाडे लावल्यानंतर हा प्रकल्प होईल असा जो विषय आहे, त्याबाबत सांगावयाचे तर महिला बचत गटाकडे एवढी जमीन उपलब्ध असणे शक्य नाही. यामुळे जो मूळ प्रस्ताव तयार झालेला आहे, त्याबाबत त्याठिकाणी सलग जमीन कशी उपलब्ध होऊ शकते याचीच शंका आता काढण्यात आलेली आहे म्हणजेच या प्रकल्पाचा एकूण खर्च 2 कोटी 50 लाख आहे आणि हा निधी खर्च करुन सदरहू प्रकल्प यशस्वी करण्यासाठी पुढील तीन महिन्यामध्ये प्रस्ताव तयार करुन त्याला केंद्र सरकारकडून मंजुरी मिळविण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

. . . .एफ-4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(5)*22607 श्रीमती अलका देसाई,श्री.सुभाष चव्हाण,डॉ.सुधीर तांबे श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अमरावती जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे दुर्धर आजाराने अनेक मेंढ्यांचा मृत्यू झाल्याने धनगर समाजावर मोठे संकट ओढवले असल्याने धनगर समाज महांसघ, अमरावती यांनी मा.मुख्यमंत्री, मा.पशुसंवर्धन मंत्री, जिल्हाधिकारी इत्यादींना नुकसान भरपाई मिळण्याबाबत माहे ऑगस्ट, 2011 मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गुलाबराव देवकर, श्री.मधुकरराव चव्हाण यांच्याकरिता : (1) या विषयावर धनगर समाज महासंघ अमरावती यांनी व लोक प्रतिनिधींनी लेखी निवेदन दिले हे खरे आहे.

(2) आजारी मेंढयावर रोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले असून त्यावर उपचार करण्यात आले आहेत. तथापि नैसर्गिक आपत्तीने मृत्युमुखी पडलेल्या शेळी व मेंढी यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणतेही शासकीय धोरण नसल्याने नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही.

(3) आजारी मेंढयांवर त्वरित उपचार करण्यात आले असून उर्वरित मेंढयांवर रोग प्रतिबंधक लसीकरण करण्याचे कार्य तातडीने करण्यात आले आहे.

सभापती महोदय,या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे. याठिकाणी दुसऱ्या क्रमांकाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"आजारी मेंढ्यांवर रोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले असून त्यावर उपचार करण्यात आले आहेत. तथापि नैसर्गिक आपत्ती यानंतर "व्यतिरिक्त" असा शब्द घालण्यात यावा.अशी दुरुस्ती करण्यात यावी.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी याठिकाणी दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तराबाबत माझे विचार मांडते.

सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाईताई यांनी प्रश्न विचारावा.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, शेतकरी शेतीला पूरक उद्योग म्हणून शेळी-मेंढी पालन, कुक्कुट पालन इ.व्यवसाय करीत असतो.महाराष्ट्र राज्याला शेती प्रधान राज्य असे म्हटले जात आहे.याठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"तथापि नैसर्गिक आपत्ती व्यतिरिक्त मृत्युमुखी पडलेल्या शेळी व मेंढी यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणतेही शासकीय धोरण नसल्याने नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही."माझा प्रश्न असा आहे की,ज्या शेतकऱ्यांनी अशा प्रकारचा व्यवसाय सुरु केलेला आहे,त्यांना शासन नुकसान भरपाई देणार आहे काय? जर शासन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नुकसान भरपाई देणार नसेल तर त्याची कारणे काय आहेत ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याच्या बाबतीत शासनाचे धोरण आहे की, अतिवृष्टी झाल्यामुळे शेळया-मेंढया मृत्युमुखी पडल्या तर आपण नुकसान भरपाई देतो. परंतु या केसबाबत सांगावयाचे तर तेथे रोगाची लागण झाली होती म्हणून आपण नुकसान भरपाई दिलेली नाही. पुढच्या काळामध्ये यामध्ये या गोष्टींचा समावेश करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये मी मेंढ्यांच्या मृत्यू बाबत प्रश्न विचारला होता. त्याबाबत शासनाने जे आश्वासन दिले होते, त्याची अजूनपर्यंत पूर्तता झालेली नाही. आज याठिकाणी जो प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे, तो गेल्या वर्षी जो पाऊस झाला त्यावेळी अमरावती जिल्ह्यामध्ये जवळजवळ 30 ते 40 हजार मेंढ्या मेल्या आणि त्यासंबंधात हा प्रश्न विचारलेला आहे. परंतु याबाबत कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही आणि आतापर्यंत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. हजारो मेंढ्या मरत आहेत आणि याबाबतीत काही धोरण नाही असे आपण येथे कबूल करीत आहोत. आपण रोज जेवणामध्ये मटण खातो आणि जे याचा पुरवठा करतात त्याबाबत शासनाचे धोरण नसावे हे बरोबर नाही.कोंबड्यांच्या बाबतीत धोरण आहे, बाकीच्या बाबतीत धोरण आहे आणि केवळ शेळया-मेंढ्यांच्या बाबतीत धोरण नाही. याबाबतीत अनेक वेळा विनंती करुनही अजूनपर्यंत धोरण निश्चित करण्यात आलेले नाही.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी प्रश्न विचारावा.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा प्रश्न आहे की, शेळया-मेंढ्यांच्या बाबतीत धोरण तयार करण्यात येणार आहे काय आणि ते किती दिवसामध्ये करण्यात येईल ? याठिकाणी दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "नैसर्गिक आपत्तीचा" उल्लेख करण्यात आला आहे. पण अवकाळी पाऊस आल्यानंतर साथीच्या रोगांना सुरुवात होते. असे असताना आपण साथीच्या रोगांसाठी नुकसान भरपाई देत नाही असे सांगत आहात. अवकाळी आणि अचानकपणे पाऊस पडतो, त्यामुळे रोग उद्भवतात. परंतु याला साथीचा रोग असे म्हणून शासनाकडून मदत नाकारली जाते.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी प्रश्न विचारावा.

ता.प्र.क्र.22607 . . . .

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, अवकाळी पाऊस झाल्यामुळे ज्या हजारो शेळ्या-मेंढ्या मरण पावलेल्या आहेत, त्यामुळे या जिल्ह्यातील धनगर समाज उद्ध्वस्त झालेला असून त्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्वरित नुकसान भरपाई देणार आहात काय आणि त्यासंबंधातील धोरण किती दिवसामध्ये ठरविण्यात येणार आहे?

यानंतर कु.थोरात . . . .

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, अतिवृष्टी झाल्यानंतर जवळपास 1183 मेंढया अमरावती जिल्हयामध्ये मेल्या होत्या.

श्री. रमेश शेंडगे : ज्या अधिकाऱ्यांनी सर्व्हे केलेला आहे त्यांनी हा आकडा दिलेला आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. शेंडगे, सन्माननीय मंत्री महोदयांचे उत्तर संपल्यानंतर आवश्यकता वाटली तर मी तुम्हाला आणखी एखादा प्रश्न विचारण्यास परवानगी देईन.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, माझ्याकडे आकडेवारी आहे. 1183 मेंढया त्यावेळी मेलेल्या होत्या. अतिवृष्टी झाल्यानंतर काही दिवसांनी त्या ठिकाणी दमट वातावरण निर्माण झाले त्यामुळे घटसर्प आणि इतर रोगांची लागण झाली त्यामुळे जवळपास 1183 मेंढया मेलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांची मागणी अशी आहे की, या संदर्भात पुढच्या काळात नुकसान भरपाई देण्यात येणार आहे काय? या संदर्भात सध्याच्या परिस्थिती दिनांक 26 मार्च, 2010 च्या जी. आर. नुसार शासनाचे धोरण असे आहे की, अतिवृष्टी झाल्यानंतर जनावरे मेली असतील तर 1000 रुपये या प्रमाणे नुकसानभरपाई देण्यात येते. परंतु यामध्ये निष्कर्ष असा काढण्यात आला की, रोगाची लागण झाली होती म्हणून नुकसानभरपाई देता येत नाही. पुढच्या काळात या संदर्भात विचार करता येईल काय?असा प्रश्न विचारण्यात आला आहे. निश्चितपणाने तसा प्रयत्न केला जाईल किंवा या संदर्भात प्रस्ताव करता येईल.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, या समाजाचे प्रतिनिधीत्व करणारे एक सन्माननीय सदस्य या सभागृहात आहेत. ते एका महामंडळाचे सन्माननीय अध्यक्ष देखील आहेत. त्या महामंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांना मार्चमध्ये चार वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यांच्या कार्यकाळातील त्यांचे हे 12 वे अधिवेशन आहे. गेली 12 वर्षे ते या महामंडळासाठी निधीची मागणी करीत आहेत. मी थोडया वेळापूर्वीच त्यांना विचारले तेव्हा त्यांनी असे सांगितले की, या महामंडळासाठी अद्याप एकही पैसा देण्यात आलेला नाही. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या ठिकाणी जी आकडेवारी देण्यात आलेली आहे. त्यापेक्षा आमच्याकडे असलेली आकडेवारी जास्त आहे. तेव्हा याचा परत सर्व्हे करुन आकडेवारी घेण्यात येईल काय?

सभापती महोदय, या संदर्भात शासनाचे काहीही धोरण नाही, ते करण्याच्या संदर्भात या ठिकाणी उलट-सुलट उत्तर देण्यात आलेले आहे. महाराष्ट्रात धनगर समाज मोठा आहे. त्यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण..

मतांवर हे शासन निवडून येते. त्यामुळे या संदर्भात ठराविक मुदतीत धोरण ठरविण्यात येईल काय, किती वर्षात आणि नेमक्या कोणत्या तारखेला हे धोरण तयार होईल याबाबतचा खुलासा करण्यात यावा.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याप्रमाणे पुन्हा माहिती घेऊन आकडेवारी एकत्रित करण्यात येईल. या संदर्भातील धोरण ठरविण्याच्या संदर्भात विचार केला जाईल.,

सभापती : सन्माननीय मंत्री महोदय, 24 तासात 65 मी.मी. पाऊस झाला तरी अतिवृष्टी झाली असे आपण समजतो. ज्यावेळी अशी अतिवृष्टी होते त्यावेळी एखादी मेंढी त्या पध्दतीची असेल तर ती गारठून मरते. तेव्हा या दृष्टिकोनातून निष्कर्ष पाहण्यात यावेत. त्या दिवशी 24 तासात 65 मी.मी. पाऊस पडला होता काय? तो निष्कर्ष काढल्यानंतर त्या क्षेत्रातील जे तज्ज्ञ अधिकारी आहेत त्यांनी असे सांगितले पाहिजे की, अशा प्रकारे मेंढया गारठतात, अतिवृष्टीमुळे हा परिणाम झालेला आहे. शेवटी ही भटकी जमात आहे. 25 ते 50 मेंढया हेच त्यांचे भाडवल आहे. ते भांडवल संपले की त्यांच्या जीवनामध्ये काहीही उरत नाही, म्हणून अशा प्रश्नाला जे सहजगत्या उत्तर देण्यात येते ते टाळण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

प्रश्नोत्तराच्या तासात नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेच्या संदर्भात 6 मिनिटे चर्चा झालेली आहे त्यामुळे तो वेळ प्रश्नोत्तराच्या तासाला वाढवून देण्यात येत आहे.

अशुधीत प्रत / शीघ्रलिपी नाही

मूल (जि.चंद्रपूर) पंचायत समिती अंतर्गत पशुधन विकास अधिकारी कार्यालयाकडून दुधाळ जनावरे खरेदीत झालेला अपहार

(6) * 22079 श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मूल (जि.चंद्रपूर) पंचायत समिती अंतर्गत पशुधनविकास अधिकारी कार्यालयाकडून सन 2010 मध्ये शेतकऱ्यांना विशेष घटक योजनेअंतर्गत 50 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे खरेदी करतांना शेतकऱ्यांना हाताशी धरुन जनावरे खरेदी न करतांच संबंधित अधिकारी यांनी अनुदान उचल करुन शासनाच्या पैशाचा अपहार केल्याचे दिनांक 26 एप्रिल, 2011 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणात अनियमितता दिसून येत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द मासिक सभेत मा.सभापती पंचायत समिती मूल यांनी आक्षेप घेतला, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, वा संबंधित पशुधन अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री. गुलाबराव देवकर, श्री.मधुकरराव चव्हाण यांच्याकरिता : (1) हे खरे नाही.

(2) व (3) दि. 22.6.2010 रोजीच्या पंचायत समिती, मुल जि.चंद्रपूर च्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र.2/4 अन्वये विशेष घटक योजने अंतर्गत झालेला खर्च नामंजूर करण्यात यावा असा ठराव घेण्यात आलेला आहे.

तथापि संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, मूल यांनी या अनुषंगाने त्रिसदसीय समिती गठीत करुन चौकशी केलेली आहे. चौकशी अहवालात सदर प्रकरणात अनियमितता झाली नसल्याचे स्पष्ट नमूद केलेले आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मंत्री महोदयांना उत्तरामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे काय?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या ठिकाणी सरळसरळ अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रकार झालेला आहे. विशेष घटक योजनेमध्ये 50 टक्के अनुदानावर बैलजोडया खरेदी करण्याचा निर्णय झाला. त्याप्रमाणे काही लोकांना बैलजोडया खरेदी करुन दिल्या. त्यावेळी अधिकाऱ्यांनी शंभर रुपयाच्या स्टँम्पपेपरवर करारनामा करुन घेतला. उद्या जर लोकप्रतिनिधींनी तक्रार केली आणि यामध्ये काही दोष आढळले तर आमची जबाबदारी राहील असे लाभार्थ्यांकडून लिहून घेतले. अशा पध्दतीचा करारनामा करण्याची पध्दत या विशेष घटक योजनेमध्ये आहे काय आणि नसेल तर अशा प्रकारचा करारनामा करण्याची कारणे कोणती? उत्तरामध्ये जून पर्यंतचा

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रिपोर्ट दिलेला आहे. सप्टेंबर, 2011 ला कॅफोने चोकशी केली आणि त्यात डॉ. अक्षय, तालुका पशुसंवर्धन अधिकारी दोषी आढळले असा प्रस्ताव उप मुख्य कार्यपालन अधिकारी श्री. निकम यांच्याकडे ऑक्टोबर, 2011 मध्ये पाठविण्यात आला आहे हे खरे आहे काय?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, दुधाळ जनावरांसाठी जिल्हा स्तरीय विशेष घटक योजनेतून निधी देण्याची व्यवस्था केलेली असते. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी बैलजोडीच्या सदर्भात प्रश्न विचारलेला आहे. मूळ प्रश्न दुधाळ जनावरांच्या संदर्भातील आहे. दुधाळ जनावरांच्या संदर्भातील विषय माझ्या विभागाकडे येतो.

सभापती : हा प्रश्न स्वीकारतांना काही चूक झालेली असेल व ती माझ्या निदर्शनास आणून दिली तर त्या बाबतीत काय निर्णय घ्यावयाचा ते मी जरुर बघेन. पण प्रश्न स्वीकारल्यानंतर व तो विभागाकडे पाठविण्यात आल्यानंतर विभागाने या प्रश्नांचे उत्तर दिले पाहिजे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांना संरक्षण देण्यात यावे.

सभापती : सन्माननीय मंत्री महोदय, या ठिकाणी विचारण्यात आलेल्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकतात काय?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय, या प्रश्नाचे उत्तर देऊ शकत नाहीत असे त्यांनी सांगितलेले आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, दिनांक 11 सप्टेंबरला कॅफोने चोकशी करुन ऑक्टोबर, 2011 मध्ये उप मुख्य कार्यपालन अधिकारी श्री. निकम यांच्याकडे प्रस्ताव सादर केला की, यामध्ये दोष आहेत, अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. तेव्हा या संबंधीचा रिपोर्ट माननीय मंत्री महोदयांकडे आहे क?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, त्या संदर्भात आमच्याकडे कुठलाही रिपोर्ट आलेला नाही. दुधाळ जनावरांच्या संदर्भात दोन वेळा चौकशी झालेली आहे त्या संबंधीचा रिपोर्ट आमच्याकडे सादर झालेला आहे. त्यावेळी 7 लाभार्थींना दुधाळ जनावरे देण्यात आली होती. त्यावेळी आमच्या विभागाने सविस्तर चौकशी केली होती. त्यामध्ये सर्व बाबींची पूर्तता झालेली आहे. त्यासाठी लागणाऱ्या ज्या काही बाबी आहेत त्या अशा की, लाभार्थींनी जनावरांचे फोटो आणले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22079..

श्री. गुलाबराव देवकर..

पाहिजेत. विमा पॉलिसी काढली पाहिजे. लाभार्थींनी शपथपत्र करुन दिले पाहिजे या साऱ्या गोष्टींची पूर्तता झालेली आहे. त्यामुळे 7 सभासदांना जे अनुदान देण्यात आलेले होते ते पूर्ण झालेले आहे.

सभापती : सदर प्रश्न राखून ठेवण्यात येत आहे.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बीड जिल्ह्यात पशुसंवर्धन योजनेतून दुधाळ गाई पुरविण्याबाबत

(7) * 22282 ॲड.उषाताई दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.सतीश चव्हाण , श्री.विक्रम काळे : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बीड जिल्ह्यात पशुसंवर्धन योजनेतून दुधाळ गाई पुरविण्यासाठी 273 अर्ज प्राप्त झाले असतांना केवळ 54 अर्जधारकांना गाई पुरविण्याचा निर्णय शासनामार्फत घेतल्याने शेतकऱ्यांची निराशा झाल्याचे माहे सप्टेंबर, 2011 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना गाई पुरविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव देवकर, श्री.मधुकरराव चव्हाण यांच्याकरिता : (1) होय, राज्यात दुध उत्पादनाला चालना देण्यासाठी 6 दुधाळ संकरित गाई/म्हशीचे गट वाटप करणे या नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय योजने अंतर्गत बीड जिल्ह्यात लाभार्थ्यांकडून एकूण 16273 एवढे अर्ज प्राप्त झालेले असून शासन निर्णयातील निकषानुसार व बीड जिल्ह्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आर्थिक तरतूदीच्या अधिन राहून या योजनेसाठी 54 लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे.

(2) व (3) ही योजना सन 2011-12 मध्ये प्रायोगिक तत्वावर राबवण्यात येत असून या योजनेच्या मूल्यमापन अहवालानुसार सदरची योजना 12 व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत राबवणे संदर्भात निर्णय घेण्यात येणार आहे. त्यानुसार या योजने अंतर्गत पुढील कालावधीत जास्तीत जास्त लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात येणार आहे.

अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या दृष्टीने दि. 22.11.2011 च्या शासन निर्णयानुसार वरील योजनेप्रमाणे जिल्हास्तरीय योजने अंतर्गत 2 दुभत्या जनावरांचा गट वाटप करणे या योजनेमध्ये दुभत्या संकरीत गाय/म्हशीची खरेदीची आधारभूत किंमत रु. 40,000/- करण्यात आलेली असून अनुदानाची मर्यादा 75 टक्के करण्यात आलेली आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "राज्यात दूध उत्पादनाला चालना देण्यासाठी दुधाळ संकरित गाई/म्हशीचे गट वाटप करणे या नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय योजनेंतर्गत बीड जिल्ह्यात लाभार्थ्यांकडून एकूण 16273 एवढे अर्ज प्राप्त झालेले असून शासन निर्णयातील निकषानुसार व बीड जिल्ह्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आर्थिक तरतूदीच्या अधीन राहून या योजनेसाठी 54 लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे". माझा प्रश्न असा आहे की, या योजनेचे विस्तारीकरण केले जाईल काय आणि लाभार्थ्यांची संख्या वाढविली जाईल काय?

श्री. गुलबराव देवकर : सभापती महोदय, निश्चितपणे विचार केला जाईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे शनिवार, दिनांक 17 डिसेंबर, 2011 रोजी अशासकीय कामकाज होते. त्याचे कारण असे की, अधिवेशन दोन आठवड्याचे असल्यामुळे शुक्रवारपर्यंत शासकीय कामकाज करावयाचे, शनिवारला एक दिवस जास्तीचे कामकाज घ्यावयाचे आणि त्या दिवशी अशासकीय कामकाज करावयाचे असे ठरविले होते. त्या दिवशी अशासकीय कामकाज असल्यामुळे आणि त्या अशासकीय कामकाजामध्ये आमचा कोणताही सहभाग नसल्यामुळे मी माननीय सभापतींना पत्र दिले होते की, शनिवारला मी सभागृहात उपस्थित राहणार नाही. माननीय सभापतींना सूचना देऊन मी सभागृहात उपस्थित राहणार नाही असे सांगितले होते. असे असताना काल मी माहिती घेतली. त्या दिवशी अशासकीय कामकाज असताना सुध्दा दोन शासकीय बिले घेण्याचा प्रयत्न शासनाकडून झाला. त्या दिवशी मी सभागृहात उपस्थित नव्हतो तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब उपस्थित नव्हते. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम सुध्दा उपस्थित नव्हते. त्या दिवशी शासकीय कामकाज रेटून नेण्याचा प्रयत्न केला गेला.

या सभागृहामध्ये शासकीय कामकाजाच्या बाबतीत, बिलांच्या बाबतीत सातत्याने सरकारला सहकार्य करण्याची आमची भूमिका असते. कोणतेही बिल कायद्यामध्ये रूपांतरित होत असताना त्यावर नीट चर्चा झाली पाहिजे, सर्व सभागृहाचे काय मत आहे ते नोंदविले गेले पाहिजे अशी संकल्पना आहे. असे असताना संसदीय कामकाज मंत्र्यांनी शनिवारला ज्या पध्दतीने कामकाज रेटून नेण्याचा प्रयत्न केला आणि ही बिले मंजूर करुन घेण्याचा प्रयत्न केला ते योग्य झालेले नाही, असे माझे मत आहे. खरे म्हणजे आपल्या विधान परिषद नियमानुसार शासकीय कामकाजाच्या दिवशीच शासकीय कामकाज व्हावयास पाहिजे. पण तसे न करता कामकाज काढून घेण्याची जी घाईगर्दी सरकारला असते आणि त्या दिवशी ज्या पध्दतीने हे कामकाज केले गेले ते उचित झालेले नाही, असे माझे मत आहे. विरोधी पक्षाला विश्वासात न घेताच जर सरकारला या ठिकाणी बिले मंजूर करुन घ्यावयाची असतील तर बहुमताच्या जोरावर सरकार ते करु शकते. परंतु लोकशाहीमध्ये एखादा कायदा करीत असताना त्यामध्ये विरोधी पक्षाचे मत सुध्दा घेतले गेले

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

पाहिजे, विरोधी पक्षाचे त्यासंबंधी काय मत आहे ते जाणून घेतले पाहिजे असे असताना शनिवारला जो प्रकार झाला तो योग्य झालेला नाही. एक तर यावेळी विदर्भातील नागपूरचे अधिवेशन दोनच आठवड्यांचे ठरविण्यात आले. या दोन आठवड्यांपैकी पहिला आठवडा कापूस किंवा इतर विषयांवर खर्च झाला. त्यामुळे मागच्या आठवड्यामध्ये कोणतेही कामकाज झाले नाही. असे असताना आणि अधिवेशनाचे दिवस कमी असताना घाईगर्दीत काही कामकाज आटपून घेणे बरोबर नाही. त्यामुळे परवा जे घडले ती बाब निषेधार्ह होती असे मला या ठिकाणी नमूद करावयाचे आहे आणि मला माझा निषेध या ठिकाणी नोंदवावयाचा आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीच्या वेळी विधानसभेत काय झाले आणि विधान परिषदेत काय होणार याचा हिशेब न करता आम्ही सांगितले की, शनिवारला अशासकीय कामकाजाचा दिवस असला पाहिजे आणि शुक्रवारी शासकीय कामकाजाचा दिवस ठेवावा. सभापती महोदय, आपण तीन दिवस या ठिकाणी नव्हता त्यावेळी माननीय उप सभापती सभागृहामध्ये होते. कामकाजाच्या बाबतीत आम्ही पूर्ण सहकार्य केले. ज्यावेळेला आम्हाला पटले नाही त्यावेळी आम्ही गैरहजर राहिलो. पण सभागृहात कामकाज चालले. मी ते कामकाज रेटून नेले वगैरे म्हणत नाही. ते कामकाज पध्दतशीर चालले. काही निषेधाचे विषय होते. एवढे सगळे करुन सुध्दा शेतकऱ्यांच्या नशिबी काही आले नाही हा भाग वेगळा. आम्ही रोज सभागृहाचे कामकाज बंद पाडावयाचे का ? शासन कधी जाहीर करते याची आम्ही वाट पाहात आहोत. आम्हाला कोणत्याही परिस्थितीत विधेयकावर चर्चा करावयाची आहे असे आम्ही वारंवार सांगतो. आदरणीय सभापतींच्या निदर्शनास आणतो. संसदीय कार्य मंत्र्यांच्या निदर्शनास आणतो. आमची गैरहजेरी बघून जाणीवपूर्वक विधेयके पारित करण्याचा जो प्रयत्न होतो त्यावरुन असे स्पष्ट दिसते की, मुळात सरकारची विरोधी पक्षाचे मत जाणून घेण्याचीच इच्छा नाही. हे जे कामकाज आहे किंवा जी विधेयके आहेत ती मंजूर करा, कामकाज झाले, कामकाज संपले, डबडे वाजवले, ढोल वाजवला, बाहेर गेलो आणि मग शेवटच्या दिवशी आमच्या सभागृहाने किती कामकाज केले याचे वाचन आपण करणार. कसे कामकाज केले याला काही महत्व आहे की

अशासकीय प्रत / अप्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

नाही ? आपण आणलेला कायदा हा पूर्णत्वाला नेला आहे का ? या ठिकाणी आपली अण्णागिरी चालू झालेली आहे. आम्ही म्हणू तेच करावयाचे आणि तुम्ही गप्प बसावयाचे ही जी अण्णागिरी आपण चालू केलेली आहे ती थांबविणार की नाही हा प्रश्न आहे.

त्या दिवशी बेळगाव-कारवारच्या प्रश्नाच्या संदर्भात सुध्दा माननीय मुख्यमंत्र्यांनी दालनात ठरविले की, ठराव झाल्यावर कामकाज करावयाचे नाही तरीही या ठिकाणी कामकाज रेटून नेण्याचा जो प्रयत्न केला तो अश्लाघ्य होता. सीमा भागातील मराठी बांधवांचा अवमान करणारा होता. त्या दिवशी सभागृहामध्ये येऊन मला निषेध नोंदविण्याची पाळी आली. त्या दिवशी जे झाले त्याबद्दल मी माफी मागितली. पण त्या दिवशी निषेध नोंदविण्याची पाळी आली. अशा प्रकारे जर सरकारकडून कामकाज रेटून नेण्याचा प्रयत्न होत असेल तर ते आम्हाला अजिबात मंजूर नाही. आम्हाला त्याबाबतीत निषेध नोंदविण्याचीच पाळी आलेली आहे, हे दुर्दैव आहे. ही बाब आम्ही या माध्यमातून आपल्या निदर्शनास आणत आहोत. सभागृहासमोर आलेले कोणतेही विधेयक नियमाप्रमाणे आम्हाला 7 दिवस अगोदर मिळावयास पाहिजे. त्याबाबत आम्ही कधी आग्रह धरला का, कधी नियम दाखविला का ? आम्ही कधी नियम दाखविला नाही. मग आपण नियमाप्रमाणे कामकाज करुया. आपण नियमाप्रमाणे चालणार असाल तर आम्हीही नियमाप्रमाणे चालतो. विधेयक सभागृहात आल्यानंतर 7 दिवस अगोदर आम्हाला त्याची प्रत द्यावी. मी त्याचवेळी कामकाज सल्लागार समितीमध्ये म्हणालो की, 20 विधेयके आहेत त्यामुळे 2 आठवड्यात ती होणार नाहीत. त्यावेळी संसदीय कार्य मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील असे म्हणाले की, जेवढी बिले होतील तेवढी तरी करु. आम्हीही सहकार्य करीत आहोत. पहिल्यापासून आम्हाला कामकाज करावयाचे आहे असे आम्ही सांगितले आहे. म्हणून आज आमची मानसिकता कामकाज करण्याची आहे पण निषेध नोंदवून कामकाज करण्याची परिस्थिती आहे. जर याबाबतीत आम्हाला न्याय मिळणार नसेल तर तर ते योग्य नाही. सरकारला सांगू इच्छितो की, आम्ही चिमूटभर आहोत, ढेकणासारखे चिरडण्यासारखे आहोत आणि आपले प्रचंड बळ आहे म्हणून आपण आम्हाला बुलडोज करणार का ? तसे असेल तर आम्हाला एकदा सांगू टाकावे म्हणजे आम्ही सभागृहात येऊ, गप्प बसू, भत्ता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

खाऊ आणि परत जाऊ. आम्ही भत्ता खाण्यासाठी येतो का ? सभापती महोदय, ही बाब अतिशय निंदनीय आहे. लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचा अवमान करण्याची ही जी प्रवृत्ती आता बोकाळलेली आहे सरकारच्या त्या प्रवृत्तीवर जर निर्बंध आला नाही तर यापुढे कामकाज कामकाज करणे शक्य होणार नाही. म्हणून आपण याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे असे मी आपल्या निदर्शनास आणत आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, अण्णागिरी हा शब्द कामकाजातून काढून टाकावा..

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेब तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब यांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केला त्या संदर्भात मी या ठिकाणी बोलणार आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये शनिवारच्या दिवशी अशासकीय कामकाज जरी दाखविले असले किंवा तसे ठरले असले तरीही अशा अनेक घटना घडत असतात आणि गेल्या आठवड्यामध्ये अशा अनेक गोष्टी घडल्या, काही प्रसंग अचानक समोर आले आणि त्यानुसार सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य मुद्दे उपस्थित करतात, चर्चा उपस्थित करतात आणि त्यामुळे कामकाज पत्रिकेवर जो कार्यक्रम दाखविलेला आहे किंवा कामकाज सल्लागार समितीमध्ये जे कामकाज ठरविलेले आहे ते कामकाज आपण आणि सभागृह अनेक वेळा बाजूला ठेवतो आणि आपण त्या विषयावर चर्चा घेतो. कामकाज सल्लागार समितीमध्ये शनिवारच्या दिवशी अशासकीय कामकाज घेण्याचे ठरविले तसेच ते झाले पाहिजे आणि सभागृहाने ठरविले की, शासकीय कामकाज सुध्दा घ्यावे. त्याप्रमाणे ते कामकाज घेतले हा एक भाग झाला. सगळ्यात महत्वाचे म्हणजे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुडकर साहेबांनी आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी जे मुद्दे उपस्थित केले आणि जे आरोप केले ते अतिशय चुकीचे आहेत, असे मला वाटते. मागचा पूर्ण आठवडा केवळ विरोधी पक्षाच्या आग्रहास्तवच नाही तर संपूर्ण सभागृहाच्या आग्रहास्तव, कापसाचा विषय असेल, सोयाबीनचा विषय असेल, धानाचा विषय असेल किंवा अलीकडचा बेळगावचा विषय असेल, या सगळ्या विषयांवर या सभागृहाच्या भावना अतिशय तीव्र होत्या म्हणून मागच्या आठवड्यात शनिवारचा दिवस सोडला तर बाकीच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे ....

सगळ्या दिवशी कार्यक्रम पत्रिकेवरचे कामकाज बाजूला ठेऊन आपण त्यावर चर्चा घेतली. विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, या विषयावर चर्चा घ्यावी आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि अन्य सर्व सदस्यांना माहीत आहे की, सत्ताधारी पक्षाने सुध्दा ताबतोब चर्चा सुध्दा घेतली. सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते जे जे सांगतील त्यांचा आदर ठेऊन..

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे काय चालले आहे ?

श्री. विनायक मेटे : मी आपल्या विषयावरच माझे मत मांडत आहे. सभापती महोदय, आम्हालाही बोलण्याचा अधिकार आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, आपण जरा खाली बसा. आम्ही सुध्दा सरकारचाच भाग आहोत. आपण विरोधी पक्षातच चांगले दिसता. आपण चांगले मुद्दे मांडता. आम्हाला आनंद आहे. आपण असेच कायम विरोधी पक्षात राहावे. या ठिकाणी विरोधी पक्षाकडून सत्ताधारी पक्ष कामकाज रेटून नेत आहे असा जो आरोप करण्यात येत आहे तो चुकीचा आह. उलट त्यांना विश्वासात घेऊन, त्यांना मानसन्मान देऊनच गेल्या आठवड्यात सत्ताधारी पक्षाने पूर्णपणे कामकाज चालविले आहे. त्या दिवशी अतिशय किरकोळ स्वरुपाची दोन बिले होती..

श्री. दिवाकर रावते : किरकोळ बिले होती हे आपण कसे ठरविणार ?

श्री. विनायक मेटे : त्यामध्ये अतिशय किरकोळ बदल होते आणि त्याची सुध्दा कल्पना विरोधी पक्षाला दिलेली होती. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे असतील किंवा सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत असतील, त्यांनी बिलावर पुष्कळ भाषण केले. त्यांनी बिलावर अतिशय सुंदर भाषण केले. आपल्यापेक्षा ते दोन्ही सन्माननीय सदस्य कोठेही कमी पडलेले नाहीत असे मला वाटते. ते अतिशय चांगले बोलले. त्यामुळे यामध्ये फार काही झालेले नाही. त्यामुळे या ठिकाणी जे आक्षेप घेण्यात आले त्यामध्ये त्यांनी अशा पध्दतीने हेत्वारोप करु नये. जे कामकाज झाले ते अतिशय योग्य झालेले आहे आणि विरोधकांचा मानसन्मान ठेऊन झालेले आहे असे मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, हमारे माननीय विरोधी पक्ष नेता और माननीय सदस्य श्री रावते साहब ने अपनी जो बात यहां पर रखी है, उस संबंध में हम उनकी भावनाओं को समझ सकते हैं. लेकिन ये बहुत ही साधारण बिल थे. इस बारे में माननीय मंत्री श्री हर्षवर्धन पाटील साहब ने यहां पर आग्रह किया. उन्होंने कहा कि पिछले हफ्ते इन बिलों को पास करने का समय नहीं मिला और अब सिर्फ 5 दिन का ही अधिवेशन बाकी रह गया है. इसलिए बिल नंबर 48 और बिल नंबर 52 पास करने का आग्रह उन्होंने यहां पर किया. ये दोनों ही बिल बहुत छोटे छोटे थे. इसीलिए उन्होंने इन बिलों को पास करने का आग्रह यहां पर किया.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी आपल्या दालनामध्ये माननीय मुख्यमंत्री , माननीय उप मुख्यमंत्री व माननीय संसदीय कार्य मंत्री यांच्या उपस्थितीत शासकीय विधेयकासंबंधीचे कामकाज रात्री 10 वाजले तरी पूर्ण करण्यास आम्ही सहकार्य करु असे सांगितले होते. त्यामुळे आमच्यामुळे सभागृहाचे कामकाज बंद पडले असे सन्माननीय सदस्य श्री.जमा सांगत असले तरी शेतकऱ्यांच्या हितासाठी आपण सगळयांनी आग्रही भूमिका घेतली होती. मुद्रांक शुल्काबाबतचे विधेयक सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांना छोटे वाटत असले तरी ते महत्वाचे विधेयक होते. मुद्रांक शुल्क खात्यात अनेक घोटाळे झालेले आहेत. त्यांचे नावानिशी पुरावे सादर केलेले आहेत. त्यामुळे मला या विधेयकावर बोलावयाचे होते. महाराष्ट्रातून विशेषत: मुंबईतून मोठ्या प्रमाणात मुद्रांक शुल्क प्राप्त होते. शासनाचा महसूल वाढण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे जे जाणून घेण्यासाठी मी आग्रह धरला होता. त्यासाठी आमची रात्री 10 वाजेपर्यंत बसण्याची तयारी दर्शविली होती.

श्री एस. क्यू. जमा : माननीय सभापति महोदय, हम माननीय सदस्य श्री दिवाकर रावते जी की भावनाओं से अहसमत नहीं हैं. परन्तु माननीय सदस्य ने ऐसा आरोप सरकार पर लगाया है कि उन्होंने जानबूझकर माननीय सदस्य की अनुपस्थिति में ये बिल पास किए हैं. हमारा कहना है कि इस तरह का आरोप लगाना सही नहीं है. एक बिल तो मुद्रांक शुल्क के बारे में था. मुद्रांक शुल्क का काम कंप्यूटर पर ऑन लाइन करने संबंधी यह बिल था .यह बात सही है कि माननीय सदस्य इस बिल पर दो-तीन घंटे भी बोल सकते हैं. लेकिन उस दिन माननीय सदस्य श्री तावडे साहब और माननीय सदस्य डॉ. सावंत साहब यहां पर उपस्थित थे. इन सभी माननीय सदस्यों की

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा.....

सहमति से ही ये बिल पास हुए हैं. इसलिए इस तरह का आरोप सरकार पर लगाना ठीक नहीं है, इतना ही मैं कहना चाहता हूं.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा आता असे म्हणाले की, त्या विधेयकाबाबत मी सहमती दर्शविली होती. परंतु मी सहमती दर्शविली नव्हती.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी या विषयावर आपापले विचार मांडले आहेत. आज मी सकाळी कार्यालयात आल्यानंतर याबाबतची माहिती घेतली आहे. लोकशाही पध्दतीमध्ये सभागृहातील कामकाज पूर्ण होण्यासाठी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य व सत्तारुढ पक्षातील सन्माननीय सदस्य यांचा कामकाज सल्लागार समितीच्या माध्यमातून समन्वय ठेवला जातो. त्यानुसार या समितीच्या बैठकीत निश्चित करण्यात आलेले कामकाज पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. सदनामध्ये आलेले कामकाज कधीही क्षुल्लक असू शकत नाही. त्यामुळे यापूर्वी झालेल्या चर्चेमधील क्षुल्लक हा शब्द मी कामकाजातून काढून टाकतो. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना माझी विनंती आहे की, या सभागृहाचे नेते हे अनेक वेळेला अनेक विषयांच्या बाबतीत आग्रह करीत असतात, त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत असतात. या सभागृहाचे आजच्या दिवसाचे व दिनांक 23 तारखेपर्यंतचे कामकाज पूर्ण होण्यासाठी आपण सर्वजण मला जरुर सहकार्य करणार आहात, हे तुमचे मोठेपण आहे. मघाशी आपणा दोघांच्या बोलण्यातून निषेध हा शब्द आला होता. हा शब्द कृपया आपण मागे घ्यावा.

(सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे दोघेही 'क्षुल्लक' हा शब्द मागे घेण्यासाठी होकार दर्शवितात.)

आपल्याकडून निषेध हा शब्द अनावधानाने वापरला गेला आहे असे मी मानतो आणि आपण तो शब्द मागे घेतल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. तथापि, या सदनाचे नेते, विरोधी पक्षाचे नेते यांना एक दिवस बोलवून हा गैरसमज काढून टाकण्याबाबत जरुर प्रयत्न करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, धन्यवाद.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासकीय विधेयकाच्या प्रती विलंबाने पिजनहोलमध्ये वितरित केल्याबाबत

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज कामकाज पत्रिकेवर 3 शासकीय विधेयके चर्चेसाठी दाखविण्यात आलेली आहेत. सदरहू विधेयकांच्या प्रती आतापर्यंत सन्माननीय सदस्यांच्या पिजनहोलमध्ये ठेवलेल्या नाहीत. विधेयकाच्या प्रती आम्हाला उशिराने प्राप्त झाल्या तर आम्ही त्यांचे वाचन केव्हा करणार ते आपणच आम्हाला सांगावे.

4...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.:मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो :-

"महाराष्ट्र महानगरपालिका (महापौर पदांचे आरक्षण) (सुधारणा) नियम, 2011 प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी 2011/80/प्र.क्र.36/न.वि.32 (1), दिनांकित 7 जून, 2011."

सभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो :-

"महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (अध्यक्ष पदाची निवडणूक) (सुधारणा) नियम, 2011 प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी 2011/80/प्र.क्र.36/न.वि.32 (2), दिनांकित 7 जून, 2011.

सभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2006-2007 चा तेहतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2000-2001 व सन 2001-2002 चा सोळावा व सतरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2000-2001 व सन 2001-2002 चा अठरावा व एकोणिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या दृष्टीकोनातून अस्तित्वात आलेल्या या महामंडळांचे अहवाल 10-10 वर्षे उशिराने सभागृहाला सादर केले जातात. आपण या संदर्भात शासनाला वारंवार निदेश दिलेले आहेत. या महामंडळाचे कामकाज कशा प्रकारे चालले आहे, या महामंडळामार्फत कोणाला मदत करण्यात आली आहे हे समजण्यास विलंब होतो. त्यामुळे निदान पुढील वर्षांचे अहवाल तरी वेळेवर सादर करण्यासाठी आपण पुन्हा एकदा शासनाला निदेश द्यावेत.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी यापूर्वी सुध्दा ही बाब सभागृहाच्या व माझ्या निदर्शनास आणली होती. अशा प्रकारच्या महामंडळांचे जे कामकाज चालते त्यांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर लवकरात लवकर ठेवणे आवश्यक आहे. हे अहवाल सादर झाल्यानंतर त्यापैकी काही अहवालांवर सभागृहात चर्चा घडवून आणावी अशी सन्माननीय सदस्यांची अपेक्षा आहे. त्या दृष्टीने सन्माननीय संसदीय कार्य मंत्र्यांच्या निदर्शनास ही बाब आणून द्यावी आणि हे अहवाल सभागृहात लवकरात लवकर सादर होतील अशी व्यवस्था करावी.

यानंतर श्री.गिते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, आपने भी आदेश दिए हैं कि कोई भी अहवाल २-३ साल पहले का यहां पर नहीं रखा जाना चाहिए. १०-११ साल पहले के अहवाल सदन में रखना उचित नहीं है. सभी माननीय सदस्यों एवं अधिकारियों को इन अहवालों की कॉपी देने के लिए करीब ४-५ सौ कॉपी निकाली जाती हैं. लेकिन ये अहवाल १०-११ साल पहले के होने की वजह से माननीय सदस्यों को उसका कोई खास उपयोग नहीं हो पाता है. इसलिए अहवाल की छपाई में होने वाला खर्च व्यर्थ ही जाता है.

सभापति महोदय, अहवाल की ४-५ सौ कॉपी की छपाई में होने वाले खर्च को रोका जाना चाहिए. इसलिए सभापति महोदय, आप ऐसे निदेश यदि सरकार को दे दें कि तीन साल पहले का कोई भी अहवाल यहां पर पेश न किया जाये तथा उस अहवाल की कॉपी सरकार अपने कार्यालय में ही रख ले, ताकि इतनी देर से अहवाल छापने में उपयोग होने वाले पेपर और पैसे को व्यर्थ होने से बचाया जा सके. अहवाल देरी से आने के लिए अधिकारियों की जवाबदारी भी फिक्स की जानी चाहिए, इतना ही मुझे कहना है.

श्री. प्रकाश बिनसाळे : शासनाने सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना लॅपटॉप संगणक उपलब्ध करुन दिलेले आहेत. शासनाची अनेक महामंडळे आहेत आणि त्यांचे दरवर्षी शेकडो पानांचे अहवाल तयार होत असतात आणि ते सदनात वितरित होतात. सदर महामंडळाचे अहवाल आम्हाला सी.डी.च्या स्वरुपात उपलब्ध करुन दिले तर शासनाचे कागदाचे मोठया प्रमाणात नुकसान कमी होईल पर्यायाने आर्थिक बचत होईल तसेच कागदपत्रे डिस्ट्रॉय करण्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडतो, तो समतोल देखील बिघडणार नाही. म्हणून शासनाच्या अखत्यारितील महामंडळाचे अहवाल सर्व सदस्यांनी सी.डी.च्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावेत अशी माझी विनंती आहे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचा सन 2008-2009 चा 46 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते,संजय केळकर,भगवान साळुंखे, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार यांनी " शासन निर्णयानुसार 1 जानेवारी, 2006 पासून सहावा वेतन आयोग लागू करणे, मात्र शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षकांना प्रत्यक्ष लाभ दिनांक 1 एप्रिल, 2011 पासून देये ठरविणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयत पाटील यांनी "यशवंतखार (ता.रोहा,जि.रायगड) येथे कुंडलिका नदीच्या पात्रात अनधिकृतरित्या सक्शन पंप चालू करुन बेकायदेशीर रेतीचे उत्खनन केल्यामुळे शेतकऱ्यांचे व मच्छीमारांचे झालेले नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो पुंडलिक गाणार,नितीन गडकरी, रामनाथ मोते, भगवान साळुंखे,डॉ.रणजित पाटील यांनी " उच्च व तंत्रशिक्षण विभागांमार्फत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारित नक्षलग्रस्त व अतिसंवेदनशील आदिवासी भागात कार्यरत व्यवसाय शिक्षकांना सन 2002 ते 2007 या कालावधीतील थकबाकी 6 टक्के व्याजासह देण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवानराव साळुंखे यांनी "महाराष्ट्र नर्सिंग ॲक्ट 1966, महाराष्ट्र नर्सिक कौन्सिल नियम 1971 व नर्सिक कौंन्सिल बॉयलॉज 1973 नुसार महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशन ही संस्था सन 1975 सालापासून सुरु असणे, मात्र या ॲक्टमध्ये सुधारणा करण्याच्या नावाखाली महाराष्ट्र परिचारिका व पॅरॉमेडीकल शिक्षण मंडळ अधिनियम, 2011 हा नवीन कायदा येऊ घालणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. किशनचंद तनवाणी यांनी "सिंधुदूर्ग जिल्हयातील वनरक्षक, वाहनचालक व अन्य पदासाठी उप वनसंरक्षक कार्यालयाने सन 2010 उमेदवारी अर्ज मागवून त्यातील पात्र उमेदवारांच्या यादीला वगळून सन 2011 मकध्ये नवीन भरती प्रक्रिया करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

लक्षवेधी सूचना क्रमांक 1 संबंधी व पुढे ढकलण्यात आलेल्या इतर लक्षवेधी सूचनांसंबंधी

सभापती : लक्षवेधी सूचना क्रमांक 1 ही सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, परशुराम उपकरकर यांनी दिलेली आहे. सदरहू लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्यांच्या सूचनेनुसार पुढे ढकलण्यात येत आहे. ही लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल. दरम्यानच्या काळात काही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आल्या आहेत, त्या लक्षवेधी सूचनाबाबत मी सांगू इच्छितो की, या अधिवेशनातच सभागृहाचा एक-दोन तासाचा जास्तीचा वेळ देऊन लक्षवेधी सूचनांवर चर्चा घेण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अकोला येथील विमानतळाच्या धावपट्टीचा विकास करणे

मु. शी. : अकोला येथील विमानतळाच्या धावपट्टीचा विकास करणे यासंबंधी श्री पांडुरंग फुंडकर, डॉ.रणजित पाटील, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" राज्यात मान्यता दिलेल्या 169 औद्योगिक विशाल प्रकल्पांमध्ये एकूण 1,44,556 कोटी रुपयांची झालेली गुंतवणूक, या प्रकल्पांपैकी अमरावती विभागामध्ये केवळ 5 औद्योगिक विशाल प्रकल्प सुरु असून त्यात केवळ रुपये 721 कोटींची गुंतवणूक होणे, महाराष्ट्रामध्ये 143 विशेष आर्थिक क्षेत्र मंजूर केले असताना अमरावती विभागात केवळ 3 विशेष आर्थिक क्षेत्र मंजूर करणे, या विभागामध्ये एकही आय.टी.पार्क नसणे, औरंगाबाद ते नागपूर या दोन शहरादरम्यान 500 कि.मी.चे अंतर असून देखील मध्ये कोणतेही विमानतळ नसणे, विकासातील अशा अनुशेषामुळे वाशिम,बुलढाणा व अकोला इत्यादी जिल्हयांचा अतिमागास जिल्हयामध्ये समावेश होणे, अकोला शहर हे अमरावती विभागातील वाशिम,बुलढाणा,अमरावती व यवतमाळ या जिल्हयापासून मध्यवर्ती ठिकाणावर असून तेथे सध्या असलेली 1400 मीटर लांबीची धावपट्टी "A.T.R.72" या प्रकारची विमाने अकोला विमानतळावर उतरण्याचे दृष्टीने आणखी 400 मीटर वाढविण्याची सूचना श्री. विजय प्रसाद अग्रवाल, संसद सदस्य, भारतीय विमान पत्तन प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी करणे, त्यानुसार अतिरिक्त जमीन संपादित करण्याकरिता शासनाची मान्यता मिळणेस्तव 5 ऑक्टोबर, 2010 रोजी जिल्हाधिकारी,अकोला यांनी सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडे परवानगी मागणे, अद्यापही ही परवानगी न मिळणे, अमरावती विभागाच्या औद्योगिक अनुशेष दूर होण्याच्या दृष्टीने शानाने तातडीने करावयाची उपाययोजना व याबाबतची भूमिका. "

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्यात मान्यता दिलेल्या 161 औद्योगिक विशाल प्रकल्पांपैकी अमरावती विभागामध्ये केवळ 5 औद्योगिक विशाल प्रकल्प सुरु आहेत. मी अमरावतील विभागातील पाच जिल्हयांपुरता प्रश्न मी विचारलेला आहे. या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी सखोल उत्तर दिलेले आहेत. 17 विशाल प्रकल्पांना मंजुरी दिलेली आहे. या प्रकल्पांसाठी 8426 कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. 9718 कोटी रुपये एवढा रोजगार प्रस्तावित आहे. या लक्षवेधीच्या सूचनेच्या लेखी उत्तरामध्ये मोठया प्रमाणात आकडेवारी देण्यात आलेली आहे. पश्चिम विदर्भात अकोला शहर मध्यवर्ती ठिकाणी आहे. अकोला येथे डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ कार्यरत आहे. विविध शैक्षणिक संस्था आहेत. उद्योगाच्या दृष्टीने अकोला शहर मध्यवर्ती ठिकाणी आहे. रेल्वेच्या दृष्टीने देखील अकोला शहर मध्यवर्ती ठिकाणी आहे. अकोला येथे विमानतळासाठी एक छोटी धावपट्टी करण्यात आली आहे. अकोला शहरा जवळच विदर्भातील पंढरी म्हणविणारे शेगांव शहर आहे. त्या ठिकाणी संपूर्ण हिंदुस्थानातील भाविक दर्शनासाठी येतात. तसेच मळघाट येथे मोठे अभयारण्य आहे.

महोदय,पश्चिम विदर्भाच्या मध्यभागी असलेल्या अकोला शहरातील विमानतळाला 1400 मीटरची एक लहान धावपट्टी आहे. अकोला येथील विमानतळावर खाजगी विमाने उतरतात. A.T.R.72 या प्रकारची विमाने अकोला विमानतळावर उतरण्याच्या दृष्टीने आणखी आणखी 400 मीटरने वाढविण्याची सूचना श्री. विजय प्रसाद अग्रवाल, संसद भारतीय विमान पत्तन प्राधिकरण,नवी दिल्ली यांनी केलेली आहे. त्यानुसार अतिरिक्त जमीन संपादित करण्याकरीता शासनाची मान्यता मिळण्यासाठी दिनांक 5 ऑक्टोबर, 2010 जिल्हाधिकारी, विभागाचा खासदार होतो, त्यावेळी अकोला शहरातील विमानतळाचा विकास व्हावा अशा प्रकारची मागणी लोकसभेध्ये केली होती. ही धावपट्टी 1400 मीटर वरुन 1800 मीटर केली तरच त्या धावपट्टीचा उपयोग होऊ शकतो. या विमानतळाच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये जागा नाही. या धावपट्टीलगत डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठाची हजारो एकर पडीक जमीन आहे. तेथील सर्व जमीन लागवडीखाली नाही. डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ हे शासनाच्या अखत्यारितील आहे. सदर विमानतळ देखील शासनाच्या अखत्यारितच आहे. डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठाची या विमानतळाच्या बाजूला पडीक असलेली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काही एकर जमीन विमानतळ प्राधिकरणास दिली तर धावपट्टी वाढू शकते. डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठाची पडीक असलेली जमीन शासनाला द्यावी अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून केलेली आहे, परंतु ती मागणी धूळ खात पडलेली आहे. डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठाची जमीन अकोला शहरातील विमानतळाच्या विकासाला उपलब्ध करुन दिली तर धावपट्टी वाढून तेथे एक चांगल्या दर्जाचे विमानतळ होऊ शकते. पश्चिम विदर्भाला चालना देणारे हे विमानतळ होऊ शकते.

महोदय, अकोला हे कर्कवृत्तावर असलेले शहर आहे. देशाच्या मध्यवर्ती असलेले अकोला शहर आहे.

<u>सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी</u>

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.

.

.

अशा शहरामध्ये धावपट्टी विकसित करणे गरजेचे आहे. म्हणून ही धावपट्टी विकसित करण्यासाठी लागणारी जमीन लवकरात लवकर संपादित करुन प्राधिकरणाला उपलब्ध करुन द्यावी अशी मी मंत्री महोदयांना विंनती करतो. त्या दृष्टीने शासन प्रयत्न करणार आहे काय?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी अमरावती विभागातील औद्योगिक प्रगतीसंबंधी आवश्यक असलेल्या विषयाबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. या भागातील लघु, मध्यम आणि विशाल औद्योगिक प्रकल्पांची सविस्तर आकडेवारी निवेदनामध्ये देण्यात आली आहे. मुख्यत: पश्चिम विदर्भातील अकोला जिल्हा हा देशाच्या मध्यवर्ती ठिकाणी असून अमरावती विभागातील पाच जिल्हयांची भौगोलिक परिस्थिती विचारात घेता विकासाच्या दृष्टीने प्रगती होण्यासाठी अकोला शहर किंवा जिल्हा मध्यवर्ती ठिकाणी आहे. तेथे विमानतळाची धावपट्टी विकसित करण्यासाठी 400 मीटर जमीन आवश्यक आहे. त्या दृष्टीने लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून त्यांनी या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. या पूर्वी सुध्दा या धावपट्टीच्या विकासासाठी अनेक प्रयत्न झाले. त्या संदर्भातील अनेक संदर्भ त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. 400 मीटर जागा या धावपट्टीच्या वाढीसाठी उपलब्ध व्हावी म्हणून जानेवारी, 2012 च्या दुसऱ्या आवठड्यात कृषी विद्यापीठाचे अधिकारी, अकोल्याचे जिल्हाधिकारी, अमरावती विभागाचे आयुक्त आणि माननीय विरोधी पक्षनेते यांची संयुक्त बैठक बोलावण्यात येईल आणि 400 मीटर जागेचा प्रश्न निकाली काढून धावपट्टी वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली कार्यवाही करण्याची मी सभागृहाला ग्वाही देतो.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, यापूर्वी तीन वेळा नियम 93 च्या सूचनांन्वये आणि लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा प्रश्न सभागृहात उपस्थित झालेला होता. अकोला येथील 1.32 कि.मी.अंतराची ही धावपट्टी 60 वर्षापूर्वीची आहे. या धावपट्टीवर फक्त 7 किंवा 8 आसनी ए.टी.आर.विमाने उतरु शकतात अशी परिस्थिती आहे. दोन वर्षापूर्वी विमानतळाची धावपट्टी विकसित करण्यासाठी 16 कोटी रुपये खर्च करण्यात येऊन धावपट्टीची लांबी 1.32 कि.मी.वरुन फक्त 1.40 कि.मी.एवढी वाढविण्यात आली. वारंवार सभागृहात चुकीची उत्तरे दिली जातात. बैठक घेण्याचे आश्वासन दिले जाते. प्रत्यक्षात अशी बैठक घेता येणे शक्य नाही. याचे कारण

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया.....

असे आहे की, धावपट्टीसमोरील भागामध्ये 200 मीटर अंतरावर राष्ट्रीय महामार्ग आहे. त्यामुळे समोरच्या भागात ही धावपट्टी वाढविता येणार नाही. धावपट्टीच्या मागील भागात शरद सरोवर आहे. त्यामुळे मागच्या भागात ही धावपट्टी वाढविणे शक्य नाही. तेथे पी.के.व्ही.चा फोसील प्लँट आहे. यापूर्वी चार वेळा लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून या प्रश्नावर सभागृहात चर्चा झाली होती. मागील बाजूला धावपट्टी वाढविता येणे शक्य नाही असे पी.के.व्ही.कडून स्पष्ट उत्तर देण्यात आले आहे. समोरील भागात नॅशनल हायवे असल्यामुळे त्या दिशेने धावपट्टी वाढविता येणार नाही. 3.5 कि.मी. अंतराची धावपट्टी तयार करण्यासाठी पी.के.व्ही.ला पत्र दिल्यानंतर त्यांनी लेखी पत्राद्वारे स्पष्टपणे कळविले की, आम्ही धावपट्टीसाठी जागा उपलब्ध करुन देणार नाही. मागील बाजूस शरद सरोवर असल्यामुळे मागच्या बाजूला जागा उपलब्ध होणे शक्य नाही. नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनामध्ये शासनाकडून असे उत्तर देण्यात आले होते. अकोला येथील विमानतळाच्या विकासासाठी जे 16 कोटी रुपये खर्च करण्यात आले ती रक्कम पूर्णपणे वाया गेलेली आहे. 120 अंशाच्या अँगलने दुसरी धावपट्टी करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही असा स्पष्ट अहवाल कृषी विद्यापीठाने दिलेला आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, 3.5 कि.मी.ची धावपट्टी तयार करुन तेथे बोईंग व इतर विमाने उतरण्याची व्यवस्था करावयाची असेल तर पंजाबराव कृषी विद्यापीठाकडून प्रस्तावित केलेली जमीन उपलब्ध करुन दिली जाईल काय?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, हा प्रश्न सुटावा यासाठी ज्या गोष्टी करणे आवश्यक आहे त्याकरिता कृषी विद्यापीठाकडून जमीन मिळवून दिली तरच हा प्रश्न निकाली निघेल. अन्यथा तेथे जागा उपलब्ध नाही. जागा उपलब्ध नसल्यामुळेच हा प्रश्न एवढी वर्षे रेंगाळत पडला आहे. हा प्रश्न निकाली निघावा म्हणूनच 15 जानेवारी, 2012 पूर्वी संबंधितांची बैठक घेऊन 400 मीटर जागा उपलब्ध करुन घेतल्यानंतर या धावपट्टीची जागा वाढविता येईल असे स्पष्ट उत्तर दिलेले आहे. विलंब लावण्याचा किंवा 16 कोटी रुपये वाया गेले ते परत वापरात आणण्याचा प्रश्न उद्भवत नाही. अकोला विमानतळाची धावपट्टी विदर्भाचा विकास होण्यास उपयुक्त अशी आहे. यासाठी 400 मीटर जागा उपलब्ध करुन देण्यासाठी मी संबंधितांची संयुक्त बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करेन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न महसूल आणि कृषी विभागाशी संबंधित आहे. सन्माननीय उद्योगमंत्र्यांनी जानेवारी, 2012 च्या दुसऱ्या आठवड्यात कृषी विद्यापीठाचे अधिकारी, जिल्हाधिकारी, आयुक्त यांची संयुक्त बैठक बोलावण्याचे आश्वासन दिले आहे. माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी म्हटल्याप्रमाणे हा प्रश्न निकाली काढण्यासाठी 400 मीटर जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने पर्यायी मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. अन्यथा वर्षानुवर्षे जमिनीचा हा प्रश्न रेंगाळत राहणार आहे. माननीय उद्योगमंत्र्यांनी हा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला तर फार श्रेय त्यांना मिळणार आहे. म्हणून जानेवारी, 2012 च्या दुसऱ्या आठवड्यात संबंधितांची संयुक्त बैठक बोलावून कृषी विद्यापीठाची पडीक असलेली जमीन अकोला विमानतळाच्या धावपट्टीकरिता उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करतील काय? या धावपट्टीची रुंदी वाढविली तर निश्चितपणे विदर्भाचा विकास होणार आहे. म्हणून मंत्री महोदयांनी आश्वासित केल्याप्रमाणे संयुक्त बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्यात आला तर मी जरुर धन्यवाद देईन. हा प्रश्न त्वरेने निकाली काढण्याची भूमिका शासनाने स्वीकारावी अशी मी विनंती करतो.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना अभिप्रेत असलेली कार्यवाही केली जाईल.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्य लोकसेवा आयोगाच्या वेळापत्रकाचे वार्षिक नियोजन करणे

मु. शी. : राज्य लोकसेवा आयोगाच्या वेळापत्रकाचे वार्षिक नियोजन करणे यासंबंधी सर्वश्री जयवंतराव जाधव, अनिल भोसले, हेमंत टकले, ॲड.उषाताई दराडे, सर्वश्री विक्रम काळे, रमेश शेंडगे, सतीश चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या दिवशी वर्षभरात दोन वेळा केंद्रीय लोकसेवा आयोग, विद्यापीठ अनुदानात आयोग, स्टाफ सिलेक्शन कमिशन इ.केंद्र शासनाच्या परीक्षा आल्याने राज्यातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची झालेली गैरसोय, या घोळामुळे काही विद्यार्थ्यांवर संधी हुकण्याची आलेली वेळ, तारखांच्या घोळामुळे धास्तावलेल्या विद्यार्थ्यांत निर्माण झालेली संतापाची लाट, परिणामी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या वेळापत्रकाचे वार्षिक नियोजन सुरवातीलाच जाहीर झाल्यानंतर राज्य लोकसेवा आयोगाच्या वेळापत्रकाचे वार्षिक नियोजन जाहीर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनामार्फत करण्यात आलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3.....

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, महाराष्ट्राचा मंगलकलश स्व.यशवंतरावजी चव्हाण यांनी आणल्यानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्याला चांगले कर्तबगार अधिकारी उपलब्ध व्हावेत या हेतूने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची त्यांनी स्थापना केली. लेफ्ट.जनरल शंकरराव थोरात यांच्यासारख्या व्यक्तिमत्वाला त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी नेमून राज्य शासनाला चांगल्या दर्जाचे अधिकारी मिळवून देण्याचे काम केले. राज्य प्रगतीशील रहावे या दृष्टीने त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केला होता. या प्रयत्नाला निश्चितपणे यश मिळाले आणि राज्याने नेत्रदीपक अशी कामगिरी केली. सध्याच्या काळात या आयोगाच्या कारभाराबाबत अनेक शंका निर्माण व्हावयास लागल्या आहेत. राज्य शासनाचे या आयोगाच्या कारभारावर नियंत्रण असले पाहिजे. त्या बाबतीत शासन कुठे कमी पडत आहे का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. 2011 या वर्षात दोन वेळा केंद्रीय लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा स्तरावरील परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात आल्या होत्या. केंद्रीय आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या एका परीक्षेमधील कालावधी अत्यंत कमी होता. त्यामुळे अनेक उमेदवार एकाच परीक्षेला बसू शकले. पात्र असतानाही दुसऱ्या एका परीक्षेला बसण्याची त्यांना संधी मिळू शकली नाही.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रिपक्षशर्ती नाही

लक्षवेधी सूचना क्र. 3 ..... श्री. जयवंतराव जाधव.....

एमपीएससीच्या परीक्षेनंतर युपीएससीची परीक्षा देण्यासाठी मधला कालावधी अत्यंत कमी असतो. या निमित्ताने माझा असा प्रश्न आहे की, परीक्षांचे वेळा पत्रक ठरविताना या बाबी विचारात घेणारी यंत्रणा शासनाकडे नसल्याने ही वेळ निर्माण होते. त्यातून मराठी माणसाचा टक्का युपीएससीच्या परीक्षेमध्ये कसा वाढू शकेल. काल एमपीएससी ने जी परीक्षा घेतली त्यातील महत्वाची बाब मी सभागृहाच्या लक्षात आणून देतो की, लिपीक-टंकलेखक या संवर्गाची परीक्षा घेण्यात आली. त्या प्रश्न पत्रिकेत बरेच प्रश्न चुकीचे छापलेले होते. ही बातमी आजच्या वर्तमान पत्रातून प्रसिध्द झालेली आहे. अशा प्रकारे आयोगाचे अधिकारी चुकीची प्रश्न पत्रिका छापत असतील आणि आपण मला दोन मिनिटात भाषण आटोपते घ्यावे यासाठी बेल वाजवून अडवित असाल तर आपण पुढील लक्षवेधी सूचना पुकारावी, मला या लक्षवेधीवर अत्यंत मोजक्या शब्दात प्रश्न विचारता येणार नाही.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी मुद्देसूद प्रश्न विचारावा यासाठीच मी सांगत आहे

श्री. जयवंतराव जाधव : महोदय, मी या निमित्ताने मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करीत आहे की, मागील वेळेस याच संदर्भात तारांकित प्रश्न विचारण्यात आला होता. त्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री महोदयांनी जी आश्वासने दिली होती त्यासंदर्भात मी त्यांना पत्र सुध्दा दिलेले आहे. मला त्यांचे उत्तर आले की, आपले पत्र पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेले आहे. पण पुढील कार्यवाही कोणती झाली याची माहिती मात्र देण्यात आलेली नाही. ज्या अधिकाऱ्यांकडून भविष्यात आपल्याला शासन चालवावयाचे आहे तेच अधिकारी अशा प्रकारच्या चुकीच्या पध्दतीने निवडून जागेवर बसविले तर त्यातून काहीच निष्पन्न होणार नाही. तसेच चुकीच्या पध्दतीने प्रश्न पत्रिका काढणाऱ्या एमपीएससीवर शासनाचा कोणताही अंकुश राहिलेला दिसत नाही. यापूर्वी पोलीस निरीक्षक भरतीत घोटाळा, पॉलिटेक्नीक अधिव्याख्याता भरतीत घोटाळा, आरोग्य उपसंचालक भरतीत घोटाळा, औषध निरीक्षक भरतीत घोटाळा अशा विविध विभागांच्या भरतीच्या वेळेस प्रश्न पत्रिकांमध्ये गडबड झाल्याचे निदर्शनास आणले आहे. त्यामुळे शासनाला किंवा एमपीएससी ला सुध्दा यामध्ये कोणतेच गांभीर्य दिसत नाही. कालची जी लिपीक-टंकलेखकाची परीक्षा झाली त्यात औंढा नागनाथ हे प्रसिध्द ज्योतिर्लिंग खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यात आहे ? असा प्रश्न विचारलेला असून त्याला 1. बीड, 2. परभणी, 3. औरंगाबाद आणि

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4. अहमदनगर असे चार ऑपशन्स दिलेले आहेत. या चारही ऑपशनमध्ये त्या प्रश्नाचे उत्तर नाही. तसेच "सी" गटातील क्र. 162 व्या प्रश्नात "गर्विष्ट" या शब्दाशी व्याकरणाच्या दृष्टीने साम्य असलेल्या पर्यायातील योग्य पर्याय ओळखा. ऑपशन्समध्ये 1."बंडाळी" 2. "धिटाई" 3. "भूक" आणि 4. "दयावंत" असे चार ऑपशन्स दिलेले आहेत. या चारही ऑपशन्समध्ये या शब्दाचा अर्थ अभिप्रेत नाही. माझ्या मते हे चार ऑपशन्स म्हणजे आयोगाची बंडाळी आहे आणि एमपीएससीची धिटाई वाढत चालली आणि त्यांच्या ज्ञानाची प्रचंड भूक आहे, मात्र शासन त्यांच्यावर दयावंत आहे. अशा आयोगाच्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

प्रा. फौजिया खान : महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाला मी उत्तर देऊ इच्छिते की, एमपीएससी आणि युजीसी मार्फत ज्या परीक्षा घेतल्या जातात त्यांच्या तारखेत आणि एमपीएससी मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांच्या क्लॅश होत असतात. त्या अनुषंगाने मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, प्रामुख्याने परीक्षा केंद्रांसाठी शाळा आणि महाविद्यालये अशाच जागा आपल्याला मिळत असतात. तसेच सुट्टीच्या दिवशी ही केंद्रे आपल्याला उपलब्ध होऊ शकतात. युपीएससीच्या परीक्षा घेण्यासाठी देखील तेच दिवस पाहिजे असतात. दिल्ली येथील परीक्षांच्या वेळेत बदल करणे आपल्याला शक्य होईल असे वाटत नाही म्हणून एमपीएससी मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांच्या संदर्भात आपण या तारखांमध्ये बदल करण्याचा प्रयत्न जरुर करीत आहोत. आपल्या आणि त्यांच्या परीक्षांमध्ये क्लॅश होत असेल तर त्यासाठी प्रि-प्लॅन आपल्याला तारीख ठरवावी लागेल. त्यासाठी आपण अगोदर जाहिरात प्रेस झाल्या नंतर तारीख जाहीर करीत होतो पण आता पुढील एक वर्षासाठीचा संपूर्ण कार्यक्रम अगोदरच प्रसिध्द केलेला असतो, जेणेकरुन उमेदवारांना अभ्यासाला वेळ जास्त मिळू शकेल.

त्याचबरोबर युपीएससी मार्फत टाईम टेबल प्रसिध्द झाल्यानंतर एमपीएससी ने आपले टाईम टेबल प्रसिध्द करावे असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार आपण या वर्षाच्या नंतर टाईम टेबल सुरु करणार आहोत. त्यानंतरही अशा परीक्षा क्लॅश होत असल्याच्या तक्रारी आल्या तर त्या बदलण्याच्या सूचना सुध्दा आपण करु शकतो. यावर्षी दि. 12.2.2012 रोजी जी परीक्षा आपण ठरविली होती त्यासंदर्भात युपीएससीची परीक्षा क्लॅश होत असल्याची तक्रार आल्यानंतर आपण ती परीक्षा पुढे ढकलली. त्याचे नवीन टाईम टेबल तयार केलेले आहे. अशा दुरुस्त्या आपण एमपीएससी च्या टाईम टेबलच्या बाबतीत केलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्यांनी प्रश्न पत्रिकेतील चुकांच्या संदर्भात दुसरा प्रश्न विचारलेला आहे. त्या अनुषंगाने मी त्यांना असे सांगू इच्छिते की, एमपीएससी ही संस्था एक ॲटॉनॉमस बॉडी असल्याने त्यावर शासनाचा तसा डायरेक्टली अंकुश नाही. त्यांना आपण केवळ गाईडलाईन्स इश्यू करु शकतो. तसेच ज्या प्रश्न पत्रिका तयार केल्या जातात त्यांचा अधिक अनुभव असलेल्या लोकांकडून त्यांचा आढावा घेत असतो. त्यात प्रामुख्याने सध्याच्या परीक्षेत आपण दुरुस्ती करण्याचे ठरविले असून सिलॅबस सुध्दा कंप्लीटली चेंज करीत आहोत. त्यात जनरल नॉलेज, इंग्रजी आणि मराठी हे तीनच भाग असतील. त्यात जनरल नॉलेजची परीक्षा पूर्णपणे ऑब्जेक्टीव्ह स्वरुपाची राहणार असून त्यात ऑप्शन्स राहणार आहेत. दुसरी दुरुस्ती अशी करणार आहोत की ही पध्दती अधिक पारदर्शक पध्दतीने व जास्तीत जास्त परीक्षक उपलब्ध होऊ शकतील अशी करणार आहोत व त्याचबरोबर उमेदवारांना आन्सरशीट सुध्दा आपण सोबत देणार आहोत.

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, ज्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांना स्पेसिफिक प्रश्न विचारावेत अशी सूचना पीठासीन अधिकारी म्हणून देण्यात येते तशी मुद्देसूद उत्तर देण्याची सूचना मंत्री महोदयांना सुध्दा आपण दिली पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्या प्रश्नाच्या संदर्भातीलच मी उत्तर दिलेले आहे. यासंदर्भात जे काही प्रश्न आहेत त्याचे निवारण कसे करावयाचे यासंदर्भात मी माहिती देत आहे. प्रश्न पत्रिकेच्या संदर्भात ज्या चुका झालेल्या आहेत त्या संदर्भातील उत्तर पत्रिका विद्यार्थ्यांना दाखविल्या जातील तसेच विद्यार्थ्यांचे अजून काही आक्षेप असतील तर अशा विद्यार्थ्यांना संधी दिली जाईल सर्व प्रश्नांचे निवारण झाल्यानंतर रिझल्ट डिक्लेअर केले जातील. रिझल्ट डिक्लेअर करण्याच्या संदर्भात नवीन पध्दत सुरु केली जाणार आहे. काही काही प्रश्नपत्रिकांमध्ये चुका असतात हे मी मान्य करते.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : कृपया सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे. प्रत्येक सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली जाईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, ज्या अधिका-यांच्या हातामध्ये राज्याचे आणि देशाचे भवितव्य आपण देणार आहोत त्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने प्रश्न उपस्थित केलेला असून या संदर्भात जे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले आहे, ते सुध्दा दुर्दैवी आहे. युपीएससी, एमपीएससीची परीक्षा पास झाल्यानंतर विद्यार्थी अधिकारी होतात व तेच मंत्र्यांना पॉलीसी समजावून सांगतात. युपीएससी, एमपीएससीच्या प्रश्नपत्रिकामध्ये चुका होतात याकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. युपीएससी, एमपीएससीची परीक्षा पास झालेले अधिकारीच मंत्र्यांना पॉलिसी समजावून सांगत असतात. असे असतांना आपण चुकीच्या प्रश्नाच्या संदर्भात मॅप बनवत आहात. केंद्रीय लोक सेवा आयोगांच्या परीक्षेचे एक वर्षाचे नियोजन जाहीर झाल्यानंतर महाराष्ट्र लोक सेवा आयोगाच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले जाते. या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर देण्यात आले आहे की, परीक्षा केंद्रासाठी जागा मिळत नाहीत. सदर उमेदवारांच्या बैठक व्यवस्थेसाठी महाराष्ट्र लोक सेवा आयोगास शाळा, महाविद्यालयांची आवश्यकता असते. इतर दिवशी शाळा व महाविद्यालये सुरु असल्यामुळे उप केंद्र उपलब्ध होण्यात अडचणी येतात. या सर्व अडचणीमुळे युपीएससी, एमपीएससीची परीक्षा एकाच दिवशी घेतली जाते. विद्यार्थ्यांच्या दोन्ही परीक्षा क्लॅश झाल्या तर विद्यार्थी परीक्षा देऊ शकणार नाहीत. ज्या विद्यार्थ्यांचे पुढील वर्षात वय वाढणार आहे त्यांना पुढील वर्षीच्या परीक्षेसाठी बसता येणार नाही. त्यामुळे मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, वर्षभरात एकंदर 52 रविवार येतात. असे असतांना तुम्ही 52 रविवारमध्ये परीक्षेचे नियोजन आपण करु शकत नाही काय ? केंद्रीय लोक सेवा आयोगाचे प्लॅनिंग एक वर्षापूर्वी होत असतांना राज्य सरकार तशा प्रकारे प्लॅन का करीत नाही ?

सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मोठ मोठी मैदाने आपल्याला मिळतात. राज्याचा, जिल्हयाचा महोत्सव असेल तर मोठ-मोठी मैदाने घेऊन डेकोरेट केली जातात. त्यामुळे या परीक्षांसाठी तुम्ही शाळा आणि कॉलेजेसवर कशासाठी विसंबून बसला आहात, पोलिसांचा वार्षिक कार्यक्रम मोठया मैदानात केला जातो परंतु भविष्यासाठी निर्माण होणा-या अधिका-यांच्या परीक्षा मोठया मैदानात का घेत नाहीत ? यासंदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न एवढाच आहे की, जी प्रश्न पत्रिका सेट केली जाते तीच मुळात चुकीची सेट केली जाते. पेपर सेट करणारे अधिकारी जी चूक करतात त्यांना क्षमायाचना देण्यासाठी या ठिकाणी उत्तर दिले जात आहे. चुकीच्या प्रश्न प्रत्रिका सेट करणा-यांना दूर करुन नवीन प्रश्नपत्रिका सेट करणा-यांना घेतले जाणार आहे काय? लोकसेवा आयोगाच्या परीक्षा एक वर्षभरापूर्वी जाहीर केल्या जातात तर राज्य सरकार त्यांच्या वेळापत्रकात काही बदल घडवू शकत नाही काय ? त्यामुळे या सर्व बाबींचे नियोजन कोण करणार आहे ? ज्यांनी चुकीचे नियोजन करुन शासनाची दिशाभूल केलेली आहे अशा अधिका-यांवर तुम्ही कारवाई करणार आहात काय ? अशा चुकांबाबत यापूर्वी कारवाई झालेली असल्यामुळे यासंदर्भातील भ्रष्टाचार मुळापासून निपटून काढला जाणार आहे काय ?

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, युपीएससी,एमपीएससीच्या वेळापत्रकाच्या संदर्भात मी अगोदरच उत्तर दिलेले आहे. युपीएससीचे टाईमटेबल प्रसिध्द झाल्यानंतर एमपीएससीचे टाईम टेबल प्रसिध्द केले जाईल व यामध्ये सर्वांना सुविधा होईल याबाबत एमपीएससी कडून प्रयत्न केले जाणार आहेत. प्रश्न पत्रिका चुकीच्या सेट केल्या जातात यासंदर्भातही मी उत्तर दिलेले आहे. प्रश्नपत्रिकेच्या संदर्भात एमपीएससीकडून दुरुस्ती केली जाणार आहे. परीक्षेच्या संदर्भात पध्दत अशी आहे की, एक्झामिनर कडून पेपर करेक्शन होऊन आल्यानंतर ते पेपर पुन्हा एक्सपर्टकडे दिले जातात. असे असतांनाही चूक राहिली तर विद्यार्थ्याला त्यासंदर्भात तक्रार करण्याची मुभा

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान .....

दिली जाते. संबंधित तक्रार कन्सीडर केली गेली तर प्रश्नाच्या चुकांचे मार्क्स विचारात घेतले जात नाही परंतु चुकांमध्ये दुरुस्ती व्हावी यासाठी परीक्षेची सर्व पध्दत बदलण्यात आलेली आहे. परीक्षा अधिक पारदर्शक व्हावी यासाठी जे नवीन प्रयोग केले जाणार आहेत त्याचीही माहिती मी या ठिकाणी दिलेली आहे. ॲक्शन घेऊन जर प्रश्न सुटत असेल तर संबंधितांविरुध्द ॲक्शन घेण्यात काहीही अडचण राहणार नाही. परंतु परीक्षांसंदर्भात दुरुस्ती झाली पाहिजे अशा प्रकारची भूमिका शासनाची आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मंत्री महोदयांनी पहिले जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे. युपीएससी परीक्षांची तारीख एक वर्षापूर्वी जाहीर करीत असते व त्या तारखा शासन ॲडजस्ट करीत असेल तर मग काही प्रश्नच राहणार नाही. माझा प्रश्न असा आहे की, जोपर्यंत आक्षेप घेतला जात नाही तोपर्यंत आपल्याला त्यातील प्रश्न समजून येत नाहीत. त्यामुळे आमचा आक्षेप माननीय मंत्री महोदयांच्या दोन वाक्यावर आहे. आपण म्हणाला की, युपीएससी, एमपीएससी ही ॲटॉनॉमस बॉडी आहे परंतु सरकार म्हणून आपली यासंदर्भात काहीच जबाबदारी येत नाही काय ? युपीएससी, एमपीएससीच्या संदर्भात प्रश्न निर्माण झाले होते अशा वेळेस त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. आपण सांगितले आहे की, प्रश्नांची पध्दती बदली जाणार आहे त्यामुळे यासंदर्भात आम्ही आपले जरुर स्वागत करु. परंतु काही प्रश्नांच्या उत्तरासाठी जे ऑप्शन दिलेले असतात तेच चुकीचे असतात. सन्माननीय सदस्यांनी ज्योतिर्लिंगाचे उदाहरण दिले आहे, ते अतिशय बोलके आहे. चुकीचे ऑप्शन दिलेले असतांना विद्यार्थ्यांना त्याचे मार्क्स मिळाले किंवा मिळाले नाहीत तर त्या परीक्षांचे काहीच महत्व राहणार नाही. परीक्षेच्या संदर्भात आपण जे नवीन धोरण स्वीकारीत आहात ते एक्सपर्टकडे दाखवून सुध्दा जर त्यात चुका झाल्या तर शासन काय कारवाई करणार आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, प्रश्नपत्रिकेत ज्या चुका झालेल्या आहेत त्याचा पूर्ण तपास केला जाईल व त्यासंदर्भात कोणती ॲक्शन घ्यावयाची ते ठरवले जाईल.

.....4

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, एमपीएससी ही मोठी संस्था असतांना तिचे काम नियोजन शून्य असून ही संस्था मूर्ख लोकांच्या ताब्यात आहे. एमपीएससीला साध्या प्रश्नांचे उत्तर माहिती नसणे बरोबर नाही. मी एमपीएससीच्या संदर्भात जो शब्द वापरला आहे तो मागे घेतो. एमपीएससी ही संस्था अज्ञानी लोकांच्या ताब्यात आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही. एमपीएससीला साधी ऑब्जेक्टीव्ह उत्तरे माहिती नसतील तर त्या सारखे दुसरे दुर्दैव नाही, असे मला वाटते. यासंदर्भात मला प्रश्न विचारावयाचा आहे की, सध्या आयएएस आणि आयपीएसच्या परीक्षांमध्ये महाराष्ट्राचा टक्का वाढतो आहे. एमपीएससीने आपल्या मुख्य परीक्षेमध्ये मल्टीपल चॉईस ऑब्जेक्टीव्ह पध्दत सुरु केलेली आहे. पण युपीएससीची मुख्य परीक्षा ही डीस्क्रिप्टीव्ह स्वरुपाची आहे. युपीएससी व एमपीएससी या परीक्षा एका पध्दतीने घेतल्या तर महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल व केंद्रीय पातळीवर महाराष्ट्राचा टक्का वाढेल. त्या पध्दतीने शासन यूपीएससीच्या परीक्षेचे नियोजन करण्याबाबत शिफारस करणार आहे काय? युपीएससी, एमपीएससी या ॲटोनमस बॉडी आहेत. हे मंडळ काही निवडणुकीने निवडून येत नाही. खरे म्हणजे सरकारच या बॉडी नियुक्त करीत असते त्यामुळे ॲटॉनॉमस बॉडी म्हणून ज्या अधिकाऱ्यांनी ही चुकीची प्रश्नपत्रिका काढलेली आहे त्यांना एमपीएससी मधून बाहेर काढले जाणार आहे काय ?

यानंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, याचे देखील मी उत्तर दिलेले आहे. चुका झाल्यासंबंधात पूर्णपणे चौकशी करण्यात येईल. जे चुकीचे प्रश्न आहेत ते रद्द करून त्याचे गुण देण्यात येतील व या प्रकरणी प्रोसिजरनुसार कारवाई केली जाईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, तीच तीच उत्तरे येत आहेत. या प्रश्नातील गांभीर्यच शासनाच्या लक्षात येत नाही. शासनाने पद्धती बदलल्याबद्दल आम्ही त्याचे स्वागत केले आहे. आपण एक वर्ष आधी कार्यक्रम घोषित करणार आहात त्याचे देखील आम्ही स्वागत केले. त्याचा फायदा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना होईल. जे कोणी तज्ज्ञ आहेत त्यांच्यावर शासनाचा अंकुश आहे की नाही ? स्वायत्त बॉडीवरील अधिकाऱ्यांवर कारवाई केल्याची अनेक प्रकरणे आपण यापूर्वी पाहिलेली आहेत. ती देखील माणसे बुद्धिमान होती. पण येथील लोकांना शासन का पाठीशी घालत आहे ? त्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील जे तज्ज्ञ आहेत त्यांच्यावर जबाबदारी फिक्स करून शासन त्यांच्यावर कारवाई करणार आहे की नाही ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा प्रश्न सरळ आणि सोपा आहे. शासनाने सांगितले की, आम्ही सिलॅबस बदलणार आहोत. सदर सिलॅबस शासन कधी बदलणार आहे ? पेपर सेटर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नियुक्त केलेले आहेत. त्यांनी पेपरमध्ये दिलेले ऑप्शन पाहता ते अज्ञानी आहेत हे दिसून येते. तेव्हा अशा पेपर सेटरवर शासन किती कालावधीत कोणती कारवाई करणार आहे ? अशा प्रकारचे पेपर सेटर नजिकच्या काळात येऊ नये म्हणून पेपर सेटरसाठी कोणता क्रायटेरिया लावण्यात आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, पेपर सेट करणारे प्रोफेसर असतात. प्रोफेसरवर शासन डायरेक्ट कोणत्याही प्रकारची कारवाई करू शकत नाही. ज्या प्रश्नपत्रिकेत चूक झाली आहे त्यासंबंधी चौकशी करण्यात येईल. त्या प्रोफेसरना बाहेर काढायचे किंवा कसे हे प्रोसिजरप्रमाणे चौकशी झाल्यानंतर निश्चित करण्यात येईल.

उप सभापती : या लक्षवेधी सूचने वरील एकंदरीत चर्चा पाहता एमपीएससीच्या कारभारामध्ये काही मूलभूत सुधारणा होणे अत्यावश्यक आहे, असे आढळून येते. त्याप्रमाणे शासनाने तेवढी कार्यवाही करावी.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मूलभूत सुधारणा करण्यासंबंधी मी सांगितले आहेच. त्याप्रमाणे मूलभूत सुधारणा करण्यात येतील. ..2

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईतील शिवडी येथील टी.बी.रूग्णालयातील कर्मचाऱ्यांना टी.बी.रोगाचा संसर्ग होणे

मु. शी. : मुंबईतील शिवडी येथील टी.बी.रूग्णालयातील कर्मचाऱ्यांना टी.बी.रोगाचा संसर्ग होणे यासंबंधी सर्वश्री चरणसिंग सप्रा, जयप्रकाश छाजेड, सुभाष चव्हाण, अशोक ऊर्फ भाई जगताप,डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री. उल्हास पवार, मोहन जोशी, एस क्यू ज़मा, हेमंत टकले, रमेश शेंडगे, विक्रम काळे, ॲड. उषाताई दराडे, सर्वश्री. अरुण गुजराथी, किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील शिवडी येथील क्षयरोग (टी.बी.) रुग्णालयात अस्वच्छता, सुरक्षिततेसाठी अपुरे पडणारे साहित्य अपुरे कर्मचारी वर्ग यामुळे रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनाच या दुर्धर रोगाची लागण होण्याचे प्रमाण वाढले असून गेल्या 5 वर्षात 60 कर्मचाऱ्यांना क्षयाची लागण झाली असून त्यातले 34 जण दगावल्याची धक्कादायक माहिती माहे नोव्हेंबर, 2011 च्या दरम्यान निदर्शनास येणे, क्षय हा संसर्गजन्य रोग असून या रुग्णालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना हात मोजे, मास्क, प्लास्टीक ॲप्रन या संरक्षक वस्तू देणे बंधकारक असणे तसेच रुग्णालयात स्वच्छता राखण्यासाठी मुबलक प्रमाणात झाडू, चिंधी, लोशन, हायपो, सोडा, ब्लिचिंग पावडर अशा साहित्याचा पुरेसा साठा असणे आवश्यक असतांना साहित्याचा अत्यंत अल्प प्रमाणात पुरवठा पालिकेकडून करण्यात येणे, त्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांमध्ये वाढते संसर्गाचे प्रमाण, त्यामुळे त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, टी.बी.सारखा दुर्धर रोग बरा होणारा आहे. गरीब माणसांना उपचार मिळावेत म्हणून एका दानकर्त्याने दिलेल्या जागेवर शिवडी येथे टी.बी.रूग्णालय उभे राहिलेले आहे. या रूग्णालयात रूग्णांना सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच टी.बी.व्हायला सुरूवात झाली आहे व ते मृत्युमुखी पडत आहेत. रोग्यांची सेवा करणारे ज्यावेळी बाधित होतात त्यावेळी इतर स्टाफवर देखील त्याचा नैतिक परिणाम होतो. येथे काय काय पुरविले आहे यासंबंधातील माहिती देण्यात आली आहे. मूळामध्ये हे रूग्णालय टी.बी.रूग्णांसाठी अपुरे आहे. कारण राज्यात व देशात टी.बी.रुग्णांची संख्या वाढत आहे. तेव्हा आधुनिक उपचार देण्याकरिता सदर रूग्णालय अद्ययावत करण्याचा शासनाचा विचार आहे काय ? ज्या दानकर्त्याने रूग्णालय सुरू करण्यासाठी जमीन दिली आहे तेथील सेवकांना राहण्याची घरे उपलब्ध करून देण्याऐवजी महापालिकेने बेकायदेशीरपणे व कुठलेही आरक्षण नसताना एका खाजगी विकासकाला स्वत:च्या वैयक्तिक फायद्याकरिता निवासस्थान बांधण्याची परवानगी दिली आहे. यासंबंधात माननीय मुख्यमंत्र्यांनी गेल्या अधिवेशनात असे उत्तर दिले होते की, खाजगी विकासकाचा इमारत बांधण्यासंबंधीचा प्रस्ताव महापालिकेकडे किंवा सरकारकडे आलेला नाही. आज तेथील जागेवर खाजगी विकासकाने स्थलांतरित झालेल्या लोकांसाठी निवासी इमारत बांधलेली आहे, याची गंभीर दखल घेऊन शासन कारवाई करणार आहे काय, असा माझा प्रश्न आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. देशातील टी.बी.चा आजार पाहिला तर त्यासंबंधी मी येथे आजच भाष्य करणे उचित होणार नाही. टी.बी. आणि मलेरिया, टी.बी.आणि एच.आय.व्ही.यांचा दिवसेंदिवस जवळचा संबंध येत आहे. ही समस्या दिवसेंदिवस मोठी होण्याची शक्यता नाकारता सुद्धा येत नाही. त्या दृष्टीने याला कशा पद्धतीने आळा घालावा याची काळजी घेण्याचे काम शास्त्रज्ञांच्या पातळीवर सुरू आहे. सन्माननीय सदस्यांनी कर्मचाऱ्यांच्या बाबतीतला प्रश्न विचारला आहे. गेल्या पाच वर्षात एकूण 29 कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला ही गोष्ट खरी आहे, हे मी उत्तरामध्ये देखील मान्य केले आहे. टी.बी.हा संसर्गजन्य रोग आहे. पूर्वी अद्ययावत अशी यंत्रणा नव्हती तेव्हा मोकळ्या ठिकाणी, थंड हवेच्या ठिकाणी जेथे माणसांचा वावर कमी आहे, अशा ठिकाणी आजारी माणसाला ठेवले जायचे. टी.बी.रूग्णाची

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

थुंकीसुद्धा ओलांडायची नाही अशी जुनी-जाणती माणसे सांगत. उपचार करणाऱ्या कर्मचाऱ्यांना उपाययोजना करण्यासाठी थोडेसे या रूग्णांच्या संपर्कात यावेच लागते. त्यामुळे त्यांना संसर्ग होतो हे नाकारण्याचे कारण नाही. पाच वर्षात केवळ या संसर्गानेच हे कर्मचारी मृत्युमुखी पडले हे कारण नसून त्यास वेगवेगळी कारणे आहेत. पुढच्या काळामध्ये अशा प्रकारची परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून आम्ही कोणती उपाययोजना करीत आहोत याची माहिती या लेखी निवेदनामध्ये सविस्तरपणे दिलेली आहे. त्यासंबंधी एका वर्षामध्ये पुनर्आढावा घेण्याचे काम करू.

जून 2011 मध्ये संसर्ग समिती स्थापन केली आहे. या समितीमध्ये त्या विभागाचेच कर्मचारी प्रतिनिधी आहेत. यामध्ये आपल्याला कोणता चांगला परिणाम जाणवला याचा निश्चितपणे आढावा घेतला जाईल व ती सुद्धा माहिती आपल्याला अवगत केली जाईल. या आवारामध्ये एका दानशूर व्यक्तीने दिलेल्या जागेवर खाजगी विकासकाने संक्रमण शिबिर उभे केले आहे, असे सांगण्यात आले व आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यासंबंधी मागच्या अधिवेशनामध्ये उत्तर दिलेले आहे. त्यासबंधातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. मात्र एका गोष्टीसंबंधी सभागृहाला आश्वासित करता येईल. अनधिकृतपणे कोणी बांधकाम केले असेल तर येत्या दोन महिन्याच्या आत त्यासंबंधी माहिती घेतली जाईल. सद्‌हेतूने दिलेल्या जागेचा कोणीतरी दुरूपयोग करीत असेल तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, शिवडी येथील टी.बी.रूग्णालयासंबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले आहे की, गेल्या पाच वर्षात संसर्गजन्य रोगाची लागण होऊन 29 कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. पण तसे नसून आता पर्यंत 34 जणांचा मृत्यू क्षय रोगाने झालेला आहे. तसेच 52 जणांना टीबीची लागण झालेली आहे. यासंबंधी वेगवेगळ्या वृत्तपत्रात बातमी देखील येऊन गेली आहे. आपण सर्व सोयीसुविधा पुरविल्या असे म्हटले असले तरी डॉ.राजेंद्र ननवारे यांनी काय सांगितले आहे ? एन-95 चे मास्क, झाडू, चिंधी, लोशन, हायड्रॉलिक ॲसिड, ब्लिचिंग पावडर हे पण देण्याबाबत आपल्याला उत्तरामध्ये लिहावे लागत आहे. त्यावरून असे दिसून येते की, महापालिकेत भ्रष्टाचाराने कळस गाठलेला आहे. हा प्रश्न मृत्यू पुरता व लागण लागण्यापुरता मर्यादित नाही. मी आपल्याला अनेक उदाहरणे देऊ शकतो. आपण

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मला दोन मिनिटे वेळ द्यावा. या रूग्णालयाचा विचार केला तर येथील कर्मचाऱ्यांना साधा साबण देखील दिला जात नाही. आज राज्य सरकारला उत्तरामध्ये आम्ही ब्लिचिंग पावडर देतो हे सांगावे लागत आहे. यातून गांभीर्य लक्षात येईल. 34 कर्मचारी मृत्यूमुखी पडत आहेत व 52 जणांना लागण लागते. त्यांच्या वारसांना नोकऱ्या दिल्यानंतर देखील ते वारस भीती पोटी रूग्णालयात येत नाहीत. हे झाले टी.बी.रूग्णालयाबाबतीत.

मुंबईत उपनगरात साथीच्या रोगाची इतर देखील रूग्णालये आहेत. मुलुंड येथील अग्रवाल रूग्णालय, स्वातंत्र्यवीर सावरकर रूग्णालय, विक्रोळीच्या कन्नमावर नगर येथील महात्मा फुले रूग्णालय, घाटकोपर येथील मुक्ताबाई रूग्णालय, गोवंडीचे शताब्दी रूग्णालय या रूग्णालयात साथीच्या रोगाने बाधित झालेल्या रूग्णांच्या रांगाच्या रांगा लागत आहे. त्यामुळे रूग्णांना राजावाडी रूग्णालयात जा असे सांगण्यात येत आहे. राजावाडी रूग्णालयात साथीच्या आजारावर उपचार करणारा डॉक्टर नसल्यामुळे 12 नंबरच्या वॉर्डला 1 ऑगस्टपासून टाळे ठोकण्यात आले आहे. म्हणजे या महानगरपालिकेतील सत्ताधाऱ्यांनी भ्रष्टाचाराचा कळस गाठून येथील लोकांचे जीव कसे घेतले आहेत यासंबंधातील हे सविस्तर वर्णन आहे. सभागृहात मुख्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. मुंबई महानगरपालिकेत भ्रष्टाचाराचा कळस गाठला जात असेल तर तो नियंत्रणात आणण्यासाठी राज्य सरकार काही उपाययोजना करणार आहे काय ? रस्त्यावर कोणी मेला तर कलम 302 नुसार कारवाई केली जाते. त्यामुळे येथील सत्ताधाऱ्यांवर देखील आपण कारवाई करू शकाल. ही एक आणि दोन रूग्णालयांची गोष्ट नाही. सगळ्या रूग्णालयांमध्ये हीच परिस्थिती आहे.

यानंतर श्री.सरफरे.....

अशुधारित प्रत/शीघ्रलेखासाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

त्या रुग्णालयांमध्ये भ्रष्टाचार एवढा माजला आहे की, ढेकणांच्या त्रासाने आपल्या घरी निघून गेल्याचे तेथील एका रुग्णाने लिहून दिले आहे. अशाप्रकारे महानगर पालिकेच्या रुग्णालयातील भ्रष्टाचाराविषयी एवढे कठोर बोलल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार आहात काय? या रुग्णालयाचे नियंत्रण महानगरपालिका करु शकत नसेल, तेथील जनतेच्या आरोग्याशी खेळ खेळला जात असेल तर या सर्व संबंधितांची चौकशी करुन त्यांच्यावर आपण कारवाई करणार आहात काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण या ठिकाणी लक्षात घ्यावे की या लक्षवेधी सूचनेचे स्वरुप अत्यंत मर्यादित आहे.परंतु आपल्या सभागृहाची प्रथा अशी आहे की, सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती ही खरी समजून त्या संदर्भात कारवाई केली जाते. माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपणाकडे यापेक्षा अधिक माहिती असेल तर त्यांनी ती द्यावी. त्या माहितीच्या आधारावर राज्याच्या नगर विकास विभागाचे प्रधान सचिव (दोन) यांच्यामार्फत संपूर्ण चौकशी करुन त्यासंबंधीचा अहवाल पुढील अधिवेशनामध्ये सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल..

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, त्या हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांचे मी स्वत: प्रतिनिधित्व करीत आहे. आपण या ठिकाणी दिलेले उत्तर संपूर्णत: चुकीचे आहे हे मी फार जबाबदारीने बोलत आहे. याठिकाणी वितरित करण्यात आलेले निवेदन हे शासकीय स्वरुपाचे आहे. या संदर्भात नेमण्यात आलेल्या समितीमध्ये कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला आहे. या मधील खरी परिस्थिती सभागृहासमोर यावी अशी माझी आपणास विनंती आहे. या समितीच्या प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडयात होणाऱ्या बैठकींचे इतिवृत्त आपण सभागृहाच्या पटलावर ठेवावे. त्यामध्ये तेथील कर्मचाऱ्यांनी ज्या वस्तूंची मागणी केली आहे, उदा. मास्क, चिंधी, औषधे, स्वच्छतेसाठी लागणारी सामग्री यांची मागणी करुन सुध्दा त्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही अशी कर्मचाऱ्यांनी नोंद केली आहे. तरी सुध्दा या ठिकाणी देण्यात आलेल्या उत्तरानुसार तेथील सर्व व्यवस्था आलबेल आहे असे सांगण्यात येत आहे. या ठिकाणी ज्यांनी हे उत्तर तयार केले आहे त्यांची आपण चौकशी करणार काय? अशाप्रकारची खोटी उत्तरे देणाऱ्या अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार काय? समितीच्या बैठकींच्या मिनिट्सचा संदर्भ घेऊन आपण ही कारवाई करणार काय? हा तेथील कर्मचाऱ्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

श्री. भाई जगताप....

माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे ही परिस्थिती केवळ एका हॉस्पिटलपुरती मर्यादित नसून सर्वच हॉस्पिटलमध्ये हीच परिस्थिती आहे. क्षय रोग हा पूर्णपणे बरा होतो ही वस्तुस्थिती असतांना त्या हॉस्पिटलमध्ये इतकी वाईट परिस्थिती असेल तर त्याची गंभीरपणे दखल घेऊन त्या सर्व संबंधितांवर आपण कारवाई करुन कर्मचाऱ्यांचे प्राण वाचविणार काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तीन अत्यंत महत्वाचे प्रश्न विचारले आहेत. हे देशातील सर्वात मोठे असलेले असे टी.बी. हॉस्पिटल आहे. या ठिकाणी संसर्ग नियंत्रण समिती नव्याने स्थापन झाली आहे, त्यामध्ये तेथील कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी समाविष्ट आहेत. त्या समितीच्या इतिवृत्तामध्ये हॉस्पिटलमध्ये मास्क नाही, चिंधी नाही, औषधे नाहीत, स्वच्छतेसाठी आवश्यक असलेल्या सामग्रीचा पुरवठा नाही अशी नोंद असेल व तरी देखील अशाप्रकारचे उत्तर अधिकाऱ्यांनी दिले असेल तर त्या अधिकाऱ्यांवर आपण कोणती कारवाई करणार असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. संबंधित विभागाकडून आमच्या विभागाकडे ही माहिती पाठविण्यात आल्यानंतर आमच्या विभागाचे सचिव त्या माहितीच्या आधारे अधिकाधिक माहिती घेऊन चांगले उत्तर देण्याचा प्रयत्न करतात. परंतु माहिती पाठविणारे मूळ डिपार्टमेंट वेगळे असते. आज मुंबई महानगरपालिका असो किंवा अन्य महानगरपालिकांमध्ये आयुक्त किंवा अतिरिक्त आयुक्त एवढे दोनच शासनाचे अधिकारी असतात. अन्य सर्व अधिकारी हे त्या महानगरपालिकेचे असतात. खरे तर त्यांच्याशी शासनाचा थेट संबंध सुध्दा येत नाही. बऱ्याच वेळी हे लोक त्या ठिकाणी काय करतात हे आम्हाला माहीत नसतांना सुध्दा सभागृहात मात्र आम्हाला उत्तरे द्यावी लागतात. अशाप्रकारे वस्तुस्थिती लपवून जर तेथील संबंधित अधिकाऱ्याने चुकीची माहिती दिली असेल तर मघाशी म्हटल्याप्रमाणे नगर विकास विभागाचे प्रधान सचिव त्याची देखील चौकशी करतील. मी ते प्रोसिडिंग स्वत: वाचून घेईन आणि त्यामध्ये जर अशा पध्दतीने चुकीची माहिती दिली गेली असल्याचे दिसले तर निश्चितपणे संबंधितांवर कारवाई केली जाईल. दुसरी गोष्ट अशी की, त्या ठिकाणी वस्तूंची खरेदी न करता ती खरेदी केल्याचे दाखविले गेले असेल तर त्या बाबत चौकशी करुन कारवाई केली जाईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी आता संसर्ग नियंत्रण समिती स्थापन केल्याचे सांगितले आहे. त्या समितीमध्ये फक्त कामगारांचे प्रतिनिधी आहेत की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

डॉ. दीपक सावंत....

तेथील विभाग प्रमुख आहेत की, क्षय रोग तज्ज्ञांचा समावेश केला आहे? तसेच, या तज्ज्ञांनी या कर्मचाऱ्यांना क्षय रोगाची बाधा झालेली आहे अशी माहिती दिली होती काय? दुसरा प्रश्न असा की, डॉट ट्रीटमेंटची सुरुवात केंद्र सरकारने केली आहे. पेशंटचा दुसऱ्या स्टेजला असलेला टी.बी. रोग देखील डॉट ट्रीटमेंटने बरा होतो. अशाप्रकारची डॉट ट्रीटमेंट त्यांच्यावर केली होती काय, केली असेल तर ते औषध तितकेसे प्रभावी नव्हते काय, त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण काय आहे?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, हा संसर्गजन्य रोग आहे. काही गोष्टी उघडपणे बोलणे बरोबर नसते. प्रत्येक व्यक्तीच्या शरीरामध्ये टी.बी. या रोगाचा जीवाणू असतो हे आपल्याला नाकारण्याचे कारण नाही. परंतु त्या व्यक्तीला जर दुसऱ्या प्रकारचा आजार झाला तर हा जीवाणू लवकर डेव्हलप होतो. त्यामुळे या कर्मचाऱ्यांपैकी काहींना वेगळा आजार असतो, काहींना व्यसन असते, काही कर्मचारी पौष्टिक आहार घेत नाहीत अशी वेगवेगळी कारणे आहेत. या घटना घडल्यानंतर शासनाने त्याची दखल घेतली असून त्या कर्मचाऱ्यांना औषधांचा मोफत पुरवठा केला जाणार आहे, त्या कर्मचाऱ्यांवर डॉट ट्रीटमेंट सुरु करण्यात आली आहे त्याचबरोबर त्यांना पोषण आहारासाठी अधिक भत्ता देत आहोत. त्या कर्मचाऱ्यांना रोखीने पैसे देण्याऐवजी डयुटीवर असतांना त्यांना दूध, अंडी यासारखा पोषण आहार देण्याची सुरुवात करण्याबाबत महानगरपालिकेला डायरेक्शन देण्याचा शासन विचार करीत आहे. तशाप्रकारचे डायरेक्शन देऊन या समस्येवर मात करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, क्षय रोग हा खरे म्हणजे एवढा भयानक आणि त्रासदायक आजार नाही की ज्याच्यामुळे मृत्यू व्हावेत. हा बरा होणारा रोग आहे. तसेच देशातील सर्वात जे मोठे रुग्णालय आहे ते बी.एम.सी.च्या ताब्यात आहे हा भाग वेगळा. तेथे काय करावयाचे असेल ते करु द्या. पण तेथे पुरेसा कर्मचारी वर्ग नाही. अशा वेळी तेथे जे कर्मचारी आहेत, त्यांनाच रुग्णांची सेवा करावयाची आहे आणि त्या अनुषंगाने ज्या वस्तू सांगितलेल्या आहेत, त्या अगदी साध्या स्वरुपाच्या आहेत आणि जर त्या साध्या गोष्टी उपलब्ध करता येत नसतील तर आपण आरोग्य खात्याच्या प्रश्नांबाबत काय बोलावयाचे. तेथे सी.टी.स्कॅन किंवा तंत्रज्ञांची गरज नाही. पण या प्राथमिक गरजेच्या गोष्टी आहेत आणि याबाबतीत महानगरपालिका नियंत्रण ठेऊ शकत नसेल तर मग त्यांच्याकडे हे रुग्णालय ठेवण्याचे कारण काय? शासनाने याबाबतीत केव्हातरी एकदा निर्णय घ्यावयास पाहिजे की, जर महानगरपालिकेला या गोष्टी करता येत नसतील तर तुम्ही ते करु नका. त्यांनी ते शासनाकडे परत द्यावे आणि आम्ही ते रुग्णालय अधिक चांगल्या प्रकारे चालवू शकू. कारण अशा प्रकारे लोकांच्या जिवाशी कशासाठी खेळ करावयाचा, कशासाठी मृत्यू होऊ द्यावयाचे .....

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी प्रश्न विचारावा.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, शासन याबाबतीत पुन्हा फेर विचार करणार आहे काय असा माझा प्रश्न आहे.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, सध्याच्या व्यवस्थेमध्ये जे काही दोष आहेत, ते दूर करण्यासाठी शासन पुढाकार घेईल आणि यातील दोष दूर करुन ही व्यवस्था अधिक सक्षम कशी होईल यादृष्टीने शासन प्रयत्न करील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा साधा आणि सोपा प्रश्न आहे. माझा प्रश्न एवढाच आहे की, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, या लक्षवेधी सूचनेचा स्कोप अतिशय मर्यादित आहे. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली, ती खरी मानून त्याबाबत चौकशी करावयाची आहे. त्यानुसार पुणे महापालिकेच्या अखत्यारितील नगर परिषदेची रुग्णालये, नवी मुंबईतील रुग्णालय, कोल्हापूरचे रुग्णालय .....

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझे ऐकून घ्यावे. महानगरपालिका मग ती काँग्रेसची असो, राष्ट्रवादी पक्षाची असो, भारतीय जनता पक्षाची असो किंवा शिवसेना पक्षाची असो, जे आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

ते आहे म्हणजे सभागृहामध्ये जे सांगितले ते खरे मानून माननीय मंत्री महोदयांनी जो उदार दृष्टीकोन दाखविलेला आहे, तो सगळया महानगरपालिकांच्या रुग्णालयातील भ्रष्टाचाराच्या चौकशी बाबत दाखविणार आहेत काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोदजी तावडे हे दिनांक 23 डिसेंबर 2011 रोजी विरोधी पक्षनेते होणारच आहेत. मला त्यांना सांगावयाचे आहे की, यामध्ये शासनाचा अत्यंत सरळ, साधा, सोपा आणि जनतेच्या हिताचा हेतू आहे. तसेच ज्यावेळी 29 माणसे मरतात तेव्हा आम्हाला काळजी वाटणे स्वाभाविक आहे. म्हणून मुंबई महानगरपालिकेतील . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

म्हणून आपण याबाबत चौकशी नेमणार आहोत. त्यामुळे यामध्ये आमचा राजकारण करण्याचा अजिबात हेतू नाही.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी मला प्रामाणिकपणे सांगावे की, अजून लक्षवेधी सूचनेवर किती सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे ? सत्ताधारी पक्षातील दोन सन्माननीय सदस्यांपैकी एका सन्माननीय सदस्यानी आणि विरोधी पक्षातील दोन सन्माननीय सदस्यांपैकी एका सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा आणि कोणी प्रश्न विचारावा ते आपणच ठरवावे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, यावर सविस्तर चर्चा झाली. टी.बी. रुग्णालयामध्ये 34 जण दगावलेले आहेत तर आणखी 52 जणांना लागण लागलेली आहे. तसेच मी इतर रुग्णालयांची देखील नावे दिली आहेत आणि या सगळया गोष्टींचे उत्तर हे सध्या महानगरपालिकेतील आरोग्य विभागात जो भ्रष्टाचार होत आहे, त्याठिकाणी येऊन पोहोचते. हा भ्रष्टाचार शासन निपटून काढणार आहे काय ? याबाबतीत सदनामध्ये किती उदाहरणे द्यावयाची हा प्रश्न आहे. त्यानंतरही जर हा भ्रष्टाचार निपटून काढणार नसाल तर जी वेगवेगळया पध्दतीची बिले मंजूर झालेली आहेत, त्यांचे काय? आताच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, या संबंधात दोन अधिकारी काम करीत आहेत. महानगरपालिकेमध्ये असे काम करणारे पुष्कळजण आहेत,मग त्या सर्वांवर कारवाई करणार आहात काय? खऱ्या अर्थाने महानगरपालिकेला भ्रष्टाचाराचा जो क्षय रोग लागलेला आहे, त्यामधून राज्य शासन या महानगरपालिकेला बाहेर काढणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्यांनी प्रश्नाच्या अनुषंगाने

श्री.भास्कर जाधव . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जी माहिती दिली, त्या आधारावर चौकशी करण्याविषयी मी सांगितलेले आहे आणि त्याबाबत मी या पूर्वीच उत्तर दिलेले आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील शिवडी येथील टी.बी.हॉस्पिटल आहे आणि म्हणूनच आम्ही याठिकाणी ही चर्चा उपस्थित केलेली आहे. मी आपल्याला सांगू इच्छिते की, याठिकाणी जवळजवळ 29 लोक मरण पावतात आणि अशा वेळी आम्ही त्यांना चिंध्या दिल्या, साबण दिला, ॲसिड दिले वगैरे सांगणे बरोबर नाही. याचे कारण असे की, मुंबई महानगरपालिकेला एका जमान्यामध्ये एक इतिहास होता, पण या काही काळामध्ये तेथील सत्ताधाऱ्यांनी हा इतिहास पुसून काढला तो भाग अलाहिदा. पूर्वी दूरदूरच्या भागातील लोक औषध-पाण्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या हॉस्पिटलमध्ये येत असत आणि बरे होऊन आपापल्या राज्यामध्ये जात असत. तेव्हा हे शासन तो पूर्वीचा दर्जा या महानगरपालिकेला पुन्हा मिळवून देणार आहे की नाही हा माझा खरा प्रश्न आहे.कारण आता शासनाने यामध्ये लक्ष घालण्याची वेळ आलेली आहे. तसेच काही वेळेला डेंग्यूची, मलेरियाची साथ येते. शिवडी येथे जसे टी.बी.हॉस्पिटल आहे तसेच ऑर्थर रोड येथेही हॉस्पिटल आहे पण त्याची अवस्था चांगली आहे असे मला म्हणावयाचे नाही. कारण मी स्वत: आर्थर रोड येथील हॉस्पिटलमध्ये जाऊन तेथील परिस्थिती पाहून आले आहे. तेथे सुध्दा पुरेशी औषधे उपलब्ध नाहीत, पुरेसा स्टाफ नाही. म्हणून या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मला आपल्याला विनंती करावयाची आहे की, अशा प्रकारे या हॉस्पिटलमधील कर्मचारी मरण पावले ही गोष्ट आपल्याला भूषणावह नाही. पण हॉस्पिटलमध्ये सध्या जी परिस्थिती आहे, त्यामध्ये आपण काही सुधारणा करणार आहात की नाही ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, शिवडीच्या टी.बी.हॉस्पिटलमध्ये कर्मचारी दगावले आहेत आणि हा एक अत्यंत गंभीर प्रश्न आहे. मी जास्त आकड्यांमध्ये जाणार नाही. परंतु माझ्या कडे जी आकडेवारी आहे त्यानुसार 2005 पासून एकूण 29 कर्मचारी दगावलेले आहेत. एक जरी कर्मचारी दगावला तरी ती गंभीर बाब आहे. मात्र याठिकाणी प्रत्यक्षात 29 कर्मचारी दगावलेले आहेत आणि ही तर निश्चितच गंभीर बाब आहे. विशेषत: 2010 मध्ये हा प्रश्न निर्माण झाला, तेव्हा मला असे वाटते की, सुरुवातीला याकडे गंभीरतेने पहाण्यात आले नव्हते. याचे कारण अशा घटना यामुळे होत आहेत असे वाटले नसावे.परंतु 2010 मध्ये आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले.लंडन येथून रॉड एस्कॉन नावाचे इन्फेक्शन कंट्रोल एक्सपर्ट यांना बोलविण्यात आले.त्यानंतर

श्री.पृथ्वीराज चव्हाण . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांच्या बरोबर विविध प्रश्नांबाबत चर्चा झाली. त्यावेळी साथीच्या रोगासाठी इंटरनॅशनल प्रोटोकॉल काय असतो याबाबत माहिती घेण्यात आली. त्यानंतर एकूण 12 गोष्टी करण्यात आल्या असून त्याबाबत येथील चर्चेमध्ये माहिती आलेली आहे.

सभापती महोदय, याबाबतीत पहिल्यांदा एक कमिटी नेमण्यात आली आणि दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये त्याची बैठक घेण्यात येते. याबाबत माननीय राज्यमंत्री महोदयांना मी माहिती घेण्याबाबत सांगितलेले आहे आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी काही साहित्य पुरविले असेल आणि जर ते देण्यात आले नसेल तर त्याबाबत नक्कीच चौकशी करण्यात येईल. तेथील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे सुरक्षिततेची जी साधने आहेत, त्यामध्ये 95 मास्क आहेत आणि ते रेग्युलर देण्यात येतील. त्याचबरोबर तेथे एकंदर किती मास्क उपलब्ध आहेत याचीही माहिती घेतली जाईल. कारण त्याठिकाणी भरपूर प्रमाणात मास्क उपलब्ध आहेत. पूर्वी दर सहा महिन्यांनी सर्व कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात येत होती. परंतु आता यामध्ये बदल करुन दर तीन महिन्यानी सर्व कर्मचाऱ्यांची तपासणी करण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर बाह्यरुग्ण सेवाही उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.एवढेच नाहीतर त्यांच्या कुटुंबीयांसाठी देखील ही सेवा पुरविण्यात येईल. तसेच त्याठिकाणी लोकल डिटेक्शन करण्याकरता देखील सोय करण्यात आलेली आहे. जर एखाद्या रुग्णाला टी.बी.ची लागण झाल्याचे निदर्शनास आले तर विनामूल्य औषध पुरवठा करण्यासंबंधीचा निर्णय सुध्दा घेण्यात आलेला आहे. पूर्वी आपण या रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांना सकस आहार घेण्यासाठी भत्ता देत होतो. पण या भत्त्याचा वापर सकस आहार घेण्यासाठी होत आहे की नाही याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले. त्यामुळे आता असा निर्णय घेण्यात आलेला आहे की, तेथील कर्मचाऱ्यांना एक वेळचे जेवण देण्यात येईल. मग त्या कर्मचाऱ्यांची ड्युटी सकाळी किंवा संध्याकाळी असेल, त्याप्रमाणे त्या कर्मचाऱ्याला प्रथिनयुक्त, चांगल्या प्रकारचा सकस आहार हॉस्पिटलमध्ये देण्यात यावा. तसेच जर कर्मचारी आजारी पडला तर त्याला स्पेशल वैद्यकीय रजा देण्यात येणार आहे.

सभापती महोदय, तसेच इंजिनिअरींगच्या दृष्टीकोनातून हॉस्पिटलच्या रचनेमध्ये काही बदल करावयाचे आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अशासकीय प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण. .

मी देशातील इतर मोठया रुग्णालयांची माहिती घेण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये चंदीगडचे मेडिकल कॉलेज असेल, नागपूरचे सेवाग्राम रुग्णालय असेल किंवा ख्रिश्चन मेडिकल कॉलेज, वेल्लोर असेल या सगळया रुग्णालयांमध्ये कशा प्रकारे व्यवस्था करण्यात आलेली आहे, यासंबंधीची मी माहिती घेतलेली आहे. या रुग्णालयांमध्ये या रोगाची लागण होण्याची संख्या आपल्यापेक्षा जास्त मोठी आहे. परंतु दगावणाऱ्यांची संख्या थोडी कमी आहे. म्हणून या संदर्भात माहिती घेण्यात येईल. हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. मी सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो की, सन्माननीय राज्य मंत्री महोदयांनी जे चौकशीचे आदेश दिले आहेत, त्याप्रमाणे निश्चितपणे चौकशी केली जाईल. पण यामध्ये एकही कर्मचारी दगावला जाणार नाही या करिता राज्य शासनाला सर्व प्रयत्न करावे लागतील, त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन नादुरुस्त असणे.

मु. शी. : सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन नादुरुस्त असणे यासंबंधी श्री. परशुराम उपरकर व डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" सिंघुदुर्ग येथील जिल्हा रुग्ण्धालयात जून,2000 मध्ये कार्यान्वित केलेल्या 2 कोटी 35 लाखांच्या सिटी स्कॅन मशिनचे आयुर्मान डिसेंबर,2011 मध्ये संपत असणे, या मशिनवर आतापर्यंत सुमारे सव्वा कोटीच्यावर दुरुस्तीवर खर्च होणे सदरहू यंत्राचा वापर संपूर्ण कालावधीत पाच-सहा महिनेच झाला असून 11 वर्षाच्या कार्यकाळामध्ये साडेदहा हजार रुग्णांनी लाभ घेणे, गेल्या महिन्यापासून पुन्हा या मशिनमध्ये बिघाड झाला असून तिच्या दुरुस्तीचा खर्च सुमारे 32 लाख एवढा असणे, परंतु या मशिनचे आयुर्मान संपत आल्याने एवढा खर्च करावा की नाही याबाबत अद्याप निर्णय न घेणे, परिणामी तेथील रुग्णांचे होत असलेले हाल, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

प्रो. फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी 29 रुग्ण दगावल्याबाबत वक्तव्य केलेले आहे. सिंघुदुर्ग जिल्ह्यामध्ये गेले पाच वर्षे जवळ जवळ 125 रुग्ण लेप्टो स्पायरोसिस या रोगाने दगावलेले आहेत तरी देखील राज्य शासनाने त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची उपाययोजना केलेली नाही. त्या ठिकाणी या संदर्भात उपाययोजना करण्यात यावी, अशी सूचना मी या माध्यमातून या ठिकाणी करतो.

सभापती महोदय, ज्या सीटी स्कॅन मशीनचा या लक्षवेधी सूचनेमध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे ही सीटीस्कॅन मशीन सन 2000 मध्ये घेताना ज्या फिलिप्स कंपनीने 20 मशीन्स राज्य शासनाला दिल्या त्या सर्व डिफेक्टिव्ह मशीन्स होत्या, अशा प्रकारचा प्रश्न त्यावेळी सभागृहात उपस्थित झाला होता. डिफेक्टिव्ह मशीन्स घेतल्यामुळे व या मशीन्सची वॉरन्टी पिरीयडमध्ये कोणत्याही प्रकारची दुरुस्ती न केल्यामुळे तसेच एएमसीमध्ये देखील कोणत्याही प्रकारची दुरुस्ती न केल्यामुळे या मशीनवर आतापर्यंत जवळ जवळ 3 कोटी 21 लाख रुपये खर्च करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, सिटी स्कॅन मशीन घेत असताना जे रेडिऑलॉजिस्ट लागतात ते दिले गेले नव्हते. या सभागृहात मागणी केल्यानंतर या ठिकाणी उत्तर देण्यात आले होते की, कोल्हापूरहून रेडिऑलॉजिस्ट दर महिन्याला दोन वेळा येतील. त्याप्रमाणे ते फक्त तीन महिने आले त्यानंतर ते परत कधी आले नाहीत. म्हणजे रेडिऑलॉजिस्ट नसताना 10785 रुग्ण सिटी स्कॅन मशीनवर तपासले असे निवेदनामध्ये म्हटले आहे. गेल्या 11 वर्षात 10785 रुग्णांची तपासणी करण्यात आली असेल तर एका वर्षात 900 रुग्ण तपासण्याचे दाखविण्यात आले आहे. पण प्रत्यक्षात मशीन तीन ते सहा महिने चालू होते, त्याबाबतीत मी या ठिकाणी प्रश्न विचारणार आहे. वॉरंटी पिरीयडमध्ये आणि एएमसीच्या कालावधीमध्ये फिलिप्स कंपनीने ही मशीन किती वेळा दुरुस्त केली? ती मशीन दुरुस्त करण्यासाठी त्या ठिकाणच्या सिव्हिल सर्जनला किती वेळा पत्र व्यवहार करावा लागला याचे उत्तर देण्यात यावे.

सभापती महोदय, अशाच प्रकारे सिंधुदुर्ग जिल्हयात शव ठेवण्याच्या ठिकाणी ज्या शितकरणाच्या मशिनरी घेतल्या, त्यांची देखील एएमसी झाली. पण एएमसीच्या कालावधीत कंपनीने कोणत्याही प्रकारचे लक्ष न दिल्यामुळे या शवागृहाची दूरवस्था आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सिंधुदुर्ग येथील जिल्हा रुग्णालयाच्या बाबतीत दिनांक 29/3/2000 रोजी ही सिटी स्कॅन मशीन खरेदी करण्यात आली होती. दिनांक 08/06/2001 पासून ती कार्यान्वित झालेली आहे. 2,34,47,000/- रुपयात ही मशीन खरेदी करण्यात आली होती. तिच्या दुरुस्तीसाठी 87,14,224/- रुपये इतका खर्च झालेला आहे. ही मशीन किती दिवस बंद होती असा या ठिकाणी प्रश्न विचारण्यात आला आहे. हे मशीन बंद असण्याच्या कालावधीचे दिवस पुढील प्रमाणे आहेत. सन 2001 मध्ये 23, 2002 मध्ये 28, 2003 मध्ये 46, 2004 मध्ये 48, 2005 मध्ये ..

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराचा अर्थ असा आहे की, 2000 मध्ये मशीन घेतली होती. 2003 पर्यंत वॉरंटी होती. तेव्हा त्यांनी ती मशीन दुरुस्त केली आणि त्याचा खर्च दिला आणि आता 2011 पर्यंत दोन-तीन वेळा या मशीनची दुरुस्ती केली आणि आता 2011 मध्ये या मशीनचे आयुष्य संपलेले आहे. ही मशीन दुरुस्त होणार नसेल तर त्या ठिकाणी नवीन मशीन घेण्यात येणार आहे काय हा विषय आहे या संबंधीचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या ठिकाणी स्पेसिफिक प्रश्न विचारला तर त्या प्रश्नाचे स्पेसिफिक उत्तर देण्यात येईल. पण सन्माननीय सदस्यांनी सर्व माहिती विचारलेली आहे त्यामुळे ती सर्व माहिती मी सभागृहाला देत आहे. नवीन मशीन घेण्यात येणार आहे काय असा प्रश्न आता या ठिकाणी विचारण्यात आला आहे. नवीन मशीन घेण्यात येणार नाही. त्यासंबंधीचे कारण पाहिजे असेल तर मी ते या ठिकाणी सांगावयास तयार आहे पण या ठिकाणी नवीन मशीन घेण्यात येणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, खर्च जास्त येतो म्हणून नवीन मशीन घेण्यात येणार नाही मग माणसे मेली तरी चालतील एवढया बेदरकारपणे या ठिकाणी उत्तर देण्यात येत आहे हे सर्व गंभीर आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या सिटी स्कॅन मशीनने वर्षभरामध्ये जास्तीत जास्त 900 रुग्ण तपासण्यात आले असे सन्माननीय सदस्य श्री. उपरकर यांनी या ठिकाणी सांगितले आहे. तसेच ही मशीन किती दिवस चालू होती हे देखील त्यांनी सांगितले आहे. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "सिंधुदुर्ग येथे 16 स्लाईस सिटी स्कॅन मशीन पुरविण्याचे प्रस्तावित करण्यात

..5.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आले आहे" असे असताना माननीय मंत्री महोदया स्वत: या ठिकाणी असे सांगत आहेत की, नवीन मशीन घेण्यात येणार नाही. मग त्या प्रस्तावाला काही अर्थ आहे काय? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, येथे रेडिऑलॉजिस्ट नव्हता तर हे मशीन कोण ऑपरेट करीत होते?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी याठिकाणी प्रश्न विचारला आणि माझ्या तोंडी काही शब्द घालण्याचा प्रयत्न केला आहे ते प्रत्यक्षात तसे नाही. मी या ठिकाणी असे सांगितले की, सिटी स्कॅन मशीन खरेदी करण्यात येणार नाही. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जो प्रश्न विचारला आहे ती शासनाची प्रपोज्ड योजना आहे. ती प्रपोज्ड योजना होईपर्यंत या ठिकाणी सिटी स्कॅनची व्यवस्था करण्यात येत आहे. त्या ठिकाणच्या खाजगी सोनोग्राफी सेंटर्सपैकी ज्यांचे दर सर्वात कमी आहेत त्यांच्या कडून कुडाळ, सावंतवाडी आणि कणकवलीसाठी सी.एस.कडून प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे. जोपर्यंत नवीन इन्स्टॉलेशन करण्यात येणार नाही तोपर्यंत खाजगी सोनोग्राफी सेंटर्सकडून सोनोग्राफी करण्यात येणार आहे. आज पर्यंत गोरगरीब लोकांची सुविधा मोफत होत होती ती तशी मोफतच राहील त्यासंबंधीचा निधी शासनाच्या मध्यमातून देऊन ही सुविधा ज्यांच्यासाठी मोफत होती त्यांना मोफत देण्यात येणार आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या सिटी स्कॅनचा प्रश्न मी आणि सन्माननीय सदस्य श्री. उपरकर यांनी गेल्या दोन अधिवेशनापूर्वी विचारला होता. सिंधुदुर्गमध्ये ज्या ठिकाणी हे सिटी स्कॅन मशीन आहे त्या ठिकाणी खाजगी सिटी स्कॅन मशीन आहे. या ठिकाणचे सिटी स्कॅन ऑपरेटर खाजगी ठिकाणी जाऊन काम करतात. खाजगी लोकांना बिझनेस पाहिजे म्हणून मुद्दाम जिल्हा रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन बंद पाडले जाते, अशी खरी वस्तुस्थिती आहे. सन्माननीय आरोग्य मंत्री माननीय श्री. सुरेश शेट्टी यांनी कबुली दिली होती की, त्या ठिकाणी या मशीनच्या बाबतीत काही तरी गौडबंगाल आहे आणि त्या बाबतीत शासन कारवाई करीत आहे, अशा प्रकारचे उत्तर गेल्या दोन अधिवेशनापूर्वी दिले होते, ही वस्तुस्थिती आहे. त्याबाबतीत शासनाने काय कारवाई केली आणि ज्या ऑपरेटरनी खाजगी सिटी स्कॅन बरोबर संबंध ठेवलेले आहेत त्यांच्या बाबत शासनाने आता पर्यंत काय चौकशी केली आहे

ख्यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदय आपण प्रमाणिकपणे हे खाते हाताळत आहात आणि आपण या सदनामध्ये सांगितले होते की, यामध्ये काही तरी गौडबंगाल आहे, मी ते शोधून काढतो आणि योग्य ती कारवाई करतो. आता माननीय मंत्री महोदय वेगळे सांगत आहेत. खाजगी माणसाचे सीटी स्कॅन चालविण्याकरिता हा सीटी स्कॅन बंद पाडण्यात आलेला आहे असा आमचा आक्षेप आहे. ते सिटी स्कॅन चालविण्याकरिता येथील रुग्ण तिकडे जाणार. सरकार त्याला पैसे देणार आणि सिंधुदुर्गमधील ते सिटी स्कॅन चालणार. ते सिटी स्कॅन कोणाचे आहेत हा मोठा विषय आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ज्या एक्झिस्टींग मशीनबद्दल या ठिकाणी चर्चा चालू आहे त्या संदर्भात मी अहवाल मागवून पुढच्या अधिवेशनामध्ये पहिल्या दिवशी तो अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, गेल्या दोन अधिवेशनांमध्ये मी हा प्रश्न उपस्थित करीत आहे. आता पुन्हा अहवाल मागविणार आहात. आपण परत अहवाल कसा मागवित आहात ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, त्या ठिकाणी जे एक्झिस्टींग मशीन आहे त्याला 10 वर्षे झालेली आहेत. ती मशीन आता आपल्याला रिप्लेस करावी लागणार आहे. मी या सदनामध्ये चौकशीचे आश्वासन दिले असेल तर आज लगेच तपासून हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर मी आपल्याला अहवाल देईन.

डॉ. रणजीत पाटील : सभापती महोदय, सदर मशीन हे 9 वर्षाच्या आधी लागलेले आहे. त्या ठिकाणी फिलिप्स कंपनीचे मशीन लागलेले आहे असे म्हणतात. प्रश्नात उल्लेख केल्याप्रमाणे आतापर्यंत त्या मशीनवर 10 हजार सिटी स्कॅन झालेले आहेत. जर आपण त्याच्या सीएमसी, एएमसी आणि मूळ किंमतीचा हिशेब लावला तर प्रत्येक सिटी स्कॅनसाठी तीन ते साडेतीन हजार रुपयांच्या वर खर्च झालेला आहे. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, आता आम्ही पब्लीक प्रायव्हेट पार्टिसिपेशनने प्रस्तावित केलेले आहे. फिलिप्स कंपनीने जशी मशीन लावली त्या पध्दतीने या मशिन्स सुध्दा रिफर्गीश लावणार नाहीत यावर शासन काही उपाययोजना करणार आहे का ?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील ....

कारण आता सिक्स्टीन स्लाईस मशीनची किंमत खूप मोठी आहे. यामध्ये आपण छोट्या छोट्या गावांची सुध्दा नावे लिहिलेली आहेत की,ज्या ठिकाणी आम्ही सिटी स्कॅनची व्यवस्था करु, त्या ठिकाणी आम्ही प्रायव्हेटमधून व्यवस्था करुन घेऊ. त्या गावात जर सिटी स्कॅन मशीन नसतील तर आपण ती व्यवस्था कोठून करुन घेणार आहात ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, चौकशीच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी सांगितलेच आहे की, आजपर्यंत जे काही झालेले आहे त्याच्याबाबत चौकशी होऊन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात येईल. आता तिकडे सुविधा कशी निर्माण करावयाची ? आम्ही सिंधुदुर्गमध्ये आणि राज्यामध्ये 35 ठिकाणी रेडियो डायग्नोस्टिक्ससाठी पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीपमध्ये सुविधा निर्माण करुन देणार आहोत. शासन आपली जमीन त्या प्रिमायसेसमध्ये देणार आहे. ज्या उत्पादक कंपन्या आहेत त्या कंपन्यांच्या माध्यमातून..

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, यासाठी शासनाने टेंडर फ्लोट केलेले आहे.

प्रा. फौजिया खान : मी तेच सांगत आहे.

डॉ. दीपक सावंत : आपल्याला जर सगळेच पब्लीक प्रायव्हेट पार्टिसिपेशनने करावयाचे असेल तर राज्यच आपण पब्लीक प्रायव्हेट पार्टिसिपेशनने करावे.

उप सभापती : या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपलेली आहे. यानंतर विशेष उल्लेख घेण्यात येतील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, प्रश्नाला न्याय मिळालेला नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

विशेष उल्लेख

पृ. शी. : चंद्रपूर जिल्ह्यात आकापूर येथे राजोरी स्टील कंपनीच्या पायाचे खोदकाम सुरु असताना सुरुंग स्फोटाने दगड फोडताना श्री. संतोष महंतो यांचा झालेला मृत्यू

मु. शी. : चंद्रपूर जिल्ह्यात आकापूर येथे राजोरी स्टील कंपनीच्या पायाचे खोदकाम सुरु असताना सुरुंग स्फोटाने दगड फोडताना श्री. संतोष महंतो यांचा झालेला मृत्यू याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□य सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडते.

"चंद्रपूर जिल्ह्यातील आकापूर (ता. मूल) एमआयडीसी अंतर्गत राजोरी स्टील कंपनीच्या पायाचे खोदकाम सुरु असणे, सदर पाया खोदताना पायात दगड लागल्यामुळे सदर दगड सुरुंग स्फोट करुन फोडण्यात येणे, परंतु कोणतीही परवानगी न घेता सुरुंग स्फोट करुन दगड फोडण्यात येणे, सदर दगड फोडताना काम करणाऱ्या श्री. संतोष महंतो यांचा दि. 13.12.2011 ला झालेला मृत्यू, सदर गैररीत्या कामाची चौकशी होण्याची अत्यंत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यावर करावयाची कारवाई,सदर विषय हा नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने सदर विषयावर मी हा विशेष उल्लेख करीत आहे"

सभापती महोदय, त्या ठिकाणी संतोष महंतो याचा मृत्यू झालेला असताना पोलीस स्टेशनमध्ये त्याचा साधा रिपोर्ट सुध्दा सादर केलेला नाही. तो मुलगा बिहारचा असल्यामुळे त्याचे पालक किंवा आई-वडील कोणीही आलेले नाहीत. मृत्यू झाल्यानंतर दवाखान्यामध्ये पोस्टमार्टेमसाठी नेले परंतु त्या बाबतीत कोणतीही कारवाई केलेली नाही. जो मुलगा मृत्यू पावला त्यासंदर्भात चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : आदिवासी विकास महामंडळामार्फत पूर्ववत भात एकाधिकार खरेदी योजना तातडीने सुरु करण्याची मागणी

मु. शी. : आदिवासी विकास महामंडळामार्फत पूर्ववत भात एकाधिकार खरेदी योजना तातडीने सुरु करण्याची मागणी याबाबत श्री. जयवंतराव जाध्व, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□य सदस्य श्री.जयवंतराव जाधव यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"भाताचे पीक घेणारे शेतकरी हे सर्वसाधारणपणे आदिवासी भागातील गरीब शेतकरी असून भात हे त्यांचे एकमेव पीक असणे, भात पीक हेच या शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन असल्याने हे पीक आदिवासी शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचे पीक असणे, भाताची विक्री करताना गरीब व अशिक्षित आदिवासी शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून अनेकदा फसवणूक केली जात असल्याने शासनाने भाताला हमी भाव देण्यासाठी आदिवासी क्षेत्रातील शेतकऱ्यांची होत असलेली मागणी, आदिवासी शेतकऱ्यांचे शोषण थांबविण्यासाठी शासनाने आदिवासी विकास महामंडळामार्फत पूर्ववत भात एकाधिकार खरेदी योजना तातडीने सुरु करुन भाताला हमी भाव मिळवून द्यावा, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

उप सभापती : आपण दिलेली विशेष उल्लेखाची सूचना वेगळी आहे आणि आपण या ठिकाणी वेगळीच सूचना मांडलेली आह.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला 2002 नंतर अनुदान न मिळणे

मु. शी. : मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला 2002 नंतर अनुदान न मिळणे याबाबत श्री.हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□□य सदस्य श्री. हेमंत टकले यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"मुंबईतील मराठीजनांमधील वाचन संस्कृती वाढावी यासाठी मुंबई महापालिकेची 29 वाचनालये मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाकडे अनुदान तत्वावर सन 2000 पासून महापालिकेमार्फत चालविण्यास देण्यात येणे, तसेच सन 2000 ते 2010 हा दशवार्शिक करार संपुष्टात येऊन सन 2002 नंतर मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला अनुदान न मिळणे, तसेच 2011 ते 2020 या कालावधीचा करार करण्यात न येणे, परिणामी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची आर्थिक परिस्थिती बिकट होणे, याबाबत सखोल चौकशी करुन ग्रंथालयाचे प्रलंबित अनुदान मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला त्वरित देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

..6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : ठाणे शहरामध्ये जलसंपदा विभागाच्या शासकीय भूखंडावरील अतिक्रमणे हटवून सदरहू भूखंड सार्वजनिक कामासाठी उपयोगणात आणण्याची कारवाई करण्याची आवश्यकता

मु. शी. : ठाणे शहरामध्ये जलसंपदा विभागाच्या शासकीय भूखंडावरील अतिक्रमणे हटवून सदरहू भूखंड सार्वजनिक कामासाठी उपयोगणात आणण्याची कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□□य सदस्य श्री. रामनाथ मोते यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

"ठाणे शहरामध्ये जलसंपदा विभागाची सुमारे 105 एकर जागा उपलब्ध असून या शासकीय भूखंडावर अतिक्रमणामुळे व अनधिकृत झोपडपट्ट्यांमुळे सध्या केवळ 72 एकर जागा शिल्लक आहे. तत्कालीन जलसंपदा मंत्री महोदयांनी ही जागा सार्वजनिक वापरासाठी देण्याची घोषणा केली होती. तसेच राज्याचे तत्कालीन क्रीडा मंत्री यांनी या जागेवर क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा विधिमंडळात केली होती.

या जागेत मुख्य प्रशासकीय भवन, जिल्हा परिषदेची इमारत व क्रीडा विद्यापीठ निर्माण करण्याचे धोरण ठरविण्यात आले असून अद्यापही या जागेचा सार्वजनिक उपयोगासाठी वापर न झाल्याने शिल्लक राहिलेल्या जागेवरही अतिक्रमण होत असून अनधिकृत झोपड्या उभ्या राहात आहेत. शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे शिल्लक राहिलेली 72 एकर शासकीय जागा अतिक्रमणाच्या विळख्यात हरवून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. या निवेदनाव्दारे शासनास विनंती आहे की, हा शासकीय भूखंड सार्वजनिक कामासाठी उपयोगात आणण्यासाठी अतिक्रमण हटवून भूखंडाचा उपयोग करण्याबाबत कार्यवाही व उपाययोजना करावी अशी विनंती आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : औरंगाबाद येथील कलाग्रामास भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याची आवश्यकता

मु. शी. : औरंगाबाद येथील कलाग्रामास भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याची आवश्यकता याबाबत श्री. सतीश चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□□य सदस्य श्री. सतीश चव्हाण यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

" लोककला जतन करण्याबरोबरच स्वयंरोजगारालाही चालना मिळावी या हेतूने औरंगाबाद येथे सुरु केलेले कलाग्राम एमआयडीसी, एमटीडीसी व मनपा यांच्या वादामुळे बंद झालेले असणे, कलाग्रामची मूळ जागा एमआयडीसीने मनपाला व नंतर मनपाने ही जमीन एमआयडीसीला लीजवर दिली. 4.50 कोटी रुपये खर्च करुन एमटीडीसीने कलाग्रामचे बांधकाम केलेले असणे व भोगवटा प्रमाणपत्र न घेताच कलाग्राम व्यापारी तत्वावर सुरु केलेले असणे, भोगवटा प्रमाणपत्रासाठी एमआयडीसीकडे 1.47 कोटी रुपये जमा करणे आवश्यक असणे, सदर रक्कम भरणेबाबत एमटीडीसी व मनपात वाद निर्माण होणे, त्यामुळे सुरु झालेले कलाग्राम बंद झालेले असणे, तेथे असलेल्या व्यावसायीकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असणे, त्यामुळे एमआयडीसी, एमटीडीसी व मनपा यांनी तोडगा काढून भोगवटा प्रमाणपत्र त्वरित घेणे आवश्यक असणे, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मेळघाट व पेंच व्याघ्र प्रकल्पासाठी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम अखर्चित राहणे

मु. शी. : मेळघाट व पेंच व्याघ्र प्रकल्पासाठी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम अखर्चित राहणे याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□□य सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"विदर्भातील मेळघाट आणि पेंच व्याध्र प्रकल्पासाठी चालू वर्षासाठी 5 सप्टेंबर आणि 13 सप्टेंबर, 2011 या दिनांकास 4 कोटी 83 लाख 70 हजार निधी मंजूर करण्यात आला असून मागील वर्षी 4 कोटी 89 लीाख 47 हजार इतके अनुदान मंजूर होऊन वन विभागाने दिलेल्या तपशीलात वस्तू खरेदी, कर्मचाऱ्यांचे वेतन, कर्मचाऱ्यांची निवास व्यवस्था, प्रकल्पाशी संबंधित धान्य साहित्याची खरेदी आदिवर लाखोंचा खर्च केला आहे. तथापि, प्रोजेक्ट टायगर यशस्वी करण्यासाठी बाबीवरील खर्च अति अल्प करण्यात येऊन मंजूर अनुदानातील 13 लाख 9 हजार 200 रुपयाची रक्कम अखर्चित राहणे, याबाबत सखोल चौकशी करुन सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी याबाबत मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :प्रत्येक जिल्ह्यात मानवी हक्क संरक्षण न्यायालयाची स्थापना करणे

मु. शी. :प्रत्येक जिल्ह्यात मानवी हक्क संरक्षण न्यायालयाची स्थापना करणे याबाबत श्री.मोहन जोशी वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□□य सदस्य श्री.मोहन जोशी यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"मानवी हक्क संरक्षण कायद्यातील तरतुदीनुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात मानवी हक्क संरक्षण न्यायालय स्थापन करण्यात यावे याबाबतची अधिसूचना सन 2009 मध्येच विधी व न्याय विभागाकडून निर्गमित केले जाणे, सन 2009 मध्ये मानवी हक्क न्यायालयातील कामकाज चालविण्यासाठी विशेष सरकारी वकिलांच्या नेमणुका कराव्यात याबाबतची देखील अधिसूचना निर्गगित केली जाणे, किमान नागपूर, अकोला, पुणे व कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये मानवी कक्क संरक्षण न्यायालय स्थापन करण्यात यावे अशी विविध सामाजिक संस्थानी केलेली मागणी, सदरहू मागणीकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष तसेच गुन्हेगारी न्याय व्यवस्थेला पुरोगामी चेहरा देण्यासाठी व अन्यायाला बळी पडलेल्या लोकांना न्याय देण्याच्या अनुषंगाने मानवी हक्क संकल्पनेचे विशेष प्रशिक्षण देऊन या विषयातील तज्ज्ञ व संवेदनशील लोकांची नेमणूक करण्याची गरज, मानवी हक्क प्रबोधनासाठी कार्यशाळा, तज्ज्ञ लोकांची समिती स्थापन करण्याची निर्माण झालेली गरज याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष परिणामी जनतेत पसरलेला असंतोष या प्रकरणी शासनाने त्वरित कार्यवाही करावी अशी मागुणी मी या विशेष उल्लेख सूचनेद्वारे करीत आहे."

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील महिला आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांची पदे भरणे

मु. शी. : राज्यातील महिला आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांची पदे भरणे याबाबत ॲड.उषा दराडे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□य सदस्या ॲड.उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य आहे. स्त्री, पुरुषाला समानता ही स्त्रियांना घटनेने बहाल केली. स्त्रियांना संरक्षण देणारे व त्यांचे सक्षमीकरण करणारे अनेक कायदे राज्य व केंद्र सरकारने केलेले आहेत. तद्वतच राज्य महिला आयोगाची स्थापना राज्यात केलेली आहे. स्थापनेपासून राज्य महिलास आयोग अत्यंत जबाबदारीने कार्यरत आहे. परंतु मागील अनेक वर्षांपासून महिला आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे आयोगाच्या कामकाजावर विपरित परिणाम होत आहे. त्यामुळे राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांच्या जागा त्वरित भरण्याची तातडीची आवश्यकता, याविषयी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :मुंबई महानगरपालिकेकडून कराच्या रुपाने वसूल केलेल्या पैशाची उधळपट्टी होत असल्याची माहिती उघड होणे

मु. शी. :मुंबई महानगरपालिकेकडून कराच्या रुपाने वसूल केलेल्या पैशाची उधळपट्टी होत असल्याची माहिती उघड होणे याबाबत श्री.किरण पावसकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□य सदस्य श्री.किरण पावसकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"मुंबई महानगरपालिकेकडून कराच्या रुपाने वसूल केलेल्या जनतेच्या कष्टाच्या पैशाची उधळपट्टीची धक्कादायक माहिती उघड होणे, व्हेरिएशनच्या नावाखाली महापालिकेच्या सत्ताधारी पक्षाकडून निविदा न काढताच कंत्राटदारांना कामे देण्यात आल्याने कोट्यवधी रुपये वाया गेले असून 2007-08 आणि 2008-09 या काळात विविध विकास कामांसाठी सुमारे 3000 कोटी रुपयांची तरतूद केली होती. मात्र या खर्चात 2,226 कोटी रुपयात वाढ झाल्याचे उघड झाले आहे. शहरातील रस्त्यांची कंत्राटे काळ्या यादीतील कंत्राटदारांना देणे, जल वाहिन्या बदलण्यासाठी 177 कोटी 21 लाख रुपये देऊनही वाढीव खर्च केला गेला, करदात्यांचा पैसा पाण्यासारखा वाहून गेल्यानेही मुंबईत पाणी गळती थांबली नसून हे प्रकार थांबले पाहिलेत याबाबत शासनाकडून चौकशी होणेबाबत मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधत आहे."

5.....

पृ. शी. : सचिन तेंडुलकर यांना भारत रत्न पुरस्कार देणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मु.शी. :सचिन तेंडुलकर यांना भारत रत्न पुरस्कार देण्याबाबत श्री.एस.क्यू.जमा वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□य सदस्य श्री.एस.क्यू.जमा यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.एस.क्यू.जमा (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापति महोदय, पिछली बार हमारी क्रिकेट टीम ने जब "विश्वकप " जीता था, उस समय ऐसा प्रावधान नहीं था कि खिलाड़ियों को भी " भारत रत्न" का सम्मान दिया जा सके. लेकिन अब केंद्र सरकार ने बहुत सारी चीजों का समावेश कर दिया है. इसलिए वर्तमान प्रावधानों के अनुसार अब खिलाड़ियों को भी "भारत रत्न " का सम्मान दिया जा सकता है.

सभापति जी, मेरा ऐसा अनुरोध है कि क्रिकेट खिलाड़ी सचिन तेंडुलकर को "भारत रत्न" सम्मान देने संबंधी एक प्रस्ताव हम विधान परिषद और विधान सभा में एकमत से पास करके केंद्र सरकार के पास भेजें कि हमारे क्रिकेट खिलाड़ी सचिन तेंडुलकर को " भारत रत्न" का सम्मान प्रदान किया जाए, धन्यवाद.

6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : श्री.परशुराम उपकर यांच्यावर झालेल्या हल्ल्यातील आरोपींना अटक न होणे

मु. शी. : . श्री.परशुराम उपकर यांच्यावर झालेल्या हल्ल्यातील आरोपींना अटक न होणे याबाबत श्री.परशुराम उपरकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□य सदस्य श्री.परशुराम उपरकर यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात 5.12.2011 रोजी वेंगुर्ला येथे श्री.राणे समर्थकांकडून तोडफोड करण्यात आली, त्यावेळी मी शिवसेनेच्या शाखेमध्ये बसलो होतो. 30-40 लोक तलवारी, गुप्त्या, चॉपर घेऊन माझ्यावर हल्ला करण्यासाठी येत असताना माझ्या अंगरक्षकाने शटर बंद केले असतानाही शटर तोडून त्यांच्याकडून आतमध्ये घुसण्याचा प्रयत्न करण्यात आला, त्यामुळे माझ्या अंगरक्षकाने गोळीबार केला, गोळीबारानंतर श्री.राणे समर्थक पळाले. याबाबत पोलिसांनी कलम 307 अनुसार गुन्हा नोंदविला असून त्या गुन्ह्यातील आरोपी अद्याप अटक झालेली नाहीत....

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांना मी सांगू इच्छितो की, आपण मंत्री महोदय श्री.नारायण राणे यांचे नाव घेतले असल्यामुळे नोटीस देणे आवश्यक होते.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी श्री.राणे समर्थक असे बोललो आहे. मी कोणचेही नाव घेतलेले नाही.

उप सभापती : आपल्यावर जो काही हल्ला झाला त्यासंबंधीचा उल्लेख करावा. यामध्ये कायदेशीर अडचणी आहेत हे आपण समजून घ्यावे त्यासाठी मी आपल्याला हे सांगितले आहे.

सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपकर यांनी श्री.राणे यांचा उल्लेख केला आहे. हा उल्लेख सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, एका मंत्र्यांच्या सहकारी असलेल्या गुंडांनी माझ्यावर जीवघेणा हल्ला केला. हा हल्ला करीत असताना माझ्या अंगरक्षकाने फायरिंग केल्यामुळे माझा जीव वाचला आहे. या गुन्ह्याबाबत पोलिसांनी नोंदविलेल्या केसमधील अद्याप सापडलेले

नाहीत. या आरोपींना शोधण्यासाठी गृह विभागाने तातडीने उपाययोजना करावी. या आरोपींचा शोध घेण्यासाठी मोहिम घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा जिल्ह्यातील या लोकांना आमदारांवर हल्ला करुनही आपण राजरोसपणे फिरु शकतो असा गैरसमज होईल, त्यामुळे तेथे कायदा व सुवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो म्हणून शासनाने याबाबत तातडीने कारवाई करावी.

8.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :मुंबईतील माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या एटीएम कार्डवर संघटनेचे नाव असणे

मु. शी. :मुंबईतील माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या एटीएम कार्डवर संघटनेचे नाव असणे याबाबत श्री.भगवान साळुंखे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□□य सदस्य श्री.भगवान साळुंखे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

मुंबई महानगरात माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहकारी बँकेमार्फत हलगर्जीपणा होत असलेल्या अनेक तक्रारी शिक्षक परिषदेकडे प्राप्त झाल्या होत्या. ही बाब गेल्या गेल्या अधिवेशनात शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. शासनाने हे काम युनियन बँकेकडे सोपविले. त्यानुसार गेल्याच महिन्यापासनू कार्यवाही सुरु झाली. शिक्षकांना एटीएम कार्डस् वितरित करण्यात आले. या एटीएम कार्डस्वर एका संघटनेचे नाव असून शासनाचे श्रेय एक संघटना घेत असून चुकीचा पायंडा पाडला जात आहे. या विशेष उल्लेखद्वारे मी शासनास विनंती करीत आहे की, शासनाने सदर बँकेस वितरित एटीएम कार्डस् परत घेऊन त्या कार्डावरील संघटनेचे नाव कमी करावे, तसेच या चुकीच्या निर्णयाची सखोल चौकशी करुन संबंधितावर योग्य ती कठोर कारवाई करण्यात यावी."

उप सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.45 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 2.09 ते 2.45 पर्यंत मध्यंतर)

नंतर श्री.गिते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्यांतरानंतर

सभापतीस्थानी माननीय उप सभापती

ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत नियमबाह्य

झालेली कर्मचाऱ्यांची भरती व पदोन्नती.

श्री. जयंत प्र. पाटील : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये कर्मचाऱ्यांची भरती ठरवून दिलेल्या पॅटर्नप्रमाणे करावी असा नाबार्ड व राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे. तसेच या सहकारी बँकामधील कर्मचाऱ्यांना पदोन्नती रोस्टरप्रमाणे दिली गेली पाहिजे असाही शासनाने निर्णय घेतलेला आहे. आज ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना मोठया प्रमाणात भ्रष्टाचार सुरु आहे. जेवढया कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे, त्यापेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची पदे मंजूर करण्यासंबंधीची परवानगी मागितली गेली आहे. नियमबाहय भरती केली जाते, त्यानंतर त्या भरतीस स्टे दिला जातो. ही नियमबाहय होणारी भरती ताबडतोबीने थांबविली पाहिजे.

महोदय, या सहकारी बॅकेमधील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याचा भाव 14 ते 15 लाख रुपये एवढा आहे. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत होणारी भरती, तसेच या बँकेतील कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या पदोन्नती नाबाईच्या गाईड लाईन्सप्रमाणे व शासनाच्या आदेशाप्रमाणेच झाल्या पाहिजेत. सहकारी बँकेतील कर्मचारी भरण्यासंदर्भात नाबार्डने नवीन पॅटर्न तयार केलेला आहे. माझ या रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेने कर्मचारी भरती व पदोन्नतीसाठी एक पॅटर्न ठरविला आहे. तसा पॅटर्न नाबार्डने सर्व राज्यातील जिल्हा सहकारी बँकासाठी ठरविला आहे. त्याप्रमाणे राज्यातील जिल्हा सहकारी बँकामध्ये कर्मचाऱ्यांची भरती केली जाते. मी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अतिशय चांगल्याप्रकारे चालवितो आहे. परंतु आमच्या बँकेकडे त्याच दृष्टीने बघितले जाते. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत नियमबाहय होणारी कर्मचारी भरती आणि नियमबाह्य देण्यात येणारी नियमबाहय पदोन्नती याबाबतीत शासनाने तातडीने दखल घेतली पाहिजे. तेथील कर्मचाऱ्यांची भरती व पदोन्नती प्रक्रिया थांबविण्याचे आदेश शासनाने आजच्या आज दिले पाहिजेत अशी माझी विनंती आहे.

उप सभापती : आपल्या म्हणण्याची शासनाने गांर्भायाने नोंद घेतलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2011-2012 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे.

उप सभापती : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर चर्चा आज, सोमवार, दिनांक 19 डिसेंबर,2011 रोजी घेण्यात येत आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधी माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन व्दारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहे. कार्यक्रम परिपत्रकेवरील दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

<u>विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या.</u>

उप सभापती : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील.

1. उप मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमाक जी-1,जी-2,जी-5,के-6,के-11, ओ-1,ओ-5, ओ-10, ओ-17,ओ-20,ओ-26,ओ-30, ओ-31, ओ-32,ओ-34,ओ-36,ओ-38,ओ-39,ओ-40,ओ-41,ओ-42,ओ-43,ओ-46,ओ-47,ओ-48.
2. उद्योग,बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक- बी-7,बी-8,के-3,के-7,झेडए-1
3. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) आणि पर्यटन मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक एच-3, एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9, झेडडी-4
4. ग्रामविकास विभाग : एल-2, एल-3, एल-5
5. जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) : आय-3, आय-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती.....

6. वस्त्रोद्योग, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ व्ही-2, व्ही-3, व्ही-5, झेडई-1
7. सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण आणि राजशिष्टाचार आर-1
8. कामगार आणि विशेष सहाय्य के-4, एन-3
9. रोजगार हमी योजना आणि जलसंधारण एल-3, ओ-3
10. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय डी-4
11. क्रीडा व युवक कल्याण ई-3
12. महिला व बाल विकास एक्स-1
13. पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य झेडडी-2

सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी पूरक मागण्यांवर आपले विचार व्यक्त करावे.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहासमोर सन 2011-2012 च्या पूरक मागण्या मांडण्यात आल्या आहेत, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मला या ठिकाणी एक गोष्ट जाणून घ्यावयाची आहे. माननीय श्री. अजितदादा पवार यांच्याकडे वित्त खाते आले, त्यावेळी त्यांनी राज्यातील जनतेला असे आश्वासन दिले होते की, प्रत्येक खात्याला आर्थिक शिस्त लावणार आहे. मी पुन्हा पुन्हा पूरक मागण्या सभागृहासमोर मंजुरीसाठी आणणार नाही. परंतु " बोले तैसा चाले....." यापुढे मी काही बोलू इच्छित नाही. परंतु माननीय श्री.अजितदादा पवार सारखी व्यक्ती सभागृहात घोषणा करते. ती घोषणा केवळ प्रसिध्दीसाठी नसावी. त्या घोषणेची अंमलबजावणी व्हावी असे मला निश्चितपणे वाटते. या सभागृहात 6328 कोटी रुपयांच्या पूरक मागण्या मंजुरीसाठी मांडण्यात आल्या आहेत. यात आकस्मिक अशा पूरक मागण्या नाही. अनेक पूरक मागण्या हया मूळ अर्थसंकल्पात यावयास पाहिजे होत्या. त्या मागण्यांचा समावेश त्यावेळी अर्थसंकल्पात केला गेला नाही. पूरक मागण्यांमध्ये मोठयाप्रमाणात अनियमितता आपल्याला दिसून येते.

सभापती महोदय, मी जास्त भाषण करणार नाही. तीन, चार विभागांच्या काही पूरक मागण्यांवरच माझे विचार व्यक्त करणार आहे. महिला व बालविकास विभागाची बाब क्रमांक 235, पृष्ठ क्रमांक 251 च्या अनुषंगाने मला एक गोष्ट निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, महाराष्ट्र राज्य बालहक्क आयोगासाठी फक्त 10 लाख रुपयांची मागणी केलेली आहे. त्यामुळे या आयोगाचे काम ठप्प झालेले आहे. या आयोगास कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करुन दिलेला नाही, फक्त प्रशासकीय बाबीसाठी 10 लाख रुपयांची मागणी केलेली आहे. बाल आयोगास तरतूद उपलब्ध करुन द्यावयाची नसेल तर तो आयोग गुंडाळून टाका. बाल आयोग हा नाममात्र न ठेवता त्यासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे.

सभापती महोदय, बाल न्यायालयाची स्थापना केंद्र सरकारच्या आदेशान्वये झालेली आहे. केंद्र शासनाने 2005 मध्ये बालहक्क आयोग संरक्षण कायदा केलेला आहे. दुर्देवाने या कायद्याची अंमलबजावणी महाराष्ट्रात झालेली नाही. बालहक्क आयोग संरक्षण कायद्याची आवश्यकता आहे

श्री.रामदास कदम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशी प्रत्येक जिल्हयामध्ये 400 ते 500 मुले आहेत. आपणा सर्वांना कल्पना आहे की, बाल न्यायालयामध्ये आठ-आठ, दहा दहा वर्षे निर्णय होत नाहीत. बालहक्क आयोग संरक्षण कायदा निर्माण झालेला आहे. परंतु त्याची या राज्यात अंमलबजावणी झालेली नाही. त्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय कधी घेणार आहात त्यासाठी निधीची व्यवस्था कशा पध्दतीने करणार आहात याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाच्या मागण्यांवर मी माझे मत थोडक्यात मांडणार आहे. महाराष्ट्रावर 2 लाख 60 हजार कोटी रुपयांपर्यंत कर्ज झालेले आहे. राज्य शासनावर एवढया मोठया प्रमाणात कर्ज झालेले आहे. परंतु त्यातील काही निधी बीज निर्मितीसाठी वापरला असता तर महाराष्ट्राची विजेची भूक भागली असती. आमच्या समोर जैतापूर येथे आंदोलन करण्याचा प्रश्न निर्माण झाला नसता. पोलिसांच्या गोळयांनी आंदोलन करणारी माणसे मेली नसती. आपण ज्या जागा प्रकल्पांसाठी संपादित केल्या आहेत, त्या जागेवर प्रकल्पच झाले पाहिजेत असे माझे ठाम मत आहे. शासनाने जैतापूर येथे होणाऱ्या अणु ऊर्जा प्रकल्पाचा आग्रह सोडावा. हरिहरेश्वर येथे शासन नवीन ओष्णिक प्रकल्प आणत आहे. शासन कोकणातील संपूर्ण सागरी किनाऱ्यांवर जवळपास 16 प्रकल्प आणत आहे. कदाचित या 16 प्रकल्पांमुळे संपूर्ण कोकणच उदध्वस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबतीत शासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या सभागृहात माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. छगनराव भुजबळ साहेब सभागृहात उपस्थित आहेत. त्यांचे मी पृष्ठ क्रमांक 57, बाब क्रमांक 70 कडे लक्ष वेधू इच्छितो. गेल्या पाच वर्षापासून तीन रस्त्यांची मी सातत्याने मागणी करीत आहे. "जामगे-आंबेय-नातूनगर " या रस्त्याच्या काम पूर्ण झाले तर 25 कि.मी.अंतर कमी होऊ शकते. 5 कि.मी.एवढया रस्त्याचे काम झालेले आहे. एकच कि.मी.रस्त्याचे काम शिल्लक आहे....

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

गेल्या पाच वर्षात निधीची मागणी करुनही निधी उपलब्ध करुन दिलेला नाही. 1 कि.मी.रस्त्याचे काम झाले तर 25 कि.मी.अंतर कमी होणार आहे व तेथील पंचक्रोशीला न्याय मिळणार आहे. म्हणून जामगे-आंबये ते नातूनगर रस्त्यासाठी 25 लाख रुपये तातडीने उपलब्ध करुन द्यावेत अशी मी विनंती करतो. त्याचबरोबर जामगे ते घेरापालघर रस्त्याचे 25 कि.मी.चे काम झाले असून 1 कि.मी.चे काम शिल्लग आहे. 25 लाख रुपये उपलब्ध करुन दिले तर 25 कि.मी.अंतर कमी होणार आहे आणि पंचक्रोशी एका ठिकाणी येऊ शकेल. 25 कि.मी.चे काम पूर्ण झाले आहे. संबंधित विभागाला मी कळविले आहे असे मंत्री महोदयांकडून मला लेखी उत्तर देण्यात आलेले आहे. परंतु अद्याप कार्यवाही पूर्ण झालेली नाही. त्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी या बाबीमध्ये लक्ष घालावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 86, बाब क्रमांक 57. कोकणात अनेक पाटबंधारे योजना राबविल्या जात आहेत. मी विधानसभेत विरोधी पक्ष नेता असताना अनेकदा या विषयावर भाष्य केले आहे. कोकणाच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम आघाडी शासनाकडून केले जात आहे. कोकणाला न्याय द्यावा अशी मी पुन्हा एकदा मागणी करतो. कोकणाला किती निधी दिला? कोकणाच्या दृष्टीने निधीचे नियोजन होणे अपेक्षित आहे. विशेषत: विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका डोळयासमोर ठेवून कोकणाला 5 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले गेले. त्या 5 हजार कोटी रुपयांपैकी किती रक्कम प्रत्यक्षपणे उपलब्ध करुन दिली, त्या पॅकेजचे काय झाले हे एकदा सभागृहाला कळले पाहिजे. विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने दिलेले आश्वासन न पाळता कोकणाला पुन्हा एकदा वाटाण्याच्या अक्षता दाखविण्याचे काम केले गेले आहे.

युती सरकारच्या काळात कोकणात 36 पाटबंधारे योजनांची कामे सुरु करण्यात आली. युती शासन पायउतार झाल्यामुळे ही सर्व कामे आज अर्धवट स्थितीत आहेत, जैसे थे परिस्थिती आहे. कोकणातील पाटबंधारे प्रकल्पांच्या कामांना निधी न देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे काय असा प्रश्न आमच्यासमोर निर्माण झाला आहे. कोकणात संपूर्ण महाराष्ट्राच्या तुलनेने सर्वाधिक पाऊस पडतो. राज्याच्या तुलनेने 40 टक्के पाऊस ज्या कोकणात पडतो,त्याच कोकणात राज्याच्या तुलनेत सर्वाधिक पाणी टंचाई आहे. देशामध्ये 40 टक्के सिंचन असून त्यापैकी महाराष्ट्रात 18 टक्के सिंचन आहे. मात्र कोकणामध्ये फक्त 2 टक्के सिंचन आहे. कोकणातील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

पाटबंधारे कामांसाठी निधी न दिल्यामुळे ही सर्व कामे अर्धवट स्थितीत पडून आहेत. शासनाने तातडीने या कामांना निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी मागणी करीत आहे. येत्या अधिवेशनात पुरवणी मागण्यांद्वारे किती निधी दिला जाईल हे मंत्री महोदयांनी सभागृहाला सांगावे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 259, बाब क्रमांक 241. पर्यटन विभागाच्या माध्यमातून मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, खेड नगरपालिकेच्या हद्दीत बोटिंग प्रकल्प सुरु करण्याचा प्रस्ताव दिलेला होता. परिपूर्ण प्रस्ताव पर्यटन विभागाकडे सादर करण्यात आला आहे. निधीअभावी हे काम थांबले आहे. निधी उपलब्ध करुन दिला तर या कामाला चालना मिळेल. पर्यटनाच्या दृष्टीने खेड नगरपालिकेच्या हद्दीमध्ये बोटिंग प्रकल्प सुरु करण्यास मान्यता द्यावी अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 205, बाब क्रमांक 179. सार्वजनिक आरोग्य विभागाला मी पाच वेळा विनंती केल्यानंतर माननीय राज्यमंत्र्यांनी मला आश्वासन दिले आहे. कळंबणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता कर्मचारीवर्गाची 65 पदे मंजूर करण्यात आली, त्यापैकी रिक्त असलेली पदे तातडीने मंजूर करुन घेऊ असे आश्वासन देण्यात आले आहे. सभागृहात दिलेले आश्वासन आतापर्यंत अंमलात आणलेले नाही. 65 पदे मंजूर करुन ती भरण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला होता. परंतु वेळेत पदे न भरल्यामुळे पदे व्यपगत झाली व निधी खर्च होऊ शकला नाही. त्यामुळे मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासन दिल्याप्रमाणे तातडीने ही रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करावी अशी विनंती करतो आणि मी ज्या मागण्या सभागृहासमोर मांडल्या आहेत त्यांचा सहानुभूतीने शासनाने विचार करावा एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011-12 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 73, पृष्ठ क्रमांक 58 बाबत मी बोलणार आहे. ऑक्टोबर महिन्यात सार्वजनिक बांधकाम मंत्री सिंधुदुर्ग जिल्हयातील आरोंदा येथे गेले होते आणि त्यांनी आरोंदा येथील पूल लवकरच वाहतुकीसाठी खुला होईल असे जाहीर केले होते. मी मध्यंतरी गोवा येथे गेलो होतो. तेव्हा वृत्तपत्रात असे वाचावयास मिळाले की, गोवा आणि महाराष्ट्र या दोन राज्यांना जोडणाऱ्या पुलाचे काम शेवटच्या टप्प्यात आहे. डिसेंबर महिन्यात मी पुन्हा गोवा येथे गेलो होतो तेव्हा कळले की, त्या कामाच्या ठेकेदाराला 2 कोटी रुपये न दिल्यामुळे त्याने काम बंद केले आहे. पुलाचे काम पूर्ण झाले असून तो आठ दिवसात वाहतुकीसाठी खुला होऊ शकतो. परंतु ठेकेदाराचे पेमेंट थांबल्यामुळे त्याने पुलाचे काम बंद ठेवले आहे. या ठिकाणी उप मुख्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांनी तातडीने निधी उपलब्ध करुन द्यावा, जेणेकरुन पुढील महिन्याभरात हा पूल वाहतुकीस खुला होईल.

सभापती महोदय, रायगड जिल्हयामध्ये केंद्र शासनाने 1500 कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. वेगवेगळे प्रकल्प रायगड जिल्हयात सुरु आहेत. असे असताना त्या जिल्हयातील रस्त्यांची अत्यंत वाईट अवस्था झालेली आहे. काही दिवसांपूर्वी माननीय वित्तमंत्री रायगड जिल्हयात आले होते. रायगड जिल्हयातील रस्त्यांवर पडलेल्या खड्डयातून कसा प्रवास करावा लागतो हे त्यांनी स्वत: अनुभवले आहे. रायगड जिल्हयासाठी खास बाब म्हणून रस्ते दुरुस्तीसाठी तरतूद करण्यात यावी अशी मी शासनाला विनंती करतो. रायगड जिल्हयातून जाणारे रस्ते अत्यंत निकृष्ट झालेले आहेत. पावसाळ्यात सगळ्यात जास्त रायगड जिल्हयातील रस्त्यांची दुर्दशा होत असते. पावसाळा संपून तीन महिने उलटून गेले आहेत. अजूनही रस्त्यांची दुरुस्ती झालेली नाही. कार्यकारी अभियंत्यांकडे विचारणा केली असता ते म्हणतात की, निधीची तरतूद झालेली नाही. प्रत्येक वर्षी पावसाळ्यात रस्त्यांची दुर्दशा होत असल्यामुळे अगोदरच्या वर्षीच पुढील वर्षाच्या रस्ते दुरुस्तीसाठी तरतूद करुन कामाचे टेंडर काढण्याची प्रक्रिया सुरु करावी अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 68, पृष्ठ क्रमांक 49 बाबत मी बोलणार आहे. पेण मतदारसंघाचे माजी आमदार आणि या राज्याचे माजी मंत्री श्री.रविशेठ पाटील यांनी एक आरोप

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केला, तो आरोप चुकीचा आहे असे माझे मत आहे. या सदनाचे सदस्य श्री.अनिल तटकरे हे खार लँड विभागाचे चेकबुक घेऊन घरी जातात आणि 10 टक्के रक्कम घेतल्यानंतरच कॉन्ट्रॅक्टरला चेक मिळतो असे त्यांनी म्हटले आहे. मी हे मान्य करण्यास तयार नाही. माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे असा प्रकार करणार नाहीत. ते सज्जन आहेत. मी या संदर्भात संबंधित अधीक्षक अभियंत्यांना फोन करुन त्यांची प्रतिक्रिया विचारली. त्यांनी सांगितले की, मी यासंबंधी भाष्य करु शकत नाही. मी हतबल आहे. मी यासंबंधी प्रतिक्रिया देऊ शकत नाही. आमदार म्हणून एक कर्तव्यदक्ष नागरिक या नात्याने मी विचारणा केली असता कार्यकारी अभियंता म्हणाले की, साहेब माफ करा. मी काही बोलू शकत नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे असे करणार नाहीत याबाबत माझी खात्री आहे. आमदाराच्या घरी विभागाचे चेकबुक नेऊन 10 टक्के रक्कम दिली तरच चेक द्यायचा अशी अर्थ खात्याने तरतूद केली आहे का?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्य एक प्रकारे आरोप करीत आहेत आणि आरोपाचे खंडनही करीत आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांची बदनामी होत आहे.

श्री.सचिन अहिर : माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे हे या सभागृहाचे सदस्य आहेत. त्यांच्या नावाचा उल्लेख करावयाचा असल्यास त्यांना लेखी नोटीस देणे आवश्यक आहे. त्यामुळे माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आपल्या वक्तव्यात माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांचा उल्लेख केला आहे तो रेकॉर्डवरुन वगळण्यात यावा, अशी मी विनंती करतो.

उप सभापती : माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आपल्या वक्तव्यामध्ये माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांच्या नावाचा उल्लेख केला आहे. वास्तविक पाहता सभागृहाच्या सदस्यांच्या नावाचा उल्लेख करावयाचा असल्यास नोटीस द्यावी लागते.

श्री.जयंत प्र.पाटील : वृत्तपत्रात जे छापून आले ते मी सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

उप सभापती : माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांच्या नावाचा जो उल्लेख केला गेला आहे तो रेकॉर्डवरुन वगळण्यात येईल.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, वृत्तपत्रात जे छापून आले ते मी सभागृहासमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. श्री.अनिल तटकरे हे सज्जन आहेत, ते असा व्यवहार अजिबात करणार नाहीत याची मला खात्री आहे. कारण मी त्यांना लहानपणापासून ओळखतो. त्याबद्दल प्रश्नच नाही.

नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

पण हे कुठेतरी थांबलेच पाहिजे. अशा प्रकारची चर्चा चालू आहे आणि ज्या पध्दतीचे वाटप होत आहे.....

श्री. रमेश शेंडगे : सन्माननीय सदस्य एका बाजूला सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे नाव घेऊन सांगत आहेत की, ते असे करणार नाहीत आणि दुसऱ्या बाजूला कुठेतरी अप्रत्यक्ष त्यांच्यावर आरोप सुध्दा करीत आहेत आणि पुन्हा चौकशी झाली पाहिजे असेही म्हणत आहेत. त्यामुळे मला असे वाटते की, या विषयावर आता जास्त चर्चा होऊ नये.

श्री. जयंत प्र.पाटील : सभागृहाचे माजी सन्माननीय सदस्य श्री. रवि पाटील यांनी जे खोटे आरोप केलेले आहेत त्या आरोपाची चौकशी करावी असे मी म्हटले आहे. ते आघाडीचे आहेत की पदाधिकारी आहेत याची मला माहिती नाही. माझी माननीय अर्थ मंत्र्यांना विनंती आहे की, खार लँडसाठी कोणात जी तरतूद केलेली आहे ती अत्यंत अपुरी आहे. माजी अर्थ मंत्री श्री. सुनील तटकरे यांच्यासोबत बैठक झाली असता कोकणातील बहुतांशी आमदार त्या बैठकीला हजर होते. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर हे सुध्दा तेव्हा उपस्थित होते. त्या बैठकीत माननीय अर्थ मंत्र्यांनी 200 कोटीची तरतूद खार लँड विभागासाठी केली जाईल असे सांगितले होते. जेणेकरुन त्यातून कोकणातील बांध-बंदिस्तीची कामे करता येतील व समुद्राचे एकही थेंब पाणी शेतात येणार नाही. मधल्या काळात मात्र अर्थ खात्याचे मंत्री बदलले आणि ही तरतूद कमी कशी झाली हे समजलेच नाही. वास्तविक कोकणात जे नवीन नवीन प्रोजेक्ट होत आहेत त्यामुळे पाण्याचा प्रवाह वेगवेगळ्या दिशेने जातो व परिणामी पूर परिस्थिती निर्माण होते. यातून मार्ग काढण्यासाठी कोकणातील खार जमिनीच्या बांध बंदिस्तीसाठी भरीव निधीची तरतूद करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, बाब क्र. 25, पृ.क्र. 19-बंदरे विभागाच्या अनुषंगाने मला एक गोष्ट निदर्शनास आणून द्यावयाची आहे. ती म्हणजे मी दररोज मांडवा बंदरावरुन जेट्टीने मुंबईला येतो. या मांडवा बंदरावर करोडो रुपये खर्च झालेले आहेत पण त्याचे ऑपरेशन अद्यापही सुरु होत नाही. या बंदरावर मंत्री महोदय येणार असल्याची कार्यक्रम पत्रिका मी वाचली होती. मी त्यांच्या स्वागतासाठी तयार होतो. पण वेळेवर त्यांचा कार्यक्रम बदलून ते प्रथम मुंबईहून उरण-रेवस व

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

नंतर मांडव्याला गेले. माझी विनंती आहे की, या बंदराचे काम पूर्ण झालेले आहे पण त्याची सुरुवात न झाल्याने ते ठप्प आहे, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मी त्याच व्यवसायातील असल्याने या विभागाशी माझा नेहमीच संबंध येत असतो. माननीय मिनाक्षी पाटील या विभागाच्या मंत्री असताना हे काम पूर्ण झालेले आहे, पण अद्यापही सुरु झालेले नाही, याकडे लक्ष दिले पाहिजे. तसेच या विभागाची अजब परिस्थिती अशी आहे की, एका शिपायाचा चार्ज कार्यकारी अभियंत्याकडे आणि कार्यकारी अभियंता हा सीईओ चे काम करतो. म्हणून यासंदर्भात एक बैठक घ्यावी व आमचाही थोडाफार अभ्यास असल्याने आम्हालाही त्या बैठकीसाठी बोलवावे.

बंदरे विभागाच्या माध्यमातून गुजरात राज्याला जवळपास 60 टक्के उत्पन्न मिळते, इतका महत्वाचा हा विभाग आहे. आपल्या राज्यात मात्र ठराविक अधिकाऱ्यांच्या मोनोपोलीवर हा विभाग सुरु आहे. तसेच राज्यात वॉटर फंडच्या बाबतीत काहीच बघितले जात नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी मुंबईत जल वाहतूक सुरु करण्याबाबतची घोषणा केली होती. पण माझ्या माहितीप्रमाणे जल वाहतूक सुरु करण्याबाबत शासनाच्या अधिकाऱ्यांनी कोणताही अभ्यास केलेला नाही. आपण बोरिवली ते गेटवे ऑफ इंडिया अशी वाहतूक ओपन समुद्रातून करण्याची घोषणा केली होती. पण अशा ओपन समुद्रातून कॅटेमरान चालू शकत नाहीत, त्यासाठी वॉटर ब्रेकची गरज असते. पण आपल्या 740 किलोमीटरच्या समुद्रात कोठेही वॉटर ब्रेक केलेला नाही. शासनाकडून घोषणा केली जाते, व्हिडियो क्लिप काढली जाते पण प्रत्यक्षात काहीच नाही अशी परिस्थिती आहे.

मुंबईच्या समुद्र किनाऱ्यावर आता नवीन बोटी नांगरुन ठेवण्यासाठी कोणतीही जागा राहणार नाही. दरवर्षी गेटवे ऑफ इंडियाला 150 बोटी नव्याने लँड होत आहेत. अशा बोटींना पर्यायी जागा म्हणून मांडवा बंदराशिवाय कोणताही उपाय शासनाच्या समोर नाही. मुंबई हे स्वत:च एक बंदर असल्याने त्या बंदराच्या मर्यादा ठरलेल्या आहेत पण याचा विचार शासनाने केलेला दिसत नाही. मंत्री महोदय नेहमी बंदरावर येत असतात. त्यांनी बघावे की मुंबईच्या समुद्रात ज्या बोटी आहेत त्यात 81 बोटी माझ्याच आहेत. अजून 250 बोटी इतरांच्या असून 150 बोटींचे बुकिंग झालेले आहे. या सर्व बोटींना बांधून ठेवण्याची क्षमता आपल्या समुद्रात नाही. या अनुषंगाने विचार करताना आम्हाला कुठे तरी चर्चेसाठी बोलाविले तर आम्ही आमच्या परीने त्यावर

.....3

श्री. जयंत प्र. पाटील.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपाय सुचवू शकतो. भलेही आमचे विचार आपण एक्झीक्युट केले नाहीत तरी चालतील पण किमान आपल्याला दिशा तरी नक्कीच मिळू शकेल. या सर्व गोष्टींची दखल घ्यावी अशी माझी विनंती आहे.

महोदय, बाब क्र. 24, पृ.क्र.19-बंदरांच्याच संदर्भातील असून समुद्र किनाऱ्यावर जे धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्यात आलेले आहेत त्यांच्यासाठी देखील अपुरीच तरतूद केली आहे. त्यात शासनाचा असा अजब निर्णय आहे की, मुरुडमध्ये मातीचा बंधारा बांधण्याचे कंत्राट देऊन टाकले. वास्तविक दगडाचे काम हे स्टेट सेक्टरने करावयाचे असते. हा नियम असताना अशा प्रकारचे कंत्राट देऊन टाकणे हा एक प्रकारे भ्रष्टाचार असल्याचा संशय येतो, याकडे लक्ष द्यावे.

बाब क्र. 179, पृ.क्र. 205-सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, मंत्री महोदय सुध्दा अनेक वेळा केवळ गोड गोडच बोलतात. यासंदर्भात मी एका सेवा निवृत्त व्यक्तीचे उदाहरण गेल्या अनेक दिवसांपासून सभागृहात मांडत आहे. श्री. पी.एस.शिंदे या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्याने घरगुती अडचणीमुळे गेल्या चार वर्षापूर्वी अर्ज करुन स्वेच्छेने सेवानिवृत्ती मागितलेली आहे. पण अद्यापही त्याला डिस्चार्ज दिला जात नाही. उलट त्याला सांगण्यात आले की, तुम्ही आमदारांकडे का गेलात, आता तुमचे काम कसे होते तेच पहावे. अशा प्रकारे अधिकारी जर वागत असतील तर आमदारांकडे कोणीही आपल्या कामासाठी यायलाच नको. या निमित्ताने माझी मागणी आहे की, श्री. पी.एस.शिंदे यांना तातडीने सेवानिवृत्ती द्यावी.

सभापती महोदय, बाब क्र. 243, पृ.क्र.270-पर्यटन विभाग. अलिबाग हा जिल्हा एक ऐतिहासिक जिल्हा म्हणून ओळखला जातो. सरसेनापती श्री. कान्होजी आंग्रे यांच्या राजधानीचे ठिकाण म्हणून अलिबाग जिल्ह्याची ओळख आहे. अलिबाग किल्ल्याला रोप-वे बनविण्यासाठी परवानगी मागण्याचा हा विषय आहे. किल्ल्याची वास्तू ही संपूर्णपणे पुराण वस्तू विभागाच्या अखत्यारित आहे. पण हा अधिकार फक्त किल्ल्यापुरताच मर्यादित आहे. समुद्र मात्र महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डच्या अंडर येतो. येथे खाजगीकरणातून रोप-वे तयार करण्यासाठीची परवानगी राज्य शासन देणार काय, किंवा तसा प्रयत्न करणार आहे काय ? तसेच विकासाची काम होत असताना आमची अशी विनंती आहे की, जी विकासाची कामे होतात त्यात आम्हाला कुठेतरी सहभागी करता येईल काय तसेच आम्ही सुचविलेली कामे मंत्री महोदय विचारात घेतील काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशोधित प्रत / शोधित प्रत नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, मी माझ्या कामासाठी कोणत्याही मंत्रीमहोदयांकडे गेलो नाही. परंतु एका बदलीच्या प्रकरणाच्या संदर्भात माननीय अजित दादा यांच्याकडे गेलो होतो. त्यावेळेस आपण मला म्हणाला होता की, "आमचे मित्र एका बदलीसाठी राजीनामा देणार देणार काय" ? त्यावेळेस मी सांगितले की, ठीक आहे. मी माझ्या आयुष्यात आपल्याकडे केवळ एका बदलीच्या कामासाठी आलो होतो परंतु ती बदली सुध्दा आपण करु शकला नाहीत. मी चुकीचे बोलत असेन तर माननीय मंत्रीमहोदयांनी तसे सांगावे. मी ज्या बदलीच्या प्रकरणात मंत्रीमहोदयांकडे आलो होतो ती बदली सुध्दा चुकीच्या पध्दतीने करण्यात आली होती. एका माणसाची दोन महिन्यात तीन वेळा बदली करण्यात आली होती व या बदलीसाठीच मी माननीय मंत्रीमहोदयांकडे गेलो होतो. आमदार म्हणून आम्हाला काही प्रोटोकॉल आहेत की, नाही हे मला सभागृहात विचारावेसे वाटते. अन्यायकारकपणे कोणी बदली करीत असेल तर त्यासाठी आलो असतांना सुध्दा माझे काम झाले नाही. या बदलीच्या प्रकरणात केवळ मी एकटाच माननीय मंत्रीमहोदयांकडे गेलो होतो असे नाही तर माझ्या सोबत तीन आमदार तसेच या राज्याचे माजी मंत्री मोहन पाटील देखील बरोबर होते. आम्हाला वाटले होते की, बदलीचे काम होईल परंतु साध्या बदलीचे सुध्दा काम झाले नाही. सदर बदली प्रकरणाचे काम माननीय मोहन पाटील यांच्या नातेवाइकांचे होते त्यामुळे आम्ही मंत्री महोदयांकडे गेलो होतो परंतु तरी सुध्दा बदली झाली नाही याचे मला फार दु:ख झाले. चुकीच्या बदलीच्या प्रकरणाचा अधिकार सुध्दा आमदार म्हणून आम्हाला राहिलेला नाही. आता आमदार म्हणून कोणते काम मंत्री महोदयांकडे घेऊन जावे व कोणते घेऊन जाऊ नये असा प्रश्न आमच्या समोर पडलेला आहे.

सभापती महोदय, मी माननीय सचिनभाऊ यांना सांगू इच्छितो की, त्यांनी आमच्या वेदनाही कळवाव्यात केवळ दुस-याची बाजू आपण घेत जाऊ नका. आमच्या ज्या वेदना आहेत, आमचा जो अपमान झालेला आहे, आमच्या अधिकारावर जी गदा आलेली आहे त्याही आपण संबंधितांकडे कळवाव्यात असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. खरे म्हणजे आमदारकी नको असे कधी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

वाटते. (अडथळा) जयंत पाटलांची किंमत आपण करु नका. आम्ही पहिल्यावेळेस पाठिंबा दिला नसता तर तुम्हाला विरोधी पक्षात बसावे लागले असते. कोणतीही अट नसतांना आम्ही आपल्याला साथ दिली होती हे आपण विसरु नका. आम्ही आपल्याला जी मदत केली होती त्याची फळे आता आम्ही भोगत आहोत. त्यामुळे आपण जयंत पाटलांना एवढे सोपे समजू नका. आम्ही ध्येयाने आणि तत्वाने काम करणारे आहोत. आम्हाला आमची राजकीय कुवत किती आहे त्याची कल्पना आहे. परंतु आमदारांचा अधिकार कोणी हिरावून घेत असेल तर ते आम्ही सहन करणार नाही. आमदार म्हणून आम्हाला काय प्रोटोकॉल आहे हे आम्हाला कळले पाहिजे. आम्ही काम सांगूनही अधिकारी काम करीत नसेल तर ते योग्य होणार नाही. सीमा भागातील माणसाच्या सेवानिवृत्तीचे काम होत नसेल, माजी आमदाराच्या जावयाचे काम होत नसेल तर त्याचे आम्हाला दु:ख होते. या ठिकाणी मी आमदारांच्या वेदना सांगत आहे. सन्माननीय सदस्य श्री. शेंडगे साहेब पैसे घेतात असे कोणी म्हटले तर त्याचे आम्हाला दु:ख होते. हे मी आनंदाने बोलत नाही. मी सदस्यांवर टीका करीत नाही. या ठिकाणी मी सन्माननीय सदस्य श्री. शेंडगे यांच्या नावाचा उल्लेख उदाहरण म्हणून केलेला आहे. सन्माननीय सदस्यांचा यावर आक्षेप असेल तर मी माझे शब्द मागे घेतो.

सभापती महोदय, बजेटमध्ये कमी तरतूद करावयाची आणि पुरवणी मागण्यांमध्ये करोडो रुपयांची तरतूद करावयाची ही जी काही प्रथा सुरु झालेली आहे ती बंद झाली पाहिजे. थोडे फार पैसे कमी पडले तर त्याची तरतूद पुरवणी मागण्यांमध्ये केली जात असते. परंतु आता बजेटपेक्षाही पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली जात आहे ही जी प्रथा आहे बंद झाली पाहिजे अशी मागणी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून मी राज्य शासनाकडे करतो. पुरवण्या मागण्या या पुरवण्या मागण्याच राहिल्या पाहिजेत. परंतु सर्व पुरवणी मागण्या वाचल्यानंतर पुरवणी मागण्या हे बजेट इ ालिले आहे असे मला दिसले आहे. हा जो काही प्रकार आहे तो थांबला पाहिजे अशी विनंती शासनाला करतो. माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार साहेब येथे उपस्थित आहेत. ते सुध्दा स्पष्ट बोलत असतात. माझ्या वेदना त्यांच्या पर्यंत पोहचाव्यात यासाठीच मी स्पष्ट बोललो आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे कोणतेही सन्माननीय सदस्य पुरवणी मागण्यांवर बोलणार नाही असे दोन्ही काँग्रेसच्या प्रतोंदानी मला कळविले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) :सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे. पुरवणी मागण्यांचा विचार करीत असतांना माननीय उप मुख्यमंत्र्यांकडून मी अपेक्षा करतो की, आपण या राज्याचे अर्थमंत्री झाल्यानंतर अगोदर या खात्यात जी बेशिस्ती सुरु होती त्या बेशिस्तीला कोठे तरी लगाम लागेल, बेशिस्त थांबविण्याचा प्रयत्न होईल असे मला वाटले होते.

सभापती महोदय, अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी कापसाचा गंभीर प्रश्न पेटलेला असतांना शासनाने पुरवणी मागण्यांसोबतच 45,00 कोटी, 40 लक्ष, 1 हजार रुपये कोटींच्या अधिकच्या मागण्या मंजूर केल्या. या मागण्या सन 2002-03, 2003-04, 2004-05, 2005-06 या वर्षाच्या आहेत. या चारही वर्षामध्ये शासनाने अर्थसंकल्प मांडलेला होता. एवढेच नाही तर पावसाळी अधिवेशन व हिवाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्यासुध्दा मांडलेल्या होत्या. असे असतांना हा अधिकचा खर्च कोणाच्या परवानगीने केला गेला ? विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांची अर्थसंकल्प व पुरवणी मागण्यांना मंजुरी मिळाल्यानंतरच हा निधी खर्च करण्यात येतो. असे असतांनाही आर्थिक बेशिस्त करण्यात आली. एखाद्या वेळेस सन 2002-03 मध्ये केलेल्या खर्चाला 2003-04 मध्ये मान्यता घेणे समजण्यासारखे होते. परंतु या शासनाने आर्थिक बेशिस्तीच्या सर्व सीमा ओलांडल्या आहेत. 9 वर्षानंतर 2002-03 मध्ये विधिमंडळाच्या परवानगी शिवाय केलेल्या खर्चाला मान्यता घेतली आहे. सन 2002-03 ते 2005-06 पर्यंत केलेल्या अधिक खर्चाचे विवरणपत्र पुढील प्रमाणे आहे. सन 2002-2003 मध्ये 25,41 कोटी 99 लाख 66 हजार रुपये, सन 2003-2004 मध्ये 10,14 कोटी 76 लक्ष 18 हजार रुपये, सन 2004-2005 मध्ये 03,88 कोटी 31 लाख 72 हजार रुपये व 2005-2006 मध्ये 05, 55 कोटी 32 लक्ष 45 हजार रुपये होते. एवढा मोठा निधी या सभागृहाच्या मान्यतेसाठी आलेला आहे. 9-9 वर्षात कोटयावधी रुपये खर्च केले जातात व त्या खर्चाला विधिमंडळाची परवानगी घेतली जात नाही. हा जो खर्च झालेला आहे तो कोणाच्या परवानगीने खर्च करण्यात आलेला आहे, हा पैसा कोणी खर्च केला, या खर्चाला मान्यता का मिळाली नाही याचे उत्तर येणे अपेक्षित आहे.

..4..

श्री. पांडुरंग फुंडकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, मी माझ्या भाषणाच्या सुरुवातीपासून माननीय उप मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा व्यक्त केलेली आहे. यापुढील अधिवेशनात किमान अशा प्रकारच्या पुरवणी मागण्या आणू नका अशी मी माननीय उप मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा करतो. अंदाज पत्रक मांडल्यानंतर जुजबी पूरक मागण्या समोर आल्या तर आम्ही त्या समजू शकतो. परंतु बजेट मंजूर झाल्यानंतरच्या पुढील अधिवेशनात पुरवणी मागण्या मंजुरीसाठी येतात ही काही चांगली बाब नाही.

सभापती महोदय, वित्त विभागाची मागणी क्रमांक जी-1, पृष्ठ क्रमांक 49, बाब क्रमांक 67 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. या बाबीद्वारे विक्रीकर विभागाची प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. अपर विक्रीकर आयुक्त, ठाणे विभाग यांच्या कार्यालयातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी विशेष भरती मोहिमेंअतर्गत चपराशी या पदावरील रिक्त पदे भरण्याकरिता इच्छूक व पात्र उमेदवारांकडून वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात आले आहेत. या जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज केलेल्या उमेदरवारांच्या मुलाखती दिनांक 10 व 11 नोव्हेंबर, 2008 रोजी घेण्याचे ठरविण्यात आले होते.

यानंतर श्री. भारवि...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, काही उमेदवारांनी अर्जासोबत कागदपत्रे सादर केली नव्हती. अपात्र उमेदवारांना संधी देण्यासाठी दिनांक 10 व 11 नोव्हेंबर रोजीच्या मुलाखती पुढे ढकलण्यात आल्या. अपात्र उमेदवारांना त्यात घुसवायचे होते. पात्र उमेदवारांना बाजूला सारून अपात्र उमेदवारांना संधी द्यायची होती. त्यामुळे त्या मुलाखती पुढे ढकलण्यात आल्या. त्यावेळी विक्रीकर आयुक्तांनी मौखिक सूचना दिल्या होत्या. विक्रीकर आयुक्तांच्या अशा सूचनांमुळे गुणपत्रिका सादर करण्यासाठी एक महिन्यांचा कालावधी उमेदवारांना उपलब्ध झाला. या कालावधीत विक्रीकर आयुक्त यांच्या वाहन चालकाच्या मुलीसह इतर चार उमेदवारांनी खोट्या गुणपत्रिका सादर केल्या. यासंबंधीचा प्रश्न आपल्या सभागृहात उपस्थित झाला होता व त्याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी देखील करण्यात आली होती. त्यानुसार शासनाने चौकशी करण्याचे आश्वासन दिले. त्याची तक्रार दक्षता विभागाकडे देखील केली. उपायुक्त, दक्षता विभाग यांनी सर्व प्रक्रिया पारदर्शक पार पाडल्याचा खोटा अहवाल सादर केला. या भरती प्रक्रियेमध्ये गैरप्रकार झाल्याचे, उमेदवारांनी बोगस गुणपत्रिका सादर केल्याचे निदर्शनास आले. परंतु, अद्याप पर्यंत खोटा अहवाल सादर करणाऱ्या तत्कालीन दक्षता विभागाच्या उपायुक्तांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. खोटा अहवाल सादर करणे, खोटी गुणपत्रिका दाखल करणे तसेच मागासवर्गीय उमेदवारांना बाजूला सारून बोगस भरती संबंधातील जे प्रकार सुरू आहेत, ते थांबविले पाहिजेत अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या पुरवणी मागणी क्रमांक के-6, पृष्ठ क्रमांक 100, बाब क्रमांक 116 यावर मी बोलणार आहे. अवर्षण प्रवण जिल्ह्यातील कृषि पंपधारकांसाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. अवर्षण प्रवण जिल्ह्यासाठी ते आवश्यक देखील आहे. सिंचनाच्या अभावामुळे विदर्भातील 6 जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर आत्महत्या

झालेल्या आहेत. या जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे सरासरी उत्पन्न कमी आहे. बऱ्याच वेळी सिंचनाच्या सुविधा उपलब्ध असताना देखील विद्युतची थकबाकी असल्यामुळे कृषि पंपाची विद्युत जोडणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

तोडली जाते. मी मुद्दामहून या मागणीवर बोलत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून अपुऱ्या पावसामुळे कपाशीचे पीक गेले काही जणांची बागायती शेती होती. त्यात त्यांनी कापूस, ऊस गहू, हरभरा इत्पादी पिके घेतली होती त्यांना शेतीसाठी पाणी द्यायचे आहे. एका बाजूला त्यांचे उत्पन्न कमी झाले होत आहे तर दुसऱ्या बाजूला बागायती पीक घेण्याची धडपड ते शेतकरी करीत आहेत. असे असताना त्याचे वीज कनेक्शन कापले जाते. अवर्षणप्रवण तालुके आहेत तेथील शेतकऱ्यांना किमान सवलत द्यायला पाहिजे होती. पण मोठ्या प्रमाणावर वीज कापली गेली. एका डी.पी.वर 50 कनेक्शन्स असतील व त्यांपैकी 25 शेतकरी हे नियमित वीज भरणारे असतील तर त्यांची डी.पी.बंद करण्याचा सपाटा वीज अधिकाऱ्यांनी लावला असेल तर ते चुकीचे आहे. अशाने जे पैसे भरतात त्यांच्यावर अन्याय केल्या सारखे होईल. याची दखल आपण घेतली पाहिजे. यासाठी अतिरिक्त तरतूद करावी लागली तर ती करावी. अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करतो.

यानंतर मी नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 155, पान क्र.163, पुरवणी मागणी क्रमांक ओ-10 वर बोलणार आहे. आमदारांच्या स्थानिक विकास निधी कार्यक्रमांसाठी तरतूद करण्यात आली आहे. आता दोन-तीन महिन्यापूर्वी जी.आर.निघाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये आमदारांच्या स्थानिक विकास निधीतून काम करावयाचे असेल तर त्यासाठी त्या स्थानिक स्वराज्य संस्थाचे ना हरकत प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे अशा प्रकारची तरतूद सुरूवातीच्या जी.आर.मध्ये करण्यात आली होती. ना हरकत प्रमाणपत्र संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने 45 दिवसात दिले नाही तर त्यास परवानगी आहे असे गृहीत धरले जात होते. पण आता नवीन जी.आर.नुसार ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता अनिवार्य करण्यात आली आहे. ना हरकत प्रमाणपत्र नसेल तर आमदार जिल्हा परिषद, ग्रामपंचायती, पंचायत समिती, नगरपालिकेत कामच करू शकणार नाही. तेव्हा माझी विनंती आहे की, ही अट काढून टाकून मागची जी 45 दिवसांसंबंधातील अट होती ती तशीच कायम ठेवली पाहिजे. तसे पाहिले तर ह्या अटीची देखील आवश्यकता नाही. कारण हा सरकारचा पैसा आहे व तो गावातच खर्च होणार आहे. तो रस्त्यावर, नाल्यावर, पुलावर खर्च होणार आहे. त्यामुळे ना हरकत प्रमाणपत्राची अट असण्याचे कारण नाही. त्यामुळे सदर अट आहे ती काढून टाकण्यात यावी, अशी मी विनती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, आता मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागणी क्र.एच-5, पृष्ठ क्र.58, बाब क्र.73 वर बोलणार आहे. या बाबी अंतर्गत रस्ते व पुलाच्या बांधकामाचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. खामगाव ते जालना या राज्यमार्ग क्र.176 च्या रस्त्याचे चौपदारी करणाचे काम के.टी.कन्स्ट्रक्शन कंपनीला देण्यात आले. जालना ते चिखली व चिखली ते खामगाव असे कामाचे दोन टप्पे पाडण्यात आले. दिनांक 29 नोव्हेंबर 2008 पासून हे काम सुरू आहे. 24 महिन्यामध्ये काम पूर्ण करण्याचा कालावधी होता. पण या ठेकेदारावर श्री.भुजबळ साहेब आपल्या खात्याची मेहरबानी का चालली आहे हे मला समजत नाही. 140 कि.मी.लांबीचा हा रस्ता खाजगीकरणातून बांधावयाचा आहे. या कामाची आता मुदत देखील संपून गेली आहे. गेल्या तीन वर्षापासून ह्या रस्त्याचे काम रखडत आहे. सदर काम करण्याची कुवत ठेकेदाराची नव्हती. त्यामुळे सदर काम कासवगतीने सुरू झाले. यासंबंधी मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांना पत्र लिहिले होते. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांनी दिनांक 14.11.2011 नुसार मला पत्र दिले असून त्यांनी 50 टक्के काम पूर्ण आहे असे कळविले आहे. आपण त्या ठेकेदाराशी जे ॲग्रीमेंट केले आहे. त्याच्या विरूद्ध कृती झाली आहे. 50 टक्के काम पूर्ण झालेले असताना त्याला 90 टक्के रक्कम दिलेली आहे.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

त्याला कुणी कंत्राट दिले कां दिले हे समजले पाहिजे. पहिल्या टप्प्याचे काम 50 टक्के झाले असेल तर 90 टक्के पैसे दिले. त्या कंत्राटदाराने तो रस्ता पूर्णपणे खोदून ठेवल्यानंतर गेल्या तीन वर्षापासून त्या रस्त्यावर प्रचंड प्रमाणात अपघात होत आहेत. त्याने संपूर्ण काम पूर्ण केल्यानंतर त्याला 90 टक्के पैसे देणे आवश्यक होते, परंतु त्याने 50 टक्के काम पूर्ण केल्यानंतर त्याला 90 टक्के पैसे देण्यात आले आहेत. औरंगाबादमार्गे जाण्यासाठी प्रत्येक आठवडयाला त्या रस्त्याने मी जात असतो. आता आपले अभियंता त्या कामाची चौकशी करण्याची गरज आहे असे म्हणत आहेत.

सभापती महोदय, दुसरा भाग असा की, चिखली ते खामगाव या रस्त्याचे 40 टक्के काम झाल्याचे अधिक्षक अभियंता यांचे म्हणणे आहे परंतु तेवढेही काम पूर्ण झाले नाही. त्या रस्त्याचे जुजबी काम झाल्यानंतर शासनाने त्या कंत्राटदाराला 20 टक्के रक्कम दिली आहे. त्या रस्त्यावर खूप खड्डे पडले आहेत व रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी खोदून ठेवण्यात आले आहे. रस्त्यावर प्रचंड प्रमाणात खोदकाम झाल्यामुळे रस्त्याच्या एका बाजूने वाहतूक सुरु आहे.आपल्या अधिकाऱ्याला या बाबत विचारल्यानंतर त्या बांधकाम करणाऱ्या कंपनीला बँक कर्ज मंजूर करीत नाही म्हणून ते काम रखडले आहे असे उत्तर दिले जाते. सदरचे रस्त्याचे काम मागील आठ महिने बंद होते तरीही त्याला कुणी विचारण्यास तयार नाही. ज्यावेळी त्याबाबत पत्रव्यवहार सुरु करण्यात आला त्यावेळी कंत्राटदाराला 20 हजार रुपये दंड आकारण्यात आला. प्रत्यक्षात त्यांच्या करारनाम्यामध्ये म्हटल्याप्रमाणे प्रकल्पाच्या किंमतीच्या 10टक्के दंडाची रक्कम वसूल केली पाहिजे. जर या प्रकल्पाची किंमत 20कोटी रुपये असेल तर तिच्या 10टक्के रक्कम वसूल केली पाहिजे. म्हणजेच 11 कोटी 85 लाख रुपये वसूल करण्यासाठी 6 लाख रुपये दर महिन्याला दंड वसूल केला पाहिजे अशाप्रकारे 16 वर्षे ही रक्कम आपल्याला वसूल करावी लागणार आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे वर्तमानपत्रांचे अनेक कटींग आहेत त्यामध्ये जालना-खामगाव या मार्गाचे चौपदरीकरणाचे काम रखडले अशी लोकसत्तेमध्ये बातमी छापून आली आहे. त्याचप्रमाणे इंडिका बसच्या धडकेमध्ये दोन ठार, तीन जखमी अशी बातमी लोकसत्तेमध्ये छापून आली आहे, ठेकेदारावर खूनाचे गुन्हे दाखल करा अशी बातमी दै. देशोन्नतीमध्ये 21 नोव्हेंबरला छापून आली आहे. "जालना-खामगाव चौपदरीकरण रस्ता ठरतोय मृत्यूचा सापळा, ठेकेदारावर खूनाचे गुन्हे दाखल करा" त्याचप्रमाणे लोकशाही वार्तामध्ये बातमी छापून आली आहे. "खामगाव ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

जालना रस्त्यावर तीन वर्षामध्ये 57 बळी" अशा प्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रामध्ये छापून आल्या आहेत.सभापती महोदय, त्या कंपनीचे लाड शासनाकडून कशासाठी सुरु आहेत? त्या कंत्राटदाराची ऐपत नव्हती,त्याला बॅकेचे कर्ज मिळत नव्हते तर तो बदलून दुसऱ्या कंत्राटदाराकडे हे काम द्यावयास हवे होते. सदरचा रस्ता 24 महिन्यात पूर्ण न करता 36 महिने होऊन गेले तरी त्या रस्त्याचे 50 टक्के काम पूर्ण झालेले नाही अशी त्या रस्त्याची स्थिती आहे. तेव्हा या रस्त्याच्या कामाची ताबडतोब चौकशी करुन जर अशाप्रकारे काम केले जात असेल तर त्या कंपनीकडील रस्त्याचे कंत्राट तत्काळ रद्द करुन दुसऱ्या कोणत्याही कंपनीकडे सोपवून तो रस्ता ताबडतोब पूर्ण करण्यात यावा. त्या रस्त्यावर रोज माणसांचे बळी पडत आहेत, त्या रस्त्यावरुन गाडी चालविणे कठीण असल्यामुळे त्याची ताबडतोब चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करावी अशी मी आपणास हात जोडून विनंती करीत आहे.

सभापती महोदय, माननीय श्री. छगन भुजबळ साहेब आपण चांगले आहात. परंतु आपल्या खात्यामध्ये काय चालले आहे हे समजत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागणी क्रमांक एच-6, पृष्ठ क्र. 59, बाब क्रमांक 76 मध्ये शासकीय निवासी इमारतीचे परिरक्षण व दुरुस्तीचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला, क्र. 1 मध्ये सन 2010-11 व सन 2011-12 या वर्षामध्ये फार मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार सुरु आहे. सन 2010-11 मध्ये इमारत दुरुस्तीची कामे सुरु न करताच कार्यकारी अभियंता आणि उप विभागीय अभियंता आणि शाखा अभियंता यांनी संगनमताने लाखो रुपयांची देयके काढली आहेत. अशाप्रकारे आपले अधिकारी काम न करता देयके काढण्याचे काम करीत आहेत इतके निर्ढावलेले अधिकारी आहेत. एमएच 30 एलआर 10-11 आर, 015 गंगा इमारत, एमएच 30 एलआर 10-11 आर, 016 गोदावरी इमारत, एमएच 30 एलआर 10-11 आर, 017 काटेपूर्णा इमारत या क्रमांकाची मंजूर कामे न करता त्यांची देयके काढण्यात आलेली आहेत. या इमारतींच्या दुरुस्तीकरिता सन 2010-11 मध्ये 10 लक्ष रुपयांची मंजुरी घेण्यात आलेली आहे.त्याचप्रमाणे अकोला कारागृहातील कामे न करताच लाखो रुपयांची देयके काढण्यात आली आहेत. एमएच 30 एलआर 10-11,आर 056 तीन निवास, एमएच 30, एलआर 10-11, आर 057, चार निवास, एमएच 30 एलआर 10-11,आर 058, 16 निवास, एमएच 30, एलआर 10-11, आर 059, 16 निवास , एमएच 30 एलआर 10-11, आर 60 डॉक्टर निवास, एमएच 30 एलआर 10-11, आर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

102, जुने किचन, एमएच 30 एलआर 10-11, आर 103, लेडीज बरॅक या कामांची पूर्ण देयके कोणतेही काम न करता काढण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे अकोला विभागामध्ये महिलांच्या दवाखान्यांची देयके सुध्दा काम न करताच काढण्यात आलेली आहेत. मंत्री महोदय, ही सर्व कागदपत्रे मी आपणास देण्यास तयार असून आपण याची गंभीरपणे दखल घेऊन ताबडतोब चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई करावी अशी मागणी करतो. या कामांना आमचा विरोध नाही, या कामांना पैसे देण्यास आमचा विरोध नाही परंतु हा जो गैरप्रकार सुरु आहे त्याला आमचा विरोध आहे. या करिता या संपूर्ण प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाची पुरवणी मागणी क्रमांक एच 8, पृष्ठ क्रमांक 62, आणि बाब क्रमांक 81 या बाबींतर्गत राज्यातील विविध ठिकाणच्या महसूल अधिकाऱ्यांच्या शासकीय निवासी इमारतींच्या परिरक्षण व दुरुस्तीचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी, लातूर यांच्या निवासस्थानाची किंमत 40 लाख रुपये आहे, त्या इमारतीच्या डागडुजी व दुरुस्तीचा खर्च 75 लाख आहे, या इमारतीच्या दुरुस्तीच्या कामाला प्रशासकीय मान्यता नसतांना दुरुस्तीवर अनाठायी खर्च करुन निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आले आहे. कामाला प्रशासकीय मान्यता नसतांना एका कामाचे 15 तुकडे पाडण्यात आले. एकाच ठेकेदाराला सलग काम देण्यासाठी तांत्रिक मान्यता क्र. 13 ते 27 अशी 15 अंदाजपत्रके दिनांक 4 ऑगस्ट 2011 ते 8 ऑगस्ट 2011 या कालावधीत मंजूर करण्यात आली. सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांच्या बंगल्याची मूळ किंमत 40 लाख रुपये असतांना त्या बंगल्याच्या दुरुस्तीवर 75 लाख रुपये खर्च होत आहेत. सदर अंदाजपत्रकावर जावक क्रमांक टाकण्यात आलेला नसून ही मागणी एकाच लेखाशीर्षाखाली मंजूर करण्यात आली. कोणत्याही अंदाजपत्रकामध्ये नकाशे व आराखडे नाहीत, सदर वीट बांधकामामध्ये 8.31 लक्ष रुपये, ग्रेनाईट फरशी बांधकामावर 6 लक्ष रुपये , अंतर्गत बाह्य फरशीवर 12.85 लक्ष रुपये, स्टील बांधकामावर 9.50 लक्ष रुपये, अंतर्गत फरशीसाठी आणि पेव्हर ब्लॉकसाठी दर सूचीला छेद देऊन अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहेत . ही गंभीर बाब असल्यामुळे तिची सुध्दा चौकशी झाली पाहिजे अशी या निमित्ताने मी मागणी करीत आहे.

अशोधित प्रत / शोधित नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाची पुरवणी मागणी क्रमांक झेडडी-4, पृष्ठ क्रमांक 259, बाब क्रमांक 243 अंतर्गत पर्यटनाच्या पायाभूत सुविधांकरिता मागणी करण्यात आलेली आहे. मेहकर जिल्हा बुलढाणा या विधानसभा मतदारसंघामध्ये एक पौराणिक व वैज्ञानिक असा ऐतिहासिक वारसा प्राप्त झालेले जगप्रसिध्द उल्का लोणार सरोवर आहे. हे सरोवर फार जुने असून लोणार सरोवर पहाण्यासाठी भारतातून नव्हेतर जगातून अनेक पर्यटक या ठिकाणी येत असतात. लोणार सरोवर हे जगातील शास्त्रज्ञांचे आकर्षण केंद्र आहे. ग्लोबल वॉर्मिंगच्या संकटावर मात करणारे संशोधन प्रसिध्द झाले असून शास्त्रज्ञांनी काढलेल्या निष्कर्षावरुन या विवरात मिथेन खाणारे जीवाश्म आढळून आले आहेत. या विषयावर या सभागृहामध्ये यापूर्वी मी एक विशेष उल्लेखाची सूचना मांडली होती. ग्लोबल वॉर्मिंग घडवून आणणारा मिथेन हा दुसऱ्या क्रमांकाचा वायू समजला जातो. या सरोवरामध्ये पाण्यावर तरंगणाऱ्या विटा सापडतात. चंद्रावर असलेले खडक देखील या परिसरात आढळतात. त्या ठिकाणी येणारे पर्यटक या वस्तू आपल्यासोबत घेऊन जातात. संपूर्ण गावातील सांडपाणी त्या लोणार सरोवरामध्ये जाऊन मिसळत आहे. सरोवराच्या दिशेने वाहून येणारे हे सांडपाणी बाहेर अडविण्याबाबत तसेच, पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्याबाबत विधान परिषदेमध्ये तारांकित प्रश्न व अन्य आयुधांचा वापर करुन मी हा प्रश्न मांडला होता. त्यावेळी माननीय पर्यटन राज्यमंत्र्यांनी या सरोवराचे जतन करण्यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले होते. मंत्री महोदयांच्या या आश्वासनानुसार जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी शासनाला अंदाजपत्रक व आराखडा सादर केला नसल्याने जिलहाधिकारी यांचेकडून त्वरित आराखडा व अंदाजपत्रक मागवून घेऊन या जगप्रसिध्द सरोवराच्या परिसराचा विकास करण्यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खरे म्हणजे संपूर्ण महाराष्ट्राला अभिमान असणारे आणि जगाच्या दृष्टीने देखील अत्यंत महत्वाचे असे हे सरोवर आहे. त्या परिसराचा विकास घडवून आणावा आणि त्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी आपल्या विभागा मार्फत निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी यानिमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर शेवटची मागणी ही जलसंपदा विभागाच्या संबंधातील आहे. पुरवणी मागणी क्रमांक आय-3, पान क्र.85, बाब क्र.95 या बाबी अंतर्गत मोठ्या व मध्यम पाटबंधाऱ्यांचे परीक्षण व त्याच्या दुरुस्तीचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. सुरुवातीला एखादे काम कमी रकमेमध्ये द्यावयाचे. मग चार-सहा झाल्यानंतर कामाच्या डिझाईन मध्ये बदल करावयाचा आणि मूळ निविदा दुप्पटीने किंवा तिप्पटीने वाढवावयाची असा नवीन प्रकार आता पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी शोधून काढलेला आहे.माझ्या बुलढाणा जिल्ह्यामध्ये नांदूरा तालुका असून तेथे 1990 मध्ये 396 कोटी रुपयांचा जीगाव प्रकल्प मंजूर करण्यात आला. सन 2006 मध्ये त्याची सुधारित किंमत 1221 कोटी झाली आणि त्यानंतर चार वर्षांनी म्हणजे 2010 मध्ये 4044 कोटी रुपये इतकी झाली. मुळामध्ये 396 कोटीचा प्रकल्प 4000 कोटीचा झाला म्हणजे चार वर्षात याची किंमत तिप्पट झाली. या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या 12 उपसा सिंचन योजनांमध्ये स्टील पाईपचे दर तिप्पट लावण्यात आले.साधारणत: हे पाईप 55 हजार रुपये मे.टन या दराने घेतले जातात. परंतु जीगाव प्रकल्पासाठी या पाईपचा दर 1 लाख 65 हजार रुपये मे.टन असा लावण्यात आला. हा जीगाव प्रकल्प माझ्याच तालुक्यात येत असल्याने माझे तेथे वारंवार जाणे होत असते.या कामासाठी लागणारे स्टील अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या स्टीलचे दर 70 ते 80 हजार रुपये मे.टन असे लावण्यात आले तरी ते ग्राह्य धरता आले असते. पण याठिकाणी सरळसरळ दुप्पट दर लावण्यात आलेला आहे आणि त्यामुळे घोटाळ्याची रक्कम वाढली आहे.

सभापती महोदय, उपसा सिंचन योजना ग्रुप-1 मध्ये 1,10,11 व 12 यासाठी पंपगृहाचे बांधकाम, उर्ध्वगामी नलिका, पंम्पिंग मशिनरी, स्वीच यार्डसह बांधकाम, वितरण कुंड व संतुलन जलाशयाची कामे करावयाची होती. यासाठी 263 कोटी 68 लाख रुपयांची निविदा हैद्राबादमधील एका कंपनीला देण्यात आली आणि मूळ निविदेमध्ये 18.4 टक्के अधिक वाढ करण्यात आली म्हणजे जणूकाही 263 कोटी 68 लाख रुपयांची निविदा कमी आहे म्हणून या निविदेमध्ये 18.4 टक्क्याने पुन्हा वाढ करण्यात आली.त्यामुळे ही निविदा 311 कोटी 22 लाख रुपयांवर गेली. उपसा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिंचन योजना क्र.2 ची निविदा 68 कोटी 4 लाख रुपयांची होती, परंतु अधिक मूल्यामुळे ती 80 कोटी 70 लाख इतकी झाली. उपसा सिंचन योजना ग्रुप 3 साठी पंपगृहाचे बांधकाम, उर्ध्वगामी नलिकेचे काम, मशिनरी, स्वीच यार्डचे बांधकाम, वितरण कुंड, संतुलन, जलाशय ही कामे करावयाची होती आणि यासाठी मूळ निविदा 31 कोटी 17 लाख रुपयांची होती.पण वाटाघाटी नंतर त्यामध्ये 23.43 टक्के अधिक वाढ झाली, म्हणजेच प्रत्यक्षात याची मूळ किंमत 31 कोटी रुपये असून, त्यामध्ये 23 टक्के अधिक देयकानुसार सदरहू बांधकाम 38 कोटी 48 लाख रुपयांचे करण्यात आले.

सभापती महोदय, उपसा सिंचन क्र.4 ची निविदा 72 कोटी 30 लाख रुपयांची होती, ती 81 कोटी 91 लाख रुपयांची झाली. तसेच उपसा सिंचन योजना ग्रुप क्रमांक-6 च्या संदर्भातील निविदा 498 कोटी 13 लाख रुपयांची होती. मात्र ही निविदा 11.35 टक्के इतक्या अधिक देयकावर देण्यात आली. त्यामध्ये सुधारित 4.98 टक्के इतकी अधिक किंमत देण्यात आली. अशा प्रकारे या निविदेची किंमत 554 कोटी 66 लाख रुपयांच्या घरात गेली. अशा पध्दतीने जोड प्रस्तावाच्या नावाखाली या निविदा वाढविण्यात आल्या. त्याठिकाणी फक्त ठरलेले सहाच ठेकेदार होते आणि जादा दराने त्यांची कामे मंजूर झाली. याठिकाणी म्हटल्याप्रमाणे "उपरोक्त निविदा सिचंन विभागाच्या सचिवांच्या अखत्यारित असलेल्या कार्यासन समितीकडे न पाठविता कार्यकारी संचालकांनी त्या आपल्या अखत्यारित मंजूर केल्या ही गंभीर बाब आहे. कोट्यावधी रुपयांच्या निविदा सचिव लेव्हलवरील जी समिती असते, त्यांच्याकडे न पाठविता एक कार्यकारी संचालक आपल्या अखत्यारित मंजूर करीत असेल ते योग्य नाही. त्यानंतर ते प्रस्ताव माननीय मंत्री महोदयांकडे पाठविले जातात. यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे, तसेच अधिकाराचाही गैरवापर झालेला असून यामध्ये कोट्यावधी रुपयांचाही अपहार झालेला आहे असे माझे म्हणणे आहे. या निविदा सहा गटामध्ये काढण्यात आल्या आणि त्यासाठी फक्त नऊ कंत्राटदारांनी निविदा भरल्या, परंतु त्यातील तीन निविदा बोगस होत्या. उरलेल्या सहा कंत्राटदारांनी रींग केली आणि जणूकाही ते सहा लोकांचेच काम आहे असे समजून त्यांनी ते आपसात वाटून घेतले, असे प्रकार जीगाव प्रकल्पाच्या बाबतीत झाले आहेत.

सभापती महोदय, सदरहू प्रकल्पाचे काम 1990 मध्ये मंजूर झाले होते, परंतु गेली 20 वर्षे हा प्रकल्प रखडलेला आहे.शेतकरी त्या प्रकल्पाकडे आशेने पहात आहे.परंतु कॉन्ट्रॅक्टर,अधिकारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यांच्या संगनमताने जोड प्रस्ताव करत या प्रकल्पाची किंमत शेकडो कोटीने वाढत आहे आणि आपण याबाबत चौकशी करणार आहात काय? असा माझा प्रश्न आहे. मी माननीय मंत्री महोदयांना एवढीच विनंती करणार आहे.मागच्या वेळी देखील सदनामध्ये याबाबत चर्चा करण्यात आली. याठिकाणी झालेल्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात वडनेरे समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने सुध्दा जीगाव प्रकल्पामध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला असल्याचे मान्य केले. शासनानेच वडनेरे समिती नेमली, त्यानंतर त्यांनी आपला अहवाल दिला. त्यामध्ये त्यांनी जीगाव प्रकल्पाच्या कामामध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असल्याचे मान्य केले.परंतु अद्यापपर्यंत दोषी अधिकाऱ्यांवर, कंत्राटदारां-वर कोणतीही कारवाई झालेली नाही. असे असताना पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून निधीची मागणी कशासाठी करीत आहात? प्रकल्पाचे काम करीत असताना जोड पत्र लावून त्याची किंमत वाढविण्यासाठी आणि वाढलेली रक्कम अधिकाऱ्यांच्या, कॉन्ट्रॅक्टरच्या खिशात घालणार असाल आणि त्यासाठी येथे मागणी करीत असाल तर आम्हाला याला मंजुरी देणे शक्य होणार नाही. 1990 मध्ये जीगाव प्रकल्प 395 कोटी रुपयांचा होता आणि आज त्याची किंमत 4 हजार कोटी रुपये इतकी झाली असल्याने या सर्व गोष्टींची सी.बी.आय.मार्फत चौकशी करावी अशी या चर्चेच्या माध्यमातून मागणी करुन माझे भाषण संपवितो.

झेड-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षाचे नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जे भाषण केलेले आहे, ते सर्व ऐकल्यानंतर मी पुरवणी मागण्यांवर बोलावे की नाही या संभ्रमात आहे. कारण पुरवणी मागण्या भ्रष्टाचारासाठी मागत आहात काय असा त्यांनी सवाल केला आहे. मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना सांगू इच्छितो की, या शासनाकडे हिंमतच नाही. एक साधी गोष्ट सांगतो. काल नगरपालिकेच्या निवडणुका होत्या. त्यावेळी आपल्या कुठल्यातरी अधिकाऱ्याच्या बाबतीत जी.आर. काढण्याच्या आणि निवडणूक आयोगाला न कळविण्याच्या प्रशासकीय .... आता पुढे काय म्हणावे असा मला प्रश्न पडतो. पण या निवडणूका पुढे गेल्या. केवळ आपल्या अधिकाऱ्याच्या चुकीमुळे या संबंधातील संपूर्ण महाराष्ट्रातील महाभारत उलटे-सुलटे झाले. निवडणूक आयोगाला तीन-तीन हप्त्यामध्ये निवडणुका घ्यावयास लागल्या आणि आपले बेदरकार अधिकारी एवढे निगरगट्ट आहेत, त्यांचे म्हणणे असे आहे की, ही आमची चूक नाही तर निवडणूक आयोगाची चूक आहे. श्रीमती नीला सत्यनारायण या आपल्या राज्यातील उत्कृष्ट अधिकारी आहेत . त्यांच्या निवृत्तीनंतर एक चांगला कर्तबगार अधिकारी निवृत्त झाल्याची भावना आपल्या सगळयांच्या मनामध्ये आहे. त्यांनी असे सांगितले की, आमची चूक झालीच नाही. मग संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत जाब देखील विचारला नाही. कारण महाराष्ट्रातील संपूर्ण निवडणुकीच्या बाबतीत वर पासून खाल पर्यंत घोळ झाला. शेतकऱ्यांच्या मागण्या मंजूर होण्यास उशीर झाला आणि त्यामुळे लाखो कुटुंबांची वाऱ्यावर पडल्यासारखी अवस्था झाली आहे. परंतु याबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर ज्यांनी काहीही कारवाई केलेली नाही, ते प्रशासन आपण कितीही ओरडलो तरी काय कारवाई करणार आहे या संभ्रमात मी आहे.

सभापती महोदय, मी दोन-तीन बाबींसंबंधात बोलणार आहे. उद्या जलसंधारणाच्या बाबतीत चर्चा होणार आहे, त्यावेळी मी सगळे बोलणार आहे. महाराष्ट्रातील सर्वच प्रकल्प आधी शेकडो कोटी रुपयांचे होते परंतु आता त्याचा खर्च हजारो कोटीपर्यंत गेलेला आहे. तरी देखील ते प्रकल्प पूर्ण होत नाहीत. या कामांमध्ये होणाऱ्या भ्रष्टाचारामुळे केंद्र सरकारने विदर्भातील गोसीखूर्द प्रकल्पाचा निधी रोखलेला आहे आणि यामुळे आपली किती बेअब्रू झालेली आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशोधित प्रत / शोधित नाही

श्री. दिवाकर रावते ..

सभापती महोदय, केंद्र सरकारने पैसा रोखावा एवढी जलसंधारणाची बेअब्रू झाल्यानंतर देखील हे शासन ढिम्म आहे, हलायला तयार नाही.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाची बाब क्रमांक 96, पान क्रमांक 86 वर मी बोलू इच्छितो. जलक्षेत्र व्यवस्थापन या संदर्भातील ही बाब आहे. शासन कसले व्यवस्थापन करीत आहे? माझ्या हातामध्ये एका शेतकऱ्याचे पत्र आहे. तो शेतकरी सर्वांना पत्र देऊन थकला आणि मला म्हणाला साहेब, आता तुम्ही तरी मला न्याय द्या. मी ज्या भागामध्ये काम करतो त्या यवतमाळमधील मालेगावमधील हा शेतकरी आहे. त्या पत्रावर 15 ते 20 शेतकऱ्यांच्या सह्या आहेत. मौजे संगणापूर, तालुका मालेगाव जिल्हा यवतमाळ येथील तलावाच्या लाभक्षेत्रात येणाऱ्या शेतकऱ्याची ही व्यथा आहे. तलावाच्या 1600 मीटर लांबीच्या कालव्याचे खोदकाम 2007 साली सुरु झाले. त्यावेळी त्या ठिकाणी असलेले संबंधित श्री. ढोबळे, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, यांनी श्री. शर्माजी या ठेकेदाराला हे काम दिले आणि त्याची देखभाल करण्याकरिता उप विभागीय अधिकारी, श्री. कुरेशी,शाखा अभियंता, श्री. बोबडे, यांची नियुक्ती केली. आजच्या घडीला या कालव्याचे काम अर्धवट आहे. जे काम झालेले आहे ते निकृष्ट दर्जाचे झालेले आहे त्यामुळे त्या शेतकऱ्यांची प्रचंड फसवणूक झालेली आहे. हा एक तर अनुशेषग्रस्त भाग आहे. त्या ठिकाणी पाणी कसे मिळेल या चिंतेमध्ये तेथील शेतकरी, राजकीय पुढारी, सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संस्था असतात आणि तेथील शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी कसे जाईल यासाठी सर्व जण कार्यरत असतात अशा भागातील कामाचा हा उल्लेख आहे.

सभापती महोदय, 900 मीटर लांब पर्यंत पाणी सोडले आणि मध्येच कालवा फुटला त्यामुळे मागच्या बाजूला आजूबाजूच्या शेतीमध्ये पाणी तुडुंब भरले त्यामुळे तेथील शेती निकामी झाली, अशी येथील कामाची परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत तेथील शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडण्यात आले आहे. या कामामध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे. ज्या शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले त्यांना पैसे देखील दिले गेले आहेत पण करण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत अधिकाऱ्यांना विचारण्यात येणार आहे काय? अकाऊन्टॅबिलिटी काही नाही. अधिकाऱ्यांना जाब विचारला जात नाही. अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही. आम्ही त्या संदर्भात सभागृहात मांडल्यानंतर मंत्री असे म्हणतात की, बरे झाले, हे आम्हाला माहीतच नव्हते. त्याला बोलावतात आणि किती खाल्ले ते

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

सांग असे विचारतात, असे आम्हाला वाटायला लागले आहे. सभापती महोदय, या सदनामध्ये आज पर्यंत पुष्कळ प्रकरणे उघडकीस आणली परंतु त्यापैकी एकाही प्रकरणाच्या संदर्भात कारवाई इ ाालेली नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील या ठिकाणी म्हणाले त्याप्रमाणे सन्माननीय आमदारांना कोण विचारते? वरपासून खालीपर्यंत सर्व बांधाबांध केलेली असल्यामुळे आम्हाला काही फरक पडत नाही, असे या ठिकाणी उघड बोलण्यात येते. ते भूषणावह आहे काय हे तुम्ही तुमचे ठरवा नसेल तर कारवाई करुन दाखवा. निवडणूक आयुक्तांच्या संदर्भात जे घडले आहे त्या बाबतीत अधिकाऱ्यावर कारवाई का करण्यात आली नाही, असा विषय परवा या ठिकाणी उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी आम्ही सभागृहात उपस्थित नव्हतो. घाई-गडबडीत, गोंधळात पुरवणी मागण्या मंजूर करुन घेण्यात आल्या. महाराष्ट्राच्या दृष्टीने हा महत्वाचा विषय आहे. एका अधिकाऱ्याने मनमानी सर्क्युलरमुळे संपूर्ण निवडणुका उलटया-सुलटया करुन टाकल्या. त्या संदर्भात त्याला शासन काही विचारणार आहे का, या सदनामध्ये काही कारवाई होणार आहे का?

सभापती महोदय, आदरणीय श्री. भुजबळ साहेब या ठिकाणी आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 71, पान क्रमांक 57 वर मी बोलू इच्छितो. मी या रस्त्यावरुन येण्याचे सोडून दिले आहे पण आठवडयातून एकदा अकोला ते संभाजीनगरला यावेच लागते. सध्या मी दुसऱ्या मार्गाने येतो. या रस्त्यावरुन संभाजीनगरला जाण्यासाठी साडे तीन तास लागत होते ते आता उलटया मार्गावरुन जावे लागत असल्यामुळे मला सहा ते सात तास लागतात. त्या रस्त्यावरुन आलो तर विमान मिळेल की नाही अशी शंका असते. म्हणून तो रस्ताच मी बदलून टाकला. त्या रस्त्याचे कामच होत नाही. माननीय श्री. भुजबळ यांनी या रस्त्याच्या बाबतीत लक्ष घालतो असे सांगितले आहे. आता ते काय लक्ष घालतात ते बघू.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील टोल वसुलीचा अत्यंत गंभीर विषय आहे. कुठल्याही व्यक्तिगत आमदारांचा हा विषय नाही. सर्व भागातील हा विषय आहे. आम्ही येथे प्रश्न मांडतो पण त्याची उत्तरे दिली जात नाहीत. बाब क्रमांक अमुक, अमुक असे मंत्री महोदय, सांगतात आणि त्यानंतर सभापती महोदय, या पुरवणी मागण्या मताला टाकतात व त्या मंजूर करण्यात येतात.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

आम्ही घसा कोरडा करुन जे चार-पाच प्रश्न मांडलेले असतात त्यांची उत्तरे दिली जात नाहीत. अशा प्रकारची सवय गेल्या पाच अधिवेशनापासून सन्माननीय मंत्री महोदयांना लागलेली आहे. आपल्याला कोणी विचारीत नाही, सभागृहात उत्तर दिले पाहिजे, असे आपल्यावर बंधन नाही. मंत्री खुश असतात. त्यातल्या त्यात आज सन्माननीय राज्य मंत्र्यांवर जबाबदारी न टाकता माननीय कॅबिनेट मंत्री श्री. भुजबळ यांनी उत्तर दिलेले आहे.

सभापती महोदय, आम्ही तक्रारी केल्या तर शासन त्याकडे लक्ष देत नाही. कारण आम्ही आमदार आहोत. अण्णा हजारेंच्या नावामध्येही 'अ' आहे आणि आमदार या शब्दामध्येही 'आ'आहे. आम्ही आमदार आणि ते अण्णा. अण्णांनी आरडा-ओरडा सुरु केल्या नंतर या शासनाची सगळी पळापळ सुरु झाली. मी जबाबदारीने बोलत आहे. या शासनामध्ये काय चालले आहे? अण्णांनी या शासनाला चांगलाच ठोसा मारला आहे. अण्णा असे म्हणाले की, 'टोल म्हणजे वाटमारी आहे. यांत्रिक दर्शक प्रत्येक टोल नाक्यावर बसवून टोल वसुलीमध्ये पारदर्शकता आणावी असा अण्णांनी शासनाला आदेश दिला, ज्या दिवशी रस्ते दुरुस्तीचा खर्च वसूल होईल, त्याच दिवशी त्या रस्त्यांची टोल वसुली बंद झाली पाहिजे, अशा प्रकारची तंबी दिली. शासनाने येत्या एका महिन्यात टोल वसुलीबाबतच्या आपल्या धोरणात बदल करावा अन्यथा आंदोलन केले जाईल, अशा प्रकारची गर्भित धमकी दिली. ती सुध्दा राळेगणसिध्दीत बसून दिली. माननीय श्री. भुजबळ यांच्या सारखा लढवय्या माणूस हबकला आणि त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना आदेश दिले. सभापती महोदय,शासनाने टोल वसुलीच्या संदर्भात ज्या दोन-तीन समित्या स्थापन केलेल्या आहेत, त्या समित्यांची आढावा बैठक राळेगणसिध्दीत झाली. ते शासकीय अधिकारी आहेत. ते अण्णांचे नोकर आहेत काय? अण्णा राळेगणसिध्दीमधून सरकार चालवत आहेत का, आम्ही सर्वजण आमदार आहोत ना, मग कशा प्रकारे सरकार चालविले जात आहे? अण्णांच्या तक्रारीवर समित्या नेमल्या आणि राळेगणसिध्दीमध्ये अण्णांच्या पुढयात सरकारी अधिकारी जाऊन बसले.

सभापती महोदय, सन्माननीय आमदार शासनाकडे गेल्यानंतर पत्र घेताना दहा वेळा वर बघतात आणि त्या नंतर पत्र घेऊन ठेवतात. त्या पत्राचे उत्तर देत नाहीत. सभापती महोदय, त्या समित्या ,त्या ठिकाणी जाऊन बसल्या. त्यामध्ये बांधकाम सचिव, श्री. धनंजय धवड, उप सचिव, श्री. टेकाडे हे सर्वजण त्या ठिकाणी गेले होते. मग अण्णा कां नाही सांगणार? मंत्र्यांनी

..4..

श्री. दिवाकर रावते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बोलावल्यानंतर त्यांच्याकडे जाण्यास सचिवांना वेळ लागतो. मी जेवायला गेलो होतो, चहाला गेलो होतो, मिटिंगला गेलो होतो अशा प्रकारे मंत्र्यांकडे जाताना दोन तास काढतात पण ते अण्णांकडे जाऊन बसले. सभापती महोदय, अण्णांनी अनेक गोष्टी त्यांना सांगितल्या. त्यामध्ये ते असे म्हणाले की, काही गुंड माणसे या टोल नाक्यावर दांडगाईचा वापर करुन टोल वसूल करतात. अण्णा गुंड असे का म्हणाले. मी अनेक टोल नाक्यावर थांबतो, माहिती घेतो. त्या ठिकाणी मी गुंड शोधण्याचा प्रयत्न केला. ते या ठिकाणी मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. अण्णा बोलले त्यामध्ये तथ्य आहे. ते चुकीचे बोलले असे नाही पण आम्ही या ठिकाणी बोललो तर कोणी उत्तर देत नाहीत. सभापती महोदय, टोलच्या टोळ धाडीला सरकारी समर्थन व सरकारचा सहभाग असतो, ही स्वच्छ गोष्ट आहे. शासनाचा कॉन्शेस क्लिअर असता, आपण जे काम करतो ते योग्य आहे असे शासनाला वाटले असते तर माननीय मंत्री महोदय, श्री. भुजबळ यांच्या सारख्या एका खंबीर माणसाने आपल्या अधिकाऱ्यांना अण्णांच्या दरबारात पाठविले नसते. कुठे तरी पाणी मुरत आहे अशी भीती आहे.

सभापती महोदय, अण्णांच्या बाबतीत या शासनाचे धोरण गंमतीचेच आहे. अण्णा भडकले की, माननीय मुख्यमंत्री हेलीकॉप्टरमधून माणूस पाठवितात तो राळेगणसिध्दीत उतरतो, अण्णांना भेटतो, अण्णांबरोबर चर्चा करतो, काय चर्चा होते माहीत नाही आणि मग अण्णा सहा महिने थांबतात. मग शासनाला असे वाटते की, आता आपल्याला सहा महिने आराम आहे. परवा माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा राळेगणसिध्दीला गेले होते, त्यावेळी अण्णांचे मौन होते. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा आणि अण्णांची मौनामध्ये बंद खोलीमध्ये एक तास चर्चा, असे वर्तमानपत्रात छापून आलेले आहे. मौनामध्ये एक तास चर्चा होते. अण्णांनी पेपरवर जे लिहून ठेवले होते त्या बाबतीत श्री. राजू पुरुळेकर यांना फोनवर विचारण्यात आले. त्यांनाही काही माहीत नव्हते. मौन सुरु असताना चर्चा कशी होते हे मला कळले नाही. माननीय मुख्यमंत्र्यांचा विभाग असताना त्याबाबतीत उप मुख्यमंत्री श्री. अजितदादांनी जाहीर केले. सशक्त लोकआयुक्त आणल्या शिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. श्री. बक्षी या सचिवांच्या अधिपत्याखाली सामान्य प्रशासन विभाग आहे. तो विभाग मुख्यमंत्र्यांकडे आहे. पण घोषणा मात्र उप मुख्यमंत्र्यांनी केली. मुख्यमंत्री हे मुख्यमंत्री असतात. त्यांच्या खाली सगळे मंत्री असतात. नावाला दुसऱ्या पक्षाचा उप मुख्यमंत्री

..5..

श्री. दिवाकर रावते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असतो. पण त्यांना मंत्र्यांचेच अधिकार असतात. त्यांना दुसऱ्याच्या खात्यात ढवळाढवळ करता येत नाही. पण त्यांनी ढवळाढवळ केली. अण्णा खुश. श्री. अजितदादा येऊन गेले. बंद खोलीत न बोलता एक तास चर्चा झाली. वर्तमानपत्रात कसे छापण्यात आले हे मला कळले नाही. प्रश्न कोणालाच पडला नाही. कुठल्याच वर्तमानपत्राने प्रश्नचिन्ह न टाकता चर्चा जाहीर केली.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

दादा येऊन गेले म्हणून अण्णा खूश. गुप्त खोलीमध्ये न बोलता बैठक झाली. एक तास चर्चा झाली. वर्तमानपत्रे काय छापतात आणि काय नाही, हे मला कळत नाही. त्या बाबतीत कोणालाही प्रश्न पडला नाही. बातमी देताना कोणत्याही वर्तमानपत्राने प्रश्नचिन्ह टाकले नाही. त्यांनी चर्चा झाल्याचे जाहीर केले. ज्यांनी गुंड टोळी म्हटले त्या अण्णांकडे चर्चा झाली.

3 नोव्हेंबरला मालेगाव येथे टोलच्या निविदा देताना राष्ट्रवादीच्या एका आमदाराने, मी या ठिकाणी नाव घेत नाही, 40-50 च्या जमावाने निविदा धारकांच्या आलेल्या निविदा जबरदस्तीने उघडून पाहिल्या. आमदाराने सांगितले की, मंत्रालयातून मला निविदा देण्याचा शब्द दिलेला असताना तुम्ही निविदा घेतल्याच कशा ? मालेगावच्या टोलनाक्याबाबत मी हे सांगत आहे. आपण म्हणाला तर मी संबंधित आमदाराचे नाव सांगेन. पण मला या ठिकाणी त्यांचे नाव घ्यावयाचे नाही. त्यांनी त्या ठिकाणी दम दिला. त्यामुळे आलेल्या सर्व निविदा बाराच्या भावात गेल्या. पोलीस स्टेशनमध्ये तक्रार सुध्दा झाली पण एफआयआर दाखल झाला नाही. आमदार राष्ट्रवादीचा आहे. पोलीस खाते त्यांच्याकडे आहे. एफआयआर दाखल झाला नाही. खास बाब म्हणजे तांत्रिक कारणास्तव त्या निविदा बाद केल्या आणि नवीन निविदा काढल्या. माननीय मंत्री महोदय श्री. भुजबळ साहेब, आपण चौकशी करावी. अण्णा आपल्या मागे का लागले आहेत ? गुंड नंबर एक. संबंधित आमदाराचे नाव माझ्याकडे आहे. मी राष्ट्रवादीचा आमदार असे म्हणालो. माननीय मंत्री महोदयांनी पोलीस स्टेशनला विचारावे. दादागिरीच्या बाबतीत सांगावयाचे तर आम्ही शिवसेनेचे आमदार असलो तरी आपण सुध्दा आमच्याबरोबर तेच करीत होता. आपण तिकडे त्याचे ट्रेनिंग दिले की काय ? आपल्यासारखा माणूस सुध्दा हबकला याचीच मला चिंता वाटते. दोन हात करणारा माणूस हात बांधून अण्णांच्या पुढे उभा का राहतो, हा माझ्यासमोर मोठा प्रश्न पडलेला आहे.

यानंतर मी नंदूरबार टोल नाक्याच्या बाबतीत सांगणार आहे. नंदूरबार टोलच्या निविदेच्या वेळेला आलेल्या सगळ्या निविदाधारकांना धमकी दिली. त्यांना टेंडर टाकण्यासाठी मज्जाव केला. त्यातल्या त्यात राष्ट्रवादीचा संबंधित जो पुढारी होता त्याच्या लोकांनी चुकून एक निविदा टाकली. प्रत्येक निविदा त्यांच्याच संमतीने काढली पाहिजे असा तेथे नियम होता पण तेथे चुकून निविदा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

टाकली होती म्हणून अधिकाऱ्यांनी वरुन दबाव आल्याबरोबर संपूर्ण प्रक्रियाच रद्द करुन टाकली. त्या खोलीला ताबडतोब लॉक लावले, सिल केले. त्या खोलीत सुध्दा कोणी जावयाचे नाही. आम्हाला न विचारता निविदा टाकण्याची हिंमत कशी केली ? मंत्र्यांच्या इच्छेविरुध्द निविदा कोणी टाकली ? त्या ठिकाणी दमदाटी करण्यात आली. मग जुन्याच कॉन्ट्रॅक्टरला ते टेंडर देण्यात आले. नंदूरबारच्या टोलच्या बाबतीत इतिश्री झाली.

सभापती महोदय, पूलगाव, वर्धा, सगळीकडे मी जातो. त्या टोलनाक्यांवर थांबतो. नंदूरबारच्या टोल नाक्यावर सुध्दा मी थांबलो होतो. ओव्हर चार्जिंगचा एक विषय आहे. म्हणजे अधिकृत 100 रुपये असेल तर 150 रुपये, 200 रुपये, 250 रुपये ओव्हर चार्जेस लावावयाचे. यांच्याकडून परवानगी घ्यावयाची. सरकारी नोटिफिकेशनमध्ये 100 रुपये असेल तर दोनशे रुपये, अडीचशे रुपये लावावयाचे. पूलगावच्या बाबतीत या प्रकाराची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये रेकॉर्ड झाली. एमएसएसआरडीसीच्या अधिकृत कागदपत्रांमध्ये ते आहे. महाराष्ट्रात 70 टक्के टोल नाक्यांवर हा प्रकार चालतो. मी पूलगावच्या बाबतीत बोलत आहे. आपण बांधकाम खात्याची वाटणी केलेली आहे. माननीय मंत्री महोदय श्री. रामराजे निंबाळकर यांच्याबद्दल मला व्यक्तिगत आदर आहे. ते पूर्णवेळ मंत्री आहेत. मी त्यांना त्या दिवशी पवनाकाठचा धोंडी म्हटले. त्यांच्याकडे फक्त कृष्णा खोरे म्हणजे ते तीन जिल्ह्यांचे मंत्री आहेत. महाराष्ट्रामध्ये असा मंत्री असतो का ? मंत्री हा महाराष्ट्राचा असतो. आमचे कर्तृत्ववान श्री. रामराजे निंबाळकर हे तीन जिल्ह्यांचे मंत्री आहेत. त्याला मराठवाड्यातील दोन-तीन तालुके जोडलेले आहे. बाकीच्या महाराष्ट्राशी त्यांचा काही संबंध नाही. त्यांच्याकडे फक्त कृष्णा खोरे दिलेले आहे. वाईट वाटते. म्हणून मी त्यांना पवनाकाठचा धोंडी म्हटले. ते काठी घेऊन कृष्णा खोऱ्याचे रक्षण करतात. बांधकाम विभागामध्ये सुध्दा एसएसआरडीसी आणि इतर दुसऱ्या भागासाठी मंत्री केलेले आहेत. सभापती महोदय, त्या ठिकाणी पोलीस स्टेशनला तक्रार झाली. हे सर्व सर्रास चालत असताना पूलगावच्या कॉन्ट्रॅक्टरच्या बाबतीत पटवापटवी झाली आणि सगळा विषय संपला. या ओव्हर चार्जींगच्या संदर्भामध्ये मंत्रालयामध्ये मोठे रॅकेट आहे. ते कोट्यवधी रुपयांचे रॅकेट आहे. या संपूर्ण प्रकरणामध्ये पोलिसांनी पावत्या जप्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

केल्या. आपल्याला सुध्दा जी पावती देतात ती खरी आहे की खोटी हा सुध्दा एक मोठा विषय आहे. त्या ठिकाणी पावत्या जप्त केल्या, सगळे झाले पण काहीच होत नाही. खातेही यांचेच आहे. गृह खातेही यांचेच आहे. एका कॉन्ट्रॅक्टरला दोन-तीन महिने तुरुंगात जावे लागले. तो कॉन्ट्रॅक्टर सुटून आल्यानंतर त्यालाच निविदा दिल्या. ज्याने लबाडी केली, ज्याच्यावर तुरुंगात जाण्याची पाळी आली, ज्याच्या बनावट पावत्या मिळाल्या, त्यालाच निविदा दिल्या. ही यांच्या टोल नाक्यांची परिस्थिती आहे.

सभापती महोदय, मेहकर भागामध्ये एक टोलनाका आहे. त्या ठिकाणी त्यांना टोल घेण्याचा आदेशच नव्हता. मी थांबून त्याला विचारले. तो म्हणाला आम्हाला टोल घ्यावयाचा आहे. मी अधिकाऱ्यांना फोन लावला. अधिकाऱ्यांनी मला फोनवर सांगितले की, त्यांना कंटीन्यूइटी द्यावयाची आहे, दोन-चार दिवसात त्यांना कंटीन्यूइटी देऊ. परत एक-दीड महिन्यानंतर जाताना मी विचारले की कंटीन्युइटी का आली नाही ? परत अधिकाऱ्यांना फोन लावला. अधिकाऱ्यांनी मला सांगितले की, प्रोसेसमध्ये आहे. तो माणूस बेकायदेशीरपणे टोल वसूल करतो. नवीन टेंडर न काढता त्याला कंटीन्युटी द्यावयाची असे ठरवून टाकले. त्याला कंटीन्युटी न दिल्यामुळे ते तसेच चालले आहे. माननीय मंत्रीमहोदय श्री. भुजबळ साहेब, ते आपले खाते नसले तरी आपण अण्णांकडे अधिकाऱ्यांना धाडले. नागपूरचा पीडब्ल्यूडीमधील किशोर कानडे उर्फ के.के. हा कोण आहे ? त्याला सांगितल्याशिवाय इकडे निविदा उचलण्याची आमदाराची सुध्दा हिंमत नाही. हा के.के. कोण आहे. आपण आता गळ्यात काही घातलेले नाही. नाही तर त्यावर 100 टक्के के.के. असे लिहिलेले असले पाहिजे. हा के.के. विदर्भातील नागपूरमधला प्रबळ माणूस आहे. त्याची एवढी ताकद आहे की, आमदाराचे सुध्दा चालत नाही. आमदाराला सुध्दा जर निविदा घ्यावयाची असेल तर त्या के.के.ला विचारावे लागते. त्याच्या ऑफीसमध्ये जावे लागते. नागपूरमध्ये के.के.आहे आणि आणि दुसरे कोणी तरी आहेत.

सभापती महोदय, ही सगळी परिस्थिती, ओव्हर चार्जींग आणि ठेकेदारांची मंत्रालयामध्ये वगैरे जी मनमानी आहे, हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. मी जिल्हाधिकाऱ्यांना बोलूवन बेकायदेशीर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते ...

चाललेले चार ते पाच टोलनाके बंद करावयास लावले. हल्ली काय चालले आहे ? कोणी तरी त्या ठिकाणी दोन-तीन दुकाने टाकतो, काठ्या टाकतो, बांबू टाकतो. जाणारे येणारे टोल देतात. आपल्यासारखा एखादा वाह्यात असला तर बोलतो की, बाबा, मला जी.आर. दाखव. हजारो लोकांमधून कधी तरी एखादा विचारतो तेव्हा तो म्हणतो, साहेब, तुम्ही जा, तुम्हाला अडवले आहे ? आपणही घाईत असलो की निघून जातो. मी सर्व आमदारांना विनंती करतो. आपण निघून गेल्यावर आपल्याला वाटते, काय आमदाराची वट आहे, आपण निघून गेलो. तसे न करता त्या ठिकाणी थांबले पाहिजे. आपले ते कर्तव्य आहे. त्या ठिकाणी जी.आर. मागा. शासनाने काढलेला आदेश मागा. मी अशा प्रकारचे चार टोल नाके बंद करावयास लावले. सर्व मजा चाललेली असते. बांबू टाकले, दोन खोके उभे केले की, आपल्याला वाटते चौकी उभी केली आहे. तथे वसुली चालू असते. सन्माननीय सदस्य महाडला सुध्दा असेच असल्याचे सांगत आहेत. महाडचेच नव्हे तर असे बरेच आहेत. मी विदर्भातील चार टोल नाके बंद केले.

हे सर्व टोल वसूल करीत असताना तिकडचे आजूबाजूचे रस्ते तरी नीट पाहिजेत की नाही ? टोल कशासाठी वसूल करीत आहेत ते कळत नाही. या संदर्भामध्ये एक बातमी आलेली आहे त्याबाबत सांगतो. आपण हे कधी करणार ? किती कोटीची माया जमा करणार ? मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे 918 कोटी रुपये प्रकल्पावर खर्च झाले. 699 कोटी रुपये प्रमाणे 19 वर्षाकरिता दिले. म्हणजे वर्षाला 1200 कोटी रुपये होतात. म्हणजे तो माणूस 30-40 हजार कोटी रुपये 19 वर्षात वसूल करणार. यामध्ये किती तोडबाजी झाली असेल हे मलाच कळत नाही. कोणाची हे माहीत नाही पण तोडबाजी झाल्याशिवाय एवढी मोठी मेहनबानी कोणी करीत नाही. मुंबई एन्ट्रीपॉइन्ट येथे 2100 कोटी रुपयांचा प्रकल्प होता. आतापर्यंत 2393 कोटी रुपये जमा झाले. तो 16 वर्षे टोल जमा करणार आहे. महाराष्ट्र राज्य लुटले जात आहे. आत्महत्याग्रस्त कुटुंबाला देण्याकरिता पॅकेजमध्ये कमतरता आहे कारण आमच्या तिजोरीमध्ये पैसे नाहीत. राज्यावर पावणेतीन लाख कोटी रुपयांचे कर्ज झाले आहे. हे ठेकदार जर हजारो कोटी रुपयांचा नफा घेत असतील तर आपले राज्य शासन काय करीत आहे ? सरकार म्हणून आपण काय करीत आहात ? कॅबिनेटमध्ये बसलेले इतर मंत्री आहेत, बांधकाम खाते श्री. भुजबळ यांचे, अमुक खाते अमक्याचे, मग त्यांचे ते बघून घेतील.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

या महाराष्ट्रात करोडो रुपयांची लूट चालली आहे.

भिवंडी-शिळफाटा, ठाणे-भिवंडी बायपास 104.83 कोटी रुपयांचे कंत्राट असताना आतापर्यंत किती कोटी रुपये जमा झाले आहेत, आणखी 6 वर्षे बाकी आहेत. म्हणजे हा माणूस 1 हजार कोटी रुपये जमा करणार आहे. धरमतर खाडीचे कंत्राट 1594 कोटी रुपयांचे होते, आतापर्यंत 3797 वसूल झाले आहेत म्हणजे दुप्पट वसुली झाली आहे. त्यांची अजून 3 वर्षे बाकी आहेत. पाताळगंगा पुलाचे कंत्राट 33.33 कोटी रुपयांचे होते, 47 कोटी वसूल झाले आहेत, त्याची आणखी 4 वर्षे शिल्लक आहेत. म्हणजे हजारो कोटी रुपयांचा टोल वसूल करुन ठेकेदार श्रीमंत होतील. जर ठेकेदार श्रीमंत होत असतील तर महाराष्ट्र शासनाच्या तिजोरीत पैसे कोठून येणार ? यु.पी.मध्ये एखाद्या शिपायाकडे 40 कोटी रुपयांची पॉपर्टी मिळते, एखाद्या पोलीस अधिकाऱ्यास पकडल्यानंतर त्यांच्याजवळ कोट्यवधी रुपयांची प्रॉपर्टी मिळते, त्यामुळे मला अशी खात्री आहे की, बांधकाम खात्यातील अधिकाऱ्यांकडे मोजता येणार नाही, एवढी प्रॉपर्टी सापडण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे टोल नाक्याचे अर्थशास्त्र सांगत आहे.

बीओटी पध्दत किंवा टोल नाक्याची पध्दत युतीच्या सरकारनेच सुरु केली असे शासनाकडून सांगितले जाईल. शिवशाहीच्या सरकारने ही पध्दत आणल्यानंतर त्यात आमच्याकडून झालेल्या चुकांमध्ये सुधारणा करुन पुढील राज्य कारभार चांगल्या प्रकारे करण्यासाठी लोकांनी तुम्हाला सत्तेमध्ये बसविले आहे. काही तरी घबाड लागले आहे असे समजून वागण्यासाठी हातात सत्ता दिलेली नाही. या सर्व गंभीर गोष्टी पाहिल्यानंतर श्री.अण्णा हजारे यांनी राळेगणसिध्दी येथे सत्ताधाऱ्यांना ओणवे उभे का केले होते त्याचे हे उत्तर आहे. ही टीका श्री.अण्णा हजारे यांच्यावर नाही. सत्ताधारी त्यांच्यासमोर ओणवे झाले, राज्याचे सरकार अण्णा चालवितात हे सिध्द झाले. चार महिन्यापूर्वी मंत्री महोदय श्री.भुजबळ यांनी सांगितले होते की, अहवाल तयार झाला आहे. पण तो अहवाल प्रथम श्री.अण्णा हजारे यांना दाखवून यावा. हे वर्तमानपत्रात छापून आले होते. श्री.अण्णा हजारे यांनी सरकारकडे पुन्हा बोट दाखविता कामा नये, असे सरकारने काम केले पाहिजे. परंतु हे सरकार त्यांच्यापुढे जाऊन वाकले. आता काही झाले तरी तिकडे जावे लागते. सरकारला अण्णांनी शिफारस केली तर कोणतीही गोष्ट पास होते. नाही तर नापास होते. आपण येथे कितीही बोललो तरी सरकारला काही फरक पडत

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही. मंत्री महोदय श्री.छगन भुजबळ साहेब हे आमचे जुने सहकारी आहेत. त्यांना त्यांच्या खात्याचा कारभार सुधारावा यासाठी मी हे सर्व सांगितले आहे. तुमच्या बाहुमध्ये बळ त्याबाबत भुज बळ असे कौतुक वाचावयास मिळते ते एकदा आपण दाखवावे अशी आमची इच्छा आहे.

सांस्कृतिक कार्य या विभागाबाबत मी माझे विचार मांडतो. आता सांस्कृतिक खात्याची गरजच नाही. मंत्री महोदय श्री.छगन भुजबळ यांनी विधानसभेच्या सभागृहात जाहीर केले तेव्हा आम्हाला कळले. नाशिक येथील महोत्सवाकरिता एक दिवसात 3 कोटी रुपये खर्च झाला. इतका खर्च करुन त्यांनी किती तरी लोकांना आनंद दिला आहे. त्यांना एवढे देणगीदार मिळतात हा सुध्दा भाग्याचा प्रश्न आहे. शब्दामध्ये अशी ताकद लागते. एक शब्द टाकल्यानंतर लोककल्याणासाठी एक कोटी रुपये येतात. ते पैसे घरच्या कामासाठी नव्हते, याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा केला आहे. विधानसभेच्या सभागृहामध्ये याबाबत उल्लेख झाला होता. तेथे निलंबनाची चर्चा चालली होती. परंतु मंत्री महोदय श्री.छगन भुजबळ यांनी नाशिक येथे तो महोत्सव करुन दाखविला. माननीय राज्यमंत्री श्री.सचिनभाऊ यांनी वरळी येथे महोत्सव आयोजित केला होता. त्यांनी तर ऑस्ट्रेलियातून घोडे आणले होते, 8-9 फूट उंचीचे ते घोडे असल्यामुळे त्या घोड्याकडे आपली मान वर करुन बघावे लागते. हे घोडे वरळीकरांना दाखविण्यासाठी आणले होते. वरळीकरांसमोर एक प्रश्न आहे. बाजूला रेस कोर्स आहे. तेथे घोड्यांच्या शर्यती चालतात. आम्हाला घोड्यांची रेस फक्त टी.व्ही.बघावयास मिळते. मंत्री असल्यामुळे मा.श्री.सचिन भाऊ यांनी जांबोरी मैदानात घोड्यांची शर्यत लावली. ऑस्ट्रेलियाचे घोडे त्या मैदानावर चालत नाहीत. त्यांना ठराविक माती लागते. त्या ठिकाणी वातावरण निर्मिती झाली होती. आपण तेथे चांगला महोत्सव केला होता. त्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केला होता. लोकांना आनंद दिला आहे. पण पूर्वी जसे मैदान होते तसे करुन द्यावे. पुन्हा असे काही करु नये, तेथे असे घोडे आणू नका. कारण तेथे पुन्हा माती टाकण्याची वेळ येणार नाही. आमचे श्री.अरविंद सावंत आहेत त्यांना मी समजावून सांगेन. तेथील मैदान चांगले करावे हा एकमेव हेतू आहे.

सभापती महोदय, आपल्या सर्वांची अशी इच्छा असते की, आपण येथे जे बोलतो ते वर्तमानपत्रातून छापून यावे. समजा माननीय मुख्यमंत्री 'डर्टी पिक्चर' नावाचा सिनेमा बघण्यासाठी

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

गेले आहेत असे तर पत्रकारांना समजले तर ते हे सर्वजण तेथे जातील. आपण येथे कितीही बोललो तरी येथे वृत्त लिहिण्यासाठी कोणीही थांबल्याचे दिसणार नाही. राजकारण्यांना बदनाम करण्याचा वसा या लोकांनी घेतला आहे काय, तो पिक्चर चित्रपटगृहात लागलेला आहे. तो बघण्यासाठी आमदार गेले होते. लाखो लोक तो पिक्चर बघत आहेत. तो पिक्चर सेन्सॉर झालेला आहे. ते आमदार जणू काही लपून ब्ल्यू फिल्म बघायला गेले अशा प्रकारची बातमी संपूर्ण महाराष्ट्रात छापून आली. मी तो पिक्चर पाहिला काय अशी विचारण करणारा फोन माझ्या घरुन आला. मी तर त्या दिवशी मुंबईतच होतो. नेत्र मैथुन चालू आहे अशा प्रकारची वर्तमानपत्रातून वातावरण निर्मिती करण्यात आली. संपूर्ण महाराष्ट्रभर आमदारांची बदनामी झाली. नागपूरमध्ये बसून हे करता काय अशी मुंबईहून विचारणा करण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांच्यावर तर संपूर्ण लेखच छापून आला होता. शेवटी आपण सर्वजण माणसे आहोत, प्रत्येकाच्या मनोरंजनाच्या कल्पना वेगवेगळ्या असतात. सन्माननीय मंत्री श्री.भुजबळ यांनी संपूर्ण नाशिककरांसाठी चांगला कार्यक्रम आयोजित करुन दाखविला. सन्माननीय राज्यमंत्री श्री.सचिनभाऊ यांनी चांगले घोडे आणून दाखविले. पण काही लोकांना पिक्चर बघावयाचा होता म्हणून ते तिकडे गेले. चौथ्या स्तंभामुळे उर्वरित सदस्यांची पंचायत झाली आहे. काही जणांना सिनेमा बघण्यासाठी जायचे होते, परंतु ते या चौथ्या स्तंभामुळे थांबले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी यवतमाळ येथे हा सिनेमा येईल त्यावेळी गपचूप बघू असे ठरविलेले आहे असे दिसते.

सभापती महोदय, कारण नसताना गोष्ट अयोग्य आहे असे भासविले जाते. राजकारणी विद्रुप आहेत अशी प्रतिमा तयार केली जाते. कारण नसेल तर असे करु नका आणि कारण असेल तर जरुर करावे असे मला सांगावयाचे आहे. यामुळे निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचा नैतिकदृष्ट्या विनयभंग झालेला आहे असे म्हणता येईल.

सभापती महोदय, महाराष्ट्रात सांस्कृतिक कार्यक्रमाची लाट आलेली आहे. ज्याप्रमाणे कबड्डीकरिता, खो खो या खेळाकरिता आमदार निधी देतो त्याप्रमाणे सार्वजनिक कार्यक्रमासाठी

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

निधी देता आला तर सर्वच आमदारांना आपल्या भागात, आपल्या कुवतीप्रमाणे जनतेसाठी कार्यक्रम साजरे करता येतील. आयोजक त्यासाठी मंत्री महोदय श्री.भुजबळ व राज्यमंत्री महोदय श्री.सचिनभाऊ यांचे मार्गदर्शन घेतील. कोणी काय केले यापेक्षा असे चांगले कार्यक्रम जर करण्याचा प्रघात असेल तर सर्व आमदारांवर दबाव येऊ शकतो. आपल्या जिल्ह्यातही असा कार्यक्रम व्हावा यासाठी ते प्रयत्नशील राहतील. म्हणून कबड्डी व खो खो या खेळाप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रमासाठी आमदार निधी देता आला तर बरे होईल. त्या निमित्ताने मी हा विषय मांडला आहे. माझ्या बोलण्यात काही कमी अधिक आले असे सन्माननीय सदस्यांना वाटत असेल तर क्षमा असावी. मंत्री महोदयांनी टोल नाक्याच्या वसुलीकडे लक्ष द्यावे, आपण अण्णांकडे पाहू नये, कारण सरकार येथून चालते. हा संदेश गेला पाहिजे अशी विनंती करतो आणि माझे भाषण थांबवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ज्यावेळी या पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु झाली होती त्यावेळी मी या सभागृहात नव्हतो. मी त्यावेळी विधानसभेच्या सभागृहात होतो. पुरवणी मागण्यांच्या चर्चेसाठी किती वेळ निश्चित केलेला आहे हे कळले तर बरे होईल. याचे कारण असे की, पलीकडच्या सन्माननीय सदस्यांना अधिक वेळ मिळावा म्हणून सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य आपले विचार मांडणार नाहीत. परंतु आता बजेटवरील सर्वसाधारण चर्चेप्रमाणे सभागृहात चर्चा सुरु आहे. पुरवणी मागण्यांवर मर्यादित स्वरुपाची चर्चा केली जाते. त्यामुळे या चर्चेसाठी निश्चित केलेली वेळ समजली तर बरे होईल. विधानसभेच्या सभागृहात गिलोटीन असल्यामुळे आम्हाला तेथेही उपस्थित रहावयाचे आहे. सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य बोलणार नाहीत त्यामुळे विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना दुप्पट वेळ दिला आहे असा त्याचा अर्थ आहे काय ?

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : माननीय मंत्री महोदय, आपण म्हणत आहात त्याप्रमाणे ठरलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांच्यानंतर उर्वरित सदस्यांनी केवळ पाच-पाच मिनिटांत आपले विचार व्यक्त करावेत.

नंतर श्री.गिते.....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, बाब क्रमांक 69, मागणी क्रमांक 49 ही वित्त विभागाची मागणी आहे. विक्रीकर विभागात संगणकीकरण असले पाहिजे, विक्रीकर विभागाच्या माध्यमातून जास्तीत जास्त विक्री कराचा महसूल वसूल केला जातो व तो राज्य शासनाच्या तिजोरीत जमा होतो. विक्रीकर विभागातील कर्मचाऱ्यांना संगणक उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत, परंतु त्या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना संगणकाचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली गेली पाहिजे. विभागात संगणकाचे वाटप होईल, परंतु त्याचे ज्ञान कर्मचाऱ्यांना नसेल तर त्या संगणकांचा काही उपयोग होणार नाही. त्यामुळे विक्रीकर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगणकाचे प्रशिक्षण देण्यात यावे व प्रशिक्षण देण्यासाठी तरतूद देखील विक्रीकर विभागास उपलब्ध करुन द्यावी अशी माझी माननीय वित्तमंत्र्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 67 मध्ये निरनिराळया प्रकारच्या तरतुदी केलेल्या आहेत. कोकणावर एका विषयाच्या बाबतीत अन्याय झाला त्याबाबतीत मघाशी सभागृहात चर्चा झाली आहे. ज्यावेळी माननीय श्री. विलासराव देशमुख हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यावेळी त्यांनी रत्नागिरी येथे येऊन कोकण विभागीय शिक्षण मंडळ निर्माण करण्याची घोषणा केली होती. माननीय श्री.विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री पदावरुन गेले. त्यानंतर माननीय श्री. अशोक चव्हाण हे या राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर ते देखील मुख्यमंत्री पदावरुन गेले. गेल्या पाच वर्षापासून कोकण विभागीय शिक्षण मंडळाचा प्रश्न शासन दरबारी प्रलंबित आहे. ही घोषणा झाल्यानंतर तीन शिक्षण मंत्री बदलले. कोकण विभागीय शिक्षण मंडळ निर्माण करण्यासाठी जागा बघितली गेली आहे. परंतु त्या जागेवर कोकण विभागीय शिक्षण मंडळाचे नाव लावले गेलेले नाही. मी व शिक्षण विभागाचे अधिकारी यासाठी भाडयाची जागा बघून आलो आहोत आणि ती जागा निश्चित केली आहे. परंतु त्या जागेचे भाडे देण्यासाठी शासनाने कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. मंडळातील कर्मचाऱ्यांची पदे आहेत, त्या पदांवरील खर्चासाठी तरतूद केलेली नाही. कोकण विभागीय शिक्षण मंडळास आर्थिक तरतूद उपलब्ध करुन दिली नाही, तर कोकणातील जनता विभागीय शिक्षण मंडळाचे स्वप्न बघत राहतील. कोकण विभागीय शिक्षण मंडळ ज्या जागेवर कार्यरत आहे, त्या जागेचे भाडे देण्यासाठी व मंडळाच्या इतर खर्चासाठी शासनाने तातडीने मोठया प्रमाणात तरतूद उपलब्ध करुन द्यावी, अशी माझी विनंती आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

सभापती महोदय, मार्च महिन्यापासून कोकण विभागीय शिक्षण मंडळाचे परीक्षेचे कामकाज हे कोकणातील कार्यरत असलेल्या कार्यालयामधून होईल असे सांगितले. परंतु ते तेथून होणार नाही असे दिसते. यासाठी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु पुढील वर्षी तरी कोकण विभागीय मंडळाच्या परीक्षेचे कामकाज कोकण विभागात कार्यरत असलेल्या कार्यालयातून झाले तर कोकणातील विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणात दिलासा मिळेल. म्हणून शासनाने पुढील वर्षी यासाठी तरतूद उपलब्ध करुन द्यावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 156 डोंगरी विकास निधी संदर्भातील आहे. डोंगरी विकास विभागांतर्गत येणाऱ्या आमदारांकडून डोंगरी विकासाची कामे सुचविली जातात, ती कामे करण्यासाठी त्यांना हा निधी उपलब्ध करुन दिला जातो. हा निधी फक्त विधानसभा सदस्यांनाच उपलब्ध करुन दिला जातो. विधान परिषद सदस्यांना तो दिला जात नाही. विधान परिषद सदस्य देखील लोकप्रतिनिधी आहेत. विधान परिषद सदस्य देखील लोकांमधून निवडून आलेले आहेत. मी कोकण विभागाचे प्रतिनिधीत्व करतो. कोकण विभागात डोंगरी विभागाची कामे सुचविली तर ती कामे मान्य केली जात नाहीत. विधान परिषद सदस्यांना अशा पध्दतीची वागणूक देणे योग्य नाही असे मला वाटते. विधानसभा सदस्यांना जेवढा अधिकार आहे, तेवढाच अधिकार विधान परिषद आहे असे गृहीत धरुन त्यांनी सुचविलेल्या डोंगरी विकास कामांना मान्यता दिली गेली पाहिजे, अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 163, बाब क्रमांक 155 च्या अनुषंगाने मी माझे मत व्यक्त करीत आहे. विधानसभा आणि विधानपरिषद सदस्य शाळांना संगणक उपलब्ध करुन देतात. ग्रामीण भागातील सदस्य ग्रामीण भागातील शाळांना संगणक उपलब्ध करुन देतात आणि शहरी भागातील सदस्य शहरी भागातील शाळांना संगणक उपलब्ध करुन देतात. शाळांना संगणक देण्याची यादी आम्ही नियोजन विभागास सादर करतो. आता संगणक देण्याची नवीन पध्दत शासनाने सुरु केलेली आहे. ती यादी प्रथम शिक्षण अधिकाऱ्याकडे जाते, शिक्षण अधिकारी शाळेत जाऊन तपासणी करतात, त्यानंतर संगणकाची तरतूद नियोजन विभागाकडून होते. त्यानंतर एजन्सी फिक्स होते. ती एजन्सी आमदारांनी सुचविलेल्या शाळांना संगणक पुरविते. एखाद्या शाळेस संगणक पुरवावा असे पत्र दिले तर त्या शाळेस आठ ते नऊ महिन्यानंतर संगणक पुरविला

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जातो. या प्रोसेसला खूप विलंब लागतो, त्यामुळे आम्हीच संगणक देण्यास अडचणी आणतो अशी परिस्थिती या प्रोसेसमुळे निर्माण होते. सदर शाळांची यादी शिक्षण अधिकारी कार्यालयात गेल्यानंतर ते ती यादी बाजूला ठेवून देतात. त्यासंबंधी जो काही अहवाल पाठवावयाचा असतो, तो लवकर पाठविला जात नाही. नियोजन विभागाकडून रस्ते, तलाव, धरण इत्यादी कामांना ताबडतोबीने मंजुरी दिली जाते आणि त्या कामांचे एस्टीमेट करण्यासाठी प्रस्ताव संबंधित विभागाकडे पाठविले जातात. शाळांना संगणक देण्यासंबंधीच्या प्रस्तावास नियोजन विभागाकडून लवकर मान्यता दिली जात नाही. आमदारांनी पत्र दिल्यानंतर किमान दोन महिन्याच्या आत संगणक वितरणासंबंधी ऑर्डर निघाली पाहिजे अशी देखील माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 156 मधील विषय हा पॅकेज संदर्भातील आहे. गेल्या आठवडयात माननीय मुख्यमंत्र्यांनी कापसासंबंधी 2 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. शासनाकडून निरनिराळया विभागात, निरनिराळया विषयासंदर्भात पॅकेज जाहीर केले जातात. शासनाने मागील विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी मोठा गाजावाजा करुन कोकण पॅकेज जाहीर केले. या कोकण पॅकेजचे वर्षभर पैसेच आले नाहीत. कोकण पॅकेजचे पैसे मिळावेत म्हणून आम्ही वारंवार मागणी करीत होतो. तेव्हा आता याद्या येऊ लागल्या आहेत की, अशा अशा कामांसाठी एवढे पैसे मिळाले. पॅकेजचा मंजूर पैसा कोठे खर्च होतो याची तपशीलवार माहिती शासनाने घेतली पाहिजे. तसेच असे जे पॅकेज जाहीर होतात, त्यांचे ॲसेसमेंट केले जावे अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 165, बाब क्रमांक 159 ही ग्रामपंचायती व इतर ग्रंथालयासाठी सहाय्य या संबंधी आहे. ही मागणी शिक्षण विभागाची नसून ती वित्त विभागाची आहे. ग्रंथालयांचे अनुदान दुप्पट करु असे मागच्या अधिवेशनामध्ये माननीय मंत्र्यांनी जाहीर केले. या घोषणेमुळे ग्रंथालय चालविणारी मंडळी अतिशय आनदी झाली होती. ग्रंथालयांना अनुदान देण्यासाठी पूरक मागणी केली आहे, त्याबद्दल मी शासनास धन्यवाद देतो. यासंदर्भात मला एक सूचना करावयाची आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात वाचन संस्कृती वाढली पाहिजे. गावागावात ग्रंथालये वाढली पाहिजेत. परंतु ग्रंथालयाला अनुदान देण्यासंदर्भात अटी व शर्ती आहेत. त्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आमुलाग्र बदल करण्याची गरज आहे. एखाद्या गावातील ग्रंथालय बंद आहे. ते फक्त कागदोपत्री चालू आहे, शिवाय त्याला शासनाकडून अनुदानही दिले जात आहे. परंतु त्याच गावातील दुसरे ग्रंथालय चांगल्या पध्दतीने चालू आहे, परंतु त्याला मात्र अनुदान दिले जात नाही. अशा चांगल्या ग्रंथालय चालविणाऱ्यांवर अन्याय होत आहे. चांगल्या ग्रंथालयांना अनुदान देण्यासाठी अटी व शर्ती शिथील केल्या जाव्यात व सुरु असलेल्या चांगल्या ग्रंथालयांना अनुदान देण्यात यावे. कोकणामध्ये दापोली तालुक्यात जालगांव म्हणून गाव आहे. त्या ठिकाणचे वाचनालय महिला चालवितात. त्यास फक्त मान्यता देण्यात आलेली नाही. त्यास शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान दिले जात नाही. त्या ठिकाणी दुसरे वाचनालय बंद आहे. त्यास शासनाची मान्यता आहे. त्यास शासनाकडून अनुदान दिले जात आहे. जे वाचनालय चालू आहे, त्यावर मोठया अन्याय होत आहे. त्या ठिकाणी तपासणी करुन तेथील अनुदान बंद करता येऊ शकते. ग्रंथालये आणि वाचनालयांना अनुदान देण्यासाठी शासनाने अटी व शर्ती घातलेल्या आहेत, त्यात तात्काळ बदल करण्यात यावेत, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमाक 170 ग्रामीण पाणी पुरवठा योजने संबंधीची आहे. कसारा पाणी पुरवठा योजना खूप गाजते आहे. कसारा हे मोठे गाव असून येथे ग्रामपंचायत आहे. कसारा पाणी पुरवठा योजनेसाठी गेल्या दहा वर्षापासून निधी खर्च होतो आहे. परंतु ही योजना आतापर्यंत पूर्ण झालेली नाही. या योजनेचा निधी खर्ची पडतो आहे. ती योजना आतापर्यंत कार्यान्वित का होऊ शकली नाही याची सखोल चौकशी झाली पाहिजे. कासारा शहरातील लोकांना पाणी पुरवठा व्हावा म्हणून ही योजना तात्काळ कार्यान्वित करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 19, बाब क्रमांक 24 ही धूप प्रतिबंधक बंधारे संबंधीची आहे. कोकणात धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांची फार मोठी अडचण आहे. महाराष्ट्राला 720 कि.मी. समुद्र किनारा लाभलेला आहे. ठाणे जिल्हयातील झाही, तारापूर, सातपाटी, उत्तन, रायगडमधील रेवस, मांडवा, माणगाव, मुरुड व सिंधुदूर्ग जिल्हयातील सागरी किनाऱ्यांवरील अनेक गावे आहेत. या ठिकाणी शासनाकडून धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्यासाठी तरतूद उपलब्ध करुन दिली जात नाही.

<u>सभापतीस्थानी माननीय उप सभापती</u>

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.संजय केळकर.....

प्रशासकीय मंजुरी तातडीने दिली जाते. परंतु आवश्यक असलेली आर्थिक तरतूद केली जात नाही. त्यामुळे किनारपट्टीवर राहणाऱ्या लोकांचे खूप नुकसान होते. कोकणातील लोकांना खऱ्या अर्थाने न्याय द्यावयाचा असेल तर वन टाईम तरतूद करुन धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांचा प्रश्न कायमस्वरुपी सोडवावा अशी मी शासनाला सूचना करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 118, पृष्ठ क्रमांक 100. द्राक्षापासून व निरनिराळ्या धान्यापासून वाईन तयार करणाऱ्या उद्योगांना शासनाकडून प्रोत्साहन दिले जाते. निरनिराळ्या मार्गाने निधी उपलब्ध करुन दिला जातो. कोकणामध्ये जांभूळ हे शाश्वत फळ आहे, त्याच्या चिकापासून चांगल्या प्रकारची वाईन तयार होते आणि तसा प्रयोग यापूर्वी यशस्वी झालेला आहे. कोकणात पिकणाऱ्या फळांकडे बघण्याचा शासनाचा दृष्टीकोन वेगळा आहे की काय अशा प्रकारची शंका कोकणातील माणसांच्या मनामध्ये निर्माण झालेली आहे. एका बाजूला द्राक्षापासून वाईन तयार करणाऱ्या उद्योगांना सवलती देत असताना जांभळापासून वाईन तयार करणाऱ्या उद्योगांना अनुदान दिले पाहिजे, त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. जांभूळ फळावर निरनिराळ्या प्रकारची प्रक्रिया केली पाहिजे. त्यातून अनेक उद्योग उभे राहू शकतात आणि कोकणातील माणसांच्या हाताला रोजगार मिळू शकतो.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्र.179, पृष्ठ क्रमांक 105. दरवर्षी निरनिराळ्या आयुधांचा वापर करुन कोकणातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उप जिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयातील रिक्त असलेली डॉक्टर व कर्मचारीवर्गाची पदे भरण्यात यावीत अशी मागणी केली जाते. जी पदे भरली जातात त्या पदावर नियुक्त केलेले कर्मचारी किंवा डॉक्टर बदली करुन घेतात. त्यामुळे पुन्हा नव्याने भरलेली पदे रिक्त राहतात. हा प्रश्न कायमचा निकाली काढावयाचा असेल तर कोकणात आरोग्य विभागांतर्गत नियुक्त केल्या जाणाऱ्या डॉक्टर व कर्मचाऱ्यांना विशेष प्रोत्साहन भत्ता दिला पाहिजे. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी गरीब रुग्ण येत असतात, त्यांना आरोग्याच्या सुविधा मिळणे आवश्यक आहे. परंतु प्रत्यक्षात अशी माहिती मिळाली की, ज्या डॉक्टरांची नेमणूक केली जाते ते डॉक्टर सेवेत रुजू होतात आणि बदलीने निघून जातात. त्यामुळे कोकणात नियुक्त केल्या जाणाऱ्या डॉक्टरांना विशेष प्रोत्साहन भत्ता दिला पाहिजे. तरच कोकणातील आरोग्य केंद्रे सुरु राहतील आणि सर्वसामान्य रुग्णांना..... ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

आरोग्य सेवा मिळू शकेल. अन्यथा आम्ही प्रत्येक वेळी सभागृहात मागणी करायची आणि शासनाने ठरलेल्या पध्दतीचे उत्तर द्यायचे व प्रत्यक्षात जागा तशाच रिक्त राहणार. असे यापुढे होता कामा नये या दृष्टीने विशेष प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत शासनाने विचार करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, मी लोकप्रतिनिधी या नात्याने अनेक रुग्णालयांना भेटी दिल्या आहेत. तेथे मला मोठया प्रमाणात भ्रष्टाचार दिसून आलेला आहे. आरोग्य विभागाचे संचालक व ठाणे विभागाचे उप संचालक यांच्याशी मी प्रत्यक्ष संपर्क साधून चर्चा केली. कर्जत येथील उप जिल्हा रुग्णालयामध्ये मी भेट दिली त्यावेळी डॉक्टरांनी खोट्या सह्या केल्याचे आढळून आले. डॉक्टर त्यावेळी रुग्णालयात हजर नसताना त्यांनी सह्या केल्या होत्या. सगळ्या प्रकारच्या अनियमितता तेथे आढळून आल्या आहेत. तेथील डॉक्टरांनी 1 हजार रुपयांची लाच घेतल्याचे सिध्द झाले. परंतु अद्याप त्यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. समित्यावर समित्या नेमल्या जात आहेत. मी जिल्हा शल्य चिकित्सकांशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की आणखी एक समिती नेमली जाईल आणि त्या समितीमार्फत चौकशी होईल. दुसऱ्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, आम्ही त्या डॉक्टरांची बदली करु म्हणजे आंदोलन करणाऱ्यांचे समाधान होईल. 1 हजार रुपयांची लाच असो वा 1 कोटी रुपयांची लाच असो, अशा लाचखोर अधिकाऱ्यांना तातडीने सेवेतून निलंबीत केले पाहिजे. कर्जत उप जिल्हा रुग्णालयातील लाचखोर डॉक्टरांना तातडीने निलंबीत करावे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री श्री.राजेंद्र गावित हे आमच्या ठाणे जिल्हयातील आहेत. मी त्यांच्यासोबत ठाणे मनोरुग्णालयातील सुविधांची पाहणी करण्यासाठी गेलो होतो. त्या मनोरुग्णालयात निरनिराळ्या प्रकारचे कंत्राटी कामगार नेमले आहेत. त्यांना वर्ष-वर्षभर पगार दिला जात नाही. ठाणे शहरातील 1500 कंत्राटी कामगार तेथे काम करीत आहेत. सहा महिने त्यांना पगार मिळाला नाही. शेवटी त्यांनी आंदोलन केले, काम बंद केले तरी त्यांना पगार दिला गेला नाही. आजही पुन्हा एकदा त्यांची मागणी पुढे आली आहे. त्यांना तीन महिन्यापासून पगार मिळालेला नाही. शेवटी आम्हीच त्यांना सांगितले की, काम बंद करा. रोज उठून शासनाच्या दरवाजामध्ये किती वेळा नाक घासायचे? जो काम करतो त्याला वेळेवर पगार मिळाला पाहिजे. त्यासाठी निधीची तरतूद केली पाहिजे. कंत्राटी कामगारांना तर वेळेवरच पगार दिला पाहिजे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ज्यांचे हातावर पोट आहे अशा कामगारांना पगार दिला नाही तर त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे. त्यामुळे कंत्राटी कामगारांच्या पगाराची कायमस्वरुपी व्यवस्था करावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 70, सार्वजनिक बांधकाम विभाग. ठाणे जिल्हयातील पोलीस वसाहतींचा प्रश्न अनेक वर्षे रेंगाळत पडला आहे. गेली पाच वर्षे प्रत्येक अधिवेशनात ठाणे जिल्हयातील पोलीस वसाहतींच्या पुनर्बांधणीची मी मागणी करीत आहे. ठाणे शहरातील वा अन्य भागातील पोलीस वसाहतींची स्थिती अत्यंत वाईट झालेली आहे. एका बाजूला गृह खात्यामध्ये काम करणाऱ्या पोलिसांना कोंडीत पकडले जाते. परंतु वसाहतीमध्ये ते ज्या अवस्थेमध्ये रहात आहेत ते पाहिले तर फार खेदजन्य परिस्थिती अनुभवाला येते. पोलिसांच्या कुटुंबीयांच्या दृष्टीने वसाहतीतील इमारतींच्या दुरुस्तीसाठी आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 80, पृष्ठ क्रमांक 61. ज्या न्यायालयांमध्ये न्यायदानाचे काम केले जाते त्यांची अवस्था अतिशय बिकट झालेली आहे. कल्याण येथील न्यायालयाला मी भेट दिली. संपूर्ण न्यायालयाची पाहणी केली. अतिशय वाईट अवस्था दिसून आली. तेथे ज्या दरवाजाने लोक आत येतात त्याच दरवाजाने न्यायाधीशांना कोर्टात यावे लागते. वस्तुत: न्यायाधीशांच्या प्रवेशासाठी वेगळ्या दरवाजाची सुविधा असणे आवश्यक आहे. ही इमारत लोडबेअरिंगवर 50 वर्षापूर्वी बांधलेली आहे. त्या इमारतीमध्ये दिवसभराच्या काळात बहुतांश वेळेला अंधाराचे साम्राज्य असते. अशा वेळेला न्यायाधीशांना काही काळासाठी काम थांबवावे लागते. न्यायाधीशांनी मला सांगितले की, काळोखात कसे काम करणार? त्यांना सरकारकडे न्याय मागावा लागत आहे. न्यायनिवाडा करीत असताना तेथे पुरेशा सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. 50वर्षापूर्वी बांधलेल्या इमारतीची तातडीने पुनर्बांधणी होण्याची गरज आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रस्ताव तयार झालेला आहे. शासनाने तातडीने या इमारतीची पुनर्बांधणी करावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे एका तहसील विभागाचा प्रस्ताव पडून आहे. हा महसूल खात्याचा विषय असला तरी अंमलबजावणीचे काम बांधकाम विभागाचे आहे. ठाण्याचे तहसील कार्यालय हे ठाणे, नवी मुंबई, भाईंदर या भागासाठी आहे. ठाणे शहराची आज

श्री.संजय केळकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18 लाख लोकसंख्या आहे. असे असताना एवढ्या मोठया परिसरासाठी हे छोटेसे तहसील कार्यालय स्थापन केलेले आहे. त्या कार्यालयाची पुनर्बांधणी करण्याची गरज आहे. त्यासाठी शासनाने तातडीने निधी उपलब्ध करुन द्यावा आणि ठाणे तहसील कार्यालयाची पुनर्बांधणी करावी अशी मागणी करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित टोल नाक्याचा प्रश्न माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विस्तृतपणे मांडला आहे. राज्य रस्ते विकास महामंडळाशी संबंधित विषय असला तरी महामंडळामार्फत ठेकेदारांशी जो करार केला जातो त्या कराराची पुनर्तपासणी करणे आवश्यक आहे अशी माझी सूचना आहे. ठाणे जिल्हयात एकूण 15 टोल नाके अस्तित्वात असून आणखी दोन-चार टोल नाके नव्याने सुरु होणार आहेत. बदलापूर येथून मुंबईकडे वाहन घेऊन येणाऱ्या माणसाला 350 रुपये भरुन मुंबई शहरात प्रवेश करावा लागतो. मुंबई महानगरचा जो भाग आहे त्या अंतर्गत टोल वसूल केला जाऊ नये अशी आमची मागणी आहे. मुंबई महानगर क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर टोल वसूल केला जात आहे तो ताबडतोब बंद करण्यात यावा. 2017 सालातील वाहनांची संख्या अपेक्षित करुन टोल वसुलीला परवानगी दिली गेली. प्रत्यक्षात आजच 2017 सालात अपेक्षित असलेली वाहनांची संख्या भरली गेली आहे. त्यामुळे 2017 चे उत्पन्न निरनिराळ्या टोल नाक्यावर अगोदरच वसूल केले गेले असल्यामुळे त्या कराराची पुनर्तपासणी केली तर काही टोल नाके बंद करण्याची मुभा मिळू शकते आणि तेथील नागरिकांना दिलासा मिळू शकतो. टोल नाक्यांच्या संदर्भातील कराराची पुनर्तपासणी करुन करारामध्ये योग्य ती दुरुस्ती करावी अशी मागणी करतो.

सभापती महोदय, क्रीडा विभागांतर्गत मागील दोन वर्षांचे छत्रपती क्रीडा पुरस्कार जाहीर झालेले नाहीत.

नंतर श्री.खर्चे...

अशुद्धीत प्रत / मुद्रणेतर नोंद

श्री. संजय केळकर .....

क्रीडा धोरण जाहीर व्हायचे राहिले आहे. एका बाजूला क्रिकेट पटूंना आपण डोक्यावर घेतो परंतु ज्या ठिकाणी ते खेळाडू जेथून निर्माण होतो त्याबाबतीत मात्र काहीच करीत नाही. जिल्हा व तालुका स्तरावर जे खेळाडू शाळांमधून जात असतात त्यांना कोणत्याही सुविधा पुरविल्या जात नाहीत. केवळ "राम भरवसे" ते जात असतात. पण पालकांना हौस असल्याने पालक सोबत जातात व आपल्या मुलांची व्यवसथा करतात. मुळात या खेळाडुंसाठी कोणत्याही प्रकारचे राहण्याचे व प्रवासाचे आरक्षण नसते. रात्रभर जागरण करुन दुसऱ्या दिवशी ही मुले खेळतात व त्याचा परिणाम त्यांच्या परफॉर्मन्सवर होतो आणि अशाच कारणांमुळे खेळाडुंचा बट्ट्याबोळ झालेला आहे. आपल्या राज्यातून जी टीम खो-खो सारख्या खेळात जिंकून आली त्यांना सुध्दा असाच अनुभव आला. ती मुले हातात पदक घेऊन रिक्षा कुठे मिळते काय हे शोधत होते. अशी अवस्था खेळाडुंची असणे हे राज्याच्या दृष्टीने भुषणावह नाही. त्याचबरोबर आपल्या राज्यातून निरनिराळ्या खेळातून विविध खेळाडू पुढे आलेले आहेत पण त्यांना शासनाकडून प्रोत्साहन दिले जात नसेल तर त्यांच्याकडून अपेक्षा करणे सुध्दा चुकीचे आहे.

महोदय, छत्रपती पुरस्काराच्या संदर्भात मला निदर्शनास आणून द्यावयाचे की हा पुरस्कार दोन दोन वर्षे दिला जात नाही, त्याचाही विचार करावा. तसेच राज्यात क्रीडा शिक्षक सुध्दा शासनाने पुरेशा प्रमाणात नेमलेले नाहीत मग अशी अपेक्षा आपण कशी करु शकतो हा देखील विचार करण्याचा भाग आहे, यादृष्टीने शासनाने लक्ष द्यावे. तसेच खेळाडुंना प्रशिक्षण, संरक्षण व प्रोत्साहन देण्याची सुध्दा तितकीच गरज आहे. केवळ 25 मार्कांसाठी ते खेळतात असा विचार करुन चालणार नाही. त्यामध्ये जे जेन्युईन खेळाडू भरडले जातात याकडे दुर्लक्ष होता कामा नये.

महोदय, बाब क्र. 241, पृ.क्र. 259 यामध्ये सांस्कृतिक विभागाने 10 लाखाची तरतूद केली आहे. सांस्कृतिक .....करण्यास काहीच हरकत नाही. निरनिराळी नाटके व चित्रपटांना प्रोत्साहन देण्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. पण राज्य नाट्य स्पर्धाकडे मात्र शासनाचे दुर्लक्ष होत आहे. वास्तविक नाट्य स्पर्धांच्या माध्यमातूनच चित्रपट व नाटकांमध्ये कलाकार जात असतात, तोच त्यांचा बेस असतो. अशा स्पर्धांसाठी जे परीक्षक जातात त्यांना हॉटेल्स सोडण्याची वेळ आली होती. त्यांना हॉटेलच्या व्यवस्थापकांनी अक्षरश: हाकलून लावले व सांगितले की,

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

आपले भाडेच भरलेले नसल्याने आपल्याला राहता येणार नाही. अशी वेळ परीक्षकांवर येत असेल तर ही गोष्ट प्रगतीशील महाराष्ट्राच्या दृष्टीने शोभनीय बाब नाही. या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, राज्य नाट्य स्पर्धा पूर्वी जशा जाहीर करीत होते त्यासाठी अगोदर जाहिरात दिली जात होती व त्यातून लोक त्यात भाग घेत असत. अशा प्रकारे हे कलाकार पुढे आलेले आहेत. आता आपण टी.व्ही. व चित्रपटांमधून जे कलाकार पाहतो ते अशा प्रकारे पुढे आलेले आहेत. त्यांना शासनाने जर ताकद दिली तरच प्रोत्साहन मिळू शकेल. त्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच त्या त्या जिल्ह्यातील लोकांच्या सूचनांचाही विचार करावा आणि केवळ शासकीय राज्य नाट्य स्पर्धा न करता सर्व क्षेत्रातील लोकांसाठी अशा स्पर्धा घ्याव्यात अशी मागणी करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी माझ्या भाषणातून जो "मालेगांव" असा उल्लेख झालेला आहे तो नाशिक जिल्ह्यातील मालेगांव नसून "मेहेकर-मालेगांव" असा गृहित धरावा अशी मी सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना विनंती करतो.

(**सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी**)

.....2

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्रीमती शोभाताई फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, पूरक मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, मी पुस्तक उघडल्यानंतर माझ्या लक्षात आले की, 6304 कोटीच्या पुरवणी मागण्या सभागृहासमोर मान्यतेसाठी आणलेल्या आहेत. त्यामध्ये जलसंपदा विभागासाठी ज्या पुरवणी मागण्या आहेत त्यांचा विचार करता सर्व ठिकाणी मला "पुणे" विभागातील कामेच दिसून आली. विदर्भ शोधूनही सापडत नाही किंवा विदर्भाला अंगठाच दिला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. अशा प्रकारे विदर्भातच अधिवेशन घेऊन आम्हाला नेहमीच अंगठा दाखविला जात असेल आणि काहीच पैसा दिला जात नसेल तर हे योग्य नाही. किमान आम्हाला काही तरी पैसा दिला पाहिजे आणि आमच्या मागण्या पुर्ण कराव्यात अशी माझी विनंती आहे.

महोदय, बाब क्र. 96, पृ.क्र.86 या मागणीच्या माध्यमातून पाटबंधारे विभागाने 250 हेक्टरवरील लहान पाटबंधारे यासाठी ही 84 कोटीची मांडलेली आहे आणि ती मागणी सुध्दा पुण्यातील प्रकल्पांचीच आहे. आमच्या विदर्भात हुमन प्रोजेक्ट सारखा प्रकल्प सन 1982-83 पासून मंजूर केलेला आहे. त्यासाठी 199 कोटी रुपये वन विभागाला द्यावयाचे होते. त्यासंदर्भात सन 2004 मध्ये मागणी झाली. त्यानंतर 2010 मध्ये पुन्हा सर्व्हेक्षण करण्यात आले आणि त्यांनी 68 कोटीची मागणी केली. सन 2011 मध्ये पाटबंधारे विभागाने या कामासाठी 171 कोटी रुपये दिले. त्यात अगोदर 28 कोटी रुपये दिले आणि 68 कोटीच्या मागणीचे प्रारुप तयार करुन पाटबंधारे विभागाच्या राज्य मंत्री व मंत्र्यांनी सचिवांना सांगितल्यानंतर अद्यापही सचिवांनी 68 कोटी रुपये अदा केले नाहीत. अशा प्रकारे पुणे आणि मुंबई तसेच ज्या ठिकाणी मुळात सिंचनाचे प्रमाणच 50 टक्क्याच्या वर आहे अशा ठिकाणी पैसा दिला जातो. आम्हाला मात्र प्रत्येक वेळेला पुस्तक उघडल्यानंतर पुणे, पश्चिम महाराष्ट्र यांचाच उल्लेख त्यात दिसतो. माझी या निमित्ताने अशी विनंती आहे की, विदर्भातील या प्रकल्पासाठी या बजेटमध्ये मंजूर करुन पूर्व विदर्भातील हुमन प्रोजेक्टला मान्यता देण्यात यावी.

महोदय, सभागृहात ट्रीपल आरच्या संदर्भात सांगण्यात आले. या योजनेच्या अंतर्गत केंद्राकडून 90 टक्के आणि राज्याचा 10 टक्के हिस्सा असतो. या योजनेअंतर्गत विदर्भात 25 तलाव घेण्यात आले. पश्चिम महाराष्ट्रात 25 तलाव घ्यावयाचे होते परंतु त्या भागात 468 तलाव

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभाताई फडणवीस

घेण्यात आले, अशी परिस्थिती आहे. याचा अर्थ असा की विदर्भाला तलावांचा प्रदेश म्हणून संबोंधले जाते परंतु विदर्भासाठी आलेला तलावाचा पैसा मात्र परस्पर तिकडे वळविला जातो हेच आमचे दु:ख आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, 100 हेक्टर पर्यंत सिंचन क्षमता असलेल्या लहान पाटबंधारे तलावाच्या दुरुस्तीची आम्ही सतत मागणी करीत असतो. विदर्भाच्या बाबतीत नेहमी अन्याय केला जातो. सब घोडे बारा टका, या न्यायाने या तलावाच्या दुरुस्तीसाठी केवळ 21 हजार रुपये दिले गेलेले आहेत. 21 हजार रुपयांमध्ये तलावाच्या दुरुस्तीचे काम होत नाही. दुरुस्तीसाठी माती न्यावी लागते, काही ठिकाणी माती भूसभुशीत असते, काही ठिकाणी मुरुम असतो, वाहतुकीचे अंतर जास्त असते त्यामुळे तलावांच्या दुरुस्तीसाठी 30 हजार रुपये नॉर्म्स ठेवण्यात यावे, असे मी लेखी पत्रही दिलेले आहे. परंतु अद्याप पर्यंत या संदर्भात आम्हाला न्याय मिळालेला नाही.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. मराठी भाषेच्या वापराबाबत आम्ही सतत मागणी करीत असतांना सार्वजनिक आरोगय विभागाने "मुफसल"हा शब्द कोठून आणला आहे ? "मुफसल क्षेत्रातील शासकीय रुग्णालये आणि दवाखान्यांची दुरुस्ती" त्यामुळे "मुफसल" म्हणजे काय ? इंग्रजीमध्ये "मुफसल"ला काय म्हटले जाते त्याची आम्हाला माहिती नाही. मला वाटते हा ऊर्दू शब्द आहे. हिंदी गेले, मराठी गेले, इंग्रजी गेले आणि आता आपण ऊर्दू शब्द कधी पासून वापरावयास लागलो आहोत ? आपण आता ऊर्दू शब्दाचा वापर करावयास लागला तर आम्ही आता ऊर्दू शिकावयाचे काय ? "मुफसल" या शब्दाचा अर्थ "गावकुसाबाहेरील" असा असल्याचे आम्हाला कळाले आहे.

सभापती महोदय, 11 महिला रुग्णालये मंजूर केलेली आहेत. चंद्रपूर जिल्हयात महिला रुग्णालये सुरु करण्यात यावीत, अशी मागणी ठरावाद्वारे केलेली असतांना सुध्दा चंद्रपूर येथे महिला रुग्णालय झालेले नाही. आपण 11 महिला रुग्णालये कोठे कोठे दिलेली आहेत त्याची माहिती देण्याची आवश्यकता आहे. 307 ग्रामीण रुग्णालये नव्याने दिली जाणार आहेत, अशी माहिती देण्यात आलेली आहे. आम्ही वारंवार डॉक्टर्स द्या, नर्सेस द्या, औषधे द्या आणि ग्रामीण रुग्णालयांची ख-या अर्थाने दुरुस्ती करा अशी मागणी करीत असतो. परंतु डॉक्टर्स, नर्सेस, औषधे न देता अजून 307 नवीन ग्रामीण रुग्णालये शासनाने दिलेली आहेत. आमच्या भागात डॉक्टर्स नाहीत, तज्ज्ञ डॉक्टर्स दिले जाते नाहीत. सर्व मशिनरी धुळ खात पडलेली आहे. आमच्या केंद्रात प्रशिक्षित डॉक्टर्स देण्याच्या ऐवजी प्रशिक्षण घेणा-या डॉक्टरांना आमच्याकडे पाठविले जाते. एक

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

मेडीकल ऑफिसर असेल तर त्याला डेप्युटेशनवर चंद्रपूर, सिंदेवाडीला पाठविले जाते. एका डॉक्टराला 10 ठिकाणी नाचवले जाते. 307 ग्रामीण रुग्णालये देण्यापेक्षा असलेल्या ग्रामीण रुग्णालयांत तज्ज्ञ डॉक्टर्स द्या. आमच्याकडे 100 खाटांचे हॉस्पीटल असून त्या ठिकाणी आरोग्याची कोणत्याही प्रकारची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. 100 खाटांचे हॉस्पीटल अतिशय सुंदर बांधले गेले आहे परंतु त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, महिला व बालकल्याण विभागाच्या बाब क्रमांक 238, पृष्ठ क्रमांक 252 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. किशोरवयीन मुलींच्या सबलीकरणासाठी राजीव गांधी योजनेमधून निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. बीड, नांदेड,नाशिक, मुंबई, बुलढाणा, सातारा, अमरावती, नागपूर, गडचिरोली, गोंदिया यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. चंद्रपूर जिल्हा आदिवासी जिल्हा आहे. त्यामुळे या योजनेत चंद्रपूर जिल्हा जोडण्यात यावा अशी माझी विनंती आहे. आरोग्याच्या तसेच किशोरवयीन मुलींचा प्रश्न यावेळेला ऐरणीवर आलेला आहे. त्यामुळे चंद्रपूर जिल्हयाला सवलत द्यावी, अशी विनंती करते. विदर्भावर अन्याय झालेला आहे एवढे सांगून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, अर्थखात्याच्या बाब क्रमांक 66 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. विक्रीकर संगणकाविषयीची ही बाब आहे. पूर्वी माननीय सुरेश शेट्टी हे वैद्यकीय शिक्षण मंत्री होते. त्यावेळेस त्यांच्याकडे वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयांचा कारभार होता. वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामध्ये काम करणा-या ग्रंथपालाच्या पगारामध्ये आणि इतर ठिकाणच्या ग्रंथपालाच्या पगारात प्रचंड मोठी तफावत आहे. आता माननीय मंत्री महोदय श्री. सुरेश शेट्टी हे राज्यमंत्री पदावरुन सार्वजनिक आरोग्य खात्यात कॅबिनेट मंत्री झाले आहेत. परंतु अजून पर्यंत ही फाईल वित्त विभागात पडून असल्यामुळे हा प्रश्न तसाच भिजत पडलेला आहे.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांना कल्पना दिली आहे परंतु अजून पर्यंत यासंदर्भात काहीच निर्णय झालेला नाही.

सभापती महोदय, रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या पृष्ठ क्रमांक 155 व बाब क्रमांक 240 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. रोजगार स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राच्या नुतनीकरणाच्या संदर्भातील ही बाब आहे. रोजगार व स्वयंरोजगार केंद्र अस्तित्वात आहे का असा प्रश्न माझ्या समोर पडलेला आहे. हे केंद्र अस्तित्वात असेल तर आतापर्यंत या केंद्राने किती बेरोजगारांना संधी उपलब्ध करुन दिलेली आहे, याची माहिती मिळाली तर बरे होईल. मी उदाहरणा दाखल सांगू इच्छितो की, रोजगार व स्वयंरोजगार विभागामध्ये एका अपंगाला 17 वर्षात 5 कॉल्स आलेले आहेत परंतु अजून पर्यंत त्याला नोकरी मिळालेली नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 73, पृष्ठ क्रमांक 58 वरील रस्ते व पूल बांधकामाचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आपण रस्ते, पूल बांधतो परंतु मी माननीय श्री. छगन भुजबळ साहेबांना आठवण करुन देऊ इच्छितो की, आरोग्य भवनाचे छप्पर अजूनही गळत आहे. माननीय मंत्री महोदयांनी एका प्रश्नाच्या संदर्भात सांगितले होते की, सार्वजनिक आरोग्य विभागाने छप्पर दुरुस्त केले नाही तर बांधकाम विभागाकडून दुरुस्ती केली जाईल. त्यामुळे आपल्या आश्वासनाचे काय झाले, याची कृपया आम्हाला माहिती द्यावी अशी विनंती आहे. आपण अनेक रुग्णालये बांधत असतो. परंतु ही रुग्णालये गावाच्या बाहेर का बांधली जातात ? पीएचसी गावाच्या बाहेर पाच कि.मी. अंतरावर का असतात ? संसर्गजन्य रोग गावात पसरु नये, म्हणून ही पध्दत ब्रिटींशांनी सुरु केली होती. परंतु ही प्रथा आजपर्यंत तशीच सुरु ठेवण्यात आलेली आहे.

..4...

डॉ. दीपक सावंत.....
रुग्णालये गावाच्या बाहेर असल्यामुळे रुग्णांना जाणे-येणे कठीण होत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, नियोजन विभावरील पृष्ठ क्रमांक 155, बाब क्रमांक 163 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. दोन मुद्यांच्या संदर्भात आमदार निधी कोठे आणि कसा वापरला जावा याबाबत माझ्या मनात शंका आहे. आमदार निधी विधानसभा सदस्यांचा असू दे किंवा विधान परिषदेच्या सदस्यांचा असू दे. कंपाऊंड वॉल बांधण्यासाठी आमदार निधी वापरता येतो काय ? स्मशान भूमीचे कंपाऊड करण्यासाठी निधी वापरता येतो काय ? नवीन मार्गदर्शक पुस्तकात यासंदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत परंतु यासंदर्भात आम्ही जेव्हा पत्र देतो तेव्हा अधिकारी नकार देतात. वक्फ बोर्डाच्या जागेवर आमदार निधीचा उपयोग करता येतो काय, जिल्हा परिषदेच्या, महानरगपालिकेच्या तसेच नगरपालिकेच्या जागेवर आमदार निधी वापरता येतो काय, हा देखील प्रश्न आहे. समजा माझी नोडल एजन्सी मुंबई शहर आहे. परंतु मुंबई उपनगर येथे पत्र दिले तर मुंबई उपनगरने ते पत्र मुंबई शहराला द्यावयास पाहिजे. वास्तविक या सर्व एकच एजन्सी आहेत. या दोन्ही एजन्सी शासकीय आहेत. दोन्हीकडे वेगवेगळी पत्रे द्यावीत असे जिल्हाधिकारी किंवा नियोजन विभागाच्या अधिका-यांचा अट्टाहास असतो. खरे म्हणजे या अधिका-यांचा इगो प्रॉब्लेम असतो व त्यामुळे ब-याचदा आमदार निधी अडकवून ठेवला जात असतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 205, बाब क्रमांक 179 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. पायाभूत आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी यंत्र सामुग्री व उपकरणे खरेदी करणे यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. एनआरएचएमच्या माध्यमातून करोडो रुपयांची यंत्रसामुग्री खरेदी केली जात असते. यासंदर्भात मी आपल्याला उदारहरणादाखल सांगतो की, 2009-10 मध्ये 18 कोटी 59 लक्ष 10 हजार, 245 रुपयांची साधन सामुग्री खरेदी करण्यात आली होती. यामध्ये 362 एन्क्यूबेटर्स खरेदी करुन 33 जिल्हा रुग्णालयात देण्यात आले होते. 33 जिल्हा रुग्णालयात त्यातील किती इन्क्यूबेटर्स सुरु आहेत ते आपण बघू शकता. रेस्पीरेटरी डिस्ट्रेस मॅनेजमेंट सेट 251 खरेदी करण्यात आले होते. ऑक्सीजन किट व मास्क 362 खरेदी करण्यात आले होते. लॅबोरेटरीच्या बाबत ऑर्डर दिलेली आहे. सोल्युबिलीटी टेस्ट किटची सन 2009-10 मध्ये 1.29 कोटी रुपयांची खरेदी करण्यात आली होती. सबसेंटर्ससाठी लॅबरोटरी किट "Proposed but Order not effected." , पीएचसीसाठी लॅबरोटरी किटस् 5.44 कोटी रुपयांचे खरेदी केले परंतु "Proposed but Order not effected." असे म्हटले आहे. यानंतर श्री. भारवि.....p

अशोधित प्रत / शोधकार्यासाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

तसेच 467.63 लाख रूपयांची औषध खरेदी केली आहे. पण आज देखील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये पॅरासिटॉमॉल सिरप मिळत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

यानंतर मी बाब क्र.178 वर बोलणार आहे. मी मनोरूग्णांच्या जागेसंबंधी बोलणार आहे, ठाणे, पुणे, नागपूर येथे मनोरूग्णालय आहे. या जागांचे नेमके काय होणार आहे ? मुंबई, ठाणे, पुणे, नागरपूर सारख्या शहरांना आज मनोरूग्णालयांची गरज आहे. पण आज ठाण्याच्या मनोरूग्णालयाचे काय ? ते सुरू राहणार आहे की, बंद राहणार आहे ? हाच मोठा प्रश्न आहे. आपण ही मनोरूग्णालये जीवंत ठेवली पाहिजेत. तेथे आपल्याला मॉल नकोत. आजच्या स्ट्रेस आणि स्ट्रेन्थच्या जमान्यात जास्तीतजास्त मनोरूग्ण तयार होत आहेत.

यानंतर मी बाब क्रमांक 273, पान क्रमांक 251 वर बोलणार आहे. इंदिरा गांधी मातृत्त्व सहयोग योजनेवर तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितलेल्या बाब क्रमांक 238, पान क्र.252 वरील किशोरवयीन मुलींच्या सबलीकरणार मी बोलणार आहे. यांना अनेक कीट दिले जातात. अनेक गोष्टी खरेदी केल्या जातात. या सगळ्या गोष्टी कोणाच्या मार्फत खरेदी केल्या जातात ? राष्ट्रीय उपभोक्ता संघामार्फत खरेदी केल्या जातात. जो किराणा माल खरेदी करतो त्यांच्याकडून अनेक गोष्टी खरेदी केल्या जातात. खादी ग्रामोद्योगाकडून आपण काय खरेदी करता ? अनेक गोष्टी खरेदी करतात त्यात फिनाईल, कीट आणि डिसइन्फेक्टेड वस्तू देखील असतात. एवढेच नव्हे तर प्रशिक्षण पण त्यांच्या वर सोपविण्यात येते. जीवन मूल्य कौशल्ये शिकविण्याचे देखील काम त्यांच्याकडे देण्यात येते. या सर्व गोष्टीसाठी काही नॉर्म्स असणे आवश्यक आहे. आयसीडीएसमधून खरेदी करा किंवा अन्य कुठूनही खरेदी करा. ही खरेदी भ्रष्टाचाराचे मूळ आहे. सार्वजनिक आरोग्य, महिला बाल विकास आणि आदिवासी विकास विभाग हे विभाग म्हणजे भ्रष्टाचारचे मूळ सत्ता केंद्र आहे. ही सत्ता केंद्र बंद केली तर विदर्भातील माणूस आणि महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील रोगी वाचू शकेल. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, ग्रामविकास विभागाच्या पान क्रमांक 106 वरील बाब क्रमांक 123 वर बोलणार आहे. 20 हजार मतदानाची इलेक्ट्रॉनिक्स यंत्रे दुरूस्त करण्यासाठी 25 कोटी 68 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. आताच्या नगरपालिकेच्या निवडणुकीच्या माध्यमातून मी असे सुचवेन की, ह्या इलेक्ट्रॉनिक मतदान मशिनसंबंधी संशय निर्माण झाला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने असे प्रावधान केले आहे की, आता इलेक्ट्रॉनिक मतदान मशिनद्वारा एक स्लीप बाहेर पडेल व ती बॉक्समध्ये टाकली जाईल. या मशिन्ससंबंधी साशंकता निर्माण झाली होती. आता जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला तीन महिन्यांचा कालावधी आहे. त्यामुळे असा विचार करता येईल काय, याचा विचार ग्रामविकास खात्याने करावा अशी सूचना करतो.

अतिशय छोट्या खोल्यांमध्ये मतदान होत असते. प्रत्येक मतदान कक्षात प्रत्येक उमेदवारांचे पोलिंग एजंट बसलेले असतात. साधारणत: एका खोलीमध्ये 5 ते 10 पोलिंग एजंट असतात. त्यामुळे मतदानाला गेल्यानंतर खूप प्रेशर येते. तेव्हा पोलिंग एजंटना मतदान कक्षाच्या बाहेर बसविण्याचा विचार करावा अशी मी या निमित्ताने सूचना करीत आहे.

यानंतर मी क्रीडा विभागावर बोलणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर जे पदक मिळवतील त्यांना वर्ग-1 ची नोकरी देणार असे सरकारने घोषित केले होते. असे घोषित करून तीन महिने झाले आहेत. या कालावधीत आता पर्यंत फक्त दोनच खेळाडूंना शासनाने वर्ग-1 मध्ये सामावून घेतले आहे. बाकीच्या सगळ्या खेळाडूंची प्रकरण प्रलंबित आहेत. जागतिक स्तरावर विजयी ठरलेली श्रीमती जयश्री सावंत हिला वर्ग-1 मध्ये पदोन्नती देऊ असे आश्वासन दिले होते. तो ही मुद्दा राहिलेला आहे. त्याकडे देखील आपण लक्ष द्यावे.

यानंतर मी वित्त मंत्र्यांचे लक्ष वेधणार आहे. सोलापूर आणि कोल्हापूर येथील व्यापार गेले दहा दिवस बंद आहे. सदर व्यापार एलबीटी मुळे बंद आहे. या संबंधी माननीय मुख्यमंत्र्यां समवेत बैठक होणार आहे असे कळते. वॅट सुरू झाल्यानंतर आपण एक टक्का वाढवला होता. तेव्हा असे म्हटले होते की, कुठल्याही प्रकारचा पर्यायी कर जकातीला येणार नाही. उद्याच्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये माननीय अर्थमंत्र्यांनी होकारार्थी निर्णय करावा आणि एलबीटी रद्द करून व्यापार जो बंद पडला आहे तो सुरू करावा अशी मी विनंती करीत आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बाब क्र.23, पान क्र.18 वर बोलण्यासाठी मी उभा आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले आणि देवगड येथे असलेली दीपगृहे ही ब्रिटीश काळातील आहेत. आज त्याची दुरूस्ती व देखभाल महाराष्ट्र शासनाने करणे गरजेचे आहे. ती अद्ययावत करण्याची आवश्यकता आहे. ती करण्यात यावीत अशी मी विनंती करीत आहे.

यानंतर मी बाब क्र.71, पान क्र.57 वर बोलणार आहे. मुंबई-गोवा हायवे टप्पा क्र.4 चे काम मे 2011 मध्ये सुरू करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन माननीय मंत्र्यांनी दिले होते. सध्या या ठिकाणचे काम अपूर्ण आहे. ठेकेदारांनी व विभागाने कळवून देखील या रस्त्यावरून मायनिंगची वाहतूक सुरू आहे. त्यामुळे रस्ता पूर्ण नादुरूस्त झाला आहे. धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे सदर रस्त्याचे काम पूर्ण होत नाही, तो रस्ता हस्तांतरित होत नाही, तो पर्यंत वाहतुकीला प्रतिबंध करण्यात यावा अशी मी मंत्रिमहोदयांना विनंती करीत आहे.

यानंतर मी पान क्र.58, बाब क्र.73 वर बोलणार आहे. साकव कार्यक्रमातून वागदे येथे साकव घेण्यात आले. एका गावात पाच साकव घेण्यात आले. त्यातील सावरवाडी येथील एक साकव एका व्यक्तिसाठी आहे. तो मुंबई गोवा हायवे लगत 17 कि.मी.च्या आतमध्ये बांधण्यात आला आहे. हा साकव बांधताना तेथील ग्रामपंचायतीने खोटे, चुकीचे संमती पत्र लिहून दिले आहे. साकव एका जागेवर बांधला असून ग्रामपंचायतीने दुसऱ्या जागेसंबंधीचे संमती पत्र लिहून दिले आहे. यासंबंधी मी गेली दोन वर्षे तक्रार करीत आहे. संबंधित जिल्हाधिकारी व नियोजन अधिकाऱ्यांकडे मी तक्रार करीत आहे. तेव्हा याची चौकशी करून यात जर काही चुकीचे काम झाले असेल तर संबंधित अधिकाऱ्यांकडून रक्कम वसूल करून त्यावर कारवाई होणे गरजेचे आहे.

सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग किल्ल्यांसंबंधी आम्ही सातत्याने बोलत असतो. सदर किल्ले दुरूस्ती करण्यासंबंधी पर्यटन विभागाने जेवढे लक्ष द्यायला हवे तेवढे ते दिले जात नाही. ते देण्यात यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...

त्याचप्रमाणे संपूर्ण जगामध्ये फक्त सिंधुदुर्ग किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचे मंदिर आहे. एका ठिकाणी आपण 300 कोटी रूपये खर्च करून छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्याची भाषा करीत आहोत. सिंधुदुर्ग किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचे जे मंदिर आहे त्याच्या दुरूस्तीसाठी महाराष्ट्र शासनाने 25 लाख रूपये दिले आहेत. सदर मंदिर दुरूस्त करण्यावरून पुरातन विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामध्ये वाद सुरू झाला आहे. सदर वाद संपुष्टात आणून ते मंदिर दुरूस्त करावे. या मंदिराच्या कामासाठी देण्यात आलेला निधी अपुरा असून तो पूर्ण देऊन मंदिराच्या कामावर खर्च करावा अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी फक्त एका बाबीवर बोलणार आहे. पान क्र.39 वरील क्रीडा विभागाच्या बाब क्र.55 व 56 वर मी बोलणार आहे.

क्रीडा प्रशिक्षकांच्या नियुक्तीसाठी मानधन तत्त्वावर नियुक्ती करण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे. त्यासाठी 1 कोटीची तरतूद केली आहे. खेळाडू विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण मिळावे, त्या विद्यार्थ्यांना पदके मिळावी, ते विद्यार्थी चमकावेत असे वाटत असेल तर मानधनावर प्रशिक्षक न नेमता त्यांना कायम स्वरूपी शासनाच्या सेवेत नेमावे. त्यांना योग्य ते वेतन मिळण्याच्या दृष्टीने पूर्णवेळ प्रशिक्षक म्हणून नेमावे अशी मी विनंती करीत आहे.

जिम्नॅस्टीक मध्ये आर्टीस्टीक आणि ॲक्रोबॅटीक असे दोन प्रकार आहेत. आर्टीस्टीक जिम्नॅस्टीकला छत्रपती पुरस्कारातून वगळण्यात आले आहे. मला मंत्रिमहोदयांनी छत्रपती पुरस्कारामध्ये याचा समावेश करणार आहोत अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. यापूर्वी याला छत्रपती पुरस्कार मिळत होता. तेव्हा हा जो क्रीडा प्रकार वगळला आहे, त्याला सुद्धा न्याय द्यावा, अशा प्रकारची मी विनंती करतो.

शालेय स्तरावर क्रीडा स्पर्धामध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना 25 गुण दिले जातात. मध्यंतरी एस.एस.सी.बोर्डाच्या अध्यक्षांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, 25 गुण रद्द करणार आहोत. यामध्ये निश्चित स्वरूपात काही त्रुटी असू शकतील. ती योजना बंद करण्या ऐवजी त्या त्रुटी दूर करून विद्यार्थ्यांना गुणांचा लाभ मिळावा अशा प्रकारची मी विनंती करतो.

2-3 जिल्ह्याला आपण एका विभागाचा दर्जा देतो. त्या विभागामध्ये त्या जिल्ह्याचे 2-3 संघ खेळतात. साधारणत: शासनाच्या नियमानुसार महापालिका क्षेत्र याला जिल्ह्याचा दर्जा दिला आहे. आमच्या ठाणे जिल्ह्यात 7 महानगरपालिका आहेत. म्हणून प्रत्येक महानगरपालिका क्षेत्रामध्ये ज्या शाळा येतात, ज्या संस्था क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होतात. त्यांना ठाण्याचा एक विभाग द्यावा व त्या प्रमाणे विभागाची रचना आपण करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाने सर्वांना सहावा वेतन आयोग लागू केला आहे. शारीरिक शिक्षण विभागातील शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू केला आहे. इतरांना 1.1.2006 पासून सहावा वेतन आयोग लागू केला. शारीरिक शिक्षकांना मात्र, दिनांक 1.4.2011 पासून सहावा वेतन आयोग लागू केला आहे. या शिक्षकांचे जाणीवपूर्वक नुकसान झालेले आहे. त्याचा शासनाने फेर विचार करावा.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.... आणि राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे व इतर विभागातील कर्मचाऱ्यांप्रमाणे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षकांना दिनांक 1 जानेवारी 2006 पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत फेरविचार करावा अशी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री. रामदास कदम, जयंत प्र.पाटील, दिवाकर रावते, संजय केळकर, मोहन जोशी,रामनाथ मोते, परशुराम उपरकर माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आणि माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी भाग घेऊन आपले विचार व्यक्त केले व काही चांगल्या सूचना देखील केल्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी भाषण करीत असतांना एक तक्रार केली त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी देखील धारा-पत्रादेवी या रस्त्याबाबत तक्रार केली. सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हे केंद्र सरकार मार्फत केले जात आहे. केंद्र सरकारने सांगितल्याप्रमाणे त्या रस्त्याचे काम सुरु झाले आहे. हे काम सुरु असतांना मध्यंतरी केंद्र सरकारचे सचिव आणि काही अधिकाऱ्यांनी त्या कामाला भेट देऊन त्या कामामध्ये काही प्रमाणात वाढ केली. त्यानंतर साहजिकपणे संबंधित कंत्राटदाराने त्या कामाच्या किंमतीमध्ये वाढ केली. ज्यावेळी त्या वाढीव कामाचे पैसे देण्याचा प्रश्न निर्माण झाला त्यावेळी सन्माननीय केंद्रीय मंत्र्यांनी सदरच्या कामामध्ये वाढ कां केली अशी विचारणा केली. सन्माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे झालेल्या बैठकीमध्ये तुमच्याच अधिकाऱ्यांनी काम वाढविण्यास सांगितल्यानंतर कामामध्ये वाढ केली आहे त्यामुळे आपल्याला त्याचे पैसे दिले पाहिजेत असे आम्ही सन्माननीय केंद्रीय मंत्र्यांना सांगितले. जोपर्यन्त त्या वाढीव कामाचे पैसे केंद्र सरकार कंत्राटदाराला देत नाही तोपर्यन्त कंत्राटदार काम करणार नाही. आपल्या अधिकाऱ्यांनी कंत्राटदाराला पत्र देऊन सांगितल्यानंतर त्याप्रमाणे कंत्राटदाराने काम केले आहे. त्यानंतर मला असे समजले आहे की, केंद्र सरकारने त्या वाढीव कामाला मान्यता दिलेली आहे, वाढीव निधीला देखील मान्यता दिलेली आहे. त्यामुळे लवकरच ते काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. त्या रस्त्यावर खड्डे पडले असतील तर ते तत्काळ भरण्यासाठी सूचना देण्यात येतील. त्याचप्रमाणे त्या रस्त्यावरील खनिज वहातुकीबाबत आपण मुद्दा उपस्थित केला आहे. त्या संदर्भात पोलीस डिपार्टमेंट आणि संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन आपल्याला निर्णय घ्यावा लागेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी रायगड जिल्ह्यातील खराब रस्त्यांबाबत तक्रार केली आहे. मागील एक दोन महिन्यामध्ये राज्यातील जवळ जवळ सर्व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. छगन भुजबळ....

महसुली विभागामध्ये जाऊन रस्त्यांवर पडलेल्या खड्डयासंदर्भात मी एक बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार एखाद्या जिल्ह्यामध्ये हे काम करण्यासाठी कंत्राटदार काही अडचणींमुळे पुढे आलेला नाही. असा एखादा जिल्हा सोडल्यास बहुतेक सर्वच जिल्ह्यांमध्ये रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम पूर्ण झाले आहे तशाप्रकारचा अहवाल मुख्य अभियंत्यांनी मला दिलेला आहे. सभापती महोदय, मी या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील एमडीआर आणि स्टेट हायवेच्या संदर्भात बोलत आहे. राज्यात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे 35 हजार कि.मी. चे एम.डी.आर. आहेत आणि ग्राम विकास विभागाकडे 18 हजार कि.मी. चे एम.डी.आर. आहेत. या बाबतीत मी आपणास खात्रीपूर्वक सांगतो की, ज्या रस्त्यांची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे असा एक भंडारा जिल्हा सोडला तर बाकीच्या सर्व जिल्ह्यांमध्ये 98 ते 99 टक्के खड्डे भरण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तशाप्रकारची पत्रे सर्वांनी आमच्याकडें पाठविली आहेत. त्या संदर्भात जर कुणाची काही तक्रार माझ्याकडे आली तर त्याची कसून चौकशी केली जाईल आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी या ठिकाणी दोन रस्त्यांची मागणी केली आहे. त्यांनी ज्या रस्त्यांची मागणी केली आहे ते रस्ते शासकीय निर्णयानुसार जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांनी करण्याबाबत त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यामुळे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी उपलब्ध होत नाही. त्यांनी जर एम.डी.आर.आणि स्टेट हायवेच्या बाबतीत मागणी केली तर त्याबाबत जरुर विचार करु. त्यांनी केलेल्या रस्त्यांच्या मागणीबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सुध्दा कळविण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी के.टी. कंस्ट्रक्शनच्या बाबतीत तक्रार केली आहे. ही गोष्ट खरी आहे की, के.टी. कन्स्ट्रक्शनला देण्यात आलेले काम निविदा पध्दतीने देण्यात आले आहे. परंतु हा कंत्राटदार काम करण्यास असफल ठरत असल्याबद्दल मागील महिन्यात माझ्याकडे तक्रारी आल्यानंतर त्या संदर्भात मी एक बैठक घेतली त्यावेळी हे काम बरेचसे मागे पडले असल्याचे आढळून आले आहे. त्या कंत्राटदाराने बँकेकडून काही पैसे उचलले आहेत, त्याचप्रमाणे त्याने व्ही.जी.एफ. सुध्दा उचलला आहे. त्याला रस्त्यावर पडलेले खड्डे भरण्याचे काम तातडीने करण्यास सांगितले आहे. त्याचप्रमाणे त्याने राहिलेले रस्त्याचे काम करण्यासाठी एक महिन्याच्या आत त्या कामाला गती दिली नाही तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. छगन भुजबळ....

निविदेतील अटी-शर्तीनुसार त्याने ज्या बँकेकडून कर्ज घेतले आहे त्या बॅकेमार्फत सहा महिन्याच्या आत दुसरा कंत्राटदार नेमला जाईल. बँकेने जर तो कंत्राटदार नेमला नाही तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून कंत्राटदार नेमला जाईल. सभापती महोदय, या कंत्राटदाराला एक महिन्याचा अवधी देण्याचे कारण असे की, त्याच्याकडून जर अशाप्रकारे आपण काम काढून घेतले तर पुन्हा कोर्ट-कचेरीमध्ये ते काम अडकून राहिल. त्यामुळे हा अर्धवट खोदलेला व वाईट अवस्थेत रस्ता तसाच राहील.त्यामुळे शक्यतोवर त्याच्याकडून काम करुन घेण्याचा आपला प्रयत्न आहे. परंतु जर तो काम करीत नाही हे आपल्या लक्षात आल्यानंतर बॅकेच्या माध्यमातून हे काम दुसऱ्या कंत्राटदाराला देण्याचा निर्णय घेतला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यानंतर लोणार सरोवराच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला आहे. त्याकरिता आजच्या पुरवणी मागण्यांमध्ये 10 कोटींची तरतूद करण्यात आली असून ते 10 कोटी रुपये उपलब्ध होतील अशाप्रकारे आपण कारवाई करीत आहोत. याबाबत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडे पी.आय.एल. व्दारे मागणी करण्यात आली होती. माननीय न्यायालयाच्या आदेशानुसार ॲड. अरुण निगवेकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय समिती नेमली असून त्या समितीमार्फत जी जी कामे सांगितली जात आहेत त्याप्रमाणे ती कामे केली जात आहेत. सांडपाणी निर्मूलन प्रकल्प हा निरी, नागपूर या संस्थेव्दारे राबविण्यात येत आहे. सरोवरातील शेत जमीन धारकांचे पुनर्वसन, सुबाभूळ वनस्पतींचे निर्मूलन करणे त्याचबरोबर त्या परिसरामध्ये अतिशय प्राचीन, जुनी मंदीरे आहेत त्याचेसुध्दा पुनरुज्जीवन करण्याचे काम आपण करीत आहोत त्यासाठी पैसे कमी पडू दिले जाणार नाहीत.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी काही ठिकाणी कामांमध्ये गैर व्यवहाराची प्रकरणे झाली असल्याचे सांगितले त्या बाबतची कागदपत्रे आपण मला देणार आहात. ती कागदपत्रे आपण माझ्याकडे अवश्य सुपूर्द करावीत. त्या बाबतीत कोणत्याही अधिकाऱ्याला अजिबात पाठीशी घातले जाणार नाही, त्यावर कडक कारवाई केली जाईल एवढे मी याठिकाणी नमूद करतो. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मालेगाव आणि मेहकर येथील टोल नाक्याच्या संदर्भात तक्रार केली. बरेचसे टोल नाके एमएसएसआरडीसीकडे आहेत.

अप्रमाणित प्रत / मुद्रणासाठी नाही

DGS/

श्री. छगन भुजबळ....

ही गोष्ट खरी आहे की, ज्यांच्याकडे शासनाची काहीही परवानगी नाही असे काही गुंड व दादा प्रवृत्तीचे लोक टोल वसूल करीत असतील व करीत आहेत असे समजून मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर आणि डेप्युटी इंजिनिअर यांनी या बाबत त्वरित कारवाई केली पाहिजे. याउपर जर तक्रार आली की, एखाद्या ठिकाणी बेकायदेशीर रित्या टोल वसूल केला जात आहे व तसे निदर्शनास आले तर तेथील एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर आणि डेप्युटी इंजिनिअर यांना जबाबदार धरले जाईल आणि प्रसंगी त्यांना ताबडतोब बडतर्फ सुध्दा केले जाईल. त्यामुळे त्यांनी आपापल्या हद्दीमध्ये असलेले जे रस्ते असतील तेथील टोल कोण गोळा करीत आहे हे पाहून जर तेथे चुकीचा माणूस दादागिरी करुन टोल गोळा करीत असेल तर त्याची पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करुन त्याच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे आणि मी आजच अशा प्रकारचे आदेश निगर्मित करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी ठाणे पोलीस निवास, कल्याण न्यायालय इमारत, तहसीलदार कार्यालयाच्या दुरुस्तीबाबत सांगितले. यासाठी त्या-त्या विभागाने पैसे दिले तर तेथेही दुरुस्तीचे काम होऊ शकते.आज सुध्दा मी याठिकाणी इमारतींच्या दुरुस्तीच्या संदर्भातील ज्या पुरवणी मागण्या मांडलेल्या आहेत आणि सन्माननीय सदस्य नवीन कामाबाबत सांगत आहेत. याठिकाणी इमारतींच्या दुरुस्तीबाबत दरवर्षी 750 कोटी रुपये संपूर्ण राज्यातील सर्व शासकीय इमारती आणि इतर इमारतींच्या दुरुस्तीसाठी मिळतात.पण यावेळेला 200-225 कोटी रुपये कमी मिळाले.जर संबंधित विभागांनी निधी उपलब्ध करुन दिला तर मग नवीन इमारती बांधण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी टोलच्या बाबतीत तक्रार केलेली आहे. यासंबंधातील सर्व फॉर्मेट केंद्र शासनाने तयार केलेला आहे, त्यानुसार काम केले जाते आणि त्या प्रमाणे टेंडर काढली जातात. परंतु हे खरे आहे की, लोकांना असे वाटते की, या रस्त्याचे काम 100 रुपयाचे झाले असताना 200 ते 300 रुपये टोल कसा गोळा केला जातो आणि याबाबत लोकांच्या मनामध्ये शंका येणे स्वाभाविक आहे. परंतु याठिकाणी 100 रुपयाचे काम झालेले असले तरी तेथील भू-संपादन किंवा इतर काही वायर्स् किंवा पाईप लाईन्स वगैरे गेल्या असतील त्याचे पैसे वेगळे असतात. दुसरी गोष्ट म्हणजे जेव्हा संबंधित उद्योजक बँकेतून 100 रुपये कर्जरुपाने घेत आहे.तेव्हा त्यावर चक्रवाढ पध्दतीने व्याज द्यावयाचे असते. आज सुध्दा आपण जर एखादी गाडी दोन लाख रुपयांना घेतली तर पाच वर्षामध्ये त्याचे चार लाख रुपये होतात. हे पैसे 15-20 वर्षे फेडत असताना बँकेचे व्याजावर व्याज म्हणजे मुद्दल अधिक व्याज फार मोठ्या प्रमाणात वाढते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हे आपल्याला लक्षात घेतले पाहिजे आणि तो खर्च सुध्दा तेथूनच येतो. त्यानंतर दर तीन ते पाच वर्षाच्या कालावधीमध्ये त्या पूर्ण रस्त्याचे पूर्णपणे रिन्युअल करावे लागते आणि तोही खर्च यामध्येच येतो. तसेच टोल जमा करण्यासाठी तेथे जी आस्थापना ठेवावी लागते, त्यासाठी लागणारा खर्च यामध्येच आहे. म्हणून येथे 100 रुपयाचे प्रत्यक्ष काम झाले असले तरी सुध्दा टोल दुप्पट-तिप्पट स्वरुपामध्ये जातो. कारण आपण तो 15-20 वर्षापर्यंत गोळा करीत असतो आणि हे सर्व समजून घेणे गरजेचे आहे.या सगळया गोष्टी फायनान्स विभाग अतिशय काटेकोरपणे पहात असतो. चेकींग करीत असतो, दुरुस्त्या करीत असतो आणि याबाबतीत ज्या क्वेरिज येत आहेत त्याचीही उत्तरे दिली जातात.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी श्री.अण्णा हजारे यांच्या बाबतीत सांगितले. मागच्या वर्षी श्री.अण्णा हजारे माननीय मुख्यमंत्र्यांकडे आले होते, त्यांची एक बैठक झाली आणि त्यावेळी त्यांनी काही सूचना केल्या होत्या. हे खरे आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाने तीन समित्या नेमलेल्या आहेत. एका समितीचे काम असे होते की, टोल नाक्यावर जी गर्दी होते, त्यावर महापास निर्माण करण्याचे काम त्यांच्याकडे देण्यात आले असून सदर काम हे टेंडर स्टेजला आहे. एक सेन्सर असते आणि त्याला एक टॅग लावलेला असतो. आपण टोलच्या मार्गाने जात असताना तेथे उभे न रहाता, आपोआपच या सेन्सरच्या माध्यमातून जो काही टोल असेल तो बँकेतून परस्पर वळता करुन घेण्याची जी सिस्टीम आहे ती इन्स्टॉल करुन घेण्याच्या बाबतीत काम सुरु आहे आणि आपण लवकरच प्रायोगिक तत्वावर ही सिस्टीम सुरु करीत आहोत.

सभापती महोदय, दुसऱ्या समितीच्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक बोर्ड लावून या कामासाठी किती निधी खर्च झाला आहे,बँकेचे किती कर्ज आहे, येथे किती टोल जमा झालेला आहे आणि वर्ष किती शिल्लक आहे वगैरे माहिती मिळण्याच्या दृष्टीने सुरुवातीला प्रायोगिक तत्वावर 26 जानेवारीला जालना-औरंगाबादला अशा प्रकारचे इलेक्ट्रॉनिक्स बोर्ड लावत आहोत आणि तेथे ते यशस्वी ठरल्यानंतर हळूहळू हे बोर्डस् सर्व ठिकाणी लावण्यात येणार आहेत.त्याचबरोबर सार्वजनिक बांधकाम विभागाचे जे टोल नाके आहेत, तेथे सगळीकडे इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पावत्या देण्याचे काम सुरु झालेले आहे.जेणेकरुन फाडलेली पावती,त्यानुसार आलेले पैसे एकूण किती आहेत याची परत एकदा केंद्रीय ठिकाणी मोजणी व्हावी, तेथे जमा व्हावेत आणि एकंदर किती गाड्या गेल्या,त्यानुसार किती पैसे जमा झाले हे लक्षात यावे यासाठी सदरहू सिस्टीम सुरु करण्या-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाबत समिती नेमली होती. त्या समितीचे काम पूर्ण झालेले आहे आणि आता ही सिस्टीम सुध्दा अनेक ठिकाणी सुरु केलेली आहे.

सभापती महोदय, महापासच्या बाबतीत संगणीकृत पावत्या आहेत. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, सार्वजनिक बांधकाम खात्याचे 64 पथकर आहेत, एमएसआरडीसी चे 65 पथकर आहेत आणि नॅशनल हायवेचे आणखी वेगळे टोल नाके आहेत. आमच्या विभागाचे जे टोल नाके आहेत, तेथे संगणकीकृत पावती देण्याच्या दृष्टीने कार्यवाही पूर्ण झालेली आहे. एमएसआरडीच्या 51 पथकर स्थानकावर संगणकीकृत पावती दिली जात आहे. याबाबत ज्या काही वेगवेगळया सूचना करण्यात आल्या, त्याप्रमाणे नवीन कंत्राट करताना आता आपण गाड्यांची मोजणी करीत असतो. पण जर आपल्या अंदाजापेक्षा भविष्यामध्ये गाड्यांची संख्या वाढली तर वाढीव जे पैसे आहेत, त्यातील 75 टक्के निधी शासनाकडे येईल आणि 25 टक्के संबंधितांकडे राहील.अशा प्रकारची सोय आता नवीन निविदेमध्ये केलेली आहे.सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नाशिक फेस्टीवल बाबत सांगितले. अर्थात आज तो विषय नव्हता.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : 5 लाख रुपये देणगी . . . .

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, ती देणगी नाही, ते प्रायोजकत्व ज्याला स्पॉन्सरशीप म्हणतात, तसे आहे. ज्याप्रमाणे आपण मायकल जॅक्सन आणला होता, त्यावेळी आपण स्पॉन्सरशीप घेतली होती. एवढेच आहे की, ...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मायकल जॅक्सनला आणला होता, पण कोट्यावधी रुपयांचा निधी कोणाकडून काम देऊन वसूल केला नव्हता एवढाच मला खुलासा करावयाचा आहे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, माझ्याकडे फोटो आहेत. याठिकाणी जिल्ह्यातील शिवसेनेचे, भारतीय जनता पक्षाचे खासदार, आमदार, त्यांचे जिल्हा प्रमुख, त्यांचे शहर प्रमुख, काँग्रेस, मनसे आणि सगळया पक्षाचे आमदार एकत्रितरित्या येऊन हा कार्यक्रम करीत असतात आणि हा कार्यक्रम महिनाभर असतो. शेवटच्या दिवशी ग्रॅन्ड फिनालेच्या वेळी बॉलीवूड शो असतो आणि तो जवळजवळ दोन लाख लोक फुकट पहात असतात. तेथे बॉलीवूडचे सर्व स्टार जात असतात.म्हणून हा खर्च आहे आणि हा सगळा कार्यक्रम स्पॉन्सर केलेला कार्यक्रम असतो. माझ्या कडे फोटो आहेत आणि यासंबंधातील ज्या जाहिराती आहेत, त्यावर सुध्दा इंडिया बुल्स प्रायोजित पण इंडिया बूल्स् एकच नाही तर त्याठिकाणी व्होकार्ड आहे, प्रोव्होक आहे,पेनिन्सुला आहे, इतरही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सगळे आहेत. "स्टार माझा" चॅनेल आहे ते तर मिडिया पार्टनर आहे आणि ते संपूर्ण शो आणि बॉलीवूड शो सुध्दा कव्हर करीत असतात आणि आपल्या चॅनेलवर दाखवितात. हे सगळे होर्डींगचे आहे.वर्तमान पत्रातील फोटो आहेत आणि पाठीमागचे जे फोटो आहेत यामध्ये इंडिया बूल्स्ने घेतलेले जे प्रायोजकतत्व आहे, त्यासंदर्भात सर्व माहिती आहे.त्यामध्ये सर्व पक्षाचे आमदार, खासदार आहेत. तसेच ते केवळ प्रमुख पाहुणे म्हणून येत नाहीत तर त्यांच्याकडे जबाबदारी असते. कोणी जलतरणचे काम करील, कोणी बॅटमिंटनचे करील, कोणी कबड्डीचे करील तर कोणी रांगोळी प्रदर्शनाचे काम करील तर कोणी ग्रँड फिनालेचे काम करील इ. अशा प्रकारे सगळे काम करीत असतात.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ..

फक्त काही लोकांनी देणगी दिली-देणगी दिली असे म्हटलेले आहे. मी याबाबतीत विधानसभेमध्ये सुध्दा असे सांगितलेले आहे की, छगन भुजबळ यांच्या संस्थेसाठी किंवा छगन भुजबळ यांच्या कुटुंबीयांसाठी गेल्या दोन वर्षात यातून एकही नवा पैसा उचलून दिला असेल तर छगन भुजबळ आपण सांगाल ती शिक्षा भोगावयाला तयार आहे. सभापती महोदय, साप-साप म्हणून भुई थोपटण्याचे काम सुरु आहे. प्रायोजकत्व आणि देणगी यामध्ये गल्लत केली जात आहे. हे सगळे हिशेब ऑडिट केले जातात. असे नाही की, हे सगळे गुपचूप-गुपचूप केले जाते. सगळा चेकचा हिशेब असतो. चेकने पैसे आले आणि चेकनेच पैसे गेले. दोन फेस्टिवल झालेले आहेत आता तिसरा फेस्टिवल सुरु होईल त्या फेस्टिवलसाठी मी मुद्दाम आपणा सर्वांना आमंत्रित करणार आहे, जेणेकरुन या फेस्टिवलचे स्वरुप किती मोठे असते हे आपल्याला पहावयास मिळेल. आपण डर्टी सिनेमा पाहिला नाही तरी चालेल पण हा फेस्टिवल आपण नक्की पहावयास यावे कारण तो अतिशय चांगला आहे. डर्टी सिनेमा बघण्यासही माझी काही हरकत नाही, आपण तो सिनेमाही पहावा.

सभापती महोदय, 373.74 कोटी रुपयांच्या मागण्या या ठिकाणी मांडण्यात आलेल्या आहेत. यामध्ये रस्ते आणि पुलासाठी नाबार्डकडून जे पैसे आहेत ते एकूण 103 कोटी 48 लाख रुपये आहेत. इमारतीसाठी 202.30 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. मी थोडया वेळापूर्वीच या ठिकाणी सांगितले की, दर वर्षी किमान 1/3 रस्त्यांचे नूतनीकरण व्हावयास पाहिजे पण दुर्दैवाने ते होत नाही. 11-11 वर्षांनी त्या रस्त्यांचा नंबर येतो. इमारतींसाठीसुध्दा कमी पैसे आहेत परंतु त्यातूनही जेवढे काम करता येईल तेवढे चांगले काम करण्याचा प्रयत्न करु.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय, श्री. छगन भुजबळ यांनी जाहीरपणे सांगितले आहे की, माझ्या विभागासाठी 28 कोटी रुपये मिळालेले आहेत. 2000 कोटी रुपयांची कामे आहेत त्यामुळे माझी आणि माझ्या खात्याची मुस्कटदाबी होते. सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय, श्री. छगन भुजबळ यांचे दु:ख आम्ही समजू शकतो. त्यामुळे आम्ही त्यांच्या मागण्या मंजूर करतो.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, पैसे कमी आहेत तर कमी आहेत. आता आपण कापसासाठी पैसे देणार आहोत त्यामुळे आणखी कट लागणार आहे. पण चांगल्या कामासाठी पैसे

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ..

दिले जाणार आहेत त्यामुळे रस्त्यांच्या बाबतीत थोडीशी अडचण झाली तर आपण ती शेतकऱ्यांसाठी सहन केली पाहिजे, हे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. सर्वच खात्यांचे पैसे कमी होणार आहेत, त्यातून आमच्या विभागाचे पैसे आणखी जास्त कमी होणार आहेत, होऊ देत. मी हे जाहीरपणे सांगत आहे. पैशांचे सोंग करता येणार नाही. भंडारा जिल्ह्यामध्ये कंत्राटदारांनी काम घेण्यास नकार दिला आहे. शेवटी विभागामार्फत ते काम सुरु आहे. प्रत्येक जिल्ह्यात जवळ जवळ 98 टक्के खड्डे भरण्याचे काम पूर्ण झालेले आहे. भंडारा जिल्ह्यात ते काम केवळ 50 टक्के होऊ शकले कारण निविदा घेण्यास कोणीही कंत्राटदार पुढे आले नाहीत. कंत्राटदारांनी काम करण्यास नकार दिला, अशी परिस्थिती आहे. सभापती महोदय, अधिक न बोलता जवळ जवळ सर्व प्रश्नांची उत्तरे मी दिलेली आहेत, काही प्रश्नांची उत्तरे देण्याचे राहिले असेल तर निश्चितपणे पत्राद्वारे मी ती उत्तरे देईन. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या आणि पर्यटन खात्याच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सर्व सन्माननीय सभासदांना विनंती करतो.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील (ग्रामविकास मंत्री) : सभापती महोदय, ग्रामविकास विभागाच्या 100 कोटी 13 लाख 94 हजार रुपयाच्या पूरक मागण्या सभागृहासमोर मांडण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकात पाटील यांनी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या खर्चावर बोलत असताना असे सांगितले की, ग्राम पंचायत व जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये दालनाच्या आतल्या बाजूला जास्त निरीक्षक ठेवण्यात येऊ नयेत, ते बाहेर असावेत तसेच निवडणुकीच्या मशीन्सच्या बाबतीत त्यांनी काही सूचना केलेल्या आहेत. हा निवडणुकीच्या मशीन्सच्या दुरुस्तीचा खर्च नाही तर निवडणूक मशीन्स नव्याने उपलब्ध करुन देण्याच्या खर्चाचा भाग आहे. राज्य शासनाला या संदर्भात काही अधिकार नाहीत पण सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना निवडणूक आयोगाला कळविण्याची व्यवस्था करण्यात येईल. सभापती महोदय, ग्रामविकास विभागाच्या पूरक मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापतीस्थानी माननीय उप सभापती

श्री. भास्कर जाधव (बंदर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मत्स्य विभागाच्या मागण्यांना मान्यता मागत असताना सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांचा पहिला प्रश्न असा होता की, मांडवा जेट्टी बांधून तयार आहे परंतु अद्यापपर्यंत तिचे उद्घाटन करुन ती वापरासाठी का घेतली जात नाही. सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, मांडवा जेट्टीचे काम खूप रखडले होते. मध्यंतरी मी त्या संपूर्ण जेट्टीला भेटी दिल्या. त्या ठिकाणी केंद्र शासनाच्या निधीतून दोन चांगल्या प्रकारची बंदरे होत आहेत त्यासाठी केंद्रीय कृषी आणि मत्स्यविकास मंत्री आदरणीय पवार साहेबांनी मोठया प्रमाणात निधी मंजूर केलेला आहे. त्या बंदरांची देखील मी पाहणी केलेली आहे. मांडवा जेट्टीच्या रखडलेल्या कामांची सुध्दा मी पाहणी केलेली आहे. तेथे प्रमुख अडचणीचा मुद्दा असा आहे की, त्या ठिकाणी जे पिलर उभे आहेत. त्या दोन पिलरमध्ये मोठी गॅप आहे. त्यामुळे त्या दोन पिलरमधून लहान बोटी पार्क केल्यानंतर किंवा उतरण्याकरिता उभ्या केल्यानंतर त्या कदाचित पाण्याच्या लाटेबरोबर आतमध्ये जाऊ शकतात आणि एखादी दुर्घटना होऊ शकते. वास्तविक पहाता ते डिझाईन तयार करतानांच या संबधीची काळजी घ्यावयास पाहिजे होती परंतु तशी ती घेतली गेली नाही, त्यामुळे तो थोडासा अडचणीचा मुद्दा होता. लहान बोट दोन पिलरच्या गॅपमधून जाऊ नये याकरिता लोखंडी गर्डर त्या ठिकाणी टाकून तो विषय आता संपविलेला आहे. तसेच त्या ठिकाणचे बाकीचे जे काम मला योग्य वाटत नव्हते ते पुन्हा करण्यात आले आहे. त्यामुळे लवकरच सर्व सन्माननीय सदस्यांना घेऊन त्या जेट्टीचे उद्घाटन करुन ती जेट्टी वापरात घेता येईल. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी असे संगितले की, "ते माझ्या स्वागता करिता त्या ठिकाणी उभे होते." सन्माननीय सदस्य माझ्या स्वागताकरिता उभे होते की नाही मला माहीत नाही, पण माझ्यावर बहिष्कार होता हे मात्र मला नक्की माहीत आहे. त्यामुळे आपण मला कुठे दिसला नाहीत.

सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकही ब्रेक वॉटर बांधलेले नाही. त्यामुळे या ठिकाणी बोटीने खुल्या समुद्रातून प्रवाशी वाहतूक करता येणार नाही, अशा प्रकारचा मुद्दा या

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव..

ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी मांडलेला आहे. सन्माननीय सदस्यांचे अनुभव विचारात घेता येतील. या संदर्भात एमएसआरडीसी कडून सर्व्हे सुरु आहे. ही जलवाहतूक सुरु करण्याकरिता काय करावे लागेल, कशा प्रकारची आखणी करावी लागेल, कोणकोणत्या उपाययोजना कराव्या लागतील याचा एकंदर अभ्यास सुरु आहे. मुंबईतील बोरिवली ते गेट-वे ऑफ इंडिया या वाहतुकीचा या ठिकाणी उल्लेख करण्यात आला आहे. दोन्ही बाजू पडताळून पाहिल्या जात आहेत. एका बाजूने एमएमआरडीए अहवाल देत आहे आणि दुसऱ्या बाजूने एमएसआरडीसी सुध्दा अहवाल देत आहे. या विषयाच्या संदर्भात शासन अंतिम निर्णयाप्रत आले नसले तरी सुध्दा शासन जलबाहतूक करण्याकरिता प्रयत्नशील आहे एवढेच मी आजच्या दिवशी सांगू इच्छितो.

सन्माननीय सदस्यांचा दुसरा मुद्दा असा होता की, बोटींना समुद्रामध्ये पार्किंग म्हणजे नांगरुन ठेवण्याची व्यवस्था नाही. या क्षणापर्यंत या मुद्याच्या बाबतीत बंदर विकास विभागाचे पाहिजे तेवढे लक्ष गेले होते, असे मी म्हणणार नाही. परंतु जयगड येथे सर्वात सुरक्षित असे बंदर आहे तशाच पध्दतीने प्रवाशी वाहतूक करणाऱ्या बोटी मोठया प्रमाणात वाढल्यामुळे त्यांना पार्किंग करिता म्हणजे नांगरुन ठेवण्याकरिता एक सुरक्षित जागा बघितली जाईल. सन्माननीय सदस्यांनी धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या बाबतीत महत्वाची गोष्ट संगितलेली आहे. हे बंधारे दगडाने बांधण्याऐवजी मातीने बांधण्यात येत आहेत त्यामुळे त्यांची नंतर खूप मोठया प्रमाणात धूप होते. खरे तर गॅबियन टाईपचे म्हणजे दगडांचे बंधारे बांधतो तशा प्रकारचेच बंधारे बांधावेत अशा प्रकारच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत. परंतु पूर्वीच्या काळात हा बंधारा मातीचा मंजूर झाला होता काय या बाबतची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती घेऊन त्या ठिकाणी नाहक मातीचा बंधारा बांधून तो धुपणार असेल . . .

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत/शोधनेसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

नाहक माती समुद्रामध्ये जाऊन पडणार असेल तर त्यामध्ये सुध्दा बदल करुन गॅब्रियन पध्दतीने बंधारा बांधण्याच्या बाबतील विचार केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी दीपगृहाबाबत सांगितले. बोटी जात असताना रात्रीचा जो फिरता लाईट किंवा सिग्नल असतो त्याला दीपगृह म्हणतात. रात्री बोटी चालविणाऱ्या लोकांना पाण्यामध्ये दुसरा कोणताही अंदाज नसतो त्यामुळे दीपगृहांच्या अंदाजावर ते बोटी चालवित असतात. कोणती दीपगृहे बंद आहेत हे सन्माननीय सदस्यांनी सांगितले नाही. परंतु रत्नागिरीमधील जी दीपगृहे बंद होती ती सगळी चालू करुन घेतलेली आहेत. सिंधुदुर्गमध्ये दीपगृह बंद असेल तर ते सुध्दा चालू केले जाईल. आपल्या बंदर विकास विभागामार्फत महाराष्ट्र शासनाने नुकतीच पोर्ट पॉलिसी जाहीर केलेली आहे. हे बंदर विकास धोरण अत्यंत चांगले आहे. कोकण किनारपट्टीत आयडेंटिफाय झालेली जी 48 बंदरे आहेत त्या बंदरांचा विकास गेली कित्येक वर्षे ज्या प्रमाणात व्हावयास पाहिजे होता तसा झाला नाही. यापूर्वी सुध्दा एक पोर्ट पॉलिसी जाहीर झाली होती परंतु त्या पोर्ट पॉलिसीला समोरच्या विकासकांकडून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे आता शासनाने खूप चांगल्या प्रकारची, आकर्षित करणारी पोर्ट पॉलिसी तयार केलेली आहे. त्याला उत्तम प्रकारचा प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे लवकरच समुद्र किनाऱ्यावरील बंदराचा विकास होऊन त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विकासक मिळतील आणि बंदर विकासाकरिता मोठ्या प्रमाणामध्ये उत्पन्नाचे साधन निर्माण होईल.

खरे म्हणजे आपल्याकडे जे महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड आहे ते स्वत:च्या उत्पन्नावर चालणारे आहे. या बोर्डाला शासनाकडून मोठ्या प्रमाणावर पैसे मिळत नाहीत परंतु आता केंद्र शासनाकडून मोठ्या प्रमाणामध्ये पैसे मिळत आहेत. आजच्या ज्या पुरवणी मागण्या आहेत त्यामध्ये 16 कामांकरिता 98 कोटी 7 लाख रुपये इतका खर्च येणार आहे. त्यापैकी 95 टक्के रक्कम म्हणजे 93 कोटी 18 लाख रुपये नाबार्डकडून कर्ज मिळणार आहे आणि 5 टक्के रक्कम म्हणजे 4 कोटी 90 लाख रुपये राज्य शासनाकडून उपलब्ध होणार आहेत. ही रक्कम 2011-2012 मध्ये खर्च करण्यास आम्हाला केंद्र शासनाने परवानगी दिलेली आहे. त्यामुळे ही जी 1 हजार रुपयांची पूरक मागणी आहे त्याला मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो. ..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

सभापती महोदय, बंदर विकासाचा जो दुसरा प्रश्न आहे त्या संदर्भात या ठिकाणी मी सांगितलेले आहे. त्यामध्ये आणखी वेगळे काही सांगण्याची आवश्यकता नाही. परंतु आपल्याला केंद्र सरकारकडून एकंदर 205 कोटी रुपये चार वर्षाकरिता मिळणार आहेत. तीन वर्षे 51-51 कोटी रुपये मिळणार आहेत आणि नंतर 25 कोटी रुपये मिळणार आहेत. या 51 कोटी रुपयांच्या अगेन्स्ट आताच आपल्याला 20 कोटी रुपये केंद्र सरकारकडून मिळणार आहेत आणि बाकीचे 31 कोटी 25 लाख रुपये नक्की मिळतील. याबाबत अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली पाहिजे यासाठी ही पूरक मागणी या ठिकाणी आलेली आहे. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारची 110 कामे घ्यावयाची आहेत. दुसरा विषय आशियायी बँक अर्थसहाय्यित शाश्वत किनारा संरक्षण याबाबतचा आहे. खरे तर मार्च महिन्याच्या बजेटमध्येच ही रक्कम बदललेली आहे परंतु त्याचा कोडनंबर थोडासा चुकलेला होता. तो कोडनंबर बदलून या ठिकाणी बँकेमध्ये अकाऊंट उघडावयाचे आणि आहे तीच रक्कम त्या ठिकाणी द्यावयाची एवढ्यापुरताच हा मर्यादित विषय आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी सांगितले की, खार जमिनीकरिता मोठ्या प्रमाणामध्ये पैसे मिळत नाहीत. मघाशी माननीय श्री. जयंतराव पाटील यांनी सुध्दा ही बाब माननीय अर्थमंत्र्यांच्या लक्षात आणून दिलेली आहे. परंतु कोणत्याही परिस्थितीमध्ये पुढच्या काळामध्ये या खार जमिनी विकसित करण्याकरिता, समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून या जमिनीचे संरक्षण करण्याकरिता मोठ्या प्रमाणावर पैसे उपलब्ध होण्याची आवश्यकता आहे. आता उणेपुरे एकूण 26 कोटी रुपये मिळतात. परंतु ही अत्यंत अल्प रक्कम आहे. त्यामध्ये पुढच्या काळामध्ये निश्चितपणे वाढ केली जाईल अशा प्रकारची ग्वाही मी आपल्याला देतो. या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, उद्योग विभागाच्या वतीने ज्या पूरक मागण्या सभागृहासमोर चर्चेसाठी आलेल्या आहेत त्या संदर्भात चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी काही अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत. आपण या मागण्यांकडे पाहिजे तर कोकणामध्ये काजू प्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी आपण 10 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यांनी अपेक्षा व्यक्त केली की, आपण ज्याप्रमाणे द्राक्षापासून वाईन तयार करण्यासाठी मदत करतो त्याप्रमाणे जांभळाच्या संदर्भात उद्योग तयार करण्यासाठी प्रोत्साहन द्यावयाचे आहे. काही बाबतीत आपण निश्चितपणे ॲग्रो इंडस्ट्रीजचे धोरण आणण्याचा प्रयत्न करणार आहोत. त्यामध्ये याची निश्चितपणे दखल घेतली जाईल. सभापती महोदय, उद्योग विभागाच्या बाब क्रमांक 111 व बाब क्रमांक 117 ते 120 या पूरक मागण्या मान्य कराव्यात अशी सभागृहाला विनंती करतो.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, वस्त्रोद्योग विभागाच्या बाब क्रमांक 210 ते 213, बाब क्रमांक 215, बाब क्रमांक 218 ते 220 यामध्ये योजनांतर्गत योजनांसाठी एकूण 100 कोटी 7 लाख 26 हजार रुपयांच्या तसेच योजनेतर योजनांसाठी 106 कोटी 97 लाख 95 हजार एवढ्या रकमेच्या पूरक मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य, महिला व बालविकास, अल्पसंख्यांक विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, महिला व बालकल्याण विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग या तीन विभागाच्या पूरक मागण्या सभागृहासमोर चर्चेसाठी आहेत. महिला व बालविकास विभागाच्या बाब क्रमांक 235, 236, 237, 238 व 239 या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करते.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी भाग घेतला. बाल हक्क संरक्षण आयोगाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली. सदस्यांचे पुनर्गठन करण्याचे काम सुरु आहे. हा खर्च फक्त कार्यालयीन कामासाठी, फर्निचरसाठी आहे एवढेच मला सांगावयाचे आहे. बाल न्यायालयाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला. राज्यातील प्रत्येक जिल्हयाच्या सत्र न्यायालयातील सर्वात वरिष्ठ अतिरिक्त सत्र न्यायाधीशाला बाल न्यायालय म्हणून विनिर्दिष्ट केलेले आहे. सर्व सरकारी अभियोक्ता व सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून स्पेसिफाय केलेले आहे. सबला स्किमच्या संदर्भातील एक मुद्दा सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मांडला. त्यांनी सांगितले की, सबला योजनेमध्ये काही कीट्स खरेदी करण्यात आले. या योजनेमध्ये कोणतेही किशोरी कीट्स खरेदी करण्यात आलेले नाही. सबला स्किमच्या अंतर्गत आपण ते करत नाही.

डॉ. दीपक सावंत : आपण मागणीमध्ये प्रशिक्षण कीट्स तयार करण्यात आलेल्या आहेत असे म्हटले आहे. आपण मूळ मागणी वाचली तर आपल्या लक्षात येईल.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे अशी कोणतीही कीट खरेदी करण्यात आलेली नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी विचारले की, चंद्रपूरला इंदिरा गांधी योजनेमध्ये समाविष्ट का करु शकत नाही ? आपण तसा समावेश करु शकत नाही. कारण या योजनेमध्ये 100 टक्के केंद्र शासनाचे अनुदान आहे आणि त्यांचीच यादी आहे. त्यामध्ये आपल्याला कोणत्याही जिल्ह्याचा समावेश करण्याचा अधिकार नाही. प्रायोगिक तत्वावर त्यांनी 11 जिल्हे निवडलेले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : आपण शिफारस करु शकतो.

प्रा. फौजिया खान : आपल्याला शिफारस करता येईल. सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 177, 178, 179, 180, 181,182, 183 व 184 या सर्व मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करते. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी श्री. टी. एस. शिंदे यांच्या सेवानिवृत्तीबद्दल सांगितले. त्याचा फॉलोअप आम्ही घेत आहोत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. पुरवणी मागण्यांमध्ये पृष्ठ क्रमांक 252 वरील बाब क्रमांक 238 मध्ये असे म्हटले आहे की, या प्रस्तावात, प्रशिक्षण कीट, सखी सहेली प्रशिक्षण, आरोग्य, जीवन कौशल्य, व्यावयायिक प्रशिक्षण, परिवहन, नोंदणी आरोग्य कार्ड यांच्यासाठी 3 कोटी 93 लाख रुपय इतक्या अनावर्ती खर्चाचा समावेश आहे.

प्रा. फौजिया खान : परंतु मी सांगितले की, अजून ते खरेदी केलेली नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी ही पूरक मागणी आलेली आहे. पूरक मागणी कशाला म्हणतात ?

प्रा. फौजिया खान : खरेदी व्हावयाची आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सन्माननीय मंत्री महोदयांना प्रशिक्षण किट म्हणजे काय किंवा त्या खर्चाचे हेड तरी माहीत आहे काय, याबाबत त्यांनी खुलासा करावा.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आरोग्य विभागाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबत विभागाकडून पाठपुरावा सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांच्या रिक्त जागांचा मुद्दा उपस्थित केला होता. प्राथमिक आरोग्य केंद्रातील विशेष तज्ज्ञ डॉक्टरांच्या नेमणुकीसाठी जाहिरात देऊन त्या जागा भरणार आहोत. सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्ह्यात जाण्यास जे एमबीबीएस झालेले डॉक्टर्स इच्छुक आहेत त्यांच्यासाठी अधिक मार्क्स ठेवलेले आहेत. त्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. कर्जतमधील एका डॉक्टरचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्यांच्या संदर्भात योग्य तो निर्णय घेतला जाईल किंवा योग्य ती कारवाई केली जाईल. कंत्राटी पध्दतीच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा येथे मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. माननीय वित्त मंत्र्यांच्या माध्यमातून जवळपास 75 टक्के देयके मंजूर केलेली आहेत. कंत्राटी पध्दतीने काम करीत असलेले रुग्णालयातील, मनोरुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या प्रश्नाचे निवारण होईल. राज्यातील मनोरुग्णालयाचे काम खाजगी लोकांना दिले जाणार नाही, सन्माननीय सदस्यांनी आपल्या मनात ही भीती बाळगू नये. शासनाकडेच ही रुग्णालये राहणार आहेत. बीओटीचा विचार करीत आहोत. परंतु त्याबाबत शासनाचा निर्णय झालेला नाही.

सभापती महोदय, अल्पसंख्याक विभागाच्या, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या, महिला व बालविकास विभागाच्या मागण्या व इतर विभागांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करते आणि येथेच थांबते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (वित्त, नियोजन, जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या जलसंपदा विभागाच्या, वित्त विभागाच्या, नियोजन विभागाच्या व ऊर्जा विभागाच्या पूरक मागण्यांवरील चर्चेला उत्तर देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते, रामदास कदम, परशुराम उपरकर, डॉ.दीपक सावंत व सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी या चर्चेत भाग घेतला आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी गोसीखूर्द प्रकल्पाचा निधी शासनाने रोखून धरला आहे काय असे विचारले होते. सन 2008-2009 मध्ये 450 कोटी रुपये, सन 2009-2010 मध्ये 720 कोटी रुपये, सन 2010-2011 मध्ये 635 कोटी रुपये व 6777 कोटी रुपये अशी एकूण 2582 कोटी रुपयांची रक्कम प्राप्त झालेली आहे. सन 2011-2012 या वर्षासाठी शासनाने केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. डिसेंबर अखेरपर्यंत निधी प्राप्त होणार आहे.

सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी डोंगरी विकास कार्यक्रमासाठी विधानपरिषदेच्या सदस्यांना निधी मिळत नसल्याची तक्रार केली आहे. डोंगरी तालुक्यात पूर्ण गटासाठी 1 कोटी व उपगटासाठी 50 लक्ष रुपये मिळतात. सदर निधीतून कामे करण्यासाठी पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली असते. या समितीमार्फत विधानसभा सदस्य व विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या कामांना मंजुरी देता येईल.

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी स्थानिक विकास निधीच्या कामासाठी एनओसी लवकर मिळत नसल्याचे सांगितले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीतील मालकीच्या संस्थांकडे जागा असतात. त्या जागेवर स्थानिक विकास निधी अंतर्गत खर्च करता येतो. परंतु त्या जागा खाजगी असतील तर तेथे विकासाची कामे करता येत नाहीत, शासकीय जागा असतील तर ते काम आपण करु शकतो. त्यासाठी देखभाल व एनओसीची अट आहे. 45 दिवसात एनओसी मिळाली पाहिजे. या कालावधीत एनओसी न मिळाल्यास ती मिळाल्याचे गृहित धरण्याबाबत भविष्यात निर्णय घेण्यात येईल.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सभागृहाची वेळ संध्याकाळी 6 वाजेपर्यंत होती. सभागृहाची वेळ संध्याकाळी 7 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 95 ते 106 वरील पुरवणी मागण्या, वित्त विभागाच्या बाब क्रमांक 66 ते 69 वरील पुरवणी मागण्या, नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 154, 158 ते 174 वरील पुरवणी मागण्या व ऊर्जा विभागाच्या बाब क्रमांक 114 ते 116, 121 व 122 वरील पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी जीगाव प्रकल्पासंबंधी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्याबाबत मंत्री महोदयांनी काहीच उत्तर दिले नाही. कृपया याबाबत त्यांनी खुलासा करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी लेखी स्वरुपात उत्तर पाठवीन.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र गावित (आदिवासी विकास व कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, कामगार विभागाच्या पुरवणी मागण्यांवर केवळ सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी आपले विचार मांडले आहेत. राज्यात जी मनोरुग्णालये आहेत त्या ठिकाणी कंत्राटी पध्दतीने 108 कामगार काम करीत आहेत. त्यांना सप्टेंबर, 2011 ते नोव्हेंबर, 2011 पर्यंत जवळजवळ 17 लाख 69 हजार रुपयांचे वेतन प्रदान केलेले आहे. त्यांच्या वेतनाची कोणतीही थकबाकी राहिलेली नाही.

कामगार विभागाच्या बाब क्रमांक 112 व 113 वरील या दोन व विशेष सहाय्य विभागाची बाब क्र.140 ही एक अशा एकूण 3 पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर (कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास, जलसंधारण, रोजगार व स्वयं रोजगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या जलसंधारण विभाग, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, रोजगार हमी योजना, पशुसंवर्धन व दुग्धविकास विभाग या विभागांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देण्यासाठी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी मालगुजारी तलावाच्या दुरुस्तीसाठी 30 हजार रुपयांचे आर्थिक निकष लावावेत अशी सूचना केली आहे. यापूर्वी या तलावांच्या दुरुस्तीसाठी दिनांक 6 जानेवारी रोजीच्या जी.आर.नुसार हेक्टरी 21 हजार रुपयांचे निकष होते, आता त्यात सुधारणा करुन हेक्टरी 28 हजार रुपयांपर्यंत वाढ केलेली आहे. त्याचप्रमाणे ट्रिपल आर ही केंद्र सरकार पुरस्कृत योजना आहे. या योजनेमध्ये विदर्भाचा कमी अंतर्भाव केलेला आहे किंवा योग्य त्या प्रमाणात विदर्भात ही योजना राबविली जात नाही असा मुद्दा त्यांनी उपस्थित केलेला आहे. विदर्भातील 8 जिल्ह्यांसाठी 668 लघुपाटबंधारे तलावांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव तयार केलेले आहेत, त्यांची किंमत 123 कोटी 39 लाख रुपये इतकी आहे. त्यामुळे 27 हजार 857 हेक्टर सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित करण्यासाठी तरतूद केलेली आहे. या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आलेली आहे.

रोजगार व स्वयंरोजगार या विभागासंबंधी बोलत असताना सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी राज्यात स्वयं रोजगार किती आहेत व किती तरुणांना नोकऱ्या देण्यात आल्या असा प्रश्न विचारला होता. 2010-2011 या वर्षामध्ये 387899 इतकी पदे अधिसूचित होती. त्यापैकी 20 लाख 91 हजार 659 उमेदवारांची पाठवणी केली होती. त्यापैकी 3 लाख 53 हजार 904 उमेदवारांना प्रत्यक्षात नोकऱ्या मिळाल्या आहेत. सन 2011-2012 मध्ये 11 लाख 32 हजार 397 उमेदवारांची पाठवणी केली होती. त्यापैकी 1 लाख 15 हजार 498 उमेदवारांना नोकऱ्या मिळाल्या. मी सभागृहाला विनंती करतो की, जलसंधारण विभागाच्या बाब क्र.125 ते 127, 130 व 131 या पुरवणी मागण्यांना मंजुरी द्यावी.

नंतर श्री.गिते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर...

महोदय, रोजगार हमी योजना विभाग पृष्ठ क्रमांक 162, बाब क्रमांक 153 ही रोजगार हमी योजनेखाली काम करणाऱ्या मजुरांना मजुरी देण्यासंबंधीची आहे. रोजगार हमी योजनेच्या कामांवरील मजुरांना मजुरी देण्यासाठी 50 कोटी रुपयांची पूरक मागणी केलेली आहे. त्यास सभागृहाने मंजुरी द्यावी. त्याचप्रमाणे बाब क्रमांक 20, बाब क्रमांक 15 व बाब क्रमांक 17 अनुक्रमे 39 कोटी 5 लाख 45 हजार 322 व 3 कोटी 62 लाख 29 हजार 24 तसेच 3 कोटी 24 लाख 76 हजार 924 रुपये एवढया रकमेच्या माझ्या विभागाच्या मागण्या आहे, त्यास सभागृहाने मंजुरी द्यावी. त्याचप्रमाणे रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी. तसेच पशुसंवर्धन विभागाच्या बाब क्रमांक 46 ते 49 च्या अनुषंगाने 5 कोटी 3 हजार रुपयांच्या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी मी विनंती करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.पद्माकर वळवी (क्रीडा व युवक कल्याण मंत्री) : सभापती महोदय, क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या पूरक मागण्यांवर सन्माननीय सदस्य सर्वश्री. संजय केळकर, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते यांनी आपले विचार व्यक्त केले.

सभापती महोदय, शिवछत्रपती पुरस्कार गेल्या दोन वर्षापासून दिले गेले नाहीत असा सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी मुद्दा उपस्थित केला. सदर पुरस्कार देण्याची लवकरच कार्यवाही करणार आहोत. शिवछपत्रपती पुरस्कार देण्यासंदर्भात जो काही क्रायरेटिया आहे, त्यात बदल करण्याची प्रक्रिया चालू आहे. ती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सदर पुरस्कार लागलीच वितरित करण्यात येतील.

सभापती महोदय, या ठिकाणी क्रीडा धोरणा विषयी विचारणा केली गेली आहे. त्याबाबतीत सांगू इच्छितो की, क्रीडा धोरण लवकरच जाहीर व्हावे अशी जनतेची तसेच दोन्ही सभागृहातील सदस्यांची इच्छा आहे. क्रीडा धोरण अंतिम टप्प्यात आहे. नवीन क्रीडा धोरणास मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन ते लवकरात लवकर जाहीर करु.

सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकात पाटील यांनी क्रीडापटुंना शासकीय नोकरी देण्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला. मागच्या महिन्यामध्ये वर्ग-1 च्या 8 आणि वर्ग-2 च्या 4 अशा 12 खेळाडूंची निवड केलेली आहे. त्यांना नियुक्ती देण्यासंबंधीची कार्यवाही लवकरात लवकर होणार आहे. दोन खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून नेमणुका दिल्या आहेत. उर्वरित 10 खेळाडू आहेत, त्यांना नेमणुका देण्यासंबंधीच्या इतर विभागांचा संबंध येत असल्यामुळे विलंब होत आहे. परंतु त्या 10 खेळाडूंना नेमणुका देण्याबाबतची देखील कार्यवाही लवकरात लवकर होईल.

सन्माननीय सदस्य श्री.मोते यांनी कोच नेमण्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला. 153 कोचसाठी पूरक मागणी मागितलेली आहे. 153 कोच हे मानधन बेसीसवर नेमण्यात येणार आहेत. कायम स्वरुपी कोचच्या 24 जागा रिक्त आहेत. त्या रिक्त जागा देखील लवकरात लवकर भरुन काढण्यात येतील. इयत्ता 10 वी आणि इयत्ता 12 वी मधील खेळाडूंना आपण 25 गुण देतो. 2010-11 मध्ये 25 गुण देणे हे पूर्वीच्या कार्य पध्दतीप्रमाणेच चालणार आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून फक्त नापास खेळाडूनांच 25 गुण देण्याची कार्यवाही होणार आहे असे मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो.

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.पद्माकर वळवी ...

सभापती महोदय, मागणी क्रमांक ई-3 अंतर्गत बाब क्रमांक 53 व 55 अनुषंगाने 1 कोटी, 50 लाख रुपयांची पूरक मागणी सभागृहाने मंजूर करावी अशी विनंती करतो

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय देवतळे (पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य विभाग) : सभापती महोदय, पर्यावरण व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी जे काही मुद्दे उपस्थित केले, त्याची नोंद घेण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी राज्य नाटय स्पर्धा केंद्र,पुणे येथे परीक्षकांची जी गैरसोय झाली त्यासंबंधी मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबाबतीत सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी स्पर्धा परीक्षकांची गैरसोय झाली होती, ती तत्काळ दूर करण्यात आली होती. सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत क्षेत्रीय कार्यालय नसल्यामुळे या सर्व स्पर्धा समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येतात. त्या ठिकाणी सांकृतिक कार्य विभागाचे क्षेत्रीय कार्यालय निर्माण करुन तेथे चांगले कार्यक्रम राबविले जातील. पर्यावरण व सांस्कृतिक कार्य विभागाच्या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी विनंती करतो.

उपसभापती :सन 2011-2012 करिता खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2002-2003, 2003-2004, 2004-2005, 2005-2006 च्या

अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांवर चर्चा.

उप सभापती : आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेत "सन 2002-2003, 2003-2004, 2004-2005, आणि 2005-2006 या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांवर चर्चा" दर्शविण्यात आली आहे. सन "सन 2002-2003, 2003-2004, 2004-2005, आणि 2005-2006 या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या हया लोकलेखा समितीने केलेल्या शिफारशी अन्वये सभागृहास सोमवार, दिनांक 12 डिसेंबर, 2011 रोजी सादर करण्यात आल्या आहेत. संसदीय प्रथेनुसार या मागण्यांवर चर्चा केली जात नाही.

सन 2002-2003, 2003-2004, 2004-2005, आणि 2005-2006 या वर्षाच्या अतिरिक्त मागण्यांवर सभागृहाने विचार केला आहे.

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व शेतजमीन आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन
(विदर्भ प्रदेश) (सुधारणा) विधेयक.

L. A. BILL NO. XXXIX OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, 1948, THE HYDERABAD TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, 1950 AND THE BOMBAY TENANCY AND AGRICULTURAL LANDS (VIDARBHA REGION) ACT, 1958.)

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 39-मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, 1948,हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम,1950 आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम,1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. प्रकाश सोळखे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 39 मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, 1948,हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम,1950 आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम,1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

हे सुधारणा विधेयक सभागृहासमोर आणलेले आहे. सार्वजनिक प्रयोजनासाठी ज्यांची जमीन संपादित केलेली आहे. त्या संपादनामुळे जे भूमिहीन होतात, त्यांना 10 वर्षापर्यंत त्यांना शेतकरी हा दर्जा मिळतो, परंतु एका दृष्टीने ही अन्यायकारक तरतूद आहे. 10 वर्षानंतर त्यांचा शेतकऱ्यांचा दर्जा काढून घेत होतो. त्यामुळे त्यांना शेतजमीन खरेदी करण्याचा अधिकार रहात नव्हता.आता कलम 63 (1) मधील (खंड-ब) मध्ये असलेल्या परंतुका नंतर एक स्पष्टीकरण आपण देत आहोत....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके.....

ज्या तारखेला जमिनीचे भूसंपादन झाले, त्या तारखेपासून भूमिहीन झालेल्या व्यक्तिच्या व त्याच्या वारसाचा वंश परंपरागत समावेश राहील असे स्पष्टीकरण देऊन ही कायद्यातील अन्यायकारक तरतूद दूर करण्याचे काम या सुधारणेच्या माध्यमातून केले आहे. अनेक माननीय सदस्यांनी अशासकीय ठरावाच्या माध्यमातून सभागृहात उपस्थित केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने हा अन्याय दूर करण्याची वारंवार मागणी केली होती. त्या मागणीला अनुसरुन हे सुधारणा विधेयक सभागृहापुढे मांडण्यात आले आहे. मी सभागृहाला हे विधेयक एकमताने संमत करण्यात यावे अशी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहापुढे अनेक विधेयके चर्चेसाठी येत असतात. मी शासनाचे या ठिकाणी मनापासून अभिनंदन करतो. अत्यंत क्रांतिकारी असे हे विधेयक आहे. भूसंपादनाला 10 वर्षे झाल्यानंतर शेतकरी म्हणून दर्जा संपुष्टात येत होता. तो दर्जा आता कायमस्वरुपी राहणार आहे. आता त्यांना शेतजमीन विकत घेता येईल अशा प्रकारचा क्रांतिकारक निर्णय शासनाने घेतला त्याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. भविष्यात या निर्णयाला फाटे फुटणार नाहीत अशी तरतूद करावी एवढे बोलून या विधेयकाला पाठिंबा देतो आणि माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी शासनाचे अभिनंदन करण्यासाठी उभा आहे. या विधेयकामध्ये सुधारणा करण्याची मागणी आम्ही केली होती आणि त्या अनुषंगाने हे विधेयक सुधारणेसह या सभागृहापुढे मंजुरीसाठी आलेले आहे. विधानपरिषदेमध्ये मी आणि विधानसभेमध्ये त्या सभागृहाचे माननीय सदस्य श्री.विवेक पाटील आणि श्रीमती मिनाक्षी पाटील यांनी विधेयकामध्ये सुधारणा करण्याची मागणी मांडली होती.

सभापती महोदय, प्रामुख्याने सिडकोने सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या त्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला. भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना सिडकोकडून 12.5 टक्के जमिनीचे पैसे मिळतात परंतु त्यांना जमीन विकत घेता येत नाही अशी परिस्थिती होती. त्या अनुषंगाने या कायद्यात सुधारणा करण्याची आम्ही मागणी केली होती. ज्यांनी प्रकल्पासाठी आपल्या जमिनी शासनाकडे सुपूर्द केल्या त्यांना पुन्हा जमीन खरेदी करावयाची असेल तर त्यांना मुद्रांक शुल्क माफ करावे अशी मी शासनाला सूचना करीत आहे. 12.5 टक्के जमिनीचा मोबदला सिडकोकडून मिळतो. परंतु इतर सार्वजनिक प्रयोजनासाठी शासनाकडून जमीन संपादित केली जाते त्यांना 12.5 टक्के जमिनीचा परतावा मिळत नाही. म्हणून परतावा मिळणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण अत्यंत अल्प असल्यामुळे त्यांना मुद्रांक शुल्क आकारले जाऊ नये अशी मी सूचना करीत आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक आणि हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक-39 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, सदनाचे ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते व श्री.जयंत प्र.पाटील यांनी मनापासून या विधेयकाचे स्वागत केले त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. माननीय

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके.....

सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मुद्रांक शुल्क माफ करण्याची सूचना केली आहे, त्या संदर्भात शासन स्तरावर विचारविनिमय करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल. मी पुन्हा एकदा हे विधेयक सभागृहाने एकमताने संमत करावे, अशी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक-39 संमत झाले आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक.

L. A. BILL NO. LIII OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT,1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 53 मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 53 मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी वि.स.वि.क्रमांक-53 वर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, महानगरपालिकेमध्ये जे बेकायदेशीर काम केले जाते ते तातडीने बंद झाले पाहिजे. आदर्श इमारतीचा घोटाळा झाला आणि त्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी शासनाने आयोग स्थापन केला आहे. या आयोगाची चौकशी अद्याप पूर्ण झालेली नाही. आदर्श घोटाळा प्रकरणाची चौकशी करण्यासाठी शासनाने न्या.पाटील आणि माजी मुख्य सचिव श्री.पी.सुब्रम्हण्यम यांचा समावेश असलेला चौकशी आयोग स्थापन केला. या आयोगाचा रोजचा खर्च 3 लाख रुपये आहे. त्यांनी तीन मुद्यांबाबत चौकशी करायची आहे. ही इमारत ज्या भूखंडावर उभी आहे तो भूखंड लष्कराचा होता, राज्य सरकारचा होता की कारगिल युध्दात वीरमरण पत्करलेल्या सैनिकांच्या वारसांसाठी देण्यात आला होता याची चौकशी या आयोगाने करावयाची आहे. मंत्री महोदय महसूल खात्याचे राज्यमंत्री आहेत. ज्यावेळी बँकेकडून कर्ज दिले जाते त्यावेळी बँकेमार्फत कर्जदाराच्या संपत्तीबाबत टायटल रिपोर्ट मागविला जातो. आदर्श इमारत घोटाळा प्रकरणामध्ये या राज्याचे तीन माजी मुख्यमंत्री गोवले गेले आहेत. त्यांची या प्रकरणात नावे घेतली जात आहेत. एका मुख्यमंत्र्यांना या प्रकरणामुळे आपले पद गमवावे लागले आहे.

सभापती महोदय, या आयोगाचा रोजचा खर्च किती आहे? सुनावणीच्या कामासाठी ॲड.दीपन मर्चंट यांना दररोज 40 हजार रुपये फी दिली जाते. ज्येष्ठ सरकारी वकील ॲड.ठाकरे यांना दररोज 1.15 लाख रुपये फी दिली जाते.

नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / मुद्रणासाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

संरक्षण खात्याचे वकील श्री. उज्वल निकम यांना प्रति दिन 50 हजार रुपये देण्यात येणार आहेत मात्र त्यांनी त्यांचे वकील पत्र सोडलेले आहे. अशा प्रकारे या चौकशीला मुदतवाढ देऊन दिवसेदिवस शासनावर त्याचा बोजा पडत आहे. आतापर्यंत या चौकशी समितीवर 3 लाख रुपये इतका खर्च झालेला आहे तरीही चौकशी पूर्ण झालेली नाही. मी पेशाने वकील नाही पण तरी देखील मी एक तासामध्ये ही सर्व कागदपत्रे शासनाकडे देऊन या प्रकरणाची चौकशी सुध्दा करु शकतो. या समितीने लष्कराच्या 50 आणि इतर सर्व मिळून 200 अधिकाऱ्यांची चौकशी आतापर्यंत केलेली आहे. या अधिवेशनात पुन्या या चौकशीला मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव येत असल्याचे समजते. अशा प्रकारे महापालिकेच्या क्षेत्रात होत असलेल्या बेकायदेशीर बांधकामांची चौकशी करायला लागलो तर ती कशा पध्दतीने नष्ट होतील याचा विचार होणे आवश्यक आहे. तसेच मला असेही म्हणावयाचे आहे की, अशा प्रकारे चौकशीचा कार्यकाल लांबत गेला तर त्यातून असाही अर्थ निघतो की शासनच अशा बेकायदेशीर बांधकामांना प्रोत्साहन देत आहे असा माझा अनुभव आहे. मी शासनाकडे या विधेयकाच्या चर्चेच्या निमित्ताने अशी मागणी करतो की, जनतेला या चौकशीसाठी कोणतीही मुदतवाढ न देता ती चौकशी कधीपर्यंत पूर्ण होणार आहे, तसेच जनतेच्या पैशाची जी उधळपट्टी चालविली आहे ती थांबवून लवकरात लवकर चौकशी कशी पूर्ण होईल यासंबंधी निवेदन केले पाहिजे. एवढे बोलून माझे दोन शब्द पुरे करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी महापालिका क्षेत्रातील बेकायदेशीर बांधकामांच्या बाबतीतील प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला असून त्या अनुषंगाने त्यांनी "आदर्श सोसायटी" ची चौकशी करण्यासाठी जी समिती नेमली आहे त्या समितीवर होणाऱ्या खर्चाचाही मुद्दा उपस्थितीत केला आहे. आपणा सर्वांनाच माहीत आहे की, दोन्ही सभागृहांनी केलेल्या माणीचा आदर करुन शासनाने ही चौकशी समिती नियुक्त केली आहे. या समितीला मुदतवाढ जरी दिलेली असली तरी चौकशीचे काम पूर्ण करणे हे त्या चौकशी आयोगाच्याच मनावर असते. तरी देखील पुढील तीन महिन्याच्या आत ही चौकशी पूर्ण करण्यात येईल व त्या चौकशीचा अहवाल शासनाकडे कसा येईल यासाठी प्रयत्न केले जातील अशी मी ग्वाही देतो व हे विधेयक संमत करावे, अशी सभागृहाला विनंती करतो.

उप सभापती : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 (दोन्ही सम्मिलीत) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे विधानसभा विधेयक 53 संमत करावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2011 चे वि.स.वि.क्र.53 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक

L. A. BILL NO. XLIII OF 2011

(A BILL TO PROVIDE FOR THE MAINTENANCE OF CERTAIN ESSENTIAL SERVICES AND THE NORMAL LIFE OF THE COMMUNITY; AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्र. 43-विवक्षित अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करण्याकरिता, आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी विधेयक मांडते.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

प्रा. फौजिया खान : महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्र. 43-विवक्षित अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करण्याकरिता, आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

महोदय, यापूर्वी महाराष्ट्र राज्यात अत्यावश्यक सेवा परिरक्षण हा कायदा सन 2005 मध्ये शासनाने केला होता. त्या कायद्याची मुदत 26 मे, 2010 रोजी संपली असून कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपामुळे विशेष करुन अत्यावश्यक सेवांचे परिरक्षण व त्याच्याशी संबंधित असणाऱ्या मालकांचे कर्मचारी बेमुदत संपावर गेल्यास त्यामुळे वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्यामुळे जनतेचे दैनंदिन जीवनर अक्षरश: ठप्प होण्याची शक्यता असते. सध्या शासनाला सहाय्यभूत ठरत असलेला कुठलाही कायदा अस्तित्वात नाही त्यामुळे पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी असा कायदा करण्याचे प्रस्तावित आहे.

महोदय, आंदोलन करण्याचा अधिकार सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना असला किंवा त्यांच्या न्याय्य मागण्या व समस्यांचे निराकरण करण्याचा

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान .....

अधिकार लोकशाही पध्दतीने असला तरी मागण्या न्याय्य असतील तर महाराष्ट्र सरकार सुध्दा त्यांच्याकडे सहानुभूतीचाच दृष्टीकोन नेहमी ठेवत असते. या मागण्या रास्त असतील तर त्या ऐकून त्यांचे निवारण सलोख्याने करण्याचे प्रयत्न सुध्दा होत असतात. व्यवहार्य मागण्या असतील तर प्रश्नच नाही पण ज्यावेळी अव्यवहार्य किंवा अवाजवी मागण्या असतात आणि त्या मान्य करणे शक्य नसेल आणि समाजाच्या अत्यावश्यक सेवांवर त्याचा परिणाम होऊन जनतेची गैरसोय होत असेल, जनतेचे जीवन ठप्प होत असेल तर अशा वेळेस मात्र शासनाला पावले उचलणे आवश्यक असते. त्यासाठी कोणताही कायदा सध्या अस्तित्वात नसल्यानेच हा कायदा आणला आहे, त्याला सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करते.

प्रश्न प्रस्तुत झाला.

.....5

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, या कायद्याच्या माध्यमातून अनिवार्यता लक्षात घेऊन अव्यवहार्यता ठरविण्याचा अधिकार शासन आपल्या हातात घेत आहे आणि त्यातून या लोकशाही पध्दतीमध्ये एक नवीन गुलामगिरी निर्माण करीत आहे. घटनेने यादेशातील प्रत्येक नागरिकाला आपला हक्क मागण्याचा अधिकार दिलेला आहे. मग ती व्यक्ती ज्या स्थानावर असेल अथवा पदावर असेल त्या त्या पध्दतमीने आपला हक्क मिळविण्याचा अधिकार त्याला असतो. या देशात कामगार हा एक अविभाज्य घटक असून त्याच्या श्रमातून प्रत्येक गोष्टीची निर्मिती होते आणि ती समाजापर्यंत पोहचते. हे सर्व करीत असताना या कामगाराला त्याचे जीवनमान त्याच्या कुटुंबासह योग्य पध्दतीने जगता यावे यासाठी हा संघर्ष निर्माण होत असतो.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर जे कर्मचारी अगोदर 10-15 हजार रुपये पगार घेत होते ते लगेच 50-60 हजार रुपये पगार घेऊ लागले. त्यांना पगार मिळतो त्याचे दु:ख मला नाही परंतु जो कामगार अगोदर 4-5 हजार रुपये पगार घेत होता तो मात्र 7-8 हजार रुपयांच्यावर गेला नाही. जीवनमान वाढते आहे, जीवन मूल्य वाढते आहे, महागाई आक्रोश करीत आहे व त्यामध्ये घरामध्ये खाणारी तोंडे वाढलेली असतांना घरातील श्रम करणा-या व्यक्तीकडे, कुटुंब प्रमुखाकडे घरातील माणसे अपेक्षेने पाहत असतात त्यावेळेला त्याची अपरिहार्यता लक्षात घेऊन निर्माण होणारी व्यवहाराकरिता आंदोलनाला प्रोत्साहीत करीत असते. आंदोलक एकत्र येण्यासाठी कामगार नेता श्रम घेत असतो. त्यामुळे या विधेयकामध्ये "अव्यवहार्यता" हा जो शब्द वापरला आहे त्यासाठी मला हे सर्व सांगावे लागले आहे.

या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. जमा साहेब हे कामगार नेते आहेत. ते कामगार क्षेत्रातील पुढारी आहेत त्यामुळे या विधेयकावर त्यांनी विचार व्यक्त करावेत अशी मी विनंती केली होती. या विधेयकाच्या भल्या बुऱ्या आणि भविष्यात निर्माण होणाऱ्या गंभीर परिणामांचा विचार या कामगार नेत्यांनी या विधेयकाच्या अनुषंगाने करणे फार महत्वाचे आहे. त्यामुळे या विधेयकाला आमचा कडाडून विरोध आहे. छुप्या मार्गातून अत्यावश्यक सेवेच्या नावाखाली मालक धार्जिणे वेगळे धोरण आणण्याचा जो प्रयत्न या शासनाने चालवला आहे त्यास विरोध करण्यासाठीच मी उभा आहे. विधेयकामध्ये अत्यावश्यक सेवेचा अर्थ दिलेला आहे. विधेयकाच्या कलम 2 (क) मध्ये असे म्हटले आहे की, "जिच्या संबंधात राज्य विधानमंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे अशी उतारु किंवा माल, जमिनीवरुन किंवा पाण्यावरुन वाहून नेणारी कोणतीही परिवहन सेवा". कारखान्यासाठी जो कायदा केला जातो तो कायदा करण्याचा अधिकार राज्य शासनाला असतो. माझ्या कारखान्यात संप, टाळेबंदी, कामगारांना झोपवण्याचे, नेस्तनाबूत करण्याचे सामर्थ्य एका ओळीत असते.

विधेयकाच्या कलम 2 (क) च्या पोट कलम (दोन) मध्ये असे म्हटले् आहे की, "जिच्या संबंधात राज्य विधानमंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे अशी गॅस किंवा दूध किंवा पाणी किंवा वीज पुरवठा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

करण्याच्या संबंधातील कोणतीही सेवा." केंद्रशासना कडून सर्वसामान्यांना सिलेंडर मधून गॅस मिळतो परंतु मुंबई मध्ये महानगर गॅस कंपनीकडून गॅस घरापर्यंत दिला जातो. सुदैवाने महानगर गॅस सिलेंडर पेक्षा खूप स्वस्त आहे. त्यामुळे या कायद्यात महानगर गॅस येणार आहे काय? दूध, पाणी, वीज पुरवठा हे अत्यावश्यक सेवेमध्ये येत असेल तर या कायद्यात यासंदर्भात दंडाची तरतूद केलेली आहे. तर मग आज तुम्ही या सभागृहातून बाहेर पडल्यावर या राज्याचे वित्त व ऊर्जा मंत्री माननीय अजित पवार यांच्यावर ताबडतोब गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे. वीज ही अत्यावश्यक सेवेत येत असतांना ती बंद करण्याचा अधिकार कोणालाही नसतांना आमच्या राज्यातील जनतेला 16-16 तास अंधारात रहावे लागते व आमच्या जनतेला विजेपासून वंचित ठेवण्याचे काम या राज्याचे ऊर्जा मंत्री अजित पवार करीत आहेत. खरे म्हणजे त्यांच्यावर ताबडतोब गुन्हा दाखल केला पाहिजे अशी मी सुरुवातीलाच मागणी करतो. या विधेयकामध्ये तरतूद असल्यामुळे मी अशा प्रकारची मागणी करीत आहे.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, अत्यावश्यक सेवेची जी व्याख्या दिलेली आहे त्यातील कोणत्याही व्याख्येत माननीय नामदार अजित पवार साहेब बसत नाही त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी नामदार अजित पवार यांचा जो उल्लेख केलेला आहे तो कामकाजातून काढून टाकण्यात यावा अशी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी नवीनच फॅड निर्माण झालेले आहे. मंत्र्यांचे चेले, चपाटे, बुजुर्ग, शागिर्द लगेच उभे राहतात हे काही योग्य नाही. या ठिकाणी मी मंत्र्यांवर टीका करीत असून ती वैयक्तिक स्वरुपाची नाही. माननीय नारायण राणे यांचे नाव घेतले सन्माननीय सदस्य श्री. नवले धावत येणार हा काय प्रकार आहे ?

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, या ठिकाणी चेले, चपाटे नसतात तर सन्माननीय सदस्य असतात. समोरच्याला जेवढा स्वाभिमान असतो तेवढा प्रत्येकाला असतो हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय अजित पवार हे ऊर्जा खात्याचे मंत्री आहेत. वैयक्तिक रित्या माननीय अजित पवारांशी आमचे काहीही देणे-घेणे नाही. कोणाचेही नाव घेतले की, कोणी तरी उभा राहतो ही पध्दत बरोबर नाही. जबाबदारी मंत्र्यांची असते. आपण वकील आहात त्यामुळे वकिलीचा प्रश्न निर्माण झालेला आहे असे मला वाटते. तुम्हाला तुमच्या भाषणात काय सांगावयाचे ते सांगा. या विधेयकाच्या संदर्भात आपल्याला जे काही शवविच्छेदन करावयाचे आहे ते करा. सभागृहात आलेल्या कायद्याचे शवविच्छेदन केले जाते व विधेयकाची मांडणी योग्य की, अयोग्य आहे हे सांगण्याचा अधिकार आम्हाला असल्यामुळे आम्ही हे बोलत आहोत.

तालिका सभापती (रमेश शेंडगे) : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी ज्या नावाचा उल्लेख केलेला आहे तो कामकाजातून काढून टाकण्यात यावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी ज्या नावाचा उल्लेख केलेला आहे त्या नावाचा उल्लेख तुम्हाला कामकाजातून काढून टाकता येणार नाही. श्री. अजित पवार हे ऊर्जा मंत्री असल्यामुळे मी त्यांच्या नावाचा उल्लेख केलेला आहे. मी त्यांचा उल्लेख व्यक्ती म्हणून केलेला नाही. या सदनात माननीय अजित पवार ऊर्जा मंत्री म्हणून बसत असतात. एखाद्या खात्याच्या मंत्र्याकडून भ्रष्टाचार झाला तर संबंधित मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागत असतो. संपूर्ण मंत्री मंडळाला राजीनामा द्यावा लागत नाही.

तालिका सभापती (रमेश शेंडगे) : या विषयाच्या संदर्भात महाराष्ट्र विधानपरिषद नियम 35 मध्ये असे म्हटले आहे की, "ज्या सदस्यास एखाद्या व्यक्तीवर मानहानिकारक किंवा अपराधारोपाच्या स्वरुपाचे कोणतेही अभिकथन ज्या दिवशी करावयाचे असेल त्या दिवशीच्या आदल्या कामकाजाच्या दिवशी त्या सदस्याने सायंकाळी 5 वाजेपर्यंत सभापतीस व तसेच चौकशी करुन उत्तर देण्याच्या प्रयोजनासाठी संबंधित मंत्र्यांस, आवश्यक त्या कागदपत्रांसह लेखी पूर्वसूचना दिल्याशिवाय त्या सदस्यास कोणत्याही व्यक्तीविरुद्ध मानहानिकारक किंवा अपराधारोपात्मक स्वरुपाचे कोणतेही अभिकथन करता येणार नाही".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, एखाद्या मंत्र्याच्या कामाबद्दल, गौरवात्मक किंवा त्यांच्यावर टीकात्मक बोलावयाचे असेल तर त्यासाठी नोटीस द्यावी लागत नाही. एखाद्यावर व्यक्तिगत भ्रष्टाचाराचे आरोप असेल, निंदा नालस्ती असेल तर त्यासंदर्भात नोटीस द्यावी लागत असते एवढी जाण आम्हाला आहे.

तालिका सभापती (रमेश शेंडगे) : आपण ज्या नावाचा उल्लेख केलेला आहे त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घेतल्यामुळे मी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 35 वाचून दाखविला आहे.

श्री. दिवाकर रावते : मी कोणावरही बोलू शकत नाही. या विधेयकाचे जे गांभीर्य आहे तेच सांगत आहे. मी कोणाला अटक करावयास सांगत नाही. या ठिकाणी मी केवळ कायद्याचे गांभीर्य वर्णन करतो आहे.

श्री. हेमंत टकले : सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब विधेयकावर आपले विचार व्यक्त करीत आहेत. ज्या पध्दतीने त्यांना विषय मांडावयाचा असतो त्या पध्दतीने ते विषय मांडत असतात. परंतु त्यांनी आपल्या भाषणात काही संसदीय शब्दाचा वापर केलेला आहे. परंतु शक्यतोवर कोणत्याही प्रकारे अवमानकारक, निंदानालस्ती कारक उल्लेख टाळला तर या विधेयकावरील चर्चा अधिक गंभीरपणे होऊ शकेल असे मला वाटते.

यानंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

त्यांनी शव विच्छेदन हा शब्द वापरला आहे. हा शब्द संसदीय असू शकेल. विधेयकासंबंधी त्यांनी शव विच्छेदन हा शब्द वापरावा का असा प्रश्न निर्माण होतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांची शब्द संपदा फार मोठी आहे. त्यांनी तेवढ्या मर्यादेत असे उल्लेख काढलेत तर ते सभागृहाच्या एकूण संवादाच्या दृष्टीने चांगले होतील असे आम्हाला वाटते म्हणून त्यांनी याचा विचार करावा अशी आमची त्यांना विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कायद्याचे अज्ञान असले तरी सुसंस्कृतीचे, साहित्यिक भान असलेले आमचे सन्माननीस सदस्य श्री.हेमंत टकले हे नाट्य परिषदेचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांनी शाब्दिक दृष्ट्या आम्हाला गुंग करून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. हे ठीक आहे. मला त्यांनी असे सुचविले की, मंत्र्यांचे नाव घेऊ नका. खात्याचे नाव घ्यावे. म्हणजे मालक गेला तरी चालेले. असे घडले तर काय गुन्हा नोंदवावा व काय दंड आकारावा यावर मी पुढे बोलणार आहे, असे मी म्हणालो. त्यानंतर अत्यावश्यक सेवेचे मी वर्णन करीत असताना माननीय श्री.हेमंत टकले साहेबांना सांगू इच्छितो की, मी गॅसचे वर्णन करताना त्यांचे नावे घेतले काय, दुधाचा उल्लेख करताना मी त्यांचे नाव घेतले काय, मी त्यांचे नाव घेऊ शकतो पण इथे त्यांचा काही संबंध नाही. का घेऊ शकतो हे आपणाला देखील माहित आहे. पाण्याचा मुद्दा उपस्थित केला तेव्हा त्यांचे नाव घेतले काय, पाणी पुरवठा करण्याचे काम हे स्थानिक स्वराज्य संस्थेचे आहे. महाराष्ट्रातील वीज पुरवठा हा शासनाच्या वीज कंपन्या मार्फत केला जातो. एखाद्या गोष्टीला जो सर्वोच्च स्थानावर असतो तो जबाबदार असतो असे आपण गृहीत धरतो. गुन्हेगाराला पकडल्यानंतर तुझा गॉडफादर कोण आहे ते सांग नाही तर फटके मारू असे पोलीस सांगतात. वीज सेवा ही अत्यावश्यक करण्यात आली आहे. कामगारांच्या, पुढाऱ्यांच्या वक्तव्यामुळे संप झाल्यामुळे एखादी सेवा खंडित झाली तर त्यास कोणाला जबाबदार धरण्यात येणार आहे ?

ह्या विधेयकावर मी बोलत असताना आपण काहीही कारण नसताना विधान परिषदेचा नियम वाचून दाखविला आहे. या विधेयकात मालक याचा देखील उल्लेख आहे. जसा कामगार, पुढारी जेलमध्ये जाईल तसा मालक देखील जेलमध्ये जाईल. आता वीज पुरवठ्याचा मालक कोण आहे ? त्या खात्याचा मंत्री हा मालक असतो. म्हणजे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे तो त्यास

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

जबाबदार असतो. म्हणूनच मी नाव घेत नाही. ऊर्जा खात्याचे जे मंत्रिमहोदय आहेत त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा लागेल, असे मी म्हणेन. गुन्हा दाखल करावा असा आदेश मी देऊ शकत नाही. कारण तो माझा अधिकार देखील नाही. मी या विधेयकाचे गांभीर्य काय असेल त्याचे वर्णन करीत आहे आणि तुमची तर हिंमत सुद्धा नाही. बाहेर गेल्यावर साध्या कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल होत नाही. तर बाकीचे काय घेऊन बसला आहात ? आता मी नाटकाच्या फॉर्ममध्ये सांगितले असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना पटले असणार. रूग्णालय, दवाखाना, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता यांचा समावेश आहे. राज्याच्या कामकाजाच्या संबंधित कोणतीही सरकारी सेवा हा शब्द सगळीकडे सामाईक आहे. पद आणि नोकरी आणि तसेच राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सचिवालयीन कर्मचाऱ्यांच्या पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती असा देखील विधेयकात उल्लेख आहे. म्हणजे आता सभागृहात आपल्याला समोर नियम पुरविण्याचे काम करणारे जे आहेत त्या सगळ्यांचा यात समावेश होतो. विधान मंडळ नेहमी बाजूला असते. तसेच, उच्च न्यायालयाचे अधिकारी व सेवक यांचा देखील समावेश या विधेयकात करण्यात आला आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हे संपाबद्दलचे विधेयक आहे. वीज ही अत्यावश्यक सेवा आहे असे सन्माननीय सदस्य सांगत आहेत. मंत्रिमहोदय हे कुठल्याही संपावर आता पर्यंत गेलेले नाहीत, हे मला येथे नमूद करावयाचे आहे. आपण सेक्शन 6 वाचावा. शॉर्टेज ऑफ पॉवर आणि नॅचरल कलॅमिटीज वगळता सर्व सेवा अत्यावश्यक सेवेमध्ये येत आहेत. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी सेक्शन 6 वाचावा असे मला सांगावयाचे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात विधेयक मांडताना त्या विधेयकाचे ज्ञान मंत्रिमहोदयांना असायला हवे. दुर्दैवाने येथे खुलासा करून आपण किती अज्ञानी आहोत हे सांगितले. त्याची चिरफाड मी पुढे करीन. मी विधेयकावर बोलत असतानाच त्यांनी मध्येच खुलासा केला आहे की, आमचा मंत्री यात दोषी नाही. ही जी अहमहमिका लागली आहे ती मला काहीच कळत नाही. यात मंत्र्यांनी भर टाकता कामा नये. मी येथे उदाहरण दिलेले आहे. मी कोणालाही दोष देत नाही. मी फक्त गांभीर्य लक्षात आणून देत आहे. या देशातील प्रत्येक

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

नागरिकाला आपल्या परिने जगण्याचा अधिकार असला तरी आता काय निर्बंध येत आहेत हे समजले पाहिजे. त्या निर्बंधासाठी मी गुलामगिरी शब्द वापरला तर ते चुकीचे होणार नाही. गुलामगिरी हा माझा शब्द मी माझ्या परिने वापरण्याचा प्रयत्न करीत आहे. तो योग्य असेल असे माझे म्हणणे देखील नाही. मला जसा हत्ती दिसतो त्या प्रमाणे मी वर्णन करीत आहे. माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी जे मत व्यक्त केले ते सुंदर आहे. मालकावर आर्ग्युमेंट करण्यासाठी त्यांनी मला टॉनिक दिल्याबद्दल बरे वाटले.

सभापती महोदय, राज्याच्या कामाकाजाच्या संबंधातील कोणतीही सरकारी सेवा करणारे अधिकारी हे आता अत्यावश्यक सेवेमध्ये आले आहेत. मात्र, सभापती सांगतील ते कर्मचारी सोडून असा देखील समावेश या विधेयकात करण्यात आला आहे. म्हणजे यातून पट्टेवाले सुटले. कारण ते माझे आहेत. त्यांना आत घ्यायचे नाही. माननीय सभापती महोदय, माननीय उप सभापती महोदय असे सुरूवातीला ते पुकारतात म्हणून त्यांना यातून वगळलेले आहे, असा या बिलाचा सरळसरळ अर्थ आहे. मी आता सभापतींचा उल्लेख केला म्हणून कृपा करून कोणीही उभे राहू नका. या बिलामध्ये विधान परिषदेचे सभापती आणि विधान सभेचे अध्यक्ष असा उल्लेख झालेला आहे. त्यांनी सभागृहात बसलेल्या अधिकाऱ्यांपैकी चव्हाण, मयेकर यांना सोडून द्यायचे ठरवले तर मग ते वाचलेत. असा या बिलाचा अर्थ आहे.

स्थानिक प्राधिकरणाच्या कामकाजाशी संबंधित असलेली कोणतीही सेवा किंवा पद असा उल्लेख विधेयकात करण्यात आला आहे. कलम 2 (क) मधील पोट-कलम (सहा) हा मिश्किल आहे. यात असे नमूद केले आहे की, ज्या बाबींसंबंधी राज्य विधानमंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे अशा बाबींशी संबंधित असलेल्या ज्या कोणत्याही इतर सेवेतील असा उल्लेख आहे. म्हणजे इतर सेवेतील अधिकार मोकळा झाला. इतर कोणती सेवा आहे हे सरकारने ठरवायचे आहे. या व्याख्येत असेही म्हटले आहे की, इतर सेवेतील किंवा पदातील किंवा नोकरीतील किंवा नोकऱ्यांच्या वर्गातील संपामुळे राज्य शासनाचे मते कोणतीही सार्वजनिक सुरक्षितता राखण्यास किंवा समाजजीवनास अत्यावश्यक असलेल्या वस्तुंचा पुरवठा व सेवा चालू राहण्यास बाधा पोहोचेल असा वर्ग. म्हणजे आताच उल्लेख केल्याप्रमाणे अनाथ आश्रमातील मुलींकरिता 55 लाख रूपयाचे पॅकेज

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

खरेदी करण्याचे ठरविले तर मग ती सेवा अत्यावश्यक झाली. त्या फॅक्टरीमध्ये काही कामगारांचा संप झाला तर तो मोडून काढण्याचा अधिकार या एका कायद्यामुळे निर्माण झाला आहे. अत्यावश्यक सेवा ठरविण्याचा अधिकार शासनाने स्वत:कडे घेतला आहे. ती सेवा अत्यावश्यक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा भाग नंतरचा आहे. फॅक्टरी मालकाने आर्ग्युमेंट करून तुम्हाला पटवून दिले आणि तुमची मानसिकता झाली की हा मालक बरोबर बोलतो आहे, त्यामुळे अत्यावश्यक सेवेमध्ये हा संप मोडून काढला पाहिजे, असे शासनाचे मत होऊ शकेल. असे सगळे चित्र या विधेयकामध्ये आहे.

पोट कलम (सहा) मध्ये असेही नमूद केले आहे की, सेवा चालू राहण्यास बाधा पोहोचेल किंवा समाजास गंभीर स्वरूपाच्या अडचणी येतील.... किती मोकळी वाक्ये आहेत ?

यानंतर श्री.सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

यामध्ये काहीही समाविष्ट करता येईल. कोणत्या खाजगी आस्थापनांना त्यामध्ये आणता येईल अशाप्रकारची व्यापक व्याख्या यामध्ये निर्माण करण्यात आली आहे. सर्वसाधारणपणे महानगरपालिका, नगरपालिका किंवा राज्य शासनाशी संबंधित सेवा यांच्याशी संबंधित हा कायदा आहे काय? तसे नाही तर या कायद्याची व्याप्ती प्रचंड करण्यात आली आहे. या तरतुदीमध्ये असे म्हटले आहे की, "कोणतीही सार्वजनिक सुरक्षितता राखण्यास किंवा समाज जीवनास अत्यावश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा व सेवा चालू राहण्यास बाधा पोहोचेल किंवा समाजास गंभीर स्वरुपाच्या अडचणी येतील आणि या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेव्दारे जी अत्यावश्यक सेवा असल्याचे जाहीर करील अशी कोणतीही इतर सेवा, पद नोकरी किंवा त्यांचा वर्ग असा आहे" अशाप्रकारे या व्यापक करण्यात आलेल्या तरतुदीची व्याख्या या ठिकाणी करण्यात आलेली आहे. त्यानंतर "संप" याचा अर्थ काय, हे पुढे सांगितले आहे? या विधेयकातील प्रत्येक तरतुदीमध्ये मी जाणार नाही, याचे कारण प्रत्येक तरतुदीची फोड करुन या ठिकाणी सांगावे लागेल.

सभापती महोदय, या विधेयकाच्या कलम (ख)(दोन) मध्ये असे म्हटले आहे की, "कोणत्याही अत्यावश्यक सेवेतील काम थांबवण्यात किंवा बऱ्याच प्रमाणात ते कमी होण्यास ज्या कोणत्याही इतर वर्तणुकीची परिणती होण्याचा संभव असेल किंवा होईल अशी कोणतीही इतर वर्तणूक". सर्वसाधारणपणे कोणत्याही निर्मिती व्यवसायामध्ये कामगार संघटना आणि मालकाचे ॲग्रिमेंट झालेले असते. त्यांच्या संबंधामधून जी निर्मिती असते ती मालकाला हवी तशी होत असते. ज्यावेळी त्यांच्यामध्ये कटुता येते त्यावेळी "नियमानुसार काम" हा बडगा उगारला जातो. मला सरकारी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत गंमत वाटते. ते कधी-कधी "नियमानुसार काम" जाहीर करतात. मला प्रश्न पडतो की, विधिमंडळातील काम नियमानुसार होत नाही, या ठिकाणी त्यांची कामाची चंपी होत असते, येथील कर्मचारी उशिरा आपल्या घरी जातात, त्यांचे काम वेगळया स्वरुपाचे आहे त्याला पर्याय नाही. परंतु मंत्रालयातील, सरकारी खात्यातील कर्मचारी व त्यांच्या संघटनेचे नेते कधी कधी "नियमानुसार काम" जाहीर करतात. मुळात ते काम कधी करतात हा जसा प्रश्न आहे त्यामध्ये पुन्हा "नियमानुसार काम" कसे करतात? हा कधीही न सुटलेला प्रश्न आहे. ते कर्मचारी अत्यावश्यक सेवेमध्ये येणार नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

मी आपल्याला एक उदाहरण देतो. बजाज कंपनीमध्ये एकदा संप झाला. एका शिफ्टमध्ये दिवसाला एका पट्टयावर 80 स्कूटर काढावयाच्या ठरलेले असते, परंतु एके दिवशी 81 वी स्कूटर निघाली. त्यांनी फक्त पाच सेकंद त्या पट्टयाला वेग दिल्याबरोबर एक स्कूटर जास्त निघाल्याबरोबर कर्मचाऱ्यांनी संप पुकारला. त्यांच्याकडे नियमानुसार 60 स्कूटर निघतात. संघटनेबरोबर झालेल्या करारानुसार कर्मचाऱ्यांना बोनस आणि पगारवाढ मिळाल्यामुळे कंपनीला 80स्कूटर देण्याचे ठरविण्यात आले. परंतु नियमानुसार ठरल्यानंतर 81 वी स्कूटर निघाल्याबरोबर कंपनीमध्ये एक महिना संप पुकारण्यात आला. त्यावेळी मी मराठवाडयात, संभाजीनगरला होतो. एक जास्तीची स्कूटर काढल्याबरोबर संप सुरु करण्यात आला व त्यानंतर स्कूटरचे प्रॉडक्शन बंद पडले. या ठिकाणी "अत्यावश्यक" हा शब्द असल्यामुळे व त्याची व्याप्ती आपल्याला समजावी या करिता मी बजाज कंपनीचे उदाहरण दिले. "कोणत्याही अत्यावश्यक सेवेतील काम थांबवण्यात किंवा बऱ्याच प्रमाणात ते कमी होण्यास म्हणजेच "नियमानुसार काम" ज्या कोणत्याही इतर वर्तणुकीची परिणती होण्याचा संभव असेल "संप म्हणून धरली जाईल" किंवा होईल अशी कोणतीही इतर वर्तणूक". या ठिकाणी कामगारांच्या अधिकारावर अनिर्बंध निर्बंध आणणारा असा हा कायदा आहे....

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 7.00 वाजेपर्यन्त होती. सभागृहापुढील कामकाज संपेपर्यन्त सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे एक अतिशय चांगले विधेयक असल्यामुळे मला या विधेयकावर दोन तास बोलावयाचे आहे. त्याचप्रमाणे अनेक सन्माननीय सदस्यांनाही बोलावयाचे आहे. त्यामुळे माझे भाषण आपण ऑन लेग ठेवावे अशी माझी विनंती आहे.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, माननीय सदस्य को आप ऑन लेग रखिए. इतनी जल्दी यह बिल पूरा नहीं होगा. मेरा कहना है कि माननीय सदस्य को ऑन लेग रखकर यह बिल कल सुबह फिर से शुरु करें, यही मेरा अनुरोध है.

तालिका सभापती : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 15 मिनिटे वाढविण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 15 मिनिटामध्ये हे विधेयक होणार नाही. सभागृहातील सर्व माननीय सदस्यांनी कामकाज थांबवून हे विधेयक उद्या घ्यावे अशी मागणी केली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

तालिका सभापती : ठीक आहे, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे भाषण हे विधेयक ज्या वेळी चर्चेला येईल त्या वेळी पुढे सुरु राहील. सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून उद्या मंगळवार, दिनांक 20 डिसेंबर, 2011 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायं. ठीक 7.01 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 20.12.2011 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही